'थॉमस पेन'चें

चरित्र

वा. दा. मुंडले.

दोन रुपये.

विजय प्रेस, पुणें.

चैतन्योत्पादक ग्रंथमाला–पुस्तक ३ रें.

थॉमस पेनचें चरित्र

लेखक

वासुदेव दामोदर मुंडले

नेपोलियन, काव्हूर, बिस्मार्क, मॅडम रोलंद, वुइल्यम दि सायलेंट
वगैरे पुस्तकांचे कर्ते.

शके १८४६] प्रथमावृत्ति [सन १९२४

चैतन्योत्पादक ग्रंथमाला--इसलामपूर

किंमत दोन रुपये

प्रकाशक
वासुदेव दामोदर मुंडले
संपादक, चैतन्योत्पादक ग्रंथमाला
इसलामपूर–सातारा.

मुद्रक
अनंत सखाराम गोखले,
'विजय प्रेस', ५७० शनवार, पुणें.

अनुक्रमणिका.

थॉमस पेन



जन्म
२९ जाने. १७३७.

मृत्यु
८ जून १८०९.

"The creation of the heart of Paine, historicaly tracable, is so wonderful, its outcome seems so Supernatural that in earlier ages he might have been invested with fable, like some *Avatar*."

[Dr. M. D. Conway's remarks on 'the Age of reason.']

थॉमस पेनचें चरित्र

प्रकरण १ लें.

अमेरिकेस जाण्यापूर्वी

वाक्स्वातंत्र्य, लेखनस्वातंत्र्य व लोकस्वातंत्र्य (व्यक्तिस्वातंत्र्य) यांचें एकेकाळीं माहेरघर म्हणून गाजलेला जो इंग्लंड देश, त्या देशांतील थेटफर्ड* नामक एका छोट्या गांवांत आमच्या चरित्रनायकाचा जन्म झाला. त्या दिवशीं इ० स० १७३७च्या जानेवारी महिन्याची २९ तारीख होती. त्याच्या बापाचें नांव जोसेफ पेन असून आईचें फ्रॉन्सिस फ्रॅकॉक असें होतें. जोसेफ पेन हा फार सुशील, कुलवान्, अब्रूदार व नेकीचा गृहस्थ होता. थॉमस पेनच्या लेखांतून याच्याविषयीं प्रेम व आदर व्यक्त करणारे

---

* हा गांव लंडन शहराकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यावर असून लंडनच्या प्रवासांतील एक प्रमुख मुक्कामाची जागा म्हणून त्यावेळीं प्रख्यात होता. इंग्लंडांतलें पहिलें वर्तमानपत्र या गांवीं निघालें. त्याचें नांव लंडन गॅझेट असें होतें. त्या गांवातर्फे पार्लमेंटमध्यें असणाऱ्या सर जोसेफ वुइल्यमसन् नामक गृहस्थानें तें काढलें होतें. त्यावेळीं कोणतेंही पुस्तक अथवा पत्र प्रसिद्ध करण्याचा हक्क केवळ राजाचे हातीं होता. इ० स० १६७४ त जोसेफ हा स्टेट सेक्रेटरी झाला. तेव्हां त्यानें पांच हजार पौंडांस हा हक्क विकत घेतला! याच हकाच्या जोरावर त्यानें मिल्टनचा खिश्चन डॉक्ट्रीन हा ग्रंथ छापण्यास आला असतां तसाच दाबून ठेवला. (कारण त्यांतील मतें व विचारसरणी तत्कालीन धर्मसमजुतींच्या विरुद्ध होती.) पुढें दीडशें वर्षांनीं हा ग्रंथ उजेडांत आला !

अनेक उल्लेख आढळून येतात. जोसेफचें घराणें, इंग्लंडांत त्यावेळीं प्रसिद्ध असलेल्या क्केकर* पंथाचें अनुयायी होतें; जोसेफ पेन हा त्या पंथाचे नियम पाळीत होता कीं नाहीं, याबद्दल मतभेद आहे; परंतु त्याचा बाप म्हणजे थॉमस पेनचा आजा हा मात्र त्या पंथाचा कट्टा अनुयायी व श्रद्धाळु भक्त होता. त्यामुळें क्केकर लोकांच्या ठायीं असलेली परोपकारबुद्धि, श्रेष्ठ प्रकारचें शील, नीतिमत्ता, सौजन्य आणि मार्दव इत्यादि गुण जोसेफ पेनच्या अंगीं पूर्णपणें वसत होते. थॉमस पेनच्या अंगीं हे गुण बऱ्याच अंशानें उतरले होते. थॉमसचा जन्म झाला त्यावेळीं युरोपची स्थिति जवळजवळ अर्धवट रानटीपणाची होती. धर्मभोळेपणा व अनियंत्रित राजसत्ता यांचें सर्वत्र साम्राज्य होतें. त्यामुळें सद्गुण व सदसद्विवेकबुद्धि हीं अज्ञान व दुर्गुण या दोन काळ्याकुट्ट ढगांनीं ग्रासलीं जाऊन सज्जन व सत्याग्रही लोकांचा छळ होत असे. धर्मासंबंधानें ज्या ठरीव व भोळसट—वेडगळपणाच्या—समजुती होत्या, त्यांविरुद्ध जर कोणीं ब्र काढला तर त्यास भयंकर शासन होत असे. थॉमस पेन ज्या थेटफर्ड गांवांत जन्मला, त्या गांवांत असे प्रकार वारंवार होत व त्यांचा ह्या चौकसबुद्धीच्या व कोमल मनाच्या मुलावर विलक्षण परिणाम होत असे. त्याचप्रमाणें थेटफर्ड येथें क्केकर लोकांच्या एका संस्थेच्या वारंवार भरणाऱ्या सभांतील भाषणांचाही त्याच्या अंतःकरणावर ठसा उमटत असे. त्याच्या बुद्धीचा व मनाचा विकास होत असतांना ह्या सर्व गोष्टी त्याच्या डोळ्यांसमोर उभ्या होत्या व त्यांच्या अनुरोधानेंच पुढें त्याचे विचार व मतें हीं बनत गेलीं.

थॉमस पेनला लिहितां वाचतां येऊं लागल्यावर थेटफर्ड येथें सर रिचर्ड फुल्मार्स्टनच्या नांवानें चालू असलेल्या ग्रामरस्कूलमध्यें तो शिकावयास जात असे. त्याचें शिक्षण, बाललीला यांसंबंधीं फारशी माहिती उपलब्ध नाहीं. तथापि त्याच्या लेखांतून पुढील त्रोटक माहिती सांपडते:—

---

* आपल्याकडील परोपकारी व सदाचरणरत अहिंसावादी भक्तिमार्गी लोकांप्रमाणेंच युरोपमध्यें त्यावेळीं जो एक विशिष्ट धर्मपंथ होता त्यास क्केकरपंथ म्हणत असत. आमच्याकडील भक्तिमार्गाच्या सांप्रदायांत जसे संत होऊन गेले, त्याप्रमाणें ह्या क्केकरपंथांतही कांहीं चांगले संत होऊन गेले.

" माझा बाप क्वेकर पंथाचा असल्यामुळें सुदैवानें मला उत्तम प्रकारचें नैतिक शिक्षण व बरेंचसें उपयुक्त ज्ञान प्राप्त झालें. माझ्या मनाचा स्वाभाविक कल शास्त्र (Science) या विषयाकडे होता. तसेंच कविता करण्याकडेही माझी कांहींशी प्रवृत्ति होती व त्याविषयींची थोडीबहुत पात्रताही माझ्या अंगीं होती. परंतु कवितेची प्रवृत्ति मनुष्यास कल्पनेच्या वातावरणाकडेच विशेष नेण्याची असल्यामुळें मीं ती प्रवृत्ति दाबून टाकली."

लहानपणीं पेननें ज्या कविता केल्या त्यांपैकीं एका मेलेल्या कावळ्यास बागेंत पुरल्यावर त्यास अनुलक्षून त्यानें केलेली पुढील कविता अस्तित्वांत आहेः—

" Here lies the body of john crow
who once was high, but now is low;
Ye brother crows take warning all,
For as you rise, so must you fall."

यावेळीं थॉमस पेनचें वय आठ वर्षांचें होतें. क्वेकरपंथाच्या मतांचा व क्वेकर लोकांच्या आचरणाचा पेनच्या मनोवृत्तींवर इतका परिणाम झाला कीं, त्याच्या एका चरित्रकारानें, 'क्वेकरपंथ नसता तर थॉमस पेन झालाच नसता' असे उद्गार काढले आहेत. क्वेकर लोकांची राहणी अगदीं साधी असे व तीच संवय थॉमस पेनला लागली. पत्ते खेळणें, मौजा मारणें, नाट्य पहाणें या गोष्टींचा त्याला लहानपणापासूनच कंटाळा होता. तो गणित विषयांतही चांगला प्रवीण असल्याचा दाखला सांपडतो. उपरोक्त 'ग्रामरस्कूल'मध्यें तो रेव्हरंड वुइल्यम नोलर याच्या हाताखालीं शिकत असतां त्या शिक्षकानें त्यास एका लष्करी जहाजावरील आपलीं अचाट कृत्यें सांगितलीं. तीं ऐकून, 'आपणही अशाच एखाद्या जहाजावर जावें' असें पेनच्या मनांत येई; परंतु तो लहान असल्यामुळें त्याचा हा विचार कृतींत उतरण्यासारखा नव्हता. पेनच्या बापास एक लहानशी शेतवाडी होती; आणि त्याशिवाय त्यानें कमरबंध (Stays) शिवण्याचा व विकण्याचा धंदा चालविला होता. आपल्या मुलास वयाच्या तेराव्या वर्षी त्यानें शाळेंतून काढून ह्या धंद्यांत घातलें. थॉमस पेननें सुमारें पांच वर्षें ह्या कामांत

घालविलीं व नंतर एके दिवशीं टेरर नांवाच्या आगबोटींतून दूरदेशीं प्रयाण करण्याचा बेत करून तो त्या आगबोटींत येऊन दाखल झाला. परंतु आगबोट निघण्यापूर्वीच त्याच्या बापानें तेथें येऊन त्यास परत घराकडे नेलें. जोसेफ पेननें प्रेमबुद्धीनें आपल्या मुलास जहाजावरून परत आणलें खरें; पण थेटफर्ड येथें त्या मुलाच्या मनाजोगता उद्योग न मिळाल्यामुळें तो फिरून (इ० स० १७५६) एका लष्करी जहाजावर जाऊन नोकरीस राहिला. यावेळीं इंग्लंड व फ्रान्स यांचें युद्ध जुंपलें होतें. तेव्हां लष्करी जहाजावर जाऊन आपलें नशीब काढण्याची ही उत्कृष्ट संधी आहे असें वाटून तो कॅप्टन मेंडझ् याचा आश्रय करून 'किंग ऑफ प्रशिया' नांवाच्या लढाऊ जहाजावर शूरपणाचीं अचाट कृत्यें करून दाखविण्याच्या हेतूनें गेला. या सफरीचा परिणाम काय झाला तें कळण्यासारखी माहिती उपलब्ध नाहीं. परंतु त्याच्या वयाच्या विसाव्या वर्षीं तो फिरून लंडन येथें मि० मॉरिस नामक स्टे-मेकरच्या दुकानांत काम करीत असल्याचा दाखला सांपडतो. तेथें तो दोन वर्षें होता. त्या कालांतील आयुष्यक्रमासंबंधानें त्यानें पुढील उल्लेख केलेला आहे. "मला अनुकूलता प्राप्त होतांच मीं दोन ग्लोब विकत घेतले व मार्टिन आणि फर्ग्युसन यांचीं तत्त्वज्ञानपर व्याख्यानें ऐकिलीं. नंतर लवकरच रॉयल सोसायटीचा सभासद व ज्योतिर्विद डॉ० बेविस याचा माझा परिचय झाला." इ० स० १७५८ त पेन हा डोव्हर येथील ग्रेस नामक स्टे-मेकरच्या दुकानांत नोकर होता; व इ० स० १५५९ त (एप्रिल) केंट परगण्यांतील सँडविच येथें त्यानें कमरबंध (Stays) तयार करण्याचें स्वतःचें दुकान घातलें. या गांवांत असतांना, तो आपल्या खोलीमध्यें लोक जमवून त्यांस आपल्या स्वतंत्र धर्ममतांचा उपदेश करीत असे, अशी आख्यायिका आहे. तेथें असतांनाच त्यानें आपल्या वयाच्या बाविसाव्या वर्षीं मेरी लँबर्ट नांवाच्या एका निराश्रित गरीब मुलीशीं विवाह केला (इ० स० १७५९). लग्न झाल्यावर तो डोलफिन के येथें राहूं लागला; परंतु तेथें त्याचा धंदा बरोबर चालेना; म्हणून तो मारगेट येथें जाऊन राहिला. ह्या ठिकाणीं इ० स० १७६० त त्याची बायको वारली. त्यानंतर स्टे-मेकरचा धंदा सोडून देऊन त्यानें अबकारीखात्यांत शिरण्याचा विचार केला. त्यानें आपला हा विचार

बापास कळविला व बापाची त्यास संमति मिळतांच तो लंडन येथें त्या कामाचें शिक्षण मिळविण्याकरितां गेला. तेथें कांहीं महिने शिक्षण संपादिल्यावर त्याची थेटफर्ड येथेंच अबकारी खात्यांत नेमणूक झाली(इ०स०१७६१). येथें असतांना त्यानें शास्त्रीय ज्ञानाचा अभ्यास चालू ठेवला होता. १७६२ त त्याची नेमणूक ग्रँथाम येथें झाली व इ० स० १७६४ त आल्फर्ड येथें झाली. याप्रमाणें, थॉमस पेन आपल्या वयाच्या पंचविसाव्या वर्षी, ज्या अबकारी कायद्यामुळें अमेरिकेच्या स्वातंत्र्याचा मार्ग तयार होत होता, ते कायदे अंमलांत आणण्याचें काम करीत होता! पोट व शास्त्रज्ञान यांच्यामागें लागलेल्या थॉमस पेनला या वेळीं राजकारण अथवा राजशास्त्र याची फारशी कल्पना नव्हती! यासंबंधानें त्यानें स्वतःच पुढील उद्गार लिहून ठेवले आहेतः—" I had no disposition for what is called politics. It presented to my mind no other idea than is contained in the word jockeyship."* अशा मनुष्याच्या हातून पुढें राजशास्त्र व धर्मशास्त्र यांसंबंधीं अत्युच्च, उदात्त व उन्नत अशीं तत्त्वें प्रतिपादिलीं जातील असें कोणाच्या स्वप्नांतही आलें नसतें. आणि म्हणून थॉमस पेनच्या पुढील चरित्रक्रमाचा विचार करणारास 'ईश्वरी संकल्प' म्हणून कांहीं चीज आहे ही गोष्ट कबूल केल्यावांचून गत्यंतर नाहीं.

थॉमस पेन ज्या खात्यांत होता त्या अबकारी खात्यांतील नोकरांची स्थिति फारशी समाधानकारक नव्हती व काम मात्र फार जोखमीचें व त्रासाचें होतें. तेव्हां साहजिकच त्या कामीं नोकर लोकांच्या हातून कांहींसा हलगर्जीपणा होत असे. अशाच कांहीं कारणावरून इ० स० १७६५ त त्यास कामावरून कमी करण्यांत आलें. नंतर डिस् एथें एका स्टे-मेकरची चाकरी त्यानें पत्करली; परंतु तेथील कामकऱ्यांबरोबर त्याचें जमेनासें झाल्यामुळें तो लिंकनशायरला निघून गेला. तेथून त्यानें आपली गेलेली नोकरी (अबकारी खात्यांतील) मिळविण्याचा प्रयत्न केला. ज्या जागेची प्राप्ति खर्च भागण्याइतकीही (बत्तीस पौंड) नव्हती ती जागा पुन्हां मिळण्याबद्दल आपल्या वयाच्या एकूणतिसाव्या वर्षी ज्या अर्थी थॉमस पेन प्रयत्न करितो,

---

* राजकारण म्हणून ज्याला म्हणतात त्याकडे माझी प्रवृत्ति नव्हती.

त्या अर्थी ह्या वयापर्यंत,त्याच्या ठिकाणीं असलेल्या गुप्त प्रतिभेची व सामर्थ्याची जाणीव त्यास उत्पन्न झालेली नव्हती हें उघड आहे. ही गोष्ट खरोखरच आश्चर्य करण्यासारखी आहे. इ०स० १७६६ त लंडनमध्यें मि० नोबल नांवाच्या गृहस्थाचे ताब्यांत असलेल्या एका शाळेंत दरसाल पंचवीस पौंडांवर, इंग्रजी शिकवून, तो पोटाची खांच भरीत राहिला होता. यावेळीं त्याची सांपत्तिक स्थिति फारच निकृष्ट अशी होती. इ० स० १७६७ त मि० गार्डनर नामक गृहस्थांनीं त्यास केन्सिंगटन् येथील आपल्या शाळेंत नोकरीस ठेविलें. येथें असतांना त्यानें निरनिराळ्या प्रकारचें ज्ञान संपादन करण्याचा सारखा क्रम सुरू ठेवला होता व तेथें त्याला पुष्कळसें महत्त्वाचें ज्ञान प्राप्तही झालें. याच वर्षी मे महिन्यांत त्याची अबकारी खात्यांत पुन्हा नेमणूक झाली. परंतु त्यावेळीं त्यानें ती जागा न पत्करितां दुसऱ्या खेपेस जागा मिळावी म्हणून अर्ज केला. त्याप्रमाणें त्याला १७६८ च्या फेब्रुवारी महिन्यांत दुसरी जागा मिळाली. ती जागा ससेक्स परगण्यांतील लुईस शहरांतील होती. या जागेवर हजर होण्यापूर्वी तो एकदां थेटफर्ड येथें जाऊन आला. लुईस येथें त्याचा काल बराच चांगल्या रीतीनें जात असे. ह्या सुमारास त्यानें कांहीं कविता केल्या व त्यांपैकीं एका 'निवडणुकीच्या संबंधीं गाण्या'बद्दल त्यास तीन गिनी मिळाल्या. जनरल वुल्फ याच्या मृत्यूवरही त्यानें एक गाणें केलें व तें त्याच्या मित्रमंडळीस फार पसंत पडलें. ह्या वेळीं पेनच्या मनामध्यें विचारक्रांति सुरू झाली होती असें त्याच्या एका चरित्रकाराच्या (ओल्डेज) उल्लेखावरून दिसतें. लुईस येथील त्याच्या आयुष्यक्रमासंबंधानें मि० रिक्मन नामक त्याच्या एका जिवलग मित्राच्या वंशजाकडून जी माहिती उपलब्ध झाली त्यांत पुढील हकीकत आहे:—

"या ठिकाणीं (लुईस येथें) तो बरींच वर्षें राहिला होता. शहरांतील मोठमोठ्या लोकांशीं त्याचा स्नेह जडला होता व ते नित्य त्याच्या सहवासांत राहून त्याच्या विनोदप्रचुर उक्ति व गंभीर संभाषणें यांपासून अनेक प्रकारचें ज्ञान संपादन करीत असत. यावेळीं तो राजकारणाचाही विचार करूं लागला होता. त्याचीं एतद्विषयक मतें व्हिग् (उदारमतवादी) पक्षास शोभेशीं होतीं. त्याच्या ठायीं 'चिकाटी' हा गुण विशेष प्रबल होता. त्याचीं मतें स्वतंत्र, धिटाईचीं, स्पष्ट व न बदलणारीं अशीं होतीं.

यावेळीं येथें 'व्हाइट हार्ट इव्हिनिंग क्लब' या नांवाची एक संस्था होती. ह्या क्लबमध्यें रोज संध्याकाळीं थॉमस पेन व त्याचें मित्रमंडळ जमून अनेक प्रकारच्या विषयांवर वादविवाद करून करमणूक करीत असे. हे वादविवाद कधीं कधीं फार कडाक्याचे होत, व त्यामध्यें कित्येकांच्या आग्रही-हट्टी स्वभावाचें नित्य प्रदर्शन होई. अखेरपर्यंत आपल्या मतास चिकटून —आग्रहानें कां होईना—जो इतरांस कुंठित करी. त्याजकडे दुसरे दिवशीं सकाळीं एक पुस्तक (ग्रीक-होमर) पाठविण्यांत येत असे व त्या परिपाठावरून त्या बुकास 'हेडस्ट्रॉंग बुक' असें नांव पडलें होतें. पेनच्या वांट्यास हें पुस्तक वारंवार येत असे. ह्या पुस्तकाच्या दर्शनी पृष्ठावर पुढील मजकूर लिहिलेला होता. "The Headstrong book, or original book of obstinacy, written by.....................of Lews, in sussex, and revised and Corrected by Thomas Pain."*

लुईस येथें राहणारा रिक्मनाचा एक मित्र मि० ली यानें इ०स० १८।१० च्या सप्टेंबर महिन्यांत, चाळीस वर्षांपूर्वीं पेनच्या संबंधानें तयार केलेल्या कांहीं कविता रिक्मन यास दिल्या. त्यांत पेनच्या भावि चरित्रक्रमाचें—त्याच्या अंगीं पुढें प्रकट होणाऱ्या गुणांचें—अंशतः भविष्य वर्तविणारी एक कविता आहे. ती अशी:—

"Immortal *Pain*, while mighty reasoners jar,
We crown thee General of the Headstrong war;
Thy logic vanquished error, and thy mind
No bounds but those of right and truth Confined.
Thy Soul of fire must sure ascend the sky,
Immortal *Pain* thy fame can never die;
For men like thee their names must ever save
From the black edicts of the tyrant grave.

---

* याचा मराठी तर्जुमा:—"ससेक्स परगण्यांतील ल्यूज गांवांतल्या ×××× नें लिहिलेलें व थॉमस पेन यानें फेरतसपासणी करून शुद्ध केलेलें आग्रही अथवा मूळचें दुराराध्य पुस्तक."

लुईस येथील उपरोक्त क्लबाच्या करमणुकीकरितां पेननें कांहीं विनोदी कविताही केल्या होत्या.

इ० स० १७७१ च्या मार्च महिन्याच्या २६ तारखेस पेन यानें ऑलिव्ह घराण्यांतील इलिझाबेथ नांवाच्या मुलीशीं दुसरें लग्न केलें. या मुलीचा बाप वारल्यामुळें तिची आई व ती गरीब स्थितींत होती. त्या मुलीच्या दीन स्थितीची दया येऊन त्यानें तिचा अंगिकार केला. ही मुलगी क्वेकर पंथाच्या कुळांतील होती. ती पेनपेक्षां दहा वर्षांनीं लहान असून तिला थोडेंबहुत शिक्षणही मिळालेलें होतें. ही मुलगी व तिची आई यांस त्यानें तंबाखूची गिरणी व दुकान काढण्याचे कामीं मदत केली व पुढें तोच त्या गिरणीचा मालक बनला. अबकारी खात्यांतून मिळणारा पगार प्रपंचास पुरेसा नसल्यामुळें त्यानें हे इतर व्यवसाय सुरू केले होते. ह्या खात्यांतील नोकरांची स्थिति सुधारण्याविषयीं पार्ल-मेंटकडे विनंतिअर्ज करण्याचें काम यावेळीं (इ० स० १७७२) त्याच्याकडे आलें होतें. हें कार्य यशस्वी होण्याकरितां ह्या वर्षाच्या हिंवाळ्यांत पार्लमेंटच्या अनेक सभासदांच्या भेटी घेऊन त्यास हा विषय त्यानें समजावून दिला व त्यांची सहानुभूति मिळविली. पुढें लवकरच ह्या प्रश्नाची चर्चा करणारीं दोन पत्रकें व कांहीं हस्तपत्रकें त्यानें प्रसिद्ध केलीं. त्याच्या ह्या चळवळीमुळें त्याची व गोल्डस्मिथची (व्हिकार ऑफ वेकफिल्डचा कर्ता) ओळख झाली. पेनच्या ह्या पत्रकांतील भाषापद्धति साधी व जोरदार होती; तसेंच त्याची विवेचनपद्धति वाखाणण्यासारखी होती; परंतु ह्या चळवळींत त्यास यश येण्याऐवजीं उलट कांहीं क्षुल्लक कारणांवरून त्याची नोकरी मात्र गेली !

थॉमस पेन लंडन येथें वरील कार्याकरितां गेल्यावर त्याच्यामागें त्याची तंबाखूची गिरणी व दुकान बंद होतें; यामुळें नोकरी जातांच त्याची स्थिति अतिशय खालावली व त्याच्या चळवळीस यश येण्याचा संभव नाहीं, असें दिसून येतांच त्याच्या सावकारांनीं आपल्या देण्याबद्दल त्याची पाठ पुरविली. तेव्हां त्यानें आपली गिरणी व दुकान व इतर सर्व मालमत्ता विकून सावकारांचें कर्ज भागविलें. पुढें त्यानें गेलेली नोकरी पुन्हा मिळविण्याचा यत्न केला पण तो फसला. त्यामुळें वयाच्या सदतिसाव्या वर्षी तो अगदीं कफल्लक

बनला! याच वेळीं त्यास त्याच्या बायकोनेंही सोडलें! मात्र हा काडी मोडून देण्याचा व्यवहार उभयतांच्या खुषीनें झाला व पूर्वी तिच्या नांवानें करून दिलेली सर्व मिळकत यावेळीं त्यानें तिला बहाल केली इतकेंच नव्हे, तर पुढें कित्येक दिवसपर्यंत तो तिला नकळत पैशाची मदतही करीत असल्याचा दाखला सांपडतो. याविषयीं त्याचा समकालीन मित्र मि० रिक्मन याच्य लेखांत असे उद्गार आहेतः—"मी असें खास सांगूं शकतों कीं, पेन, नेहमीं आपल्या स्त्रीसंबंधानें आदरानें व ममतेनें बोलत असे; आणि कित्येक वेळां त्यानें तिला नकळत द्रव्याची मदतही केलेली आहे." याच सुमारास अमेरिकन शास्त्रज्ञ व भावी मुत्सद्दी 'फ्रँकलीन'* याच्याशीं त्याची ओळख झाली. हा यावेळीं लंडन येथें विद्युच्छक्तीचे प्रयोग करीत होता. पेनची प्रवृत्तिही शास्त्रीय विषयाकडे असल्यामुळें ह्या प्रयोगांत त्यानें बरेंच लक्ष घातलें. पेनचे शास्त्रीय लेख व त्यानें तयार केलेले यांत्रिक नमुने यांची माहिती पुढें येईलच. यावेळीं त्याची सांपत्तिक स्थिति चांगली नसल्यामुळें तो लंडनच्या एका अप्रसिद्ध कोपऱ्यांत जाऊन राहिला होता. त्याच्या चरितार्थाचीं साधनें यावेळीं काय होतीं तें कळण्यास मार्ग नाहीं; तथापि एका उपलब्ध पत्रावरून यावेळची त्याची मनःस्थिति समाधानकारक नसून चिंतातुर व असंतुष्टपणाची होती असें मात्र स्पष्ट दिसून येतें.

थॉमस पेन ज्यावेळीं लंडनमध्यें होता त्यावेळीं तेथील राज्यव्यवस्था व सामाजिक स्थिति समाधानकारक नव्हती.* यामुळें तेथील लोकांचीं मनें

---

* फ्रँकलीन प्रथम पोस्टमास्तर होता; नंतर फ्रान्सांतील अमेरिकन वकील होता. यावेळीं अमेरिकन स्वातंत्र्याचे युद्धास फ्रान्सकडून द्रव्यसाहाय्य मिळविण्याचें अत्यंत नाजूक व कठीण काम यानें केलें. हें कार्य त्यानें केलें नसतें तर अमेरिकेस सदर युद्धांत यश येणें दुरापास्त होतें. पुढें हा अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांचा अध्यक्ष झाला.

* ह्या स्थितीबद्दल डॉ० कॉनवे नामक पेनच्या चरित्रकारानें पुढील उद्गार काढले आहेतः—

"It was a regime almost incredible to us now, when England is of all nations most free from Curruption and Court influence

असंतुष्ट झालेलीं होतीं व 'ज्युनियसचीं प्रख्यात पत्रें'* याच सुमारास प्रसिद्ध होऊन त्याच्या प्रकाशकावर खटला झालेला होता. तीं पत्रें पेनला फार आवडलीं असें तत्संबंधीं त्यानें केलेल्या एका उल्लेखावरून दिसून येतें. इंग्लंडांतील त्या वेळच्या राजकीय व सामाजिक विषमतेचा अनुभव पेनप्रमाणें फ्रँकलीन यासही आला असल्यानें पेनबद्दल त्याचे मनांत साहजिकच सहानुभूति उत्पन्न झाली. त्याची बुद्धिमत्ता व हुषारी पाहून अमेरिकेंत असल्या माणसाचा फार उपयोग होईल आणि त्याचा आयुष्यक्रमही तेथें चांगला यशस्वी होईल असें वाटून त्यानें त्यास अमेरिकेस जाण्याची सूचना केली. पेनलाही आपल्या चालू स्थितीचा कंटाळा आलेला होता. तेव्हां त्यानें फ्रँकलीनच्या सूचनेस मान्यता दिली व पुढें त्याच्या सल्ल्यानें लवकरच त्यानें अमेरिकेस प्रयाण केलें.

---

in Politics; and it was little realized in English colonies before the revolution. But Franklin was in London to witness it, and Pain was there to grow familiar with the facts. To both of them the systematic inhumanity and injustice were brought home personally."

* वरील स्थितीचें व्याजोक्तीनें व खोंचदार आणि मर्मभेदकरीतीनें आविष्करण करण्याचें काम ज्युनियसच्या पत्रांनीं केलें. त्यामुळें इंग्रजी वाङ्मयांत ह्या पत्रांस फार महत्त्वाचें स्थान प्राप्त झालें आहे.

प्रकरण २ रें.

अमेरिकेंत प्रवेश

फ्रँकलीनच्या सल्ल्यावरून पेन यानें अमेरिकेस प्रयाण केलें म्हणून मागें सांगितलें. त्याप्रमाणें तो इ० स० १७७४ च्या नोव्हेंबर महिन्याच्या ३० व्या तारखेस अमेरिकेंत येऊन पोंचला. येतांना त्यानें फ्रँकलीनकडून त्याच्या जांवयास पुढील आशयाचें पत्र आणलें होतें:—

" थॉमस पेन हा हुषार व योग्य माणूस असून तो पेनिसाल्व्हानिया येथें वसाहत करण्याकरितां येत आहे. तो तेथें अगदीं नवीनच येत असल्यामुळें, त्याला शक्य ती मदत व सल्लामसलत तुम्हीं द्यावी. कारकून, शिक्षक अथवा मोजणीदार यांपैकीं कोणत्या तरी एका प्रकारचें काम त्यास तुम्ही मिळवून द्याल, तर त्याला आपला चरितार्थ चालविण्यास नड पडणार नाहीं. वरील सर्व कामास तो चांगला योग्य आहे व त्याची तेथें विशेष ओळख-पाळख होईपर्यंत तरी तुम्हीं वरील दिशेनें त्यास मदत करावी, अशी माझी इच्छा आहे " वगैरे.

ह्या पत्राचा पेनला फार चांगला उपयोग झाला, असें त्यानें ता. ४ मार्च इ० स० १७७५ रोजीं फिलाडेल्फिया येथून फ्रँकलीन यास पाठविलेल्या पुढील पत्रावरून कळून येईलः—

" तुमच्या शिफारसपत्रामुळें मला येथें पुष्कळ मित्र व मान्यता प्राप्त झाली व त्याबद्दल मी तुमचे आभार मानतों. कित्येक सद्गृहस्थांनीं, मला विशेष किफायतशीर अशा शर्तींवर, आपल्या मुलांस शिकविण्याचें काम मजकडे सोंपविलें आहे. आणि रॉबर्ट एटकिन नांवाच्या एका बऱ्याच मोठ्या महत्त्वाच्या प्रकाशकानें नुकतेंच एक मासिक पुस्तक चालू केलें असून त्याकामीं त्यानें माझी मदत घेण्याचें सुरू केलें आहे. मीं जेव्हां त्यास प्रथम मदत केली तेव्हां त्यास ६०० पेक्षां जास्त वर्गणीदार नव्हते. आतां वर्गणीदारांची संख्या १५०० च्या वर झालेली आहे. हा केवळ दुसऱ्याच अंकाचा परिणाम आहे. पहिल्या अंकाशीं माझा कांहीं संबंध

नव्हता. मासिकाचे दोनच अंक बाहेर पडले असल्यामुळें मीं अद्याप (मोबदल्यासंबंधीं) विशेष ठराव केला नाहीं." वगैरे.

ह्या मासिकाचें नांव 'पेनिसाल्व्हानिया मॅगझाईन' ऊर्फ 'अमेरिकन म्युझियम्' असें होतें. त्याचा पहिला अंक इ० स० १७७५ च्या जानेवारी महिन्याचे अखेरीस प्रसिद्ध झाला व दुसऱ्या अंकापासून पुढें अठरा महिनेपर्यंत ह्या मासिकाचें संपादकत्व पेनकडे होतें; आणि त्याबद्दल त्यास दरसाल पन्नास पौंड मिळत असत. पेनचा त्या मासिकाशीं संबंध जडतांच त्याचे वर्गणीदार भराभर वाढत चालले, यावरून पेनच्या लेखनसामर्थ्याचा चांगला अंदाज करतां येईल. यावेळीं पेन फक्त निरुपद्रवी अशा केवळ वाङ्मयात्मक व शास्त्रीय विषयांवरच लिहीत असे. 'Rights of the man' (मनुष्याचे हक्क) व 'Age of reason' (बुद्धीचें युग) हे ग्रंथ पुढें ज्याच्या लेखणींतून उतरले त्या थॉमस पेननें ह्या मासिकास मजकूर पाठविणारांस अनुलक्षून "धर्म व राजकारण ह्या विषयांची चर्चा केली जाणार नाहीं" असा इशारा दिलेला पाहून कोणासही क्षणभर मौज वाटल्यावांचून राहणार नाहीं. असो; या मासिकांत जे विषय येत, त्यांत इंग्लंडांतील नवीन यांत्रिक शोध—त्या त्या यंत्रांच्या चित्रासह छापले जात असत. ह्या विषयवैशिष्टयाच्या योगानें फ्रँकलीननें स्थापन केलेल्या (लंडनच्या) फिलॉसफीकल सोसायटीचें लक्ष त्या मासिकाकडे विशेष वेधलें व तींतील प्रमुख शास्त्रज्ञ आणि विद्याव्यासंगी लोकांच्या तोंडीं पेनचें नांव खेळूं लागलें. लुईस (इंग्लंड) येथें असतांना पेननें जीं विनोदप्रचुर स्फुट काव्यें रचिलीं होतीं, त्यांपैकीं कांहीं निवडक काव्यें ह्या मासिकांतून प्रसिद्ध झालीं आहेत. या मासिकामध्यें पेन 'Atlanticws' 'Vox Populi' 'Æsop' या टोपण नांवांनीं आपले लेख प्रसिद्ध करी. कधीं कधीं त्याच्या लेखावर कांहींच नांव नसे. यावेळीं त्यानें जे निरनिराळे लेख लिहिले त्यांत, त्या काळीं युरोपमध्यें प्रचलित असलेल्या द्वंद्वयुद्धाच्या चालीचा निषेध करणाराही एक लेख आहे. ह्या लेखांतून त्याच्या भावी विचारस्वातंत्र्याची झांक ठिकठिकाणीं आढळून येते. क्वेकर ऊर्फ युरोपांतील संतमंडळांच्या मतांसंबंधानेंही त्यानें स्पष्ट चर्चा करून त्या मतांतील भोळसरपणा काढून त्याचें खरें रहस्य विशद करून दाखविलें आहे. तो स्वतः ह्या पंथापैकींच

असल्यामुळें त्याची एतद्विषयक मीमांसा विशेष मान्य होण्यासारखी आहे. तो म्हणतोः—

* "माझ्या क्वेकरपणाची मर्यादा येथपर्यंत जाते कीं, जर सर्व जग शस्त्रांचा त्याग करून तडजोडीनें–वादविवादानें–बुद्धिवादानें आपले व्यवहार पाहण्यास–तंटे मिटविण्यास तयार असेल तर माझीही तसें करण्यास अनुमति आहे. परंतु सर्व जगाची इच्छा जोंपर्यंत तशी होणार नाहीं तोंपर्यंत हें तत्त्व बाजूस ठेवून मला माझें हत्यार हातीं घेणें भाग आहे आणि तें घेण्याचें सामर्थ्य मला दिल्याबद्दल मी ईश्वराचे आभार मानतों. ××× आपण देवदूतांच्या जगांत रहात नाहीं, सैतानाचा अंमल अद्याप नष्ट झालेला नाहीं, व चमत्कारानें आपलें रक्षण होईल अशीही अपेक्षा करतां येत नाहीं–करणें रास्त होणार नाहीं."

विवाहित स्त्री-पुरुषांचे परस्परसंबंध, घटस्फोटाचीं कारणें, या विषयांवरही सदर मासिकांतून त्यानें चर्चा केलेली आढळून येते. 'स्त्रियांचीं शोचनीय स्थिति' 'गुलामांचा व्यापार' व इतर अनिष्ट सामाजिक प्रकार यांसंबंधानें ह्या मासिकांतून पेननें वेळोवेळीं जे स्वतंत्र व अभियुक्त विचार प्रगट केले त्यांतूनच पुढें अमेरिकन स्वातंत्र्याच्या कल्पनेचा प्रादुर्भाव झाला. ह्या कल्पनेचीं सूक्ष्म बीजें पेनच्या ह्या प्राथमिक लेखांत जीं जागजागीं विखुरलीं होतीं त्यांचें कालवशात् एकीकरण होऊन पुढें त्यापासूनच अमेरिकन स्वातंत्र्यरूपी वृक्ष निर्माण झाला व त्या वृक्षाच्या मधुर फळांचा आस्वाद अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांतील जनता अद्याप घेत आहे. बिचाऱ्या पेनला मात्र ह्या वृक्षाची जोपासना करण्याकरितां अनेक प्रकारचे

---

* "I am thus for a Quaker, that I would gladly agree with all the world to lay aside the use of arms, and settle matters by negotiations; but unless the whole world wills, the matter ends, and I take up my musket, and thank heaven he has put it in my power' ... ... We live not in a world of angels. The reign of satan is not ended, neither Can we expect to be defended by miracles." म० गांधींच्या अहिंसावादाचा अतिरेक करणारांनीं ह्या उद्गारांचें मनन करावें. —संपादक.

कष्ट सोसावे लागले असूनही तत्कालीन तरुण पिढीच्या कृतघ्नतेमुळें त्या मधुर आस्वादाचा लाभ घेतां आला नाहीं ! असो; स्त्रियांच्या करुणास्पद स्थितीसंबंधानें पेनचें मन किती तळमळत होतें हें त्याच्या पुढील उद्गारां-वरून दिसून येईलः —

कोठें बहुपत्नीत्वाच्या अपमानकारक चालीमुळें स्त्रियांना आपल्या सवतींच्या सहवासांत आपला सर्व जन्म घालवावा लागतो, तर कोठें एकदां निगडित झालेली विवाहग्रंथी आजन्म सुटणें शक्य नाहीं अशा समजुतीमुळें शहाणीस मूर्खाच्या व सालस स्त्रीस पशुवत् क्रूर पुरुषाच्या गुलामगिरींत आपलें कष्टमय जीवित घालविणें भाग पडतें. ज्या देशांत हे दोन्हीही प्रचार दृग्गोचर होत नाहींत व जेथें स्त्रियांच्या सुखाची पर-मावधि झाली आहे असें समजतात तेथेंसुद्धां स्त्रियांची फार शोचनीय स्थिति असते. आपल्या मालमत्तेची व्यवस्था लावण्याचे हक्क व विचार-स्वातंत्र्य हीं त्यांना कायद्यानेंच पारखीं केलेलीं असतात. त्यांना दुर्मार्गाला प्रवृत्त करून त्यांचेवर आपला एकछत्री अम्मल चालविणारे पुरुषच त्यांच्या वर्तणुकीच्या बऱ्यावाईटपणाचा निकाल लावणारे न्यायाधीश बनत असतात! पुरुषांच्याच मतांचा स्त्रियांच्या मनावर पूर्ण अंमल असावयाचा व स्त्रियांच्या क्षुल्लक कृतींचा मोठा बाऊ करून त्यास गुन्ह्याचें स्वरूप देणारेही तेच. आपणच त्यांना दुर्मार्गाला प्रवृत्त करून फिरून एवढ्याशा चुकीबद्दल अगर नुसत्या संशयावरूनही लोकांत त्यांची नाचक्की करून त्यांस शिक्षा करण्याचा अधिकारही त्यांचाच! स्त्रियांची ही स्थिति पाहून कोणाचें अंतःकरण कळवळत नाहीं? पण असें असूनही सांगण्यास दुःख वाटतें कीं, कोणत्याही देशांत व कोणत्याही कालांत पुरुषवर्ग त्यांच्या बाबतींत जुलूम किंवा अत्याचारच करीत आलेला आहे. कधीं कधीं त्यांना (पुरुषांच्या) अहंकारजन्य जुलमामुळें व मत्सरामुळें असह्य असा छळ सोसावा लागतो तर कधीं त्यांस दुष्ट पुरुषांच्या द्वेषबुद्धीस बळी पडावें लागतें. पतीचें प्रेम असल्यास त्याचे काबाडकष्ट करणें व त्याचें प्रेम नसल्यास प्रत्येक बाबतींत आपली हेळ-सांड होणें हें त्यांच्या नशिबीं ठेवल्यासारखें असतें. सप्रेम व उदासीन (पतीच्या) अशा दोन्ही प्रकारच्या वृत्तीपासून त्यांना जवळजवळ

सारखाच त्रास होत असतो. जगांतील ३/४ भागांतील स्त्रियांची स्थिति निसर्गतः दैन्य व तुच्छता यांच्या दरम्यान असते.

सौंदर्याची अतिशय चहा करणारे लोकसुद्धां स्त्रियांना कोणत्याही प्रकारें प्रसिद्धीस येऊं देत नाहींत. एका प्रसिद्ध ग्रीक गृहस्थानें म्हटलें आहे कीं, 'जी स्त्री जास्त लोकांना माहित नाहीं तीच साध्वी.' हा अरसिक गृहस्थ स्त्रियांना त्यांच्या कर्तव्यांविषयीं नियम घालून देतो; परंतु त्यांनीं थोडीशी लोकमान्यतेची हाव धरली तर तो रुष्ट होतो; आणि त्यांच्याकडून सद्वर्तनाची अपेक्षा करितांना, त्यांचे ठायीं सन्मानाविषयीं आकांक्षा दिसून आल्यास त्याची तो गुन्ह्यांत गणना करितो. एखादी महिला जर आपल्या समाजाच्या वतीनें बोलण्यास पुढें सरसावली तर ती अशा गृहस्थास उद्देशून पुढें लिहिल्याप्रमाणेंच बोलेलः—

"तुमचा अन्याय किती तरी मोठा आहे! सद्गुणसंपादनाचे बाबतींत जर आम्हांस तुमच्यासमान हक्क आहेत तर त्याच सद्गुणांमुळें प्राप्त होणाऱ्या प्रशंसेवर आमचा समान हक्क कां नसावा? गुण हेंच सार्वजनिकदृष्ट्या पूजेचें स्थान असलें पाहिजे (मग ते स्त्रीमध्यें असोत कीं पुरुषामध्यें असोत.) आमचीं कर्तव्यें तुमच्यापेक्षां भिन्न असलीं तरी तीं अधिक सुलभ किंवा समाजाला कमी उपयुक्त आहेत असें मुळींच नाहीं. तीं कर्तव्यें तुमच्या गृहसौख्याचे व संतोषाचे आधारस्तंभ आहेत. पत्नी व माता ह्या दोन्ही नात्यांनीं आम्हीच आपल्या सद्वर्तनानें कुटुंबांत ऐक्य व प्रेम निर्माण करितों. शिशुसंगोपनाचें दुष्कर काम अंगावर घेऊन राष्ट्राला सच्छील मनुष्यें पुरविण्याचें कामही आम्हीच करितों. गृहलक्ष्मीची प्रेमळ दृष्टि संसारावर पडली नसती तर समाजांत सौम्य आचाराचा पूर्ण लोप होऊन मनुष्यामध्यें जिकडे तिकडे कलहच माजले असते. आमचें धैर्यही तुमच्यापेक्षां कमी वेळां कसोटीस लागतें असें नाहीं. निसर्गतः आमचे अंगीं दुर्बलता असल्यामुळें आमच्यावर धैर्य प्रकट करण्याचे प्रसंग वारंवार येतात. दुःख जन्मापासूनच आमच्या मागें लागलेलें असतें. समाजबंधनें व रूढि यांनीं आमचे हातपाय घट्ट बांधून टाकले आहेत. समंजसता व सद्गुण यांच्या द्वंद्वानें आम्हांस घाबरें करून सोडलें आहे. कांहीं प्रसंगीं तर नागरिक ह्या नात्यानेंही आम्हांस

धैर्य प्रकट करावें लागतें. तुम्ही जेव्हां आपल्या राष्ट्राकरितां आपलें रक्त (धारातीर्थीं) अर्पण करितां तेव्हां त्यांत आमचाही अंश असतो. किंबहुना तें रक्त आमचेंच आहे, असें समजलें पाहिजे. कारण, आम्हींच तें आमच्या पतीस व मुलास अर्पण केलेलें असतें. युद्धाच्या आवेशांत समरभूमीवर आपल्या देहाची आहुति देणें एकवेळ सोपें ठरेल, पण आपल्या प्रियजनांच्या निधनानंतर जीवित कंठण्याचें आमच्या वांट्यास येणारें काम अधिक खडतर आहे, हें कोणीही कबूल करील. वृथाभिमान व महत्त्वाकांक्षा या द्वयाला बळी पडून अखिल पृथ्वीतल पुतळे, जयस्तंभ व शिलालेख यांनीं मंडित करून आपल्या नश्वरदेहांच्या पश्चात् कीर्तिरूपानें राहणें शक्य करण्यासाठीं तुम्हीं अव्याहत प्रयत्न चालविले असतां आम्हीं मात्र आपली जीवितयात्रा निर्जन अरण्यांतील सुवासिक पुष्पाप्रमाणें, जनदृष्टीपुढें न येतां अप्रसिद्धपणें कां संपवावी ? मृत्यु व नंतर गाढ विस्मरण हेंच आमच्या नशिबीं असावें काय ? सर्वच बाजूंनीं आम्हांवर जुलूम करूं नका. आमच्या आप्तेष्टांच्या लहानशा परिवाराबाहेर कधीं कधीं तरी आमचें नांव जाण्यास सवड ठेवा. मित्रत्व व प्रेम यांसाठीं तरी आमच्या पश्चात् आमचें नांव निघण्यास जागा ठेवा व सद्वर्तनाचें योग्य पारितोषिक जी लोकमान्यता ती मिळण्याचा आमचा हक्क हिरावून घेऊं नका."

अमेरिकेंत आल्यावर थॉमस पेननें जे लेख लिहिले, त्यांत पहिलें स्थान 'गुलामांची मुक्तता' या त्याच्या निबंधास देण्यांत येतें. त्यानें प्रसिद्ध केलेला पहिला लेख हाच होय. 'जस्टिस अँड ह्युमॅनिटी' या सहीनें सदर निबंध त्यानें छापला. ह्या निबंधांत त्यानें गुलामांचा व्यापार व गुलामगिरी यांपासून उद्भवणाऱ्या अनेक भयंकर अनर्थांचें आविष्करण करून गुलामांना मुक्त करून गुलामगिरी बंद करण्याची व्यावहारिक योजना लोकांपुढें मांडली आहे. अमेरिकेंत त्यावेळीं प्रसिद्ध असलेल्या डॉ० रश नांवाच्या गृहस्थास हा निबंध अतिशय आवडला व त्यानें त्याबद्दल त्याचा मोठा गौरव केला. डॉ० रश ह्याचें मतही ह्या बाबतींत पेनप्रमाणेंच असून गुलामगिरीच्या पद्धतीबद्दल खेद प्रदर्शित करणारें एक पत्रक त्यानेंही कांहीं दिवसांपूर्वीं प्रसिद्ध केलेलें होतें. परंतु त्यावेळीं

त्याकडे कोणीं फारसें लक्ष दिलें नाहीं. पेनच्या जोरदार व कोटीबाज विवेचनपद्धतीमुळें त्याचा उपरोक्त निबंध प्रसिद्ध होतांच अमेरिकेंतील अनेक विचारी लोकांचें लक्ष या विषयाकडे वेधलें व निबंध प्रसिद्ध झाल्यानंतर बरोबर पस्तीस दिवसांनीं (एप्रिल १२ तारखेस) फिलाडेल्फिया येथें पहिली अमेरिकन 'ॲन्टिस्लेव्हरी सोसायटी' स्थापन झाली.

पेन जेव्हां अमेरिकेंत आला, तेव्हां इंग्लंड व अमेरिका यांच्यामध्यें राजकीय बाबतींत घासाघीस सुरू झालेली होती. तथापि इंग्लंडची राजसत्ता झुगारून देऊन स्वतंत्र होण्याचे विचार अद्यापि कोणाच्या मनांत आलेले नव्हते. इंग्लंडच्या सार्वभौमसत्तेखालीं अंतःस्वातंत्र्य मिळावें, हीच मुख्यतः अमेरिकेची यावेळीं इच्छा होती. पेनचें मत यावेळीं देखील जरी राजाच्या सत्तेविरुद्ध (Monarchy) होतें व अमेरिकेच्या भावी स्वातंत्र्याचें चित्र जरी त्याच्या डोळ्यांपुढें होतें तरी इग्लंड व अमेरिका यांच्यामध्यें युद्ध जुंपूं नये, अशी त्याची फार इच्छा होती. आणि म्हणून आपल्या एतद्विषयक प्राथमिक लेखांत त्यानें सौम्यपणाची व तडजोडीची भाषा वापरली आहे. अमेरिकेंत पुढें प्रसिद्धीस आलेला प्रख्यात मुत्सद्दी व सेनापति जॉर्ज वॉशिंग्टन याचें मतही यावेळीं स्वतंत्र होण्याच्या विरुद्धच होतें.* परंतु पुढें लवकरच अमेरिकेच्या लोकमतामध्यें विलक्षण खळबळ उडाली. लेक्झिंग्टन् येथें ता. १९ एप्रिल रोजीं झालेली कतल ही या खळबळीचें तत्कालिक कारण होय. ही कतल ब्रिटिश लष्कराकडून झाली होती आणि त्यामुळें अमेरिकन लोक चवताळून गेले होते. अर्थात् यापुढें सामोपचाराचीं व तडजोडीचीं बोलणीं बंद होऊन, लोक स्वतंत्र होण्याच्या गोष्टी उघडउघड बोलूं लागले व तशा प्रकारचे वीस ठराव पास करून ता. ३१ मे रोजीं नॉर्थ कॅरोलिनांतील मेक्लेनबर्ग येथील कमिटीनें ते राष्ट्रीय सभेकडे पाठविले. लेक्झिंगटनची कतल झाल्या-

* "If you ever hear of my joining in any such measures, you have my leave to set me down for everything wicked." असे उद्गार १७७५ च्या मे महिन्यांत रे० जेनाथन बुचर याजवळ वॉशिंग्टननें काढले होते.

नंतर वरील काऊंटीखेरीज इतर प्रांतांतील लोकही स्वतंत्र होण्याच्या गोष्टी बोलूं लागले. परंतु इंग्लंडपासून विभक्त होऊं इच्छिणाऱ्या ह्या लोकांच्या मनांत पूर्णलोकसत्तात्मक (republicanism) राज्यपद्धतीची कल्पना नव्हती. तर इंग्लंडचा राज्यकारभार त्यावेळीं जसा चालत होता तसाच आपणही स्वतंत्रपणें—इंग्लंडला ढवळाढवळ न करूं देतां—चालवावा एवढीच त्यांची इच्छा होती. इंग्लंडांत चालू असलेली शासनपद्धति व ती अंमलांत आणण्याकरितां तेथें असलेल्या निरनिराळ्या संस्था स्वतंत्रपणें आपण आपल्या देशांत स्थापाव्यात असें ह्या लोकांचें मत होतें. राष्ट्रीय-सभेचे बहुतेक सभासद गर्भश्रीमंतांच्या वर्गांतील व राजसत्ताभिमानी (Royalists) होते. स्वातंत्र्य आणि समता (Liberty and equality) म्हणजे सर्व जनतेला समान हक्क देऊन लोकस्वातंत्र्याचा शक्य तितका विस्तार करण्याची भावना या लोकांच्या मनांमध्यें येणें फारसें शक्य नव्हतें. अशा स्थितींत जर अमेरिका तत्काल स्वतंत्र होती तर तेथील मुख्य अधिकारी हा एक प्रकारचा खराखुरा राजाच बनला असता. लोकांची ही मनोवृत्ति पेनच्या लक्षांत येऊन चुकली होती; परंतु त्याच्या स्वतःच्या मनाचा कल सर्वस्वीं लोकसत्तात्मक राज्यपद्धतीकडे असल्यामुळें इंग्लंड व अमेरिका यांचें युद्ध जुंपतांच त्यानें अमेरिकेंत होऊं घातलेल्या क्रांतीस उत्क्रांतीचें स्वरूप देऊन प्रजासत्ताक राज्यपद्धतीचीं तत्त्वें लोकांच्या मनांत भरवून देण्यास उघडपणें सुरवात केली.† ह्या क्रांतीबरोबर राजाची सत्ता (Monarchy) व गुलामगिरीची पद्धति ह्या दोहोंचाही नायनाट करण्याविषयीं त्यानें जोराचा प्रयत्न सुरू केला. अमेरिकन स्वातंत्र्याची द्वाही फिरविणारा रीतसर जाहिरनामा प्रसिद्ध होण्यापूर्वी पेननें चालविलेल्या पेनिसाल्व्हानिया मॅगझाइनमध्यें 'ए सिरियस थॉट' ह्या सदराखालीं 'ह्युमानस' ह्या सहीनें अमेरिकन स्वातंत्र्यासंबंधानें एक लेख प्रसिद्ध झाला होता. हा लेख पेनच्या हातचा आहे. ह्या लेखाच्या शेवटच्या परिच्छेदांत

† It was that he raised the revolution into an evolution. * * * * The war having begun, and seperation become probable, Pain hastened to connect it with humanity and with republicanism.

वर सांगितलेल्या पेनच्या विचारांचें प्रतिबिंब चांगलें दृष्टीस पडतें. तो परिच्छेद असा:—

"आणि जेव्हां परमेश्वराच्या कृपाप्रसादामुळें आम्ही फक्त त्याजवरच अवलंबून राहणारे होऊं, स्वतंत्र होऊं, तेव्हां त्याबद्दल आपली कृतज्ञता प्रगट करणारें पहिलें कृत्य म्हणून नीग्रो लोकांचा विक्रय बंद करणारा व जे अगोदरच गुलाम म्हणून येथें आहेत त्यांचे कष्ट कमी करून अखेरीस त्यांची मुक्तता करणारा कायदा आपण पास करावा."

वरील लेख प्रसिद्ध झाल्यानंतर लवकरच पेन यानें 'कॉमनसेन्स' नांवाचें लहानसें पुस्तक प्रसिद्ध केलें. या पुस्तकांत त्यानें इंग्लंडच्या तत्कालीन राज्यपद्धतीचें अनिष्ट स्वरूप दाखवून देऊन अमेरिकेनें इंग्लंडपासून विभक्त होण्याची आवश्यकता साधकबाधक प्रमाणांसह प्रतिपादिली होती. ह्या पुस्तकानें त्यावेळीं फारच महत्त्वाची कामगिरी केली. इंग्लंडच्या राज्यपद्धतीस जरी बहुतेक सर्व अमेरिकन लोक कंटाळले होते तरी तिचा संबंध तोडून न टाकतां तडजोडीनें आपल्या लढ्याचा निकाल करून घेऊं इच्छिणारा एक प्रबल नेमस्तपक्ष त्यावेळीं अमेरिकेंत अस्तित्वांत होता. या पक्षांत वॉशिंग्टन, फ्रॅंकलीन जेफर्सन, रॅंडॉल्फ, वगैरे बडी मंडळी होती (त्यांपैकीं प्रत्येक पुढें प्रेसिडेंटच्या हुद्यापर्यंत चढला) व त्यांच्याभोंवतीं अनेक मोठमोठया व वजनदार लोकांचें जाळें पसरलेलें होतें. ह्या बड्या लोकांच्या ह्या प्रवृत्तीमुळें सामान्य जनतेचीं (Commoners) मनेंही द्विधा झालेलीं होतीं. अमुक एक गोष्ट बेशक करावी, असा निश्चय करण्याचें धैर्य फारसें कोणास होत नव्हतें. 'कसें होईल, काय होईल' अशा विचारानें ते बिचकत होते. परंतु पेनचें 'कॉमनसेन्स' प्रसिद्ध होतांच ह्या लोकांच्या मनांतील भीति, अर्धवटपणा व चलबिचल पार लयास गेली व अमेरिकन स्वातंत्र्याचें निशाण उभारण्याचा त्यांनीं ठाम निश्चय केला. लोकमतावर इतका विलक्षण परिणाम* त्या पुस्तकानें केला. उपरोक्त

---

* जोएल बार्लो नामक तत्कालीन विद्वानानें ह्या पुस्तकाच्या परिणामासंबंधानें पुढील उद्गार काढले आहेत:—

"On this celebrated publication which has received the testimoney of praise from the wise and learned of different

बऱ्या मंडळींच्या मनावरही त्याचा उत्तम परिणाम झाला. त्यांच्या मनांत मधूनमधून, जे विचार घोळत होते तेच विचार व्यवस्थित रीतीनें व कुशलतेनें ह्या पुस्तकांत एकत्र मांडले असल्याचें त्यास दिसून आलें. त्यामुळें त्यास एक प्रकारचा संतोष वाटला. तथापि कांहीं नेमस्त मंडळींस इंग्लंडपासून विभक्त होण्याची कल्पना अजूनही पसंत वाटत नव्हती. ह्या अमेरिकन पक्षाचा तत्कालीन पुढारी रे० वुइल्यम स्मिथ (हा फिलाडेल्फिया युनिव्हर्सिटीचा अध्यक्ष होता) यानें 'Cato' हें टोपण नांव घेऊन पेनच्या सदर पुस्तकावर कडक टीका केली व पुढें 'फॉरेस्ट' ह्या टोपण नांवाखालीं पेननें त्याच्याशीं बराच कालपर्यंत वाग्युद्ध करून अखेर त्यास जेरीस आणलें. ह्या वादविवादाचा परिणामही सदर पुस्तकाच्या हेतूस पुष्टिकारक असाच झाला. हा वाद पुरा झाल्यावर लवकरच पेनला पेनिसाल्व्हानिया युनिव्हर्सिटीनें बहुमानाची पदवी दिली. त्याच्या प्रतिपक्षीयाची मात्र इतकी नामुष्की झाली, कीं पुन्हा त्यानें राजकीय बाबतींत केव्हांच तोंड घातलें नाहीं ! सदर पुस्तकामध्यें पेननें राजकीय स्वातंत्र्याची जी उदात्त कल्पना लोकांपुढें मांडिली आहे ती केवळ अमेरिकन लोकांपुरतीच नसून सर्व मानवजातीस उपयुक्त होण्याजोगी आहे. त्या पुस्तकाच्या प्रस्तावनेंत, 'अमेरिकेचें कार्य हें पुष्कळ अंशानें अखिल मानवजातीचें कार्य आहे' असे उद्गार त्यानें काढले आहेत. व त्यास शोभेल असेंच विवेचन सदर पुस्तकांत केलेलं आहे. पेनच्या बौद्धिक विचारांचें व मानसिक औदार्याचें क्षेत्र संकुचित नव्हतें. त्याचे विचार सर्वगामी होते. त्यानें आपल्या मासिकावर 'सर्व जग ही माझी देशभूमी व सत्कार्य करणें हा माझा धर्म' असें ब्रीदवाक्य प्रसिद्ध केलें होतें व त्यास अनुरूप अशीच त्याची कृति व लेख होते. अमेरिकन

---

nations, we need only remark that it gave spirit and resolution to the Americans, who were then wavering and undetermined, to assert their right, and inspired a decisive energy into their Counsels; we may therefore Venture to say without fear of Contradiction that the great American Cause owed as much as to the pen of Pain as to the sword of Washington."

क्रांतीच्या वेळीं जीं पत्रकें व पुस्तकें प्रसिद्ध झालीं त्यांत 'कॉमनसेन्स'च्या बरोबरीचें एकही नव्हतें. पेनची नालस्ती करणाऱ्या चीथॅमनें देखील ह्या पुस्तकाच्या परिणामाविषयीं अनुकूल साक्ष दिली आहे. अमेरिकन प्रेसिडेंट रँडाल्फ यानेंही 'अमेरिकन स्वातंत्र्यास पेनचे लेख प्रमुखत्वानें कारणीभूत झाले' असें लिहून ठेवलें आहे. कॉमनसेन्सची भाषा उद्दीपक व विचारसरणी ओजस्वी होती. हें पुस्तक छापण्यासंबंधीं प्रथम बरीच अडचण पडली. मोठ्या मिनतवारीनें तें बेल नांवाच्या एका धीट प्रकाशकानें छापलें. त्यावर पेनचें नांव मुद्दाम छापलें नाहीं. थोड्या वेळांत त्याच्या वीस हजार प्रति खपल्या! त्यामुळें पेनचें वजन फार वाढलें व त्याचा सर्वत्र सन्मान होऊं लागला. परंतु द्रव्याचा मात्र कांहीं लाभ झाला नाहीं. उलट थोडी झीजच सोसावी लागली. पैसे प्रकाशकानें मिळविले. हें पुस्तक प्रसिद्ध झाल्यानंतर कांहीं काळानें अमेरिकन स्वातंत्र्य जाहीर करण्याची धामधूम सुरू झाली. परंतु या कामीं अमेरिकेंतील क्वेकर पंथाचे लोक 'अहिंसेचें तत्त्व' पुढें करून विरोध करूं लागले! थॉमस पेन हाही क्वेकरचाच मुलगा होता. अर्थात् क्वेकर पंथाच्या मतांचें खरें रहस्य त्यास ठाऊक होतें. तें प्रगट करून त्यानें ह्या विरोधी क्वेकरमंडळींची चांगली कानउघाडणी केली.* त्याचप्रमाणें अमेरिकन स्वातंत्र्याची द्वाही

---

* इंग्लंडशीं युद्ध सुरू होणार असें पाहून क्वेकर लोकांनीं त्याविरुद्ध बराच धिंगाणा माजविला होता. कित्येक तर उघडउघड प्रतिपक्षास मदत करीत होते; कित्येक गुप्त हेर बनले होते व कित्येकांनीं धर्म व नीति यांचीं तत्त्वें पुढें करून अमेरिकन लोकांस स्वातंत्र्याच्या चळवळीपासून परावृत्त करण्याचा प्रयत्न चालविला होता. त्या सर्वांचा पेननें यथोचित समाचार घेतला. त्याचा एक मासला असाः—

"O Ye partial ministers of your own acknowledged principles! If the bearing of arms be sinful, the first going to war must be more so, by all the difference between wilful attack and unavoidable defence. Wherefore, if ye really preach from conscience, and mean not to make a political hobby-horse of your religion, convince the world thereof by proclaiming your

फिरविणाऱ्या जबाबदार लोकांस त्यानें आफ्रिकन निग्रोच्या मुक्ततेबद्दलही " Forget not the hapless African " असें म्हणून इषारा दिला. परंतु दुर्दैवानें या इषाऱ्याचा त्यावेळीं फारसा उपयोग झाला नाहीं. अमेरिकेमध्यें गुलाम पाळण्याची चाल इतकी बद्धमूल झाली होती, कीं त्यांत कांहीं अन्याय अथवा अमानुषता आहे असें तेथील बहुजनसमाजाच्या मनांतही येत नसे. गुलाम ही आपली एक प्रकारची मालमत्ता आहे, ती पैसे खर्चून आपण संपादन करितों; अर्थात् तिची हवी तशी व्यवस्था करण्याचा आपला हक्क आहे अशी समजूत तेथील मोठमोठ्या समंजस लोकांची होती. खुद्द जॉर्ज वॉशिंग्टनलाही ह्या समजुतींत फारसें कांहीं गैर आहे असें वाटत नव्हतें ! अशा स्थितींत गुलाम ठेवण्याच्या पद्धतीवर थॉमस पेन जेव्हां जोरानें हल्ला करी, तेव्हां त्याच्या मनांतील कळकळीच्या भावनेविषयीं (Sincerity about the American Cause) अमेरिकन लोकांस मधून मधून शंका येत असे. 'कॉमनसेन्स' प्रसिद्ध होण्यापूर्वीं त्यानें आपल्या एका ॲन्टिस्लेव्हरी पत्रांत, " हजारों लोकांना जे गुलाम म्हणून पाळीत आहेत त्यांनीं आपल्या गळ्याभोंवतालच्या राजकीय बंधना-बद्दल तक्रार करणें कितपत सुसंबद्ध होईल याचा विचार करावयास नको काय ? " असा मजकूर अमेरिकन देशभक्तांस उद्देशून लिहिला होता. त्यावरून पुष्कळांच्या मनांत, तो इंग्लंडचा गुप्त हेर असावा, अशी शंका आली

---

doctrine to our enemies, for they likewise bear arms. ... ... preach repentence to your king and warn him of eternal ruin; Ye would not spend your partial invectives against the injured and insulted only, but like faithful ministers, cry aloud and spare none.

याचा सारांश हा कीं, 'शस्त्र धारण करणें, हें जर खरोखर पाप असेल, तर तसें चढाईचें धोरण स्वीकारणाऱ्या आपल्या शत्रूला अगोदर सांगा. कारण त्यांत पापाचा अंश जास्त आहे. धर्माला राजकारणांतील डावपेंचाचें स्वरूप न देतां जर प्रामाणिकपणें तुम्हांस आपल्या अहिंसातत्त्वाचा उपदेश करणें असेल तर प्रथम तो तुम्ही युद्धास प्रवृत्त होऊन नाशास कारणीभूत होणाऱ्या आपल्या राजाला अगोदर करा, म्हणजे तुमचा निस्पृहपणा तरी दिसून येईल.

व फ्रँकलीनचा जर त्यास पूर्ण पाठिंबा नसता तर अशा संशयास्पद स्थितींत त्यास फिलाडेल्फिया येथें राहणें अशक्य झालें असतें. गुलाम पाळण्याच्या पद्धतीविरुद्ध लिहिणें त्यावेळीं किती धोक्याचें होतें, याचा ह्या गोष्टीवरून वाचकांस चांगला अंदाज होईल. अशी जरी स्थिति होती तरी थॉमस पेननें वेळोवेळीं त्या प्रश्नाची चर्चा करून तत्कालीन गुलामांची मुक्तता करण्याचा उपदेश चालूंच ठेवला होता; आणि देशामध्यें उत्पन्न झालेल्या राजकीय अस्वस्थतेमुळें जरी त्याच्या ह्या उपदेशाचा उपयोग तत्काल होऊं शकला नाहीं तरी राजकीय स्वातंत्र्य व स्वास्थ्य यांचा अमेरिकन लोकांस लाभ झाल्यावर थोड्याच कालांत हा उपदेश फलद्रूप झाला, हें इतिहासज्ञांस सांगावयास नकोच.

प्रकरण तिसरें

स्वातंत्र्याच्या निशाणाखालीं!

आपलें स्वातंत्र्य जाहीर करावें कीं नाहीं याचा विचार करण्याकरितां जेव्हां अमेरिकेच्या राष्ट्रीयसभेंत (कांग्रेस) चर्चा सुरू झाली, तेव्हां पांच वर्षांपूर्वी ज्या मेक्लेनवर्ग कौंटीनें आपलें स्वातंत्र्य जाहीर केलें होतें, त्याच कौंटीनें प्रथम 'राष्ट्रीय स्वातंत्र्य' जाहीर करण्याची आपल्या प्रतिनिधींस सल्ला दिली. त्यांचें उदाहरण पाहून लवकरच साउथ कॅरोलिना व्हर्जिनियादि इतर परगण्यांतील लोकांनींही आपापल्या प्रतिनिधींस तीच सल्ला दिली. मात्र मेरिलँड व न्यूयॉर्क ह्या परगण्यांतील लोक अद्याप तसें करण्यास तयार नव्हते. न्यूयॉर्कचे लोक तर विरुद्धच होते असें म्हटलें तरी चालेल. दुसरे सहा परगणे, 'राष्ट्रीय स्वातंत्र्य' ताबडतोब जाहीर करण्यास प्रतिकूल होते. याकरितां ह्या प्रश्नाचा निकाल करण्याचें काम राष्ट्रीय सभेनें एका कमिटीवर सोंपविलें व कमिटीचा रिपोर्ट तयार होईपर्यंत आपली बैठक तहकूब केली. ह्याच सुमारास इंग्लंडाहून लॉर्ड हौ हा तडजोड करण्याचे हेतूनें येत असल्याची खबर येऊन पोंचली. ती येतांच, न्यूयॉर्क व पेनिसाल्व्हानिया ह्या दोन प्रमुख प्रातांनीं तडजोडीचीं कलमें ऐकण्याविषयीं विशेष उत्सुकता प्रगट केली; अर्थात् त्यांचा राष्ट्रीय स्वातंत्र्य जाहीर करण्याचा उत्साह त्या मानानें थंड पडला. इतर ठिकाणच्या लोकांचीं मनेंही चंचल झालीं. ही स्थिति अमेरिकन स्वातंत्र्याच्या चळवळीस फार धोक्याची होती. ह्या वेळीं लोकांच्या मनांतील चंचलपणा नाहींसा करून त्यांच्यामध्यें इच्छित हेतूसंबंधानें एकतानता उत्पन्न करणें जरूर होतें आणि हें बिकट कार्य घडवून आणण्याकरितां पेननें, युद्धांत मेलेल्या "जनरल मॉंटगामेरीचें भूत व एक अमेरिकन प्रतिनिधी यांचा फिलाडेल्फिया नजिकच्या रानांत झालेला संवाद" या नांवाचें एक पत्रक प्रसिद्ध केलें. हें पत्रक अगदीं आणीबाणीच्या वेळीं प्रसिद्ध केलें असल्यामुळें त्यांतील मजकूर व तो जुळविणारी भाषापद्धति, लोकांचीं मनें

अतिशय उत्तेजित करणारी अशी होती. भुताच्या तोंडीं घातलेला कांहीं भाग तर फारच मर्मभेदक व हृदयद्रावक असा होता. तो वाचून नपुंसकालाही वीरश्री येण्याचा संभव होता! या पत्रकामुळें जो पाहिजे होता तो परिणाम तत्काल घडून आला. 'राष्ट्रीय स्वातंत्र्य' जाहीर करण्यासंबंधानें जो मतभेद होता तो बहुतेक नाहींसा झाला; पुढें दोन तीन महिन्यांतच राष्ट्रीय सभेनें (अर्थात् सर्व ठिकाणच्या प्रतिनिधींनीं) 'राष्ट्रीय स्वातंत्र्य' जाहीर करण्याचा ठराव पास केला. हें 'राष्ट्रीय स्वातंत्र्य' जाहीर करणारा खलिता मुख्यतः पेनच्या हातचा होता. त्यांत अमेरिकेंतील नीग्रो लोकांच्या मुक्ततेबद्दलचाही एक परिच्छेद पेननें घातला होता. परंतु जॉर्जिया व साउथ कारोलिना या परगण्यांतील लोकांनीं त्यास हरकत घेतल्यामुळें जेफर्सन (एक भावी प्रेसिडेंट) यानें तो काढून टाकला. ही गोष्ट पुढें पुष्कळ दिवसांनीं (त्या अमदानींतील माणसें मेल्यानंतर) उघडकीस आली. असो; याप्रमाणें अमेरिकन स्वातंत्र्य जाहीर करण्याची नुसती तयारी करूनच पेन थांबला नाहीं; तर त्यानें त्याप्रीत्यर्थ बंदूक खांद्यावर टाकून प्रत्यक्ष शिपाईगिरीही पतकरली! राष्ट्रीय सभेंतील प्रतिनिधि ज्यावेळीं (ऑगस्ट ते नोव्हेंबर इ० स० १७७७) राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या जाहिरनाम्यावर सह्या करीत होते त्यावेळीं पेननें 'पेनिसाल्व्हानिया' मासिकाचें संपादकत्व सोडून देऊन लष्करी छावणीचा मार्ग धरला होता. वाटेल तेथें मदतीस पाठवितां यावें म्हणून दहा हजार लोकांचें जें विशिष्ट सैन्य जमविण्यांत आलें होतें त्यांत पेननें आपलें नांव दाखल करून घेतलें. जनरल रॉब्रडर्यु ह्याच्या हाताखालीं तो प्रथम ॲबॉय व नंतर बर्गेन येथें लढला. हें विशिष्ट सैन्य फार थोड्या मुदतीकरितां जमविण्यांत आलें होतें व ती मुदत भरतांच त्यास रजा देण्यांत आली. त्यानंतर पेन फोर्ट ली येथें जनरल ग्रीन याजकडे गेला. त्यानें ता. १९ सप्टेंबर रोजीं त्यास 'व्हालंटीयर एडिकँप' नेमलें. ता. २० नोव्हेंबर रोजीं जनरल ग्रीनचा पराभव होऊन त्यास फोर्ट ली सोडून देऊन पळ काढावा लागला. हा पळ काढतांना त्याच्या सैन्याचे थंडीमुळें व अन्नसामुग्रीच्या कमतरतेमुळें फार हाल झाले. अशा आपत्तींत हें सर्व सैन्य Newrok येथें २२ नोव्हेंबरला येऊन पोंचलें. ह्या पराभवामुळें सर्व अमेरिकन सैन्य हवालदील झालें. वॉशिंग्टनच्या

सैन्याचीही अशीच दुःस्थिति होती. अन्नावांचून व कपड्यांवांचून त्यांचे हाल होत होतेच; त्यांतच विमनस्कतेची भर पडून त्यांचा धीर सुटूं लागला. ह्या स्थितीचें खरें स्वरूप लक्षांत येण्याकरितां (अमेरिकन जनरल) वॉशिंग्टन ह्यानें त्यावेळीं निरनिराळ्या पत्रांत काढलेले उद्गार पुढें देतों:—

ता. ९ नोव्हेंबर रोजीं तो आपल्या भावास लिहितो कीं, "ह्या पालटलेल्या अनिष्ट परिस्थितीमुळें मला मरणप्राय कष्ट होत आहेत. मी शपथेवर सांगतों, कीं हल्लीं जे सायास मी करीत आहें ते, मला दरसाल कोणीं वीस हजार पौंड बक्षीस दिले तरीही करण्याचें माझ्या मनांत येणार नाहीं. आणि इतकेंही करून माझी इभ्रत राहील कीं नाहीं कोण जाणे. कारण अशा अनेक प्रकारच्या आपत्तींमध्यें लोकांच्या कल्पनेबरहुकूम काम करणें बहुतेक अशक्यच आहे."

ता. २७ नोव्हेंबर रोजीं जनरल ली यास तो लिहितो कीं, "आपल्या प्रतिकारापेक्षां मुख्यतः वाईट हवेमुळेंच शत्रूची हालचाल मंदावली आहे." तो हें लिहीत होता त्यावेळीं शत्रूचें सैन्य Nework शहराच्या नजीक येऊन पोंचलें होतें आणि दुसरे दिवशीं तें एका बाजूनें शहरांत शिरलें व वाशिंग्टन आपलें सैन्य घेऊन दुसऱ्या बाजूनें बाहेर पडला. पुढें १३ डिसेंबर रोजीं जनरल ली शत्रूच्या हातीं सांपडला; तेव्हां वाशिंग्टनची स्थिति फारच चमत्कारिक झाली. तो आपल्या भावास लिहितोः—

"माझ्या प्रस्तुत दुःस्थितीपेक्षां खडतर अशी स्थिति तुमच्या कल्पनेच्या आटोक्यांत क्वचितच येईल. आतां तत्काल नवें सैन्य उभारणें एवढाच काय तो आम्हांस तरणोपाय उरला आहे, व जर तो फसला तर सर्वच कांहीं आटोपलें म्हणून समजावें. कारण ठिकठिकाणचे रहिवासी, धैर्य, जोम व सोशिकपणा यांच्या अभावामुळें प्रतिकार करण्याच्याऐवजीं जर्सी येथें जनरल हौ यास शरण जाऊन त्याचा आश्रय मागूं लागले आहेत."

हें पत्र लिहिण्यापूर्वींच एक दिवस अगोदर त्यानें राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षास, "आपली स्थिति फार बिकट आहे व आपल्या शिपायांची फार दुर्दशा झाली असून कित्येकांना तर वस्त्राच्या अभावामुळें समरांगणावर नेणें अशक्य झालें आहे" अशा अर्थाचें पत्र लिहिलें. ता. १८ डिसेंबर रोजीं तो फिरून आपल्या भावास पुढीलप्रमाणें लिहितोः—

"माझी स्थिति किती तारांबळीची आहे याची तुम्हास कल्पना होणार नाहीं. मला वाटतें, इतक्या मोठ्या अडचणी व त्यांतून निसटण्याच्या साधनांची इतकी कमतरता माझ्याप्रमाणें दुसऱ्या कोणाच्या वांट्यास क्वचितच आली असेल. असें जरी आहे तरी आपल्या कार्याच्या न्याय्य-पणाविषयीं माझी पूर्ण खात्री असल्यामुळें, जरी कांहीं कालपर्यंत तें अनिश्चित-पणाच्या ढगाखालीं आच्छादून गेलें तरी तें सपशेल बुडेल अशी कल्पना मनास शिवत नाहीं."

वर दिलेल्या वॉशिंग्टनच्या पत्रांतील उताऱ्यांवरून त्यावेळीं अमेरिकन सैन्य व सेनानी यांची स्थिति काय होती, हें वाचकांच्या चांगलें लक्षांत येईल. वॉशिंग्टननें उल्लेखिलेला अनिश्चितपणाचा ढग दूर सारून स्वातंत्र्य-रूपी बालरवीचीं स्वच्छ किरणें अमेरिकेच्या किनाऱ्यावर प्रकाशित करण्यास यावेळीं पेनच्या लेखणीनें बिनतोड मदत केली. जनरल ग्रीनचा पराभव होऊन त्याचें सैन्य Nework येथें येतांच पेननें, पुढें प्रख्यात झालेलें 'The first crisis' (पहिली आणीबाणीची वेळ) या नांवाचें पत्रक लिहिण्यास सुरवात केली. हें पत्रक १९ डिसेंबर रोजीं छापलें व लागलींच सर्व सैन्यांत वांटलें गेलें. ह्या सुमारास ट्रेंटन शहरावर गुप्तपणें हल्ला करण्याचा वॉशिंग्टनचा विचार ठरलेला होता. हा हल्ला होण्यापूर्वीं दोन तीन दिवस अगोदर पेनचें उपरोक्त पुस्तक लष्करांत प्रसिद्ध केलें गेलें व सर्व लहान मोठ्या अधिकाऱ्यांनीं आपापल्याभोंवतीं शिपायांचे कंपू जमवून त्यांस तें मोठ्या आवेशानें वाचून दाखविलें. त्यांतील मजकूर ऐकतांच अन्नवस्त्राच्या कमतरतेमुळें हिरमुसलेल्या व अपेशामुळें हतवीर्य झालेल्या शिपायांच्या अंगांत वीरश्रीचें अवसान चढलें. ह्या पत्रकाचा प्रारंभ पुढील शब्दांनीं करण्यांत आला होता:—

"These are the times that try men's souls. The summer soldier and the sunshine patriot will, in this crisis, shrink from the service of his country; but he that stands it now, deserves the love and thanks of man and woman. Tyrany, like hell, is not easily conquered; yet we have this consolation with us,

that the harder the conflict the more glorious the triumph; what we obtain too cheap we esteem too lightly; it is dearness only that gives everything its value. Heaven knows how to put a proper price upon its goods and it would be strange indeed if so celestial an article as Freedom should not be highly rated."

हे व यापुढील भागांतले शब्द शिपायांच्या अंतःकरणामध्यें इतके भिनून गेले कीं, त्यांनीं अन्नवस्त्रादिकांची परवा सोडून देऊन मोठ्या उत्साहानें आपल्या बंदुकी खांद्यावर टाकल्या व 'These are the times that try men's souls !' हें वाक्य गुणगुणत त्याच्या नादांत ते समरभूमीकडे जाऊं लागले ! त्यांच्या अंगीं त्यावेळीं विलक्षण आवेश चढलेला होता. देशकार्यापुढें त्यांना स्वतःच्या जिवाची कांहीं किंमत वाटत नव्हती. यामुळें ट्रॅंटनवर हल्ला करण्याची जेव्हां वेळ आली तेव्हां ते अगदीं कसून व जिवावर उदार होऊन लढले. अर्थात् त्याचा परिणामही इष्ट असाच झाला. नाताळच्या दिवशीं उत्तर रात्रीस वॉशिंग्टननें ट्रॅंटनवर हल्ला केला व दुसरे दिवशीं सूर्योदयापूर्वीं त्यानें तें शहर हस्तगत करून घेतलें ! यावेळीं वॉशिंग्टनच्या हातीं शत्रूची बरीच सेना सांपडली होती. 'वक्त्यांच्या वक्तृत्वानें लोकांच्या मनोवृत्तींत विलक्षण खळबळ झाल्याचीं अनेक उदाहरणें इतिहासांत आहेत; परंतु लेखणीच्या सामर्थ्यानें हतवीर्य व हताश झालेल्या लोकांमध्यें जिवावर उदार होण्याइतकें अवसान भरल्याचें उदाहरण पेनच्या चरित्राखेरीज इतरत्र क्वचितच सांपडेल,' असें डॉ० कॉनवे यानीं या प्रसंगास अनुलक्षून लिहिलें आहे. असो; ट्रॅंटनचा विजय मिळाल्यानंतर इंग्लिश सेनापति लॉर्ड हौ यानें पुन्हां शांततेचें व तडजोडीचें बोलणें सुरू केलें व आपल्या इच्छेप्रमाणें तडजोड झाल्यास गतगोष्टींबद्दल अमेरिकन लोकांस माफी मिळेल म्हणून जाहीर केलें. तेव्हां पेननें 'The second crisis'(दुसरी आणीबाणीची वेळ) ह्या नांवाचें आणखी एक पत्रक प्रसिद्ध केलें. 'पेन हा एक भाडोत्री लेखक असून आपली तुंबडी भरण्याकरितां प्रस्तुत संधीचा फायदा घेऊन लोकांचीं मनें प्रज्वलीत करणारीं पत्रकें लिहीत आहे' वगैरे

प्रकारची ओरड लॉर्ड हौच्या पक्षाकडून करण्यांत आली होती. त्यास व त्यानें प्रसिद्ध केलेल्या माफीच्या जाहीरनाम्यास अनुलक्षून पेननें पुढील उत्तर दिलें आहे:—

"What I write is pure nature, and my pen and my soul have ever gone together. My writings I have always given away, receiving only the expense of printing and paper, and sometimes not even that. I never counted either fame or interest, and my manner of life, to those who know it, will justify what I say. My study is to be useful, and if your lordship loves mankind as well as I do, you would, seeing you cannot conquer us, cast about and lend your hand towards accomplishing a peace. Our independence, with God's blessing we will maintain against all the world; but as we wish to avoid evil ourselves, we wish not to inflict it on others. ××× if you neglect the present opportunity, it will not be in our power to make a seperate peace with you afterwards, for whatever treaties or alliances we form we shall most faithfully abide by; wherefore you may be deceived if you think you can make it with us at any time."

पेनचें हें लिहिणें लॉर्ड हौ यास केवळ औद्धत्याचें वाटलें; पण अमेरिकन पक्षांतील पुढाऱ्यांचा त्यावर विश्वास असल्याचीं स्पष्ट चिन्हें जेव्हां त्यास दिसूं लागलीं, तेव्हां त्यांचा गंभीरपणें विचार करणें त्यास भाग पडलें. II crisis प्रसिद्ध झाल्यावर लवकरच फिलाडेल्फिया येथील 'कौन्सिल ऑफ सेफ्टी'नें पेनला रेड इंडियन लोकांस वश करून घेण्याकरितां राष्ट्रीय सभेनें पाठविलेल्या कमिशनचा सेक्रेटरी नेमिलें. ह्या कमिशनचा रिपोर्ट पेननें लिहिला व त्याबद्दल पेनिसाल्व्हानिया येथील लोकसभेनें राष्ट्रीय सभेच्या नांवावर त्यास ३०० पौंड मुशाहिरा म्हणून दिले. त्यानंतर राष्ट्रीय सभेनें जेव्हां (एप्रिल १७)

परराष्ट्रीय खात्याचा व्यवहार पहाणारी कमिटी स्थापन केली, तेव्हां पेनला त्या कमिटीचा सेक्रेटरी नेमण्यांत आलें. ह्या जागेचा पगार दरमहा सत्तर डॉलर ठरला होता; पण पेनला फक्त १५ डॉलरच मिळत असत!

वॉशिंग्टननें ट्रेंटन शहर हस्तगत केल्यानंतर बरेच दिवस इंग्लिश सैन्याची हालचाल थांबली होती. त्या अवधींत पेन फिलाडेल्फिया येथें येऊन क्वेकर लोकांच्या विरोधाचा प्रतिकार करण्याची खटपट करीत होता. व नंतर लवकरच त्यानें 'III crisis' (तिसरी आणीबाणीची वेळ) नांवाचें एक पत्रक प्रसिद्ध केलें. या पत्रकांत त्यानें नैतिक व राजकीय दृष्टीनें अमेरिकन लोकांच्या 'राष्ट्रीय स्वातंत्र्या'चें समर्थन करून त्याचें रक्षण करण्याकरितां अवश्य असलेल्या कायदेशीर योजनांची चर्चा केली आहे. हें पत्रक लिहीत असतांना त्याचे ठायीं, फार मोठ्या जबाबदारीची जाणीव तीव्रपणें जागृत असल्याचें, त्यांतील विचारसरणीवरून दिसून येत आहे. राष्ट्रीय सभेनें पुढें जे एतद्विषयक कायदे पास केले ते ह्या विचारसरणीच्या अनुरोधानेंच होत. यावरून या पत्रकाचें महत्त्व वाचकांच्या चांगलें लक्षांत येईल.

परराष्ट्रीय खात्याच्या कमिटीच्या सेक्रेटरीची जागा पतकरल्यामुळें पेनला ह्यावेळीं अतिशय काम करावें लागलें, हें त्याचा त्यावेळचा पत्रव्यवहार नुसता वरवर चाळून पहाणारासही कळून येण्यासारखें आहे.* हें काम संभाळूनही इष्ट प्रकारचें लोकमत तयार करण्याकरितां लेखनक्रियेचें कामही त्यानें चालू ठेवलें होतें. या युद्धांत फिलाडेल्फिया शहर जेव्हां शत्रूंनीं घेतलें त्यावेळीं, वॉशिंग्टनच्या हातून फार चुका झाल्या. त्यामुळें राष्ट्रीय सभेंत त्याच्याविरुद्ध टीका होऊं लागली व कित्येक प्रतिनिधींनीं तर त्याजविरुद्ध कट करून त्याचा पाडाव करण्याचा—त्यास खालीं आणण्याचा

---

* हा पत्रव्यवहार तत्कालीन कर्त्या पुरुषांशीं असून तो फार महत्त्वाचा आहे. परंतु त्यांतील कित्येक बाबी तत्कालीन कालापुरत्याच उपयुक्त असल्यामुळें व पेनच्या चरित्रापेक्षां 'अमेरिकन क्रांती'च्या इतिहासांत त्या विशेष शोभण्यासारख्या असल्यामुळें, सदर पत्रव्यवहार येथें देण्यांत आला नाहीं.

प्रयत्न केला. वॉशिंग्टनच्या हातून बऱ्याचशा चुका झाल्या अशी पेनची प्रामाणिक समजूत होती; परंतु वॉशिंग्टनच्या देशभक्तिसंबंधानें व सद्हेतूसंबंधानें त्याची पूर्ण खात्री होती. कसलाही प्रसंग आला तरी वॉशिंग्टन हातीं घेतलेलें काम सोडून देणार नाहीं, असा त्यास पूर्ण भरंवसा होता. म्हणून त्यावेळीं त्याच्याविरुद्ध झालेला गवगवा व प्रतिकूल मत नाहींसें करण्याकरितां त्यानें IV crisis (चवथी आणीबाणीची वेळ) हें पत्रक प्रसिद्ध केलें. ह्या पत्रकामध्यें त्यानें मोठ्या खुबीदार शब्दांनीं व युक्तिवादानें जॉर्ज वाशिंग्टनसंबंधीं उत्पन्न झालेला विरोध व प्रतिकूल मत नाहींसें करण्याचा यत्न केलेला आहे. वॉशिंग्टनच्या कृतीचें प्रत्यक्षपणें समर्थन करणारें एकही वाक्य न लिहितां फक्त प्रतिपक्षाचें कपट व डावपेंच यांचें आविष्करण करून लोकांच्या मनांतील देशभक्तीच्या भावनेस उत्कटपणें चेतविण्याचा त्यांत प्रयत्न केलेला आहे. ह्या पत्रकाचा लोकमतावर व वॉशिंग्टनच्या चुकांमुळें पराभव पावल्याकारणानें हताश झालेल्या दीन स्थितींतील त्यांच्या शिपायांच्या मनावर फारच विलक्षण परिणाम झाला. वॉशिंग्टनची जाऊं पहाणारी इभ्रत त्यामुळें बचावली व त्याचा पुढील मार्ग जास्त सुकर झाला.* या पराभवामुळें अधीर झालेल्या व भ्यालेल्या लोकांना हें पत्रक वाचून बराच (सकारण) धीर आला. 'शत्रूचें सामर्थ्य तीन वर्षांच्या युद्धामुळें पुष्कळ कमी झालें असून त्यांच्या तिजोरीची स्थितिही समाधानकारक नाहीं; त्यांना फ्रान्स व स्पेन यांचेंही भय आहे; अशा स्थितींत अमेरिकेबरोबर फार कालपर्यंत त्यास युद्ध करवणार नाहीं.' वगैरे मुद्यांवर जोर देऊन त्यानें लोकांच्या मनांत राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या मोहिमेच्या यशस्वीपणाबद्दल आशा उत्पन्न केली. "इतक्या थोडया सैन्याशीं सामना करण्याचा प्रसंग व कायमचा जय मिळविण्याची अशी उत्कृष्ट संधि यापूर्वीं आपणांस कधींच आली नव्हती," असें त्यानें लोकांस निक्षून सांगितलें. हें पत्रक त्यानें उभयतांची स्थिति

---

* यासंबंधानें डॉ० कानवे म्हणतो:—'Never was aid more artistic than that Pain's pen now gave to washington. ... ... There is no accent of advocacy. While belittling all that Howe (General) had gained he reunites, Washington and Gates, in the public mind....etc.

प्रत्यक्ष पाहून लिहिलें असल्यामुळें व त्यांतील प्रतिपादनशैली खातरजमा करणारी (convincing) अशी असल्यामुळें लोकांच्या मनांत उत्पन्न झालेलें औदासिन्य व खिन्नता त्यानें तत्काळ दूर केली. पेन हें एवढें पत्रक लिहूनच थांबला नाहीं तर त्यानें वेळोवेळीं असलीं पत्रकें प्रसिद्ध करून अमेरिकन स्वातंत्र्याप्रीत्यर्थ चालू असलेल्या मोहिमेची प्रगति करण्याचें काम एकसारखें अव्याहत चालू ठेविलें होतें. अमेरिकेचा हितचिंतक फ्रँकलीन हा त्यावेळीं पॅरिस येथें होता. त्यास पेननें ह्या मोहिमेंतील वर्तमान सविस्तरपणें कळविण्याकरितां ह्याच सुमारास एक फार मोठें पत्र लिहिलें आहे. फ्रँकलीन हा पॅरिस येथें राहून अमेरिकन कार्यास फ्रान्सची सहानुभूति व मदत मिळविण्याची खटपट करीत होता व त्यास अमेरिकेंतील इत्थंभूत हकीकत कळविण्याचें काम पेनकडेच होतें. पेननें भाकित केल्याप्रमाणें लौकरच ब्रिटिश जनरलानें आपण होऊन फिलाडेल्फिया शहर सोडून दिलें (जून १८, सन १७७८). याप्रमाणें ब्रिटिशांनीं जरी माघार घेतली तरी राष्ट्रीय सभेचे कित्येक प्रतिनिधि मध्येंच युद्ध थांबवून तह करण्याच्या गोष्टी बोलत होतेच. फिलाडेल्फिया शहरांतील कित्येक कुटुंबांचा इंग्लडांतील लोकांशीं आप्तसंबंध असल्यामुळें व कांहींचा त्या देशाशीं व्यापारी हितसंबंध असल्यामुळें ते लोक स्वतंत्र होण्याच्या विरुद्ध होते. ह्या शहरांतील बहुजनसमाजाचेंही मत 'राष्ट्रीय स्वातंत्र्या'स फारसें अनुकूल नव्हतें. तेव्हां लोकसत्तानुवर्ती राष्ट्रीय-स्वातंत्र्य प्राप्त करून घेतल्याशिवाय तह करणें इष्ट नाहीं, हें या लोकांच्या मनावर ठसवून देण्याकरितां पेनला आणखी पत्रकें प्रसिद्ध करावीं लागलीं. ह्या पत्रकांतून त्यानें ब्रिटिश पीसकमिशनर्सची थट्टा करून त्यांच्या मागण्यांचें वैयर्थ्य दाखवून दिलें आहे व अशा आणीबाणीच्या आणि आत्मोत्कर्षाच्या प्रसंगीं सर्वांनीं एकमतानें व एकदिलानें राष्ट्रकार्याकरितां आपलें सर्वस्व अर्पण करण्यास तयार झालें पाहिजे, असें अमेरिकन लोकांस आठवून सांगितलें आहे. अशा वेळीं अमेरिकन देशभक्तांचें ब्रीद कोणतें असलें पाहिजे हें सांगण्याकरितां 'The American Patriots' Prayer' या सदराखालीं त्यानें कांहीं कविता प्रसिद्ध केल्या; त्यांचें रूपांतर पुढें देण्यांत येत आहे. त्यावरून त्याच्या शीलाची व देशभक्तीची बरीच चांगली कल्पना होण्यासारखी आहे.

अमेरिकन देशभक्ताची प्रार्थना.

पद (चाल०—पंचतुंड नररुंडमाळधर.)

सर्वशक्ति तूं लोकत्रितयीं चराचराचा तूं जनिता ॥
यशःस्तोत्र तव अखंड वाहे अनंत लोकीं भगवंता ॥ धृ०॥

कोण, कुठुनि मी आलों, माझें कार्य कोणतें वद मातें ॥
स्वार्थे ना नाडावें माझें मानव्यासी जें नातें ॥
स्वस्वरुपातें जाणायातें नता शिकवि या भगवंता ॥ १ ॥

मनोवृत्ति या वळोत माझ्या हांक ऐकुनी देशाची ॥
नियम विवेकाचा पावन हा, निवड असे ही सुगुणांची ॥
हांक निसर्गाचीही तैसी आज्ञा तव ही भगवंता ॥ २ ॥

स्वातंत्र्याच्या पवित्र कार्या विन्मुख कधिं म्यां ना व्हावें ॥
धन मान स्तुति मित्रत्वादिकिं मातें ना कधिं भुलवावें ॥
मार्ग सुमंगल दावि दयाळा त्वद्भक्ता या भगवंता ॥ ३ ॥

द्वैत जातिविद्वेषें मत्कारिं न पडो व्यसनीं भूमाता ॥
व्यक्तिद्वेषा विद्ध कराया प्रेरावें ना या हाता ॥
नृपसत्ता वज्रा योजाया मोह पडोना मच्चित्ता ॥ ४ ॥

असन्मार्ग मद्देशबांधवीं एक विचारें आक्रमिला ॥
वळवाया तरि तयां सत्पथा यत्न पाहिजे म्यां केला ॥
मायभूमिची सेवा ऐसी घडवी देवा भगवंता ॥ ५ ॥

ह्या कवितेंत सांगितल्याप्रमाणें प्रत्येक तऱ्हेचा स्वार्थत्याग पेननें केला होता. त्यानें आपली आवडीची व किफायतशीर अशी पेनिसाल्व्हानिया मासिकाच्या संपादकाची जागा सोडून दिली होती; तसेंच फिलाडेल्फिया येथील फायदेशीर असा शिक्षकाचा धंदाही सोडून समरभूमीवरील आपत्तींचा कटु अनुभव घेण्यासही तो आनंदानें तयार झाला होता. अशा

रीतीनें त्यानें आपलें मन व शरीर तर अमेरिकन स्वातंत्र्याच्या कार्यास वाहिलें होतेंच पण त्याशिवाय आणखी त्यानें लिहिलेल्या सर्व पत्रकांचें स्वामित्व–अर्थात् उत्पन्न–या कार्यास अर्पण केलें. त्याचीं हीं पत्रकें, प्रत्येकीं दोन अगर तीन शिलिंगप्रमाणें, हजारोंनीं खपत होतीं परंतु त्याची स्थिति पाहिली तर त्याजजवळ आपल्या एका मित्राचे बूट वेळेवर दुरुस्त करून पाठविण्यापुरतेही पैसे नव्हते ! याला म्हणावें स्वार्थत्याग ! व हीच खरी उत्कट देशभक्ति ! असे पुरुष ज्या राष्ट्रांत निपजतात तें राष्ट्र खरोखरच भाग्यवान् होय !!!

प्रकरण चवथें

फ्रान्सची मदत व तत्संबंधीं कारस्थानें.

अमेरिकन राष्ट्राचे हिताकरितां पेन इतक्या उत्कटत्वानें झटत होता कीं, त्या बाबतींत त्यानें स्वतःच्या संरक्षणाचा अथवा हिताहिताचाही कधीं विचार केला नाहीं. त्याची वागणूक इतकी चोख व निर्भिडपणाची होती कीं, अमेरिकन राष्ट्राचें तिलमात्र देखील नुकसान कोणी करूं लागल्यास त्याचा–मग तो केवढाही मोठा असो–खरपूस समाचार घेतल्यावांचून तो रहात नसे. कोणत्याही राष्ट्रांत राज्यक्रांतीची धामधूम सुरू झाली म्हणजे कित्येक मोठमोठ्या कर्त्या पुरुषांना सत्ता व संपत्ति यांचें साधन करून आत्महित करून घेण्याची एकप्रकारें पर्वणीच येत असते. ही पर्वणी आली असतां, आपला देशाभिमान व स्थूलमानानें आपली देशहितैकदृष्टीही कायम ठेवून आत्मसाधनाच्या वाहत्या गंगेंत हात धुवून घेण्याचा मोह ज्याला होत नाहीं असा मनुष्य विरळा! थॉमस पेन हा अशांपैकींच एक होता व अमेरिकन क्रांतीच्या इतिहासाचें सूक्ष्म दृष्टीनें निरीक्षण करणारास त्याकाळीं अशा तऱ्हेचा हा एकटाच मनुष्य होता असें आढळून येईल. अशा मनुष्याला निर्भिडपणामुळें कधीं कधीं स्वतःवर संकट ओढवून घेण्याची पाळी येते हें व्यवहारज्ञांस माहित असेलच. पेनलाही हा कटु अनुभव आला. तो कसा हें पुढील हकीकतीवरून समजून येईल.

अमेरिकन स्वातंत्र्याची चळवळ जेव्हां सुरू झाली तेव्हां फ्रान्स व इंग्लंड यांचें बरें नव्हतें. दोन्ही राष्ट्रें एकमेकांस पाण्यांत पहात होतीं. इंग्लंडनें इ० स० १७६३ त फ्रान्सचा पराभव केल्यामुळें फ्रान्स इंग्लंडवर मनांत जळफळत होतें. अमेरिकेंत क्रांति सुरू होतांच फ्रान्सचा तत्कालीन प्रधान व्हर्जिनस यास साहजिकच समाधान वाटलें व त्यानें अमेरिकेस मदत करण्याचा घाट घातला. परंतु फ्रान्सच्या राजाला हा बेत प्रथम फारसा पसंत नव्हता. यामुळें उघडपणें अमेरिकेस मदत करण्याचें धैर्य त्या प्रधानास होईना. तथापि मदत करण्याची त्याची उत्कट इच्छा असल्यामुळें

त्यानें ब्यूमार्शेस नामक एका धाडसी मनुष्यास हातीं धरून त्याच्यामार्फत लंडन येथील अमेरिकेचा गुप्त अधिकारी मुनीम आर्थर ली याचा विचार घेऊन एक योजना तयार केली. त्या योजनेप्रमाणें फ्रान्सनें अमेरिकेला अर्धा लक्ष लिव्हर्स सोन्याच्या रूपानें द्यावेत व अर्धालक्ष दारूगोळ्याचे (युद्धसामुग्रीच्या) रूपानें द्यावेत असें ठरलें होतें. परंतु ही रक्कम सरकारमार्फत न देतां ब्यूमार्शेस यानें स्थापन केलेल्या एका व्यापारी कंपनीच्यामार्फत अमेरिकन गुप्त प्रतिनिधीस द्यावी व त्याजकडून त्याबद्दल तितक्या किंमतीची तबाखू घ्यावयाची असें जाहिर करावें म्हणजे 'मदत केली' असा बोभाटा होणार नाहीं, असें हें कारस्थान होतें. वास्तविक तंबाखूचें हें केवळ सोंग होतें व 'आपल्याविरुद्ध अमेरिकेस मदत केली' असें इंग्लंडला बोलण्यास संधी सांपडूं नये, म्हणून तें केलें होतें. ह्या कारस्थानास पुढें व्हर्जिनस यानें फ्रान्सच्या राजाचीही संमति मिळविली होती. याच सुमारास डीन नांवाचा अमेरिकन प्रतिनिधि फ्रान्समध्यें युद्धसामुग्री खरेदी करण्यास निघाला होता. तो इ० स० १७७६ च्या जुलई महिन्यांत पॅरिस येथें जाऊन पोंचला व व्हर्जिनसच्या सल्ल्यावरून त्यानें ब्यूमार्शेस याची गांठ घेतली. डीन पॅरिसमध्यें येणार हें जर ब्यूमार्शेस ह्यास पूर्वीं कळतें, तर त्यानें आर्थर ली याच्याशीं संबंध ठेवलाच नसता. आर्थर लीनें ह्या कारस्थानाची खरी बातमी अमेरिकेंत कळविली होती व यासंबंधीचा सर्व पत्रव्यवहार पेनच्या—तो परराष्ट्रीय खात्याच्या कमेटीचा सेक्रेटरी असल्यामुळें—हातीं होता. डीन पॅरिसमध्यें येतांच त्यानें आर्थर ली बरोबर झालेल्या ठरावाची ब्यूमार्शेस ह्यास ओळख दिली परंतु ब्यूमार्शेसनें त्यास उडवाउडवीचीं उत्तरें दिलीं. व पुढें तर त्यानें त्या मदतीविषयींची खरी गोष्ट पार नाकबूल केली. परंतु इतक्यांत अमेरिकेपासून पुढें मिळणाऱ्या सवलती न गमवाव्यात म्हणून फ्रान्सच्या सरकारनें अमेरिकन प्रतिनिधि मि० डीन, फ्रँकलिन व ली यास, ब्यूमार्शेस याचे स्वाधीन केलेली एक लक्ष लिव्हर्सची रक्कम अमेरिकेस आपण देणगी म्हणून दिली आहे; मात्र हा व्यवहार गुप्त ठेवावा, असें कळविलें. तथापि ही गोष्ट जाहिर करतां येण्यासारखी नसल्यामुळें ब्यूमार्शेस यानें त्यापासून स्वतःचा फायदा करून घेण्याचा विचार केला व अमेरिकन प्रतिनिधि डीन हाही

पुढें त्यास सामील झाला. ब्यूमार्शेस यानें आपल्या एका मुनीमाच्या द्वारें त्यानें पाठविलेल्या युद्धसामुग्रीबद्दल अमेरिकेच्या राष्ट्रीयसभेकडे मागणी केली. तेव्हां त्या सभेनें अर्थातच ह्या बाबीचा खुलासा करण्याविषयीं डीन यास परत बोलाविलें. डीन यानें ब्यूमार्शेसची मागणी रास्त असल्याचें राष्ट्रीयसभेस कळविलें. परंतु डीनची लुच्चेगिरी सिद्ध करण्याजोगा कांहींसा पत्रव्यवहार पेनच्या ताब्यांत होता तो त्यानें राष्ट्रीयसभेपुढें मांडला. त्यावर राष्ट्रीयसभेनें डीनला दोन वेळ खुलासा करण्याची संधी दिली परंतु त्याच्यानें ह्या दोन्ही खेपेस त्या सभेचें समाधान करवलें नाहीं. उलट त्याच्या खुलाशामुळें राष्ट्रीयसभेचा त्याजविषयीं प्रतिकूल ग्रह झाला आणि यामुळें त्या सभेनें पुन्हा त्याचें म्हणणें ऐकून घेण्याचें नाकारलें. त्यावरून डीन यास राग येऊन त्यानें आपलें समर्थन करण्याकरितां वर्तमानपत्राकडे धांव घेतली. हें पाहून पेननेंही त्यास वर्तमानपत्रांतून उत्तरें देण्याचा क्रम सुरू केला. पेनचें स्वतःचें वर्तन अगदीं चोख असल्यामुळें व अमेरिकन कार्यास त्यानें आपलें सर्वस्व वाहिलें असल्यामुळें त्याची लेखणी निर्भिड व अनियंत्रितपणें चालूं लागली व डीनचीं कृष्णकृत्यें उघडकीस आणण्याच्या भरांत त्याच्या हातून 'फ्रान्सनें आपण होऊन आम्हांस देणगी दिली व याबद्दल अमेरिकेनें त्यांचे आभार मानणें जरूर आहे' अशा अर्थाचा मजकूर लिहून गेला. हा मजकूर त्यानें, त्यावेळीं फ्रान्सबद्दल (ब्यूमार्शेसच्या मागणीमुळें) अमेरिकन लोकांत जी क्षुब्धता उत्पन्न झाली होती ती दूर करण्याकरितां लिहिला. परंतु फ्रान्सच्या परराष्ट्रीय हितसंबंधाच्या दृष्टीनें तो त्यावेळीं प्रसिद्ध होणें अनिष्ट (impolitic) असल्यामुळें तो प्रसिद्ध होतांच अमेरिकेंतील फ्रान्सच्या प्रतिनिधीनें राष्ट्रीयसभेकडे त्याबद्दल तक्रार केली व तो खोटा असल्याचें स्वतः जाहीर केलें. राष्ट्रीय सभेनेंही, पेनचा हा उल्लेख चुकीचा आहे असें जाहीर करावें अशी त्यानें मागणी केली. ह्या गुप्त कारस्थानाची नक्की माहिती राष्ट्रीयसभेस नव्हती. त्या संबंधींचा महत्त्वाचा पत्रव्यवहार फक्त पेनच्याच ताब्यांत असल्यामुळें, फ्रेंच प्रतिनिधि जेरार्द याच्या तक्रारीच्या खरेखोटेपणाविषयीं त्या सभेस कांहीं निकाल करतां येईना. जेरार्दच्या तक्रारीचा फायदा घेऊन डीन यानें राष्ट्रीयसभेच्या अनेक प्रतिनिधींचीं मनें पेनसंबंधानें कलुषित केलीं. व पेन

हा कांहीं तरी बरळत आहे, त्याला गर्व झाला आहे वगैरे गोष्टी त्यानें त्यांच्या मनांत भरवून दिल्या. पेनची बाजू उजळ करणारी माहिती ह्या प्रतिनिधीस फारशी नसल्यामुळें डीनच्या खुषामतीचा त्यांचेवर पगडा बसला. डीनच्या सुदैवानें ह्यावेळीं राष्ट्रीय सभेचा अध्यक्षही त्याच्या पक्षाचाच होता. तेव्हां अर्थातच डीनपक्षास पेनच्या विरुद्ध काहूर माजविण्यास आयती संधी सांपडली. राष्ट्रीयसभेच्या प्रतिनिधींत आपणासंबंधानें गैरसमज उत्पन्न करण्याचे प्रयत्न चालू आहेत असें समजतांच, पेननें पुढील आशयाचें पत्र त्या सभेस पाठविलें:—

"नामदार सभासदहो, माझ्या वर्तणुकीच्या कांहीं बाबीसंबंधानें हरकत घेतल्याचें मला समजलें आहे परंतु ती हरकत कोणत्या स्वरूपाची आहे हें मला ठाऊक नसल्यामुळें त्यासंबंधीं मला कांहींएक खुलासा करितां येत नाहीं. तथापि सार्वजनिक कामासंबंधीं माझ्या खासगी व जाहीर (Public) दोन्ही प्रकारच्या वागणुकीचा योग्य विचार करून त्यासंबंधानें बरा वाईट निर्णय करण्याचें काम मी आपणाकडे मोठ्या आनंदानें सोंपवितों. आजपर्यंत मीं जें जें कांहीं केलें तें सर्व चांगल्या हेतूनें केलें असून तें करण्यांत मी आपल्या सामर्थ्याची शिकस्त करीत आलों आहें हें पाहून मला समाधान वाटतें."

"इ० स० १७८७ च्या एप्रिल महिन्यांत, मीं याचना केली नसतांही नामदार राष्ट्रीयसभेनें माझी, परराष्ट्रीय खात्यांतील कमेटीच्या सेक्रेटरीच्या जागीं नेमणूक केली, ही नेमणूक अतिशय मानाची होती असें मी समजतों. आणि जरी त्या जागेचा पगार तेव्हांपासून आतांपर्यंत केवळ दरमहा ७० डालर—इतकाच आहे-ही रक्कम नेमस्त राहणीच्या खर्चासही पुरण्यासारखी नाहीं-तरी मीं त्याबद्दल कधींही तक्रार केली नाहीं. उलट ह्या देशाच्या अडचणींचा अंशभागी होणं हें आपलें कर्तव्य आहे असें मानून मी मोठ्या आनंदानें अनेक गैरसोयी सोशीत आलों आहें. अशी स्थिति असल्यामुळ माझ्या नोकरीच्या स्वस्तपणाखेरीज, दुसरी कोणतीही चूक माझ्याहातून घडल्याचें मला दिसून येत नाहीं; याशिवाय दुसऱ्या कित्येक बाबतींत मीं जें औदार्य दाखविलें आहे तोच, माझ्याहून भिन्न वृत्तीच्या मनुष्यास माझा गुन्हा वाटण्याचा संभव आहे."

"ज्याअर्थीं माझी जागा मोठ्या मानाची आहे त्याअर्थीं, त्या जागेस अनुरूप अशी कृति माझ्या हातून झाली नाहीं असें जर राष्ट्रीयसभेस आढळून येईल—राष्ट्रीयसभेचें तसें मत बनल्यास मला जरी फार वाईट वाटेल—तरी मी त्या मतास मान देऊन माझ्या ताब्यांतील कागदपत्र व पुस्तकें मी सभेच्या स्वाधीन करीन.

"जर माझ्या जागेचा पगार भरपूर असता तर तिचा राजीनामा देणें मला शोभलें असतें. परंतु तसें नसल्यामुळें मीं राजीनामा दिल्यास तो थोड्या पगारामुळें दिला असें वाटण्याचा संभव आहे. म्हणून ह्या सभेची जी आज्ञा होईल त्याप्रमाणें वागण्याचें मीं ठरविलें आहे. माझ्या-बद्दल सभेचें मत कांहींहि होवो, ह्या देशाच्या ज्या कार्याला मीं स्वतःस वाहून घेतलें आहे तें कार्य यशस्वी करण्याकरितां आपणाकडून शक्य तें सर्व करावयाचें असा जो माझा निश्चय झाला आहे त्यांत बिलकुल अंतर पडणार नाहीं हें आपणांस कळवून मी आपली रजा घेतों."

"थॉमस पेन"

हें पत्र ज्या दिवशीं त्यानें राष्ट्रीयसभेस पाठविलें त्याच दिवशीं ह्या सभेनें त्यास आपणापुढें बोलाविलें व त्याप्रमाणें तो हजर होतांच तिच्या अध्यक्षानें [जे] त्यास, वादविषयक मजकूर [फ्रान्सच्या देणगीसंबंधाचा] प्रसिद्ध केला कीं नाहीं, म्हणून प्रश्न केला. त्यास पेननें 'होय' असें उत्तर दिलें. हें उत्तर मिळतांच त्याला तत्काळ तेथून जाण्याची आज्ञा झाली. दुसरे दिवशीं सकाळीं पेनला असें आढळून आलें कीं, डीनच्या पक्षानें राष्ट्रीयसभेंत आपणांस कोणत्याही गोष्टीची परिस्फुटता करूं द्यावयाची नाहीं असा निश्चय केला आहे. पेनला असें समजतांच त्यानें राष्ट्रीयसभेस पुढीलप्रमाणें आणखी एक विनंतिपत्र लिहिलें.:—

"नामदार सभासदहो, काल मला आपणांपुढें बोलावून जो प्रश्न विचारण्यांत आला, त्यावरून माझ्या अलीकडील कांहीं लेखांसंबंधानें आपलें प्रतिकूल मत झालें असावें असा मला संशय येतो. परंतु माझ्या कोणत्या लेखांतील कोणता भाग आक्षेपार्ह आहे हें मला कळविण्यांत आलेलें नाहीं. जर कोणा सभ्य गृहस्थानें मजवर आरोप करणारा अथवा

आरोप करण्यास जागा असलेल्या मजकुरानें भरलेला एखादा अर्ज आपणांकडे केला असेल तर मी आपला नोकर या नात्यानें त्याची नक्कल आपणांस मागत आहें. ह्या देशांतील एक स्वतंत्र रहिवाशी Freeman या नात्यानें अशी नक्कल मागण्याचा मला हक्क आहे. काल मी ज्या वेळेस या सभेच्या न्यायासनापुढं आलों तेव्हां मजवरील आरोप मला कळविण्यांत येऊन आत्मसमर्थन करण्याचीही संधी दिली जाईल असें मला वाटलें. परंतु त्या बाबतींत माझी सर्वस्वी निराशा झाली.

"स्वतंत्र रहिवाशी ह्या दृष्टीनें पहातां, माझें म्हणणें ऐकल्याशिवाय मला ठपका दिल्यास तो सहन करणें मला योग्य होणार नाहीं. माझ्या वर्तनाचें समर्थन करणारा पुरावा माझेजवळ आहे अशी माझी समजूत आहे. आणि माझें म्हणणें ऐकून घेतल्याशिवायच मला विनाकारण ठपका दिला—मजवरील आरोपाची नक्कलसुद्धां मला मिळाली नाहीं, इत्यादि गोष्टी जर मीं सप्रमाण सिद्ध करून प्रसिद्ध केल्या तर या सभेकडे केवढा दोष येईल याचा आपण विचार करावा. ह्या सभेंतील [सभासदांच्या] अंतःकरणांस माझी अशी विनंति आहे कीं, माझ्या अब्रूवर घाव घालणाऱ्या गोष्टीचा निर्णय करण्यापूर्वी त्यांनीं स्वतःच्या अब्रूविषयीं नीट विचार करावा. लोकप्रीति संपादन करण्याचाच जर माझा हेतु असता तर मीं हें पत्र लिहिलें नसतें. माझा असें लिहिण्याचा उद्देश एवढाच आहे कीं, ज्या गोष्टीचें पुढें समर्थन करतां येणार नाहीं, अशी कोणतीही गोष्ट ह्या सभेच्या हातून होऊं नये.

"या देशांत मीं कीर्ति, मान्यता व इभ्रत संपादन केली असून त्या सर्वांबद्दल मला मोठा अभिमान वाटतो. आणि गुप्त रीतीनें केलेल्या आरोपावरून अन्यायानें जर त्यास कोणी धक्का लावील तर आत्मसमर्थनाचा [त्या मानमान्यतेच्या रक्षणार्थ] अभियुक्त मार्ग काढून त्याचा अवलंब करणें हें पुढें माझें कर्तव्य होईल. मजवर मेहेरबानी करा, असें मी म्हणत नाहीं. सरळपणानें व सन्मान्य पथानें मजबरोबर वागा, एवढेंच माझें मागणें आहे व तें मागणें मागण्याचा माझा हक्क आहे. जर माझें म्हणणें ऐकून घेण्याचा ह्या सभेचा विचार ठरेल, तर

माझें म्हणणें पुढें मांडण्याची तयारी करण्यास मला पुरेसा वेळही सभा देईल अशी आशा प्रदर्शित करून मी रजा घेतों."

पेननें याप्रमाणें राष्ट्रीयसभेस विनंतिपत्र लिहिलें खरें; पण फ्रेंच मदतीबद्दलची फ्रान्समध्यें घडलेली हकीकत पुढें येऊं द्यावयाची नाहीं [जाहीर होऊं द्यावयाची नाहीं] असें राष्ट्रीयसभेनें अगोदरच ठरविलें*

---

* फ्रेंच प्रतिनिधि जेरार्ड हा ब्यूमार्शेस यास यांत सामील झाला व त्याच्यातर्फे आणि फ्रेंचसरकारतर्फे तो राष्ट्रीयसभेवर आपलें वजन घालूं लागला. यामुळें राष्ट्रीयसभेचाही एका दृष्टीनें नाइलाज झाला. पण त्यामुळें पेनला मात्र फार त्रास सोसावा लागला. फ्रान्सांतील ह्या कारस्थानाचें स्वरूप व्यक्त करणारें एक पत्र गव्हर्नर मॉरिस (हा कांहीं दिवस फ्रान्समध्यें अमेरिकेचा प्रतिनिधि होता व पेनचा गुप्त शत्रुही होता.) याच्या कागदपत्रांत सांपडलें आहे. हें पत्र त्यानें जॉन रँडाल्फ (अ० प्रेसिडेंट.) यांस लिहिलें आहे. त्यांतील महत्त्वाचा भाग पुढें देतों. त्यांतील मथितार्थ ह्या प्रकरणांत मराठींत सांगितलाच आहे.

"It will, I believe, appear from the correspondence between Mr. Arthur Lee and the secret and commercial committee, that early in our dispute with Great Britain the French Court made through him a tender of military supplies, and employed as their agent for that purpose M. Beaumarchais, who having little property and but slender standing in society might (if needful) be disavowed, imprisoned, and punished for presuming to use the king's name on such an occasion. In the course of our revolutionary war, large supplies were sent by M. Beaumarchais under the name of Roderique Hortalez & Co, a supposed mercantile name. But the operations were impeded by complaints of the British Ambassador, which obliged the French Court to make frequent denials, etc., * * * every step of this kind bound them more strongly to prevent a disclosure of facts. " After Congress returned to Philadelphia, M. De Frang agent of M. Beaumarchais, applied to

असल्यामुळें, पेनच्या पत्रांचा कांहीं एक उपयोग झाला नाहीं. पेनचें हें पत्र राष्ट्रीयसभेच्या अध्यक्षानें दाबून टाकलें असावें, असें दिसतें. कारण त्याची नोंद सभेच्या कार्यक्रमपुस्तकांत नाहीं. या पत्राचें उत्तर न आल्यामुळें त्यानें आपल्या जागेचा राजीनामा देणारें एक पत्र फिरून राष्ट्रीयसभेस पाठविलें. या पत्रांत त्यानें मागील दोन पत्रांतील मुद्दे विशेष स्पष्ट करून सांगितले आहेत व आपण जें जें कांहीं लिहिलें व प्रसिद्ध केलें तें राष्ट्रीयसभेची इभ्रत व देशाचें हित यांच्या संरक्षणाकरितांच लिहिलें असें प्रतिपादिलें आहे. त्याचें हें व यापुढील दुसरीं कित्येक पत्रें राष्ट्रीयसभेचा अध्यक्ष जे यानें दाबून टाकिलीं. [जे हा अमेरिकेंतील टोरीपक्षाचा असल्यामुळें पूर्णलोकसत्तावादी पेनबद्दल त्याच्या मनांत फारशी सहानुभूति नव्हती.] मार्च ३० व एप्रिल २१ व २३ [सन १७७९] ह्या तीन तारखांस त्यानें पुन्हां राष्ट्रीयसभेस पत्रें लिहिलीं. त्यांपैकीं २३ एप्रिलचें पत्र महत्त्वाचें असल्यामुळें त्यांतील कांहीं भाग पुढें देतों:—

Congress for payment. This application was supported on the ground of justice by many who were not in the secret, for the Congress had then so much good sense as not to trust itself with its own secrets. There happened unluckily at that time a fued between Mr. Lee and Mr. Dean. The latter favoured M. Beaumarchai's claim. Pain who was clerk to the secret and commercial committee, took part in the dispute, wrote pieces for the gazettes, and at length, to overwhelm Dean and those who defended him with confusion, published a declaration as American secretary for Foreign affairs. (error. Pain signed common sense,) The French Minister M. Gerard, immediately made a formal complaint of that publication,and an equally formal denial of what it contained. The Congress was therefore obliged to believe, or atleast to act as if they believed, that Pain had told a scandalous falsehood."

"नामदार सभासदहो, आपले सेक्रेटरी मि० थॉमसन् यांजपाशीं चौकशी करितां, माझ्या पत्राचीं उत्तरें अद्याप देण्यांत आलीं नाहींत, असें समजतें. ह्या महत्त्वाच्या प्रसंगीं जिकडून मिळेल तिकडून माहिती गोळा करण्याचे कामीं कॉंग्रेस इतकी शिथिल कां झाली आहे हें समजत नाहीं आणि सुमारें तीन महिन्यांपूर्वी मला दरसाल ७०० पौंड (लांच) देऊं करण्याचा जो [एका स्थानाहून] खासगी रीतीनें प्रयत्न करण्यांत आला त्याचा विचार करितां कांग्रेसच्या शैथिल्याबद्दल मला विशेषच आश्चर्य वाटतें. सदर देणगी मला कितीही सभ्यपणानें अथवा मित्रभावानें देऊं केली असली तरी ती नाकारणें हेंच आपलें कर्तव्य आहे असें मला वाटलें; कारण त्यांत अशी शर्त होती कीं, तिच्यामुळें मीं त्या वेळेपासून सार्वजनिक बाबीसंबंधानें जी माहिती प्रसिद्ध केली व अद्यापही जी माहिती मला (ह्या) देशास द्यावयाची आहे ती प्रसिद्ध करण्यास व्यत्यय आला असता." वगैरे.

ह्या पत्रावरून कळून येईल कीं, पेनला, त्याची लेखणी विवक्षित मार्गाकडे नेण्याकरितां, दरसाल ७०० पौंडांचा लांच मिळण्याचा संभव होता. पेन यावेळीं अगदीं दरिद्रावस्थेंत असल्यामुळें जर त्यानें ह्या रकमेचा स्वीकार केला असता तर त्याचे दिवस मजेंत गेले असते. परंतु त्यानें तसें करण्याचें नाकारलें. या गोष्टीवरून पेनच्या लेखणीचें सामर्थ्य व त्याचा दिलदारपणा आणि नेकी (integrity) हीं कोणत्या दर्जाचीं होतीं याची वाचकांस चांगली कल्पना होईल. पेनला हा लांच देणारा गृहस्थ फ्रेंच प्रतिनिधि जेरार्द हाच होय. ह्या मुत्सद्याचे जे कागदपत्र उपलब्ध झाले आहेत त्यांवरून असें दिसतें कीं, पेनचा डीनच्याविरुद्ध पहिला लेख प्रसिद्ध होतांच हा गृहस्थ पेनला भेटावयास गेला व त्यानें त्याची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. पेननें त्याच्याशीं फार सभ्यपणाचें वर्तन केलें व आपला मुख्य मुद्दा न सोडतां त्याला शक्य तितकें संतुष्ट करण्याचाही त्यानें यत्न केला. पुढें पेननें जेव्हां राजीनामा दिला, तेव्हां त्याची गांठ पडतांच जेरार्द यानें त्यास लांच देऊन आपल्या बाजूस ओढून घेण्याच्या प्रयत्न केला. यासंबंधानें जेरार्द यानें आपल्या [फ्रान्सच्या] प्रधानास पुढील पत्र लिहिलें आहे:—

"when I had denounced to congress the assertions of M. Payne, I did not conceal from myself the bad effects that might result to a head puffed up by the success of his political writings, and the importance he affected. I foresaw the loss of his office, and feared that seperated from the support which has restrained him, he would seek only to avenge himself with his characteristic impetuousity and impudence.. × × × The only remedy, my lord, I could imagine to prevent these inconveniences, and even to profit by the circumstances, was to have Payne offered a salary in the King's name, in place of that he had lost. He called to thank me, and I stipulated that he should publish nothing on political affairs, nor about congress, without advising with me, and should employ his pen mainly in impressing on the people favourable sentiments towards France and the Alliance * * *. I promised him a thousand dollars per annum to begin from the time of his dismission× by congress. * * * You know too well the prodigious effects produced by the writings of this famous personage among the people of the states to cause me any fear of your disapproval of my resolution."

याशिवाय आणखी दोन प्रख्यात गृहस्थांच्या लेखण्या आपण विकत

× जरार्दचें हें लिहिणें चुकीचें आहे. पेनला कांग्रेसनें डिसमिस् (बडतर्फ) केलें नव्हतें. त्यानें आपण होऊन राजीनामा दिला होता. त्यास बडतर्फ करण्याविषयीं एक दोन सूचना कॉंग्रेसपुढें आल्या होत्या; पण त्या प्रचंड बहुमतानें नापास झाल्या. —डॉ० कॉनवे.

घेतल्या आहेत असें जेरार्ड लिहितो. ह्या दोन गृहस्थांनीं आपल्या ठरावाप्रमाणें 'Honest Politician व Americanus' या सहीखालीं जेरार्ड याच्या इच्छेप्रमाणें लेख लिहिले; परंतु पेननें मात्र त्याची इच्छा पूर्ण केली नाहीं. पेनशीं केलेला ठराव निरर्थक ठरला, असें जेरार्ड यानें फ्रेंच प्रधानास पुढील एका पत्रांत लिहिलें आहे.* ह्या फ्रेंच मुत्सद्यानें पेनबरोबर जें बोलणें केलें त्यासंबंधानें फिलाडेल्फिया येथील पत्रांतून पेननें पुढील मजकूर प्रसिद्ध केला.

"पैसे मिळविण्याचाच जर माझा हेतु असता तर तसें करण्यास मला पुष्कळ संधी होती. 'कॉमनसेन्स' या पत्रकाच्या विक्रीपासून उत्पन्न झालेला नुसता नफा जर मीं घेतला असता तर त्यावेळीं मला बरेंचसें गबर होतां आलें असतें. कारण त्या पत्रकाचा इतका खप झाला आहे कीं, त्यास ह्या देशांतच काय, पण इतर देशांतही तोड सांपडणार नाहीं. परंतु मीं त्याची किंमत फारच कमी ठेविली होती इतकी कीं, त्यासंबंधांत मला ३९ पौं. ११ शि. देणें झालें! याशिवाय माझा वेळ व परिश्रम त्या कामीं खर्च झाले ते निराळेच. याप्रमाणेंच माझ्या इतर पत्रकांसंबंधानेंही मीं निरपेक्ष बुद्धि दाखविली आहे."

"मि० डीन याच्या कामगिरीसंबंधानें जेव्हां वाद उपस्थित झाला, तेव्हां मि० जेरार्ड याच्या विनंतीवरून त्याचें माझें ह्या विषयावर पुष्कळ मोकळेपणानें बोलणें झालें. ही गोष्ट ता. २ जानेवारी रोजीं घडली. त्याच दिवशीं अगर दुसरे दिवशीं संध्याकाळीं मि० जेरार्ड यानें दुसऱ्या एका सभ्य गृहस्थाच्या मार्फत मला एक नाजुक व फायदेशीर गोष्ट कळविली (लांच देऊं केला) परंतु मीं त्यास पुढील आशयाचें उत्तर दिलें:—

'Any service I can render to either of the countries in alliance, or to both, I ever had done and shall readily do, and Mr. Gerard's esteem will be the only compensation I shall desire.'

---

* 'but this writer (Payne) having tarnished his reputation and being sold to the opposition, I have found another.,'

पेननें जेरार्द याची एक पैही कधीं घेतली नाहीं; परंतु फ्रेंच सरकारच्या औदार्याचा जाहीर उल्लेख केल्यानें त्या सरकारची चमत्कारिक स्थिति होण्याचा संभव आहे अशी खात्री होतांच त्यानें आपल्या मागील लेखांत दुरुस्ती कर णारा थोडासा खुलासा केला.त्याचा पहिला उल्लेख पुढीलप्रमाणें होता:—

"Those who are now her (America's) allies, prefaced that alliance by an early and generous friendship; etc" यांत त्यानें फ्रान्सच्या राजाचें नांव घेतलेलें नाहीं. तेवढी पळवाट शोधून पुढें ता. २६ जानेवारीस त्यानें असा खुलासा केला कीं, 'माझ्या मागील पत्रांत [लेखांत] मीं फ्रान्सच्या राजाचा कोणत्याही नांवानें उल्लेख केलेला नाहीं अथवा राष्ट्र या नात्यानें फ्रान्सचाही निर्देश केलेला नाहीं.' फ्रेंच प्रतिनिधी जेरार्द यास फायदेशीर असा काय तो एवढाच मजकूर पेननें लिहिला व तो त्यानें मोठ्या संतोषानें लिहिला. याच वर्षाच्या जून महिन्यांत पेनचा व मागें सांगितलेला 'Americanus' याचा [अमेरिकन] तहाच्या शर्तीसंबंधानें वादविवाद झाला व त्यांत 'Americanus' हा 'भाडोत्री' लेखक असल्याबद्दलचा आपला संशय पेननें व्यक्त केला आहे.

येथें हेंही सांगणें जरूर आहे कीं, फ्रान्समध्यें असतां डीन व जेरार्द यांची मैत्री असून त्यानीं व्हर्जिनस (फ्रेंच प्रधान) बरोबर अनेक वेळां खलबतें केलीं होतीं. डीन व जेरार्द हे दोघेही एकाच बोटीवरून अमेरिकेंत आले, व इंग्लंडांत सांपडलेल्या कांहीं कागदपत्रांवरून असें दिसून येतें कीं, जेरार्द याचा, अमेरिकेस पुरविलेल्या युद्धसामुग्रींत पैशाचा हितसंबंध होता. आणि म्हणून 'फ्रान्सची मदत ही देणगी आहे' हा पेनचा सिद्धांत खोडून काढणें—स्वहिताच्या दृष्टीनें त्यास भाग होतें. ह्या कारस्थानांतील मुख्य पात्रें म्हटलीं म्हणजे ब्यूमार्शेस व डीन हीं होत. पैकीं ब्यूमार्शेस हा हॉलंडमध्यें अगदीं दारिद्रावस्थेंत मरण पावला. डीन याची स्थिति तर त्याच्याहूनही वाईट झाली. राष्ट्रीयसभेनें त्याच्या फ्रान्सांतील कामगिरीबद्दल त्यास कांहींएक दिलें नाहीं. नंतर तो फ्रान्समध्यें गेला व अमेरिकन स्वातंत्र्यास प्रतिकूल असा पत्रव्यवहार करूं लागला. हा पत्रव्यवहार पकडला गेला व छापला गेला (इ० स० १७८२). परंतु फ्रँकलीन यानें, 'आपत्तीमुळें

त्याचें माथें फिरलें आहे' असें मोठ्या औदार्यानें तत्संबंधीं प्रतिपादन केल्यामुळें त्याचें पारिपत्य करण्याचा कोणीं यत्न केला नाहीं. अखेरीस तो इंग्लंडमध्यें गेला व इ० स० १७८९ त हीन स्थितींत मरण पावला. याप्रमाणें, 'हांसत कर्म करावें, भोगावें रडत तेंचि परिणामीं' अशी या कृष्ण-कारस्थानांतील दोन प्रमुख पात्रांची स्थिति झाली ! *

पेननें डीनवर वर्तमानपत्रांतून जे हल्ले केले ते केवळ निरपेक्षबुद्धीनें अमेरिकन राष्ट्राच्या हिताकरितांच केले. युद्धामुळें अमेरिकेच्या तिजोरीची ओढाताण झाली होती. अशा स्थितींत ब्यूमार्शेसची एक लक्षाची रक्कम डीनच्या सांगण्याप्रमाणें देणें म्हणजे अमेरिकेवर एक मोठें संकटच होतें. शिवाय ही रक्कम लोक लबाडीनें मागत होते; यासंबंधीं भरपूर पुरावा पेनच्या दप्तरीं होता. तेव्हां साहजिकच त्यास ह्या खोट्या कृत्यांची चीड आली. तो क्वेकर पंथाचा असल्यामुळें सरलता व प्रामाणिकपणा हे गुण त्याच्या अंगीं अगदीं मुरून गेले होते व अशा माणसास खोट्याची चीड तत्काळ येते असा सामान्य नियम आहे. त्यास अनुसरूनच पेनचें वर्तन होतें. डीनच्या वागणुकींतील अनेक वाईट गोष्टी पेनला माहित होत्या; इतकेंच नव्हे तर, त्यासंबंधीं लेखी पुरावा त्याचेजवळ होता. परंतु त्यानें मोठ्या उदारपणानें एक दोन महत्त्वाच्या गोष्टी—ज्या त्या वेळीं प्रसिद्ध होत्या तर डीनची इभ्रत पार लयास जाती—ह्या वादविवादांत बाहेर आणल्या नाहींत. जॉर्ज वॉशिंग्टनच्या ऐवजीं एका जर्मन राजपुत्रास अमेरिकेचा सेनापति करण्यासंबंधानें त्यानें खटपट चालविली होती व त्यासंबंधींचा गुप्त पत्रव्यवहार पेनच्या हातीं होता. पेननें पुढें एका पत्रांत, या गोष्टीचा उल्लेख करून केवळ दयेमुळें (Out of pity to him) त्यावेळीं आपण ही गोष्ट प्रसिद्ध केली नाहीं असें म्हटलें आहे.

---

* डीनच्या वंशजास पुढें कॉँग्रेसनें ३५००० डॉलर (त्याच्या वेतना-प्रीत्यर्थ) उदारबुद्धीनें दिले. परंतु त्याचें शील व कृति यांवर जो कालिमा चढला तो धुवून निघालेला नाहीं.

प्रकरण ५ वें

राजीनाम्यानंतर

पेन व डीन यांच्यामध्यें झालेल्या वादविवादासंबंधीं कांहीं गोष्टींत जरी मतभेद होण्यासारखा असला तरी त्यामुळें अमेरिकन तिजोरीवर येणारी एक लक्षाची धोंड निवारिली गेली याबद्दल दुमत होणें शक्य नाहीं. पेनच्या पत्रव्यवहारामुळें अमेरिकेचा याप्रमाणें फायदा झाला खरा; पण त्यामुळें पेनचें मात्र मोठें नुकसान झालें. त्याची सांपत्तिक स्थिति (त्यानें आपल्या लेखांची मिळकत अमेरिकन कार्यास वाहिल्यामुळें व त्याच्या जागेचा पगार कमी असल्यामुळें) केव्हांच चांगली नव्हती. यामुळें नोकरीचा राजीनामा देतांच पोटाकरितां त्याला एका कायदेपंडिताच्या कचेरींत कारकुनी पत्करावी लागली. त्यानें जरी ही नोकरी पत्करली व राष्ट्रीयसभेचा संबंध तोडला तरी राष्ट्रकार्यावरील त्याचें प्रेम कमी झालें नाहीं. राष्ट्रीय घडामोडींसंबंधानें आपले विचार प्रसिद्ध करण्याचा क्रम त्यानें चालू ठेवलाच. इ० स० १७७९ च्या उन्हाळ्यांत त्यानें, इंग्लंडबरोबर होऊं घातलेल्या तहांत, न्यूफौंडलंड येथील फिशरी (मासे मारण्याचा हक्क) अमेरिकेचें स्वाधीन ठेवण्याबद्दलचें कलम अवश्य पाहिजे म्हणून वर्तमानपत्रद्वारें चर्चा सुरू केली. मागें सांगितलेला 'Americanus' ह्यानें हें कलम नसावें म्हणून प्रतिपादण्यास सुरवात केली तेव्हां पेनचा व त्याचा खडाजंगीचा वाद झाला व त्या वादांत त्यानें प्रतिपक्षाचें मत सप्रमाण खोडून इंग्लंडशीं होणारा तह कोणत्या धोरणावर व्हावा ह्याचें विस्तारपूर्वक व अमेरिकेस हितावह असें विवेचन केलें. पेननें कारकुनीची नोकरी केवळ पोटाकरितां धरली होती. त्याला तो धंदा मनापासून मुळींच आवडत नव्हता. राज्यव्यवहार व ग्रंथलेखन हे दोन विषय त्याच्या अत्यंत आवडीचे होते. पैकीं राज्यव्यवहारांतून बाहेर पडणें त्याला नुकतेंच भाग पडलें असल्यामुळें त्याचें लक्ष आतां आपल्या लेखांकडे विशेष लागलें.

अमेरिकन राजकारणांत पडलेल्या तत्कालीन प्रत्येक गृहस्थाची सांपत्तिक स्थिति पेनपेक्षां अनेकपटीनें चांगली होती व राष्ट्रीयसभेकडूनही त्यांचा योग्य रीतीनें परामर्ष घेतला जात असे. त्यांतील जे कोणी लेखक होते ते आपल्या लेखांवरही पैसे मिळवीत. पेननें मात्र आपल्या लेखांचें उत्पन्न आजपर्यंत घेतलें नव्हतें व राष्ट्रीयसभेनेंही त्यास कांहीं विशेष मदत केलेली नव्हती. फ्रँकलीनसारख्याकडे राष्ट्रीयसभेची दहा हजार पौंडांची रक्कम होती व तिचा हिशेबही कोणी कसून घेत नव्हते. परंतु पेनला मात्र अपुऱ्या पगाराशिवाय एक दमडीही जास्त (राष्ट्रीयसभेकडून) मिळत नसे. कारकुनीची नोकरी धरणें भाग पडल्यावर, ह्या सर्व गोष्टी त्याच्या मनांत येऊन त्याला आपल्या स्थितीबद्दल फार वाईट वाटलें व ती स्थिति सुधारण्याकरितां आपले आजपर्यंतचे सर्व लेख पुस्तकरूपानें प्रसिद्ध करावेत असें त्याच्या मनानें घेतलें. पण ह्या कामास लागणारें भांडवल त्याजपाशीं नव्हतें. तेव्हां त्यानें आपला वजनदार मित्र हेन्री लॉरेन्स (हा कांहीं दिवस राष्ट्रीयसभेचा अध्यक्ष होता) ह्यास पुढील आशयाचें पत्र लिहिलें:—

" माझा ताप जर फिरून उलटला नसता, तर मीं ह्या पत्रांतील मजकूर मागच्या रविवारींच तुम्हास कळविला असता. अमेरिकन कार्याकरितां मीं काय काय केलें, हें तुम्हास माहीत आहेच. मी जरी ह्या देशांतला व लोकांतला नव्हतों तरी त्या कार्याच्या योग्यतेमुळेंच माझें मन त्याकडे वेधलें व मीं त्यास हातभार लावला. दुसऱ्या कोणत्याही देशांत असल्या परिस्थितींत हेंच काम मीं केलें असतें. आणि माझ्यासंबंधानें एका विवाक्षित स्थानाहून जो कृतघ्नपणा दर्शविण्यांत आला आहे, आणि ज्याची तुम्हास माहिती आहे, त्यावर मी ह्याच विचारानें विरजण घालून आपलें समाधान करून घेत असतों.

"माझी स्थिति अशी चमत्कारिक आहे कीं, मला अनेक मित्र आहेत; पण माझी खरी स्थिति जाणणारे फारच थोडे आहेत. बहुतेकांचें मत असें आहे कीं, मीं जो एवढा मोठा व्याप केला त्यापासून मला बरीच प्राप्ति होण्याचीं साधनें उपलब्ध झालीं आहेत. त्यांना मजकडून जें काय मिळालें तें सर्व फुकट मिळालें असल्यामुळें मला कोणत्याही प्रकारची

जरूर नाहीं अशी त्यांची समजूत झाली आहेसें दिसतें. लेखनक्रियेचाच धंदा मला योग्य आहे. परंतु मनाच्या व शरीराच्या अस्वास्थ्यामुळें माझी स्थिति सध्यां इतकी बिघडलेली आहे कीं, हा घरकोंबडेपणाचा आयुष्यक्रम सोडून मोकळया हवेंत घोड्यावरून फिरण्याचा व्यायाम केल्यावांचून माझ्या स्थितींत सुधारणा होणें शक्य नाहीं. परंतु दुर्दैवानें एक घोडा विकत घेण्याचेंही मला सध्यां सामर्थ्य नाहीं. माझी ही स्थिति सुधारण्याकरितां मीं एक योजना केली आहे व त्या कामीं मला एक दोन मित्रांचें साहाय्य घेणें जरूर आहे." वगैरे.

ह्या पत्रांत पुढें त्यानें आपले आजपर्यंतचे सर्व लेख एकत्र छापण्याची व त्यानंतर 'अमेरिकन क्रांतीचा इतिहास' प्रसिद्ध करण्याची योजना सविस्तरपणें दाखल केली आहे व पहिल्या कामास सुरवात होऊन त्याचा पहिला भाग प्रसिद्ध होईपर्यंत कागदास लागणारें भांडवल उसनें देण्याबद्दल याचना केली आहे. अमेरिकन लोकांच्या राष्ट्रीय स्वातंत्र्याप्रीत्यर्थ ज्यानें सर्वप्रकारचा स्वार्थत्याग केला त्याची अशी दीन स्थिति व्हावी ही दैवलीला विचित्र नव्हे काय? विचित्र तर खरीच, परंतु जगामध्यें जे खरे थोर पुरुष होऊन गेले त्यांपैकीं बहुतेकांची स्थिति अशीच विपद्ग्रस्त होती हें पाहून त्याबद्दल समाधान मानण्यास जागा आहे. व पेननें ह्या गोष्टीचा विचार करून समाधान मानलें नसेल असेंही नाहीं. परंतु या मानसिक समाधानानें प्रपंचांत–व्यवहारांत–होणारी कुतरओढ थांबूं शकत नाहीं; अथवा भुकेच्या वेदना दूर होत नाहींत! त्याकरितां लक्ष्मीची थोडीबहुत तरी आराधना करणें भाग पडतें आणि या नियमास अनुसरूनच पेननें आपल्या स्नेह्यापुढें आपल्या कठोर दारिद्र्याचें वरील पत्रांत दिल्याप्रमाणें खेदजनक प्रदर्शन केलें आहे. अमेरिकन लोकांच्या कल्याणाकरितां त्यानें आपलें सर्वस्व गमावलें होतें व आपला देहही त्यानें त्या कामीं झिजविला होता. तेव्हां त्याच्या योगक्षेमाची काळजी दूर करणें हें अमेरिकन राष्ट्राचें कर्तव्य होतें–निदान त्याच्या अडचणीच्या प्रसंगीं तरी त्यास त्यांनीं मदत करणें जरूर होतें. परंतु तसें त्यांनीं न केल्यामुळें पेनला साहाजिकच वाईट वाटलें. अशा प्रकारच्या मनःस्थितींत असतांना त्यानें २८ सप्टेंबर

रोजीं पेनिसाल्व्हानियाच्या कार्यकारी मंडळास आपल्या गरजांची व बजावलेल्या कामगिरीची ओळख देणारें एक पत्र लिहिलें. ह्या मंडळास पेनची योग्यता माहीत होती. व त्याच्या लेखानें केलेच्या कामगिरीची जाणीवही त्यांस होती. परंतु फ्रेंच प्रतिनिधीच्या भयामुळें त्यांच्यानें त्यास मदत करवेना. तथापि पेनचें उपरोक्त पत्र येतांच त्या मंडळाचा अध्यक्ष जोसेफ रीड यानें फ्रेंच प्रतिनिधि मि० जेरार्द यास, 'जर तुमची कांहीं हरकत नसेल तर पेनला आम्ही कामावर घेऊं इच्छितों' असें पत्र लिहिलें. त्याचें उत्तर जेरार्द यानें दिलें कीं, "मीं व मि० द. मिराले यांनीं देऊं केलेलें काम पेननें नाकारलें आहे. जर त्याच्या लेखणीचा योग्य प्रकारें उपयोग करून घेणें तुम्हास शक्य असेल तर तुम्ही खुशाल त्यास कांहीं तरी काम द्या. ××× ज्या कामीं मला यश आलें नाहीं, त्या कामांत तुम्हीं यश मिळविल्यास तुमचा गौरव प्रथम मी करीन." ह्या उत्तराचा भावार्थ वाचकांच्या लक्षांत आलाच असेल. जेरार्द याचें असें उत्तर आल्यामुळें जोसेफ रीड यानें पेनला तत्काळ उत्तर पाठविलें नाहीं. तेव्हां पेननें पेनिसाल्व्हानियाच्या कार्यकारी मंडळास पुढील आशयाचें पत्र पुन्हा लिहिलें:—

"थोडे दिवसांपूर्वी मी आपणास, सार्वजनिक कामाकडे मीं आपलें सर्व लक्ष दिल्यामुळें माझी स्वतःची काय स्थिति झाली हें कळविलें होतें, परंतु त्या पत्राचें उत्तर नाहीं. आपल्या मित्रांना विसरून जाण्याची व प्रतिभा आणि वाङ्मय यांच्या प्रगतीस अडथळा करण्याची ह्या संस्थानच्या सरकारची प्रवृत्ति पाहून मला खेद वाटतो.

"जो गृहस्थ सध्यां आपल्या मंडळाच अध्यक्ष आहे त्याच्या खास विनंतीवरून, ज्यावेळीं त्यास अनेक अडचणींमुळें कॉन्स्टिटयूशनचें समर्थन करणें अशक्य झालें त्यावेळीं मीं तिचें समर्थन केलें. व तें करीत असतां मला ज्या अनेक गैरसोयी व आपत्ति सोसाव्या लागल्या त्यांकडे ह्या मंडळानें लक्ष न दिल्यामुळें अजूनही त्या विपन्न स्थितीशीं मला झगडावें लागत आहे. मीं हातीं घेतलेलें कार्य फार महत्त्वाचें असल्यामुळें त्याची कोणत्याही प्रकारें हानि होऊं नये म्हणून मी आजपर्यंत या गोष्टीबद्दल बाचांश न करतां स्वस्थ बसलों; परंतु आतां त्यासंबंधानें जें कांहीं

वाटतें तें कळवून असल्या अनिष्ट प्रकारच्या उदाहरणाचा, मजप्रमाणेंच काम करूं इच्छिणाऱ्या दुसऱ्या लोकांच्या मनावर किती वाईट परिणाम होईल हें ह्या मंडळाच्या लक्षांत आणून देणें जरूर आहे."

याप्रमाणें लिहून पुढें आपल्या ग्रंथप्रकाशनास लागणाऱ्या कागदास अवश्य असलेले १५०० पौंडांचें कर्ज एक वर्षाच्या मुदतीनें परत देण्याच्या शर्तीवर मागितलें आहे.

वरील पत्रांत ज्या कॉन्स्टिटयूशनचा उल्लेख केला आहे ती डॉ० फ्रँकलीन जेम्स कॅनॉन यांनीं इ० स० १७७६ त पेनिसाल्व्हानिया संस्थानाकरितां तयार केली व त्या कामीं पेनचीही त्यांनीं मदत घेतली होती. ही कॉन्स्टिटयूशन म्हणजे खराखुरा लोकसत्ताक राज्यपद्धतीचा खलिता होता. त्याअन्वयें श्रीमंत व गरीब यांच्यांतील विषमता दूर करून सर्वांस सारख्या तत्त्वावर निवडणुकीचा हक्क देण्यांत आला होता. ह्या कॉन्स्टिटयूशनचें समर्थन आणि क्वेकर लोकांनीं शत्रुपक्षास केलेल्या मदतीचें आविष्करण ह्या दोन गोष्टी पेननें केल्यामुळें पेनिसाल्व्हानिया व परंपरेनें इतर संस्थानांचें पुष्कळ हित झालें होतें. पेनिसाल्व्हानियाच्या लोकसभेंत क्वेकर लोकांचें बरेंच प्राबल्य होतें; तें नाहींसें होऊन स्वातंत्र्यप्रिय लोकांचें त्यांत वर्चस्व होण्यास पेनचे प्रयत्नच कारणीभूत झाले होते. परंतु सभेच्या कार्यकारी मंडळास पेनला मदत करण्याचें धैर्य एकाएकीं होईना. डीन प्रकरण झाल्यावर कित्येक अधिकृत लोकांनीं त्याची मानखंडना करण्यासही कमी केलें नाहीं! असें जरी होतें तरी लोकस्वातंत्र्याचे भक्त पेनच्या बाजूलाच होते. व डीन प्रकरणानंतर पुढें सुमारें एक वर्षभर पेनचे झणझणीत लेख त्यांस वाचावयास न मिळाल्यामुळें त्यांना चुकल्या-चुकल्यासारखें वाटत होतें. त्यांच्या परिश्रमानें पेनचा आपत्काल लवकरच दूर झाला व त्यास तारीख २ नोव्हेंबर सन १७७९ रोजीं पेनिसाल्व्हानिया-लोकसभेनें आपला कारकून नेमलें. याच दिवशीं त्या संस्थानांतील गुलाम बाळगण्याची पद्धत नाहींशी करणारा कायदा त्या सभेपुढें यावयाचा होता. ह्या कायद्याचा मुख्य मसुदा जॉर्ज ब्रायन यानें केला होता व त्याचा प्रास्ताविक भाग पेननें लिहिला होता. ह्या प्रास्ताविक

भागांत त्यानें अमेरिकेस राष्ट्रीय स्वातंत्र्य व त्यामुळें सर्वांस सारखे हक्क मिळाल्याबद्दल मोठ्या गंभीर शब्दांनीं परमेश्वराचे आभार मानून लोकांस झालेल्या आनंदाचेंही दिग्दर्शन केलें होतें. व अशा आनंदाच्या प्रसंगीं, देशांतील चमत्कारिक व अन्याय्य रूढीमुळें ज्या निग्रो लोकांना अमेरिकन लोकांनीं दुःखांत व कष्टांत दिवस काढावयास लाविलें, त्यांसही स्वातंत्र्य देऊन गुलामगिरींतून मुक्त करणें हें त्यांचें पवित्र कर्तव्य आहे असें प्रतिपादिलें होतें* हा कायदा १ मार्च सन १७८० रोजीं पास झाला. ह्या कायद्याचें काम चालू असतां पेनला आणखी एक महत्त्वाचें काम करावें लागलें. ह्या वर्षाच्या [सन १७८०] प्रारंभीं पुन्हा वॉशिंग्टनच्या सैन्याची स्थिति खालावली. त्याच्या सैन्यास अन्नवस्त्राची फिरून वाण पडली. त्यांतच वादळ होऊन कित्येकांचे फार हाल झाले. जनावरें मारून खाण्यापर्यंत पाळी आली ! एकंदरींत 'The times that tried mens soul' असा काल पुन्हा आला. शत्रुपक्षानें ह्या स्थितीचा फायदा घेऊन वॉशिंग्टनच्या

---

* ह्या प्रतिपादनांतील महत्त्वाचा भाग पुढें दिला आहेः—

" We esteem it a peculiar blessing granted to us that we are enabled this day to add one more step to universal civilization, by removing as much as possible, the sorrows of those, who have lived in undeserved bondage, and from which by the assumed authority of the kings * * * no effectual legal * * * relief could be obtained we conceive ourselves at this particular period particularly called upon by the Blessings which we have received, to manifest the sincerity of our profession, and to give a substantial proof of our gratitude.

And whereas the Condition of those persons, who have heretofore been denominated Negro and Mulatto slaves, has been attended with Circumstances, which not only deprived them of the common blessings that they were by nature entitled to, but has cast them into the deepest afflictions * * In justice therefore etc."

शिपायांस लालूच दाखवून फोडण्याचा प्रयत्न चालविला व तो त्याचा प्रयत्न कांहीं अंशीं सफलही होत चालला. या स्थितीचें हृदयद्रावक चित्र वॉशिंग्टननें आपल्या तारीख २८ मेच्या पत्रांत काढलें असून तें पत्र त्यानें पेनिसाल्व्हानियाच्या लोकसभेचा अध्यक्ष मि० रीड यास पाठविलें आहे. वॉशिंग्टनच्या सर्व पत्रांत ह्या पत्राइतकें निराशाद्योतक पत्र क्वचितच असेल. हें पेननें सदर लोकसभेस वाचून दाखविलें. त्यांपैकीं पुढील भाग जेव्हां तो वाचूं लागला तेव्हां सर्वांचें हृदय भरून आलें व त्यांच्या चेहऱ्यावर गंभीरतेची व खिन्नपणाची छटा दिसूं लागली. तो भाग असाः—

"मी खात्रीनें सांगतों कीं, आमच्या दुःस्थितीसंबंधीं तुमच्या मनांत येणारी प्रत्येक कल्पना वस्तुस्थितीचें निदर्शन करण्यास अपुरी आहे. लष्कराचा दम खचवून टाकणाऱ्या गोष्टी, इतक्या कांहीं एकवटून आल्या आहेत, कीं अखेरीस तें हातपाय गाळूं लागलें आहे आणि सैन्याच्या प्रत्येक भागांत बंड व राजद्रोह यांचीं गंभीर चिन्हें दिसूं लागलीं आहेत."*

सर्व पत्र वाचून झाल्यावर सर्व सभासद निराशेनें व खेदानें भांबावून गेले. व एकानें उठून "We may as well give up first as last" असे निराशेचे उद्गार काढले. कारण ह्या संस्थानच्या तिजोरीची स्थिति ह्यावेळीं चांगली नव्हती; परंतु पेनचा तुंबलेला पगार त्यास देण्याइतकें द्रव्य त्या तिजोरींत होतें. तेव्हां पेननें आपला पगार घेतला व लागलीच वॉशिंग्टनला मदत करण्याकरितां ५०० डॉलरची रक्कम देऊन आलेली आपत्ति दूर करण्याचा मार्ग त्यानें लोकांस दाखवून दिला. ही रक्कम व त्याबरोबरच स्फूर्त्योत्पादक असें एक पत्र त्यानें क्लेनाघन नांवाच्या गृहस्थाकडे पाठवून त्यास ह्या कार्यानिमित्त वर्गणी जमा करण्यास सुचविलें. ह्या गृहस्थानें आपल्या मित्रमंडळीस जेव्हां हें पत्र वाचून दाखविलें तेव्हां

* "I assure you, every idea you can form of our distress will fall short of the reality. There is such a combination of circumstances to exhaust the patience of the soldiery that it begins at length to be worne out, and we see in every line of the army the most serious features of mutiny and sedition."

त्याचा इतका परिणाम झाला कीं, त्या सर्वांना ह्या कार्यास तत्काल मदत करण्याची स्फूर्ति झाली. खुद्द क्लेनाघन व त्याचा मित्र मॉरिस ह्यांनीं प्रत्येकीं २०० पौंड वर्गणी दिली. पेनच्या पत्रामुळें लोकांचा उत्साह इतका वाढला कीं, थोडक्याच अवधींत ३००,००० पौंड वर्गणी जमली. ह्याच पैशावर एक बँक–पेढी–स्थापन झाली व त्या बँकेंतून वॉशिंग्टनला पुढें शेवटपर्यंत पैशाची मदत होत गेली. याप्रमाणें, वर्गणीची कल्पना काढून, स्वतः वर्गणी देऊन व लोकांस त्या कामीं प्रोत्साहन देऊनच पेन थांबला नाहीं; तर वॉशिंग्टनच्या सैन्याच्या दुःस्थितीमुळें व चार्लस्टन नांवाचा एक अमेरिकन सेनानी पराभव पावून शत्रूच्या हातीं लागल्यामुळें सामान्य लोकांच्या व लष्कराच्या मनावर जो अनिष्ट असा [नैतिक] परिणाम झाला होता, तो दूर करण्याकरितां त्यानें मागल्याप्रमाणें पुन्हा आपलीं Crisis [आणीबाणीचे प्रसंग] नामक पत्रकें प्रसिद्ध करण्यास सुरवात केली. ह्यांपैकीं एका पत्रकांत त्यानें लोकांशीं पुढील बुद्धिवाद केला आहे. "चार्लस्टन शत्रूच्या हातीं लागल्यामुळें लोकांचा जोम नष्ट झाल्यासारखा दिसत आहे, पण वास्तविक तसें होण्याचें कांहीं कारण नाहीं. असल्या तुटक विजयानें सर्व राष्ट्र काबीज केलें असें होत नाहीं. फ्रान्सचें आपणांस चांगलें पाठबळ आहे व लष्करास लागणारी सामुग्री पुरविण्याकरितां एक मोठी संस्था स्थापन झाली असून तिच्या हातीं पुष्कळ मोठी रक्कम (रोकड) देण्यांत आली आहे. अशा स्थितींत हातपाय गाळण्याचें कांहींएक कारण नाहीं." याच पत्रकास ता. क. जोडून त्यांत तो म्हणतो–

"चार्लस्टन आपल्या हातचा गेला, पण मला वाटतें योग्य सामुग्रीच्या कमतरतेमुळें ही गोष्ट घडून आली. ह्या राष्ट्रानें अंगिकारलेल्या अत्युत्तम आणि थोर अशा कार्याबद्दल ज्याला ह्यावेळीं अभिमान वाटणार नाहीं तो स्वतंत्र होण्याविषयीं निर्धार केलेल्या लोकांच्या समाजांत सुस्थितींत राहण्यास अपात्र आहे."

ह्या पत्रकांचें काम चालू असतां मध्यंतरीं तारीख ४ जुन रोजीं त्यानें त्यावेळीं देशापुढें असलेल्या अनेक प्रश्नांची चर्चा करणारें एक खासगी पत्र मि० रीड यास पाठविलें. त्या पत्रांत तो म्हणतो:—

"सध्यां आपणांस ज्या नाना प्रकारच्या अडचणी येत आहेत त्यांचीं कारणें आपल्या तिजोरीचा रितेपणा व आपल्या पतीवर पडत असलेला ताण हीं होत. हीं कारणें दूर करा, कीं आपली स्थिति सुधारलीच म्हणून समजा. राष्ट्रीयसभेच्या हुकुमाप्रमाणें जरी लढाईचें सर्व काम चालू आहे तरी त्या सभेच्या कामांत असावा तसा व्यवस्थितपणा नाहीं. × × × × × अमेरिकन लोकांना आपले हक्क समजतात; पण त्यांस राजकारण समजावें तसें समजत नाहीं. आपल्याला काय पाहिजे याची त्यांस स्पष्ट कल्पना आहे पण तें संपादन करण्यास लागणाऱ्या साधनांची त्यांना चांगलीशी कल्पना नाहीं कर्ज वाढविणें व तात्पुरता खर्च वाढविणें ह्यांतील भेद त्यांना कळत नाहीं. युद्ध चालू ठेवावें अशी मात्र सर्वांची इच्छा आहे; पण तें कशाच्या आधारावर देव जाणे. × × × × जर तुम्ही शहरांतील कांहीं धनिक लोकांस बोलावून त्यांच्या लक्षांत आपल्या देशाची व सैन्याची स्थिति आणून द्याल व ही स्थिति सैन्यांतील अधिकाऱ्यांच्या दोषामुळें प्राप्त झालेली नसून लोकांनीं भरपूर मदत न केल्यामुळें–सामुग्रीच्या कमतरतेमुळें–झाली आहे असें जर त्यांच्या मनावर बिंबवाल तर बरेंच कार्य होईल. त्यांच्यामध्यें जर कांहीं पाणी व शहाणपणाचें धोरण असेल तर ते तत्काल एक कमिटी स्थापून वर्गणी जमा करतील व त्यांतून सैन्यास लागणाऱ्या सामुग्रीचा पुरवठा खास करतील. त्यांच्या ह्या उदाहरणाचा कित्ता इतर प्रांतही गिरवितील. त्यांच्याजवळ असलेलें सोनें जडजवाहीर वगैरे त्यांनीं लष्करच्या पगाराप्रीत्यर्थ दिल्यास सरकारांतून त्याबद्दल त्यांस तारण मिळेल असेंही तुम्हीं त्यास सुचविल्यास चालेल. अशा तऱ्हेचा कांहीं प्रयत्न लवकरच केला पाहिजे. 'चार्लस्टन' शत्रूच्या हातीं सांपडला आहे तेव्हां ताबडतोब कांहींतरी केलें पाहिजे. सैन्यामध्यें फिरून एकोपा व जोम उत्पन्न केला पाहिजे आणि ह्या संस्थानांत असे हजारो लोक आहेत कीं, जे ३०, ४०, ५०, गिनी वर्गणी ह्या कामीं सहज देऊं शकतील. × × × माझी आणखी एक सूचना आहे कीं, आपल्या राष्ट्रीय-संघाशीं राजनिष्ठ राहण्याची शपथ अद्याप घेतली नाहीं असे जे मळेवाले आहेत त्यांच्यावर ह्यावेळीं कर बसवावा. व तो पैशाच्या अगर सामानाच्या–घोडे, गाड्या, कपडे–

रूपानें वसूल करावा. × × × × जें काय करणें असेल तें ताबडतोब केलें पाहिजे. आपत्तीचा तत्काळ प्रतिकार न केल्यास ती आपणांस डोईजड होईल. आवेशाच्या देखाव्यानेंही खरा आवेश–जोम–उत्पन्न होईल. परंतु झालेल्या नुकसानीबद्दल विचार करण्यास लोकांस एक दिवसही फुरसत देतां कामा नये. त्यांच्यामध्यें सारखा उत्साह भरला पाहिजे. × × × चार्लस्टनच्या पराभवानंतर शत्रु आतांच कांहीं नवी हालचाल करूं शकणार नाहीं. × × × युद्धांत हस्तगत केलेल्या इतक्या कैद्यांची ते काय वाट लावणार?" वगैरे.

या पत्राचा चांगला उपयोग झाला. एक वर्षापूर्वीं राष्ट्रीयसभेनें पेनला अप्रत्यक्ष रीतीनें दोष दिल्यामुळें जर त्याची लोकप्रियता कांहींशी कमी झाली असेल तर वॉशिंग्टनला मदत करण्याच्या त्याच्या ह्या खटपटीमुळें ती पूर्वींपेक्षांही अधिक वाढली. व ह्या वर्षाच्या जुलई महिन्यांत (१७८०) पेनिसाल्व्हानिया युनिव्हर्सिटीनें त्यास 'मास्टर ऑफ आर्टस्' ही पदवी दिली.

ह्या वर्षींच्या हिवाळ्यांत पेननें आपलें 'crisis extra-ordinary' (असाधारण आणीबाणीचा प्रसंग) नांवाचें पत्रक प्रसिद्ध केलें. आपलीं पत्रकें स्वस्त किंमतीस विकतां यावींत म्हणून पेननें यावेळीं तीं प्रसिद्ध करण्याचें काम स्वतःच्या हातीं घेतलें होतें. ह्या नव्या पत्रकाची किंमत त्यानें पांच सेंट (सुमारें ०४ आणे) ठेविली. ह्यावेळीं नाण्याचा भाव फारच उतरला असल्यामुळें शक्य तितकी कमी किंमत ठेवणें जरूर होतें. हें पत्रक त्यानें राष्ट्रीयसभेची स्थिति सुधारण्याकरितां लिहिलें. राष्ट्रीयसभेनें, स्वातंत्र्याप्रीत्यर्थ सुरू केलेलें युद्ध जरी सर्व 'संयुक्त संस्थाना'च्या हिताकरितां होतें तरी तें युद्ध चालू असतां त्या संस्थानावर योग्य तितकी हुकमत राष्ट्रीयसभेस चालवितां येत नसे. एखादें संस्थान तिचा हुकूम लागलाच अमलांत आणी, तर एखादें अर्धवट रीतीनें त्याकडे लक्ष देई. यामुळें सैन्यास लागणारी सामुग्री व द्रव्य राष्ट्रीयसभेस वेळच्यावेळीं पाठवितां येत नसे. आणि त्याकारणानें वॉशिंग्टनची मोठी त्रेधा उडून जात असे व त्यास आपल्या सामर्थ्याचा योग्य तितका फायदा करून घेतां येत नसे.*

---

* यासंबंधानें वॉशिंग्टन लिहितोः—(पुढील पानावर पहा.)

राष्ट्रीयसभेनें पैशाची मागणी केली, कीं कित्येक संस्थानांची स्थिति चमत्कारिक होत असे. ही स्थिति नाहींशी करून लोकांच्या मनांत युद्धास लागणारें द्रव्य देण्याची प्रेरणा करण्याकरितां ह्या पत्रकांत पेननें फारच खुबीदार व परिणामकारक असा हितोपदेश केला आहे. त्यांत त्यानें पुढील गोष्टी लोकांच्या नजरेस मुख्यत्वेंकरून आणिल्या आहेत:—

"युद्ध व निरनिराळ्या संस्थानचा राज्यकारभार मिळून दरसाल वीस लक्ष पौंड खर्च होतात. आपली लोकसंख्या ३,०००,००० असल्यामुळें माणशीं १३ शिलिंग ४ पेन्स हें या खर्चाचें प्रमाण पडतें. इंग्लंडच्या अमदानींत माणशीं दोन पौंड कर असे. अमेरिकेंत शांतता स्थापन झाल्यावर माणशीं ५ शिलिंग याप्रमाणें कराचें प्रमाण बसणार आहे. पण जर ही संधी गमावली तर इतर इंग्रज रयतेप्रमाणें अमेरिकन लोकांसही माणशीं २ पौंडांप्रमाणें कर द्यावा लागेल. सध्यां वीस लक्ष पौंडांचा जो वार्षिक खर्च लागतो त्यांत पेनिसाल्व्हानियाच्या वांटणीस $\frac{1}{8}$ म्हणजे २,५०,००० पौंड येतील. ३७५,००० लोकांत हे वांटले म्हणजे दरमहा दरमाणशीं १ शिलिंग पडतो. ह्या युद्धांत यश न मिळविल्यास माणशीं दरमहा ३ शिलिंग ३ पेन्स अधिक पडतील. पेनिसाल्व्हानियाचे लोक सध्यां दरसाल फक्त ६४२८० पौंड देत असतात; म्हणजे त्यांच्या वांट्यास वास्तविक रीतीनें येणाऱ्या रकमेपैकीं १८५,७२० पौंड ते दरसाल कमी देतात आणि यामुळेंच सैन्याची दुर्दशा होत आहे."

इतकें सांगून पेनिसाल्व्हानियानें माणशीं ७ शिलिंग अधिक कर बसवून रक्कम उभारावी व इतर संस्थानांनींही घरें, जमिनी, दारू, बाहेरून येणारे व्यापाराचे जिन्नस, यांवर युद्धाप्रीत्यर्थ स्वतंत्र कर (war tax) बसवावा अशी सूचना केली होती.

"One state will comply with a requisition of Congress' another neglects to do it; a third executes it by halves 'and all differ either in the manner, the matter, or so much in point of time, that we are always working up a hill, and ever shall be; and while such a system prevails we shall ever be unable to apply our strength or resources to any advantage."

यानंतर पेननें, " पब्लिक गुड " या नांवाचें एक पत्रक प्रसिद्ध केलें. या पत्रकांत त्यानें 'व्हर्जिनिया' संस्थानचा, सरहद्दीसंबंधीं राष्ट्रीयसभेबरोबर जो लढा पडला होता त्याचें लोकपक्षास–राष्ट्रीयसभेस अनुकूल असें विवेचन केलें आहे. पूर्वापरसंबंध व कायदा यांच्या दृष्टीनें ह्या विवेचनांत त्याच्या हातून कांहीं चुका झाल्या. आणि त्यामुळें उपरोक्त संस्थानच्या रोषास तो पात्र झाला. त्याचे हेतु मात्र शुद्ध होते ही गोष्ट अखेर सिद्ध झाली आहे. याप्रमाणें पेनची स्वारी, या भागाच्या प्रारंभीं वर्णिलेल्या केंविलवाण्या स्थितींतून निघून पुन्हा राजकारणाच्या रंगभूमीवर रंगत चालली होती !

प्रकरण ६ वें

फ्रान्सचा प्रवास व राष्ट्रीयसभेशीं संबंध

इसवी सन १७७५ च्या आक्टोबर महिन्यांत फ्रँकलिन यानें पेनला 'अमेरिकन क्रांती'चा इतिहास लिहिण्याची सूचना केलेली होती, ती पेन विसरला नव्हता. परंतु मध्यंतरीं नवीन वाद उपस्थित झाल्यामुळें तें काम हातीं घेण्यास त्यास सवड झाली नाहीं. तथापि त्याचीं साधनें त्यानें फ्रँकलीनजवळून मिळविलीं होतीं. व या कामास तो आतां हात घालणार होता. त्यानें आपला हा विचार पेनिसाल्व्हानियाच्या लोकसभेच्या स्पीकरला (ता० ३ नोव्हेंबर १७८० रोजीं) कळविला व आपली कारकुनीची नोकरी सोडून तो या इतिहासाचें काम करूं लागला. परंतु इतिहास लिहिण्यापेक्षां स्वतः इतिहास तयार करण्याकरितांच तो जन्मला असल्यामुळें त्याला सुमारें तीन महिन्यांचे आंत तें काम सोडून देऊन एका महत्त्वाच्या कामगिरीवर जावें लागलें. त्याचें 'crisis-extra-ordinary' प्रसिद्ध झाल्यावर लवकरच राष्ट्रीयसभेनें ८० लक्ष डॉलर कर्ज काढण्याचें ठरविलें. हें कर्ज अमेरिकेंत उभारणें शक्य नव्हतें. कारण अमेरिकेंत सरकारी नोटांचा भाव अतिशय उतरला होता. तेव्हां पेननें फ्रान्सकडून हें कर्ज काढण्याचा विचार सुचवून त्याप्रमाणें फ्रेंच प्रधानास (व्हर्जिनस) एक पत्र लिहिलें. त्यांत त्यानें असें म्हटलें होतें कीं, अमेरिकेंत एक डॉलरच्या नोटीची किंमत एक सेंट झाली असून फ्रान्सनें जर दरसाल दहा लक्ष पौंड कर्ज अथवा मदत म्हणून दिले नाहींत तर युद्ध चालू ठेवणें अशक्य होईल. हें पत्र अमेरिकेंतील फ्रेंच लिगेशनचा सेक्रेटरी एम्. मारबोई यास दाखविण्यांत आलें; पण त्यानें त्यासंबंधानें निरुत्साहात्मक उद्गार काढले. तरी पण पुढें ना० रॅल्फ इझर्ड यानें तें जेव्हां राष्ट्रीयसभेच्या कित्येक सभासदांस दाखविलें तेव्हां त्यांना तो बेत पसंत पडून त्या प्रकरणासंबंधीं प्रत्यक्ष बोलणें करण्याकरितां वाशिंग्टनचा मदतनीस कर्नल जॉन लॅरेन्स ह्यास पाठवावें असें ठरलें. तो गेला असतां सैन्याची स्थिति

फ्रेंच प्रधानास बरोबर समजावून सांगेल अशा हेतूनें या कामीं त्याची योजना करण्यांत आली. कर्नल लॅरेन्स जाण्यास नाखुष होता; परंतु पेन बरोबर आल्यास जाण्याचें त्यानें कबूल केलें. पेननें ती गोष्ट तेव्हांच कबूल केली. कारण पुष्कळ दिवसांपासून पेनच्या मनांत इंग्लंडांत जाऊन तेथील लोकमत अमेरिकन स्वातंत्र्यास अनुकूल करून घेण्याचे विचार घोळत होते. तेव्हां या आयत्या आलेल्या संधीचा फायदा घ्यावा व फ्रान्समधलें काम आटोपतांच तसेंच तेथून इंग्लंडमध्यें जावें असें त्यानें ठरविलें. त्याप्रमाणें तो व कर्नल लॅरेन्स हे उभयतां सन १७८१ च्या फेब्रुवारी महिन्यांत बोस्टन येथून निघाले व मार्च महिन्यांत फ्रान्स देशांत येऊन दाखल झाले. ते तेथें पोचल्यानंतर अननुभविक अशा कर्नल लॅरेन्सच्या हातून अशा कांहीं चुका झाल्या, कीं त्यायोगानें सर्व काम फिसकटण्याच्या बेतांत आलें होतें. परंतु पेन व फ्रँकलीन यांच्या प्रयत्नामुळें तें सावरलें गेलें. या प्रकरणाचा अखेर निकाल कसा झाला यासंबंधानें लॅमर्तिन (फ्रेंच इतिहासकार) म्हणतो, 'The king loaded Pain with favours. The gift of six millions was confided into the hands of Franklin and Pain' (राजानें पेनवर आपल्या कृपेचा वर्षाव केला. सहा मिलियन्सची देणगी फ्रँकलीन व पेन यांच्या स्वाधीन करण्यांत आली.) याप्रमाणें हें काम आटोपतांच पेननें इंग्लंडला जाण्याचा आपला विचार कर्नल लॅरेन्स व फ्रँकलीन यांस कळविला; परंतु फ्रँकलीननें त्याच्या सुरक्षितपणाविषयीं शंका प्रदर्शित करून तो विचार सोडून देण्याविषयीं त्याचें मन वळविलें. तेव्हां तो कर्नल लॅरेन्सबरोबर अमेरिकेस परत आला. (तारीख २५ ऑगष्ट १७८१) येतांना त्यांनीं २,५००,००० लिव्हर्स व कपडे आणि इतर लष्करी सामान आपल्याबरोबर आणलें. ह्या महत्त्वाच्या कामगिरीबद्दल पेनला कांहीं एक मोबदला मिळाला नाहीं. कर्नल लॅरेन्स–ज्यानें आपल्या अदूरदर्शीपणामुळें बहुतेक कार्य बिघडवून टाकलें होतें, यासच त्या कामगिरीबद्दलचा सर्व मान व भत्ता–पगार वगैरे मिळाला! पेननें आपलें निर्वाहाचें साधन सोडून व स्वतःच्या सुरक्षितपणाची भीतीही धाब्यावर बसवून हें कार्य साधलें; परंतु त्याबद्दल त्याला नुसता धन्यवादही कोणीं दिला नाहीं. कर्नल लॅरेन्स हा

लवकरच वॉशिंग्टनकडे निघून गेला; परंतु त्याला पेनच्या स्थितीची व त्यानें केलेल्या मदतीची स्मृति राहिली नाहीं. पेननें कर्नल लॉरेन्स यास लिहिलेल्या एका पत्रांत वरील गोष्टीची किंचित् ओळख दिली आहे; परंतु त्याचा कांहीं विशेष उपयोग झाल्याचें दिसून येत नाहीं. सांपत्तिकदृष्ट्या जरी ह्या वेळीं पेनची स्थिति असमाधानकारक होती तरी लौकिक व मानमान्यता या बाबतींत मात्र त्याची स्थिति स्पर्धा करण्यासारखी झाली होती. डीन प्रकरणाचे वेळीं राष्ट्रीयसभेचे जे सभासद त्याच्याविरुद्ध होते ते या वेळीं त्याच्याशीं सलोख्यानें वागूं लागले होते; अमेरिका आणि फ्रान्स यांच्या हिताविरुद्ध डीननें लिहिलेलीं पत्रें याच सुमारास प्रसिद्ध झालीं असल्यामुळें त्याच्यासंबंधानें ह्या लोकांचे ठायीं तिरस्कार उत्पन्न होऊन पेनचें त्या-वेळचें करणें त्यांस आतां बरोबर वाटूं लागलें आणि ही समजूत जसजशी दृढ होत गेली तसतसा पेनबद्दल या लोकांचा पूज्यभाव वाढूं लागला. लौकिक व मानमान्यता विशेष वाढल्यामुळें राष्ट्रीय महत्त्वाच्या, आनंदाच्या उत्सवाच्या सर्व प्रसंगीं पेनला आदरपूर्वक निमंत्रणें येऊं लागलीं. वॉशिं-ग्टनला आतां सारखे जय मिळत चालल्यामुळें असे प्रसंग वरचेवर येऊं लागले. ता. २८ नोव्हेंबर रोजीं राष्ट्रीयसभेनें वॉशिंग्टनचें मोठ्या थाटानें स्वागत केलें. त्यावेळीं सर्व लोक मोठ्या आनंदांत निमग्न झाले होते. पेनही त्यांत होता पण त्या प्रसंगास अनुरूप असा थाटमाट—पोशाख वगैरे—करण्याचें त्यास सामर्थ्य नसल्यामुळें एखाद्या भिकाऱ्याप्रमाणें त्यास तेथें जावें लागलें व ही गोष्ट त्याच्या मनाला फार लागून राहिली. त्यानें आपलें सर्वस्व—पुस्तकांचे हक्क, नोकरीचाकरी—अमेरिकन स्वातंत्र्याच्या कार्यास अर्पण केल्यामुळेंच त्यास ही स्थिति प्राप्त झाली होती. त्याच्या कित्येक महत्त्वाच्या कामगिरीबद्दल राष्ट्रीयसभेच्या लोकांनीं व देशांतील पुढाऱ्यांनीं त्याची अनेक वेळ स्तुति केली; परंतु त्याला निर्वाहाची अडचण पडूं न देण्याची—त्याच्या सरकारी व इतर कामगिरीबद्दल मोबदला देऊन व्यवस्था कोणीही झटून करीना. तेव्हां त्यानें वॉशिंग्टनला एक खासगी पत्र लिहून त्यांत पुढीलप्रमाणें आपलें हृदय उकलून दाखविलें आहे. तो म्हणतोः—

“ आपणास नुकत्याच मिळालेल्या जयाबद्दल मी आपलें मनःपूर्वक अभिनंदन करितों व आपणास जेव्हां फुरसत सांपडेल तेव्हां आपली गांठ

घेण्यास मला मोठा आनंद वाटेल हेंही कळविण्याची परवानगी घेतों. ह्या पत्रांत मी जी हकीकत लिहिणार आहें तिनें आपल्या विवेचनेंत अधिक भर पडणार नाहीं अशी मला आशा आहे. ज्याला आपलें हृदय उकलून दाखविलें असतां तें जाणण्याची ऐपत आहे त्याच्याजवळ स्वतःच्या स्थितीचें गूढ सांगावें–कारण तें जाहीर करण्याची माझी इच्छा नाहीं–अशा हेतूनें मी पुढील मजकूर खुल्या दिलानें लिहीत आहें.

"अमेरिकेंत येऊन आज मला सात वर्षें झालीं आणि जरी हीं वर्षें माझ्या आयुष्यांतील अत्यंत माननीय अशीं होत, तरी त्या कालांत मला फारच त्रास व अडचणी किंबहुना आपत्ति सोसाव्या लागल्या आहेत. अमेरिकन कार्याच्या इभ्रतीकरितां व त्या कार्याच्या हिताकरितां –सिद्धीकरितां–मीं स्वतःच्या निर्वाहाच्या सोयीकडेही लक्ष दिलें नाहीं व इतराप्रमाणें माझ्या पुस्तकांपासून होणाऱ्या फायद्याचाही मीं स्वीकार केला नाहीं. मी जितक्या उदार मनानें अमेरिकेशीं वागलों तितक्याच उदार मनानें तीही मजबरोबर वागेल अशी माझी समजूत होती; परंतु मला त्याविरुद्ध अनुभव आल्यामुळें माझ्या मनास मोठा खेद वाटत आहे. व तो खेद माझ्या स्वतःच्या स्थितीसंबंधानेंच केवळ वाटतो असें नसून अमेरिकेचें हें वर्तन माझ्या मनांतून तिचें शील उतरण्यास कारणी-भूत व्हावें व अशा रीतीनें तिनें आपल्या इभ्रतीसंबंधानें बेफिकीर असावें याबद्दलही वाटतो.

"ह्या देशांतील व युरोपांतील बहुतेक लोकांस मी अमेरिकेच्या उपयोगी पडलों असल्याचें माहीत आहे. आणि तिच्या हिताकरितां तिच्या अत्यंत दुर्धर अशा आपत्तीचाही मी वांटेकरी झालों. त्यामुळें माझी स्वतःची स्थिति इतकी बिकट झाली कीं, एका उन्हाळ्यांत, पोटाची खळगी भरण्याकरितां ह्या शहरांतील ओयेन बिडल नांवाच्या एका गृहस्थाकडे मला खर्डेघाशी करावी लागली. ह्या व अशा तऱ्हेच्या अनेक अडचणी मला भोगाव्या लागल्या; परंतु मीं त्यांचा परिस्फोट केला नाहीं. कारण तसें केल्यास अमेरिकेच्या कृतघ्नपणाचें प्रदर्शन होऊन तिच्या इभ्रतीस धक्का बसण्याचा संभव होता. आणि त्याचा फायदा घेण्यास तयार असणारे अनेक लोक परदेशांत आहेत.

"दुर्दैवानें ज्यावेळीं सिलास डीन याचीं कृत्यें कोणास माहीत नव्हतीं त्यावेळीं तीं मला ठाऊक होतीं व तीं मीं प्रामाणिकपणानें—ज्याबद्दल माझे आभार मानावयास पाहिजे होते—उघडकीस आणून त्याची लबाडी यशस्वी होऊं दिली नाहीं. माझें त्यावेळचें मत खरें असल्याचें त्यानें स्वतःच (आतां) कबूल केलें आहे व त्याचा अभिमान-पक्ष-धरणारे उत्साही असे त्याचे मित्रही आतां आपण त्यावेळीं फसल्याचें मोकळया मनानें कबूल करीत आहेत.

"जेव्हां प्रत्येकास आपत्तीनें ग्रासलें होतें तेव्हां मींही मोठ्या आनंदानें सर्व दुःखें सोशिलीं. परंतु आतां ह्या देशाचा मुख्य हेतु जवळ जवळ सिद्ध झाला असून त्याची स्थिति दिवसानुदिवस भरभराटीची होत चालली आहे; परंतु मी मात्र अत्यंत वाईट स्थितींत पडलों आहें. आणि इतकें असूनही याचा दोष कोणाकडे द्यावा याची मला पंचाईत पडली आहे. कारण मी जेथें जेथें जातों तेथें सर्व लोक माझा आदरसत्कार करितात, माझ्याशीं स्नेहभावानें वागतातआणि सर्वजण माझ्या स्थितीबद्दल एकमेकांवर दोषारोप करीत असतात. त्यांच्या ह्या शिष्टपणामुळें मला कांहींएक बोलतां येत नाहीं. त्यांचें वर्तन (परस्पर दोषारोप करण्याचें) माझी स्थिति अधिकच बिकट करीत आहे. परंतु अशा स्थितींत राहणें यापुढें मला शक्य नाहीं. तथापि ज्याअर्थीं ह्या देशाशीं मतभेद व्यक्त करण्याची व त्यानें माझीउपेक्षा केल्याचा बोभाटा करण्याची माझी इच्छा नाहीं त्याअर्थीं मी आतां फ्रान्स किंवा हॉलंड येथें जाऊन राहण्याचा बेत करीत आहें. लेखक या नात्यानें माझी प्रसिद्धी आहे आणि त्यामुळें येथल्यापेक्षां अनिष्ट असा प्रसंग तेथें मला येणार नाहीं अशी माझी खात्री आहे. शिवाय युरोपखंडामध्येंही अमेरिकेसंबंधानें योग्य माहिती प्रसिद्ध करून तिच्यासंबंधीं अनुकूल असें लोकमत तयार करण्याचेंही काम ह्या देशांतून करतां येईल. जरी अमेरिकेचें वर्तन मजबरोबर असावें तसें नाहीं तरी तिच्या भरभराटीविषयींची माझी इच्छा तिळमात्रही कमी झालेली नाहीं आणि तिनें अंगिकृत केलेल्या कार्याप्रमाणेंच तिचें शीलही (युरोपांत) उज्ज्वल झालेलें पाहण्यास मला फार आनंद वाटेल." वगैरे.

आपल्या लेखांपासून द्रव्यसंपादन करावयाचें नाहीं असा जो प्रारंभीं पेननें निश्चय केला होता त्यास कारण त्याच्या मनावर झालेले क्केकर पंथाच्या मतांचे संस्कार होत. ह्या संस्कारांमुळें न्याय्य व पवित्र असें युद्ध असल्याशिवाय त्यांत सामील होण्याचें धाडस त्यास करवलें नसतें. अमेरिकन युद्धाच्या न्यायीपणाविषयीं त्याची खात्री झाल्यामुळेंच तो त्यांत पडला आणि त्यांत पडल्यानंतर क्केकर पंथाच्या एखाद्या परोपकारी साधूप्रमाणें त्यानें पडेल तें काम करून व लेखणीच्या द्वारें अमेरिकेस साहाय्य केलें. अमेरिकेच्या संकटप्रसंगीं जरी याप्रमाणें त्याने आपले लेख मोबदल्याची अपेक्षा न करितां लिहिले तरी लेखकांच्या हक्कांची त्यास चांगली कल्पना होती व ह्या हक्कांकडे लोकांचें लक्ष वेधून ते स्थापन करण्याची खटपट त्यानेंच प्रथम केली. त्याच्या उदारबुद्धीचा फायदा घेऊन बेल नामक एका प्रकाशकानें अमेरिकन राष्ट्रास त्यानें अर्पिलेल्या ग्रंथाच्या उत्पन्नांतून पुष्कळ पैसे खाल्ले आणि दुसऱ्या एका प्रकाशकानें 'Common sense' च्या एका आवृत्तींत आपल्या पदरचा अधिक मजकूर घुसडून पेनला न विचारतां तें खपविलें. या अशा अनुभवामुळें अमेरिकेचें संकट दूर होतांच पेननें आपल्या पुस्तकाचे हक्क, पैसे घेऊन विकत देण्याचें व ग्रंथकारांच्या हक्कांचें संरक्षण करण्याचें मनांत आणिलें असावें असें दिसतें. असो; पेननें वॉशिंगटनला लिहिलेल्या पत्रांत ज्या आपल्या स्थितीचें वर्णन केलें आहे, ती दूर करण्याची वॉशिंगटननें लवकरच खटपट केली असें रॉबर्ट मॉरिस याच्या डायरीवरून दिसतें. त्याच्या डायरींत २६ जानेवारी १७८२ रोजीं अशी नोंद केलेली आहे कीं, 'वॉशिंगटननें पेनला मदत करण्याची आवश्यकता दोन वेळ व्यक्त केली.' मॉरिस हा त्यावेळीं फडणिशीखात्याचा प्रमुख अधिकारी होता. त्याच्या व पेनच्या पुढें अनेक भेटी होऊन पेनला कोणत्या तरी रूपानें मदत करणें जरूर वाटून तसें करण्याचें त्यानें कबूल केल्याचा दाखला सांपडतो. त्याच्या मदतनिसाचीही त्या गोष्टीस अनुमति मिळून, पेननें राष्ट्रीय फंडांतून दरसाल ८०० डॉलरची रक्कम घ्यावी व त्याबद्दल त्यानें अमेरिकन कार्यास पोषक व उपयुक्त असे लेख लिहावेत, असें ठरलें. पेनची ह्या ठरावास कबुली मिळतांच रॉबर्ट मॉरिस यानें यासंबंधानें आर०

लिव्हिंग्स्टन् यास पत्र लिहिलें व त्याचा परिणाम त्या दोघांनीं वॉशिंगटनची गांठ घेऊन पुढील ठराव करण्यांत झाला:—

" फिलाडेल्फिया, १० फेब्रुवारी १७८२

" खालीं सही करणार यांनीं, सध्यांच्या नाजुक स्थितीचा व अशा वेळीं लोकांस जागे करून त्यांच्या ठायीं उत्साह उत्पन्न करण्याच्या अवश्यकतेचा व लेखक या नात्यानें थॉमस पेनच्या योग्यतेचा आणि त्याच्या आजपर्यंतच्या लेखांच्या (जनसमूहावरील) परिणामाचा विचार करून एकमतानें असें ठरविलें आहे कीं, वरील कार्याकरितां थॉमस पेन याची नेमणूक करून त्यास दरसाल ८०० डॉलर पगार म्हणून द्यावेत. हा पगार आज तारखेपासून सुरू करून तो परराष्ट्रीय खात्याच्या सेक्रेटरीनें, गुप्त कार्याकरितां म्हणून त्यास देण्यांत येत असलेल्या रकमेंतून द्यावा. वरील कार्याकरितां जाहीर रीतीनें व उघडपणें पगार दिल्यास मि० पेन याच्या लेखांच्या परिणामाची हानि होऊन त्याजवरही अपायकारक असे अपवाद—दोषारोप येण्याचा संभव आहे असें खालीं सही करणार यांचें मत आहे."

" रॉबर्ट मॉरिस
रॉबर्ट लिव्हिंग्स्टन.
जॉर्ज वॉशिंगटन."

हा ठराव होण्यापूर्वींच पेननें आणखी एक 'crisis' लिहिण्याचें काम सुरू केलें होतें. ह्या पत्रकांत त्यानें अमेरिकेंतील प्रत्येक संस्थानास संयुक्त संघाचें (union) महत्त्व सांगून प्रत्येकानें वैय्यक्तिक राजसत्तेचें संयुक्त संघाच्या राजसत्तेंत केंद्रीकरण करावें असा उपदेश केला होता. अमेरिकन राष्ट्रीयत्वाच्या अस्तित्वाकरितां, त्याच्या संरक्षणाकरितां, हिताकरितां व त्यांतील एकंदर लोकांच्या सुखाकरितां असें करणें अत्यंत जरूर आहे असें त्यानें प्रतिपादन केलें होतें. 'The united states of Ameri ca' हें अमेरिकन राष्ट्रीयत्व व्यक्त करणाऱ्या संघाचें भव्य नांव प्रथम पेनच्याच लेखणींतून बाहेर पडलें. अमेरिकन स्वातंत्र्य जाहीर होण्यापूर्वीं पेन ह्या संघांतील सर्व संस्थानांस अनुलक्षून " Free and independent states of America " The 'Glorious union' ह्या नांवांचा उपयोग करीत

असे व स्वातंत्र्य जाहीर होऊन युद्ध सुरू होतांच त्यानें वर (प्रथम) सांगितलेल्या नांवानें ह्या संघाचा उल्लेख करण्यास सुरवात केली.

ह्या सुमारास इंग्लंड हें फ्रान्स व अमेरिका यांचें सख्य मोडून टाकण्याचा प्रयत्न करीत होतें. व या बाबतींत रशिया व ऑस्ट्रिया यांच्यामार्फत जी मध्यस्थी चालू होती तत्संबंधींचा गुप्त पत्रव्यवहार, पेन फ्रान्समध्यें असतांना त्यास फ्रँकलीन व फ्रेंच प्रधान व्हर्जिनस ह्यानें दाखविला होता. ह्या नाजुक प्रकरणासंबंधानें वॉशिंगटनचें व त्याचें या वेळीं कांहीं खलबत झाल्याचें त्याच्या पत्रव्यवहारावरून दिसून येतें. या एकाच गोष्टीवरून तत्कालीन अमेरिकन मुत्सद्द्यांपाशीं त्याचें केवढें वजन होतें व याच्या मदतीची त्यांस केवढी अपेक्षा असे याची चांगली कल्पना करितां येईल. उपरोक्त crisis लिहून प्रसिद्ध केल्यानंतर पेननें, वॉशिंगटनच्या हातून नाइलाजास्तव फांशीं जाणाऱ्या एका लष्करी अधिकाऱ्याचे प्राण वांचविण्याचा प्रयत्न केला. यासंबंधानें वॉशिंगटननें त्याचा अभिप्राय विचारला तेव्हां वॉशिंगटनला तें कृत्य करण्यास राष्ट्रीय-सभेचीही परवानगी मिळाली होती. तो प्रश्न अमेरिकन राष्ट्राच्या इभ्रतीचा असल्यामुळें त्याच्या विरुद्ध अभिप्राय प्रगट करणें मोठें बिकट—नाजुक—काम झालें होतें. परंतु अशा प्रसंगींही पेननें आपली सद्सद्विवेकबुद्धि जागृत ठेवून वॉशिंगटनला-- राष्ट्राची इभ्रत न गमावतां त्या कृत्यापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला.

पुढें सर्वांच्याच सुदैवानें, त्या मनुष्याच प्राण वांचवितां येण्याजोगी स्थिति प्राप्त झाली व त्याबद्दल वॉशिंगटननेंही त्या मनुष्यास सोडून देऊन त्याचें—तो सुटल्याबद्दल—अभिनंदन केलें.

यानंतर पेननें, 'अमेरिकन क्रांती'संबंधानें ॲबे-रेनॉल नांवाच्या इंग्रज गृहस्थानें लिहिलेल्या एका पुस्तकावर टीका लिहिली व त्यांत त्यानें ॲबेचे अनेक कुग्रह खोडून काढले असून शेवटीं इंग्लंडला उपदेश केलेला आहे. ही टीका त्यानें पुस्तकरूपानें प्रसिद्ध केली व त्याच्या पन्नास प्रती वॉशिंगटनकडे त्याच्या सैन्याच्या उपयोगाकरितां म्हणून त्यानें पाठवून दिल्या. त्यांबरोबर वॉशिंगटनला त्यानें जें पत्र लिहिलें आहे त्यांत " युद्धास सात वर्षें पुरीं झाल्यामुळें व कोणतीही गोष्ट सात वर्षांहून अधिक न करण्याची इंग्लंडची सामान्य प्रवृत्ति असल्यामुळें आतां लवकरच युद्ध

थांबेल व आतां आपले वाईट दिवस संपले असून शत्रुपक्षांत लढाईचें अवसान राहिलें नसल्यामुळें लवकरच आपणांस चांगले दिवस पहावयास सांपडतील." वगैरे मौजेचा व उत्तेजनपर मजकूर लिहिला आहे. या पत्राच्या उत्तरांत वॉशिंगटननें पेनचे आभार मानून लढाई बंद होण्या-संबंधीं आपले विचार प्रगट केले आहेत. ही टीका लिहिल्यानंतर पुढें इंग्लंडांतील लॉर्ड शेलबर्न यांच्या भाषणांतील मुद्दे खोडून काढण्याकरितां त्यानें आणखी एक 'crisis' लिहिलें व त्यावर पुढें बराच काल वादविवाद चालू होता. तो वाद संपल्यावर पेननें परराष्ट्रीय खात्याचा सेक्रेटरी व इतर प्रमुख मुत्सद्दी यांस एक विनंतिपत्र लिहून राष्ट्रीयसभेला 'A continental Legislature' (एक मध्यवर्ती मुख्य कायदेमंडळ)ची जोड देण्याची आवश्यकता दाखवून दिली. त्यावरून रॉबर्ट मॉरिस यानें एका मेजवानीचे प्रसंगीं पेनशीं या विषयावर चर्चा करण्याकरितां सर्व प्रमुख मुत्सद्द्यांस बोलाविलें व त्या प्रसंगीं, संयुक्त संस्थानांच्या संघास बळकटी आणण्यासाठीं पेननें योजिलेल्या उपरोक्त योजनेबद्दल चर्चा करण्यांत येऊन ती पसंत ठरविण्यांत आली.

वॉशिंगटनला लिहिलेल्या पत्रांत पेननें भविष्य केल्याप्रमाणें लवकरच युद्ध थांबलें. ता. १८ एप्रिल सन १७८३ रोजीं युद्ध बंद झाल्याचा जाहिरनामा वॉशिंगटननें प्रसिद्ध केला. व दुसऱ्याच दिवशीं पेननें आपलें 'शांतता व त्यापासून प्राप्त होणारे फायदे' या नांवाचें शेवटचें 'crisis' प्रसिद्ध केलें. ह्या पत्रकाची सुरवात पुढील शब्दांनीं केली आहे. *'मनुष्यांचे आत्मे कसोटीस लावणारा काळ निघून गेला आहे; आणि जगांतील सर्वांत मोठी व परिपूर्ण अशी क्रांति मोठ्या थाटानें व आनंदांत पार पडली आहे.'

यानंतर त्यानें आणखी एक पत्रक प्रसिद्ध करून सर्व संस्थानांस वैय्यक्तिक सत्तेचा व अभिमानाचा ध्यास सोडून सर्वांच्या संयुक्त हिता-करितां एकत्र होण्याचा व एकराष्ट्रीयत्वाची चाड बाळगण्याचा फिरून

* "The times that tried men's souls are over-and the greatest and completest revolution the world ever knew gloriously and happily accomplished."

एकवार उपदेश केला आहे. अखेरीस अमेरिकन क्रांतीचा समारोप करतांना स्वतःसंबंधानें त्यानें पुढील उद्गार काढले आहेतः—

"अमेरिकेच्या कार्यानेंच मला ग्रंथकार बनविलें. त्या कार्याचा माझ्या मनावर इतका परिणाम झाला व तें मला इतकें प्रिय झालें कीं, राष्ट्रीय स्वातंत्र्य जाहिर करण्याचा सन्मान्य असा मार्ग सोडून जेव्हां अस्वाभाविक व अशक्य अशा तडजोडीच्या नादाला (पुढारी) लागल्यामुळें त्या कार्याची हानि होण्याचा संभव दिसूं लागला तेव्हां मला स्वस्थ बसणें अशक्य होऊन मीं त्या कार्यास आपणास वाहून घेतलें; आणि गेल्या ७।८ वर्षांच्या अवधींत त्या कार्याची जर मीं कांहीं सेवा केली असेल तर त्याबरोबरच, मानवी प्राण्यांची सुधारणा करण्यासारख्या उच्चतर कामीं स्वतंत्र व निरपेक्ष बुद्धीनें वाङ्मयाचा उपयोग करून त्याचेंही महत्त्व-(दर्जा) मीं वाढविलें आहे. × × × × × परंतु ज्याअर्थीं आतां युद्ध थांबलें असून प्रत्येकजण सुख-शांततेचा अनुभव घेण्याकरितां घरीं जात आहे त्याअर्थीं मी त्या विषयाची आतां रजा घेतों. या कार्यांत मीं प्रारंभापासून शेवटपर्यंत अंतःकरणपूर्वक भाग घेतला असून त्यांतील निरनिराळया स्थित्यंतरांचा (खारट तुरट) मीं अनुभव घेतलेला आहे. आणि मी इतःपर कोणत्याही देशांत जरी गेलों तरी या कार्यांत बजावलेल्या कामगिरीबद्दल मला नेहमीं यथार्थ अभिमान वाटेल व याप्रमाणें मनुष्यजातीस उपयोगी पडण्याचें सामर्थ्य माझें ठायीं उत्पन्न केल्याबद्दल निसर्ग व दैव यांचे मी आभार मानीत राहीन."

इ० स० १७८३ च्या सप्टेंबर महिन्यांत अमेरिकेंत पूर्ण शांतता स्थापना झाली. त्यावेळीं राष्ट्रीय-सभेचें काम प्रिन्स्टन येथें चालू होतें. तेथें त्या सभेनें वॉशिंगटन यास पुढील कार्यक्रमासंबंधानें सल्लामसलत देण्याकरितां बोलाविलें. त्याप्रमाणें वाशिंगटन तिकडे निघून गेला. राष्ट्रीयसभेनें त्याच्याकरितां रॉकी हिलवर एक सुंदर राजवाडा तयार केला. तेथें वॉशिंगटन येऊन पोंचल्यावर राष्ट्रीयसभेचे अध्यक्ष, अधिकारी, परराष्ट्राचे वकील वगैरे सर्वांनीं त्याचें आदरपूर्वक व मोठ्या उत्साहानें स्वागत केलें आणि कांहीं दिवस मोठ्या आनंदांत घालविले. राष्ट्रीयसभेनें वॉशिंगटनचा

पुतळा उभारण्याविषयीं ठराव करून त्यानें केलेल्या कामगिरीबद्दल आपला आदर व्यक्त केला. व इतर प्रकारेंही त्याचा बहुमान केला.

या वेळीं पेन बॉर्डन टाऊन येथें आपल्या लहानशा घरीं व त्याचा जुना मित्र कर्नल किर्कब्राइड याच्या सहवासांत रहात होता. हा कर्नलही क्वेकर पंथाचा असून पेनच्या मतांविषयीं सहानुभूति बाळगणारा होता. पेनिसाल्व्हानियाची लोकसत्ताक राज्यपद्धतीची सनद (Constitution) तयार करण्याचे कामीं ह्या दोघांनीं एकमेकांच्या खांद्यास खांदा देऊन मदत केली होती (सन १७७६). तसेंच अमेरिकन युद्धांत दोघेही बरोबर लढले होते आणि दोघांनाही शास्त्रीय विषयाची—यांत्रिक शोधांची अभिरुचि होती. यामुळें त्या दोघांचा स्नेह चांगला जमला होता. मि० हॉल या नांवाचा एक यंत्रकलाभिज्ञही त्या गांवांत रहात होता. आणि तो पेनच्या नवीन शोधांचे नमुने बनविण्याच्या कामीं त्यास मोठ्या उत्सुकतेनें मदत करीत असे. राज्यक्रांतीचें काम पुरें झाल्यामुळें यापुढें या यांत्रिक शोधाच्या कामाकडेच आपलें सर्व लक्ष लावण्याचा त्यानें निश्चय केला. परंतु हें काम हातीं घेण्यापूर्वीं एकदां आपल्या वृद्ध आईबापांस जाऊन भेटावें असें त्याच्या मनांत होतें, तथापि त्याकामीं (प्रवास वगैरे) अवश्य असणारा पैसा त्याच्याजवळ नव्हता. त्यानें बजाविलेल्या कित्येक कामगिरीं-बद्दल त्यास कांहींच द्रव्य मिळालेलें नव्हतें. व तो सेक्रेटरी असतांना जरी त्याचा पगार दरमहा ७० डॉलर ठरला होता तरी फक्त १५ डॉलरच काय ते त्याच्या हातीं येत होते. यामुळें त्याजपाशीं कांहीं शिल्लक नव्हती. पैशाची कांहीं तरी सोय व्हावी म्हणून आपल्या आजपर्यंतच्या कामगिरीबद्दल चौकशी करून कांहीं तरी विचार करण्याबद्दल त्यानें राष्ट्रीयसभेच्या अध्यक्षास पत्र लिहिलें. त्या पत्राचा कांहींसा उपयोग झाला; पण मध्यंतरीं तीन महिने पेननें अगदीं निकृष्ट स्थितींत काढले. यामुळें प्रिन्स्टन येथें वॉशिं-गटननिमित्त झालेल्या उत्सवांत त्यास भाग घेतां आला नाहीं. परंतु वॉशिंगटन त्यास विसरला नाहीं. त्यानें ता० १० सप्टेंबर (सन १७८३) रोजीं रॉकी हिलवरून त्यास पुढील आशयाचें पत्र लिहिलें:—

" मी येथें आल्यानंतर तुम्ही बॉर्डनटाऊनला गेल्याचें मला समजलें. तुम्ही तेथें विश्रांतीकरितां गेलां आहां कीं काटकसरीच्या निमित्तानें

गेलां आहां हें मला ठाऊक नाहीं. कोणत्याही कारणामुळें कां गेलां असाना, जर तुम्ही या ठिकाणीं येऊन माझ्याबरोबर कांहीं दिवस येथें घालवाल तर मला फार आनंद होईल.

"तुम्ही येथें आल्यानें राष्ट्रीय सभेला तुमच्या मागील कामगिरीची स्मृति होईल आणि त्यासंबंधानें माझ्या हातून जर कांहीं होण्यासारखें असेल तर तें मी, आपल्या कामगिरीचें महत्त्व माझ्या पूर्ण लक्षांत असल्यामुळें, मोठ्या आनंदानें करीन."

वॉशिंगटनचें हें निमंत्रण पेननें स्वीकारलें व त्यास पुढील आशयाचें उत्तर लिहिलें:—

'आपलें पत्र पाहून फार आनंद झाला. आपण दर्शविलेल्या स्नेह-भावाबद्दल व दिलेल्या आमंत्रणाबद्दल मी आपले मनःपूर्वक आभार मानितों.

"मि॰ मॉरिस यांच्या सूचनेवरून राष्ट्रीयसभेला माझ्या कामगिरी-चा विचार करण्याविषयीं मीं नुकतेंच एक विनंतिपत्र पाठविलें असून त्या सभेंत सध्यां त्याचा विचार चालू आहे. तें पत्र विचाराकरितां राष्ट्रीयसभेनें एका कमिटीकडे सोपविलें होतें व त्या कमिटीचा रिपोर्ट सध्यां राष्ट्रीयसभेपुढें आहे. 'हिस्टेरिओग्राफर'ची जागा मला द्यावी, अशी सदर कमिटीची शिफारस* असल्याचें मला समजलें आहे. ह्या शिफा-रशीचा विचार, आणखी कांहीं गोष्टी मी राष्ट्रीयसभेपुढें मांडीपर्यंत तहकूब करण्याविषयीं कांहीं सभासदांस मीं विनंति केली आहे. आणि त्या बाबतींत तुमची सल्लामसलत (खासगी रीतीनें) घेण्याचा माझा विचार होता तो तुमच्या स्नेहदर्शक पत्रानें अधिक दृढ झाला आहे. कारण सार्वजनिक बाबींसंबंधानें लिहितांना जरी मला कसलीही अडचण भासली नाहीं तरी स्वतःसंबंधानें लिहिण्याची वेळ येतांच फार मोठी पंचाईत पडल्यासारखी वाटत आहे." वगैरे.

सदरहू उत्तर लिहिल्यानंतर लवकरच पेन वॉशिंगटनला भेटावयास गेला व तेथें त्याचें उत्तमप्रकारें आगतस्वागत झालें. त्या ठिकाणीं त्याला इंग्रेज,

---

* ही सूचना वॉशिंगटनची होती.

लिंकन आणि कॉब्र हे जुने सहकारी मित्र भेटले व त्यांच्या सहवासांत त्यानें कांहीं काल मोठ्या आनंदांत घालविला.

वॉशिंगटन व पेन यांचा परस्पर स्नेहभाव पाहून मनांतल्यामनांत तळमळणारा-पेनविषयीं मत्सर बाळगणारा एक लहानसा पक्ष राष्ट्रीय सभेंत होता; व तो लोकमत पेनच्या विरुद्ध करण्याची संधि शोधीत होता. ह्यावेळीं संयुक्त संस्थानांतील कांहीं संस्थानें आपली स्वतंत्र सत्ता चालविण्याबद्दल पुन्हा प्रयत्न करूं लागलीं होतीं. तो प्रयत्न राष्ट्रविघातक असल्यामुळें तो मोडून काढण्याकरितां पेननें आपल्या विश्रांति घेत पडलेल्या लेखणीस फिरून जोराची गति दिली. "स्वतंत्र व सर्वव्यापी अशी राजसत्ता 'संयुक्त संस्थानांच्या'च नांवानें चालली पाहिजे व ती सत्ता म्हणजे केवळ 'कायद्यांचें प्राबल्य'सूचक अशी असली पाहिजे व ह्या सत्तेचा अंमल सर्वत्र समतेनें चालावा म्हणून निरनिराळ्या संस्थांनांनीं वैय्यक्तिक सत्तावैशिष्ट्याची हांव इतःपर सोडून दिली पाहिजे; असें झालें तरच एकराष्ट्रीयत्व टिकून सर्व संस्थानांचें सामग्र्यानें कल्याण होईल." अशा तऱ्हेचें प्रतिपादन करण्यास पेननें पुन्हा सुरवात केली. 'अमेरिकन संस्थानांत एकराष्ट्रीयत्वाची कल्पना लवकर रुजणार नाहीं व एकराष्ट्र या नात्यानें त्यांचें भय बाळगण्याचेंही कारण नाहीं.' असे उद्गार इंग्लंडांतील लॉर्ड शेफिल्ड यानें काढले होते. त्यास पेन यानें झणझणीत उत्तर देऊन एकराष्ट्रीयत्वाचें संवर्धन करण्याकरितां सर्व संस्थानांस मोठ्या कळकळीनें आग्रहाचा उपदेश केला आहे. परंतु त्यावेळीं त्याचा हा उपदेश संकुचित दृष्टीच्या कित्येक लोकांस (संस्थानांस) पसंत वाटला नाहीं. तशांत ह्या परिस्थितीचा फायदा घेऊन राष्ट्रीयसभेंत त्याजविरुद्ध असलेल्या उपरोक्त पक्षानें त्याच्याविषयीं लोकमत कलुषित करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळें व मुख्यतः त्याच्या वरील स्पष्ट उपदेशामुळें राष्ट्रीयसभेच्या कित्येक प्रतिनिधींची त्याच्यावर इतकी वक्रदृष्टि झाली कीं, त्याला मदत करण्याकरितां राष्ट्रीयसभेची अनुकूलता संपादन करण्यास वॉशिंगटनला आपलें सर्व वजन खर्च करावें लागलें. अशी जरी स्थिति होती तरी इ० स० १७८४ त न्यूयॉर्क संस्थानानें सुमारें २७७ एकर जमीन पेनला दिली. ही जमीन मिळतांच पेनला स्वतःच्या स्थितीविषयीं बरीच उमेद आली

व त्यानें वॉशिंगटन यास, राष्ट्रीयसभेंत स्वतःबद्दल यापुढें खटपट करून विनाकारण आपलें वजन व्यर्थ घालवूं नये, म्हणून पत्र लिहिलें. राष्ट्रीयसभेंतील कित्येक दुराग्रही सभासदांशीं डोकेफोड करीत बसण्यापेक्षां प्रत्येक संस्थानांतून स्वतंत्रपणें आपणांस जें काय मिळेल तेवढ्यावरच गुजारा करावा असें पेनच्या मनानें घेतलें. व न्यूयार्कचा कित्ता दुसरीं संस्थानेंही गिरवितील असें त्यास वाटूं लागलें. न्यूयॉर्कनें दिलेली जमीन न्यूरॉचेल या गांवीं होती. तिचें उत्पन्न पेनच्या खर्चास पुरण्याइतकें नव्हतें; परंतु अगदींच कांहीं नसल्यापेक्षां थोडासातरी आधार झाला व इतर संस्थानां-कडूनही अशीच कांहीं मदत मिळेल या आशेवर तो समाधान मानीत होता. राष्ट्रीयसभेकडून मदत घेण्याचा विचार त्यानें आतां सोडून दिला होता व प्रत्येक संस्थानामधूनच जें काय मिळेल तें मिळविण्याची खटपट त्यानें आतां सुरू केली होती.* त्याची ही कल्पना वॉशिंगटनलाही पसंत पडली, हें त्याच्या पुढील पत्रावरून दिसून येईल. रिचर्ड हेनरी ली यास वॉशिंगटन लिहितो:--

"पेननें विनंति केली नसतां व त्यास न कळत, त्यानें बजाविलेल्या कामगिरीविषयीं व त्याच्या हल्लींच्या विपद्ग्रस्त स्थितीविषयीं तुम्हांस आठवण देण्याची मी परवानगी घेतों.

"त्याचें 'कॉमनसेन्स' व 'Crisis' नामक अनेक पत्रकें हीं योग्य वेळीं प्रसिद्ध होऊन त्यांनीं लोकांच्या मनावर इष्ट असा परिणाम घडवून आणलेला आहे; ही गोष्ट त्या कालाकडे जो कोणी नजर फेकील त्यास

* येथें थोडासा खुलासा करणें जरूर आहे. एकराष्ट्रीयत्वासाठीं सर्व संस्थानांस एक 'अधिसत्ता' स्थापन करण्याचा पेन उपदेश करीत असतां त्यानें स्वतः प्रत्येक संस्थानास निरनिराळी मदत करण्याविषयीं कसें सुचविलें ? असा प्रश्न उपस्थित होणार आहे. त्याचें उत्तर असें कीं, पेनच्या वरील सूचनेंत, प्रत्येक संस्थानचें अंतस्थ कारभाराचें (internal administration) स्वातंत्र्य नष्ट करण्याची कल्पना नसून फक्त परराष्ट्रीय संबंध व राष्ट्र या नात्यानें संयुक्त संस्थानची उन्नति व रक्षण करण्याचे विशिष्ट अधिकार व सत्ता राष्ट्रीयसभेच्या हातीं असावी व त्या बाबतींत संस्थानांनीं स्वतंत्रपणें कारभार करूं नये एवढेंच त्याचें म्हणणें होतें.

नाकबूल करतां यावयाची नाहीं. त्याच्या ह्या कामगिरीकडे आजपर्यंत दुर्लक्ष करण्यांत आलें हें सर्वांस ठाऊक आहेच. त्याची स्थिति सध्यां फारच हलाखीची झाली आहे. अशा स्थितींत त्यास कांहींतरी मोबदला देणें हें न्यायाचें नाहीं काय?

"लोकांची मदत नाकरण्यासारखी सध्यां त्याची स्थिति नाहीं. न्यूयॉर्क संस्थाननें आपली स्थिति फारशी समाधानकारक नसतांही त्यास मदत करून उदाहरण घालून दिलें आहे. कित्येक कारणांमुळें राष्ट्रीयसभेपासून मदत घेण्यापेक्षां निरनिराळया संस्थानांकडून परस्पर मदत घेण्याचें त्यास अधिक पसंत वाटतें. व त्याचें करणें पुष्कळांना पसंत पडण्यासारखें आहे असें मला वाटतें. त्याची हांव फार मोठी नाहीं. साधारणपणें स्वावलंबन करतां येण्यापुरती मिळकत असावी एवढीच त्याची महत्त्वाकांक्षा आहे. आणि ज्या दृष्टीनें त्याच्या कामगिरीच्या (अमेरिकन कार्यासंबंधीं) महत्त्वाकडे मी पाहतों त्याच दृष्टीनें तुम्हीही जर पहाल तर एकादी मिळकत त्यास मिळवून देण्याकरितां तुम्ही मोठ्या आनंदानें झटाल अशी माझी खात्री आहे."

याच अर्थाचीं दोन तीन पत्रें वॉशिंगटननें निरनिराळया संस्थानच्या लोकसभाधिपतींस पाठविलीं आहेत. या पत्रांवरून पेनच्या कामगिरीचें वॉशिंगटनलाही केवढें महत्त्व वाटत होतें हें चांगलें कळून येईल. वॉशिंगटनच्या ह्या पत्रामुळें आणखी एकदोन संस्थानांतून पेनला मदत करण्याची खटपट सुरू झाली; पण व्हर्जिनिया संस्थानांत ती यशस्वी झाली नाहीं. कारण स्वतंत्र-वैयक्तिक सत्तेचा आग्रह धरण्यांत हें संस्थान प्रमुख होतें व तें त्यामुळें पेनच्या प्रखर टीकेस पात्र झालें होतें. पेनिसाल्व्हानियाच्या लोकसभेनें मात्र त्याच्या कामगिरीबद्दल अभिनंदनपर ठराव पास करून त्यास ५०० पौंडांची देणगी दिली. या वेळपर्यंत दोनच संस्थानांनीं फक्त त्यास मदत केली; पण तेवढ्यानें तूर्त त्याची दधात मिटली. यापुढें राष्ट्रीयसभाही त्यास कांहीं देऊं इच्छीत होती; पण राष्ट्रीयसभेकडून देणगीच्या रूपानें कांहीं घ्यावयाचें नाहीं असें त्यानें ठरविलें असल्यामुळें* त्यानें राष्ट्रीयसभेकडे

*असें ठरविण्याचें एक कारण असें होतें कीं, राष्ट्रीय सभेची सर्व संयुक्त

मागील नोकरीचा फक्त मुशाहिरा मागितला व तत्संबंधींचा आपला हिशेब त्यानें त्या सभेस सादर केला. ह्या हिशेबाची चर्चा करण्यास राष्ट्रीयसभा फारशी खुष नव्हती. परंतु पेनला तसें करून घेण्याची आवश्यकता भासत होती. कारण त्या चर्चेंत डीन प्रकरणाचीही चर्चा निघून राष्ट्रीयसभेनें त्या वेळीं त्याच्यावर घेतलेले आक्षेप खोटे ठरणार होते. परंतु त्या कामांत राष्ट्रीयसभेच्या इभ्रतीस कमीपणा येण्याजोगा असल्यामुळें पेनच्या हिशेबाची चर्चा करण्यास ती सभा टाळाटाळ करीत होती. अखेरीस ह्या प्रकरणाचा विचार करण्याकरितां राष्ट्रीयसभेनें एक कमिटी नेमली. त्या कमिटीचा रिपोर्ट तयार झाल्यावर राष्ट्रीयसभेनें ता० २३ ऑगस्ट रोजीं पुढील ठराव एकमतानें पास केला.

"थॉमस पेन* यानें स्वातंत्र्य व शासनपद्धति यांसंबंधानें योग्य वेळीं प्रसिद्ध केलेल्या खुबीदार लेखांच्या द्वारें नुकत्याच घडून आलेल्या क्रांतीचीं तत्त्वें लोकांस समजावून देऊन तीं त्यांच्या मनावर ठसविण्याकरितां प्रारंभापासून (क्रांतीच्या) स्वयंप्रेरणेनें व सातत्यानें जे परिश्रम केले ते ह्या संस्थानांच्या नागरिकांना प्रिय झाले—आवडले-असून राष्ट्रीयसभेच्याही अभिनंदनास—धन्यवादास ते पात्र होण्यासारखे आहेत; सबब त्याचे हे परिश्रम व त्यापासून झालेले

संस्थानांवर 'अधिसत्ता' चालावी म्हणून त्याची जी खटपट होती तिच्या निरपेक्षपणास बाध येऊं नये. राष्ट्रीयसभेकडून देणगी घेतल्यास वैयक्तिक सत्तावादी संस्थानांस त्याच्यावर टीका करण्यास तें एक छिद्र होणार होतें. म्हणून त्यानें आपला हिशेब चुकता करण्याविषयीं त्या सभेस लिहिलें. हिशेबाचे पैसे व देणगी यांतील फरक वाचकांच्या लक्षांत येईलच.

*" That the early, unsolicited, and continued labours of Thomas Pain, in explaining and enforcing the Principles of the late revolution by ingenious and timely publications upon the nature of liberty, and civil government, have been well received by the citizens of these states and merit the approbation of congress; and that in consideration of these services, and the benefits produced thereby, Mr. Pain is entitled to a liberal gratification from the united states."

फायदे यांचा विचार करितां संयुक्त संस्थानांपासून मि० पेन यास उदार आश्रय मिळणें जरूर आहे."

या स्वरूपाचा ठराव नको होता म्हणून त्यानें आपल्या हिशेबाच्या यादीचा निकाल करण्याविषयीं ता. २७ सप्टेंबर रोजीं राष्ट्रीयसभेस फिरून एक पत्र लिहिलें. राष्ट्रीयसभेनें ता. ३ आक्टोबर रोजीं आपल्या पूर्वोक्त ठरावास अनुसरून पेनला ३००० डॉलर देण्याचा हुकूम केला. एतद्विषयक कमिटीनें सहा हजार डॉलर देण्याची शिफारस केली होती; परंतु पेनच्या शत्रूंनीं खटपट करून सहाचे तीन हजार केले. ही रक्कम, लॉरेन्सबरोबर पेननें जो फ्रान्सचा प्रवास केला—व अमेरिकेवरील संकट दूर केलें—त्या प्रवासाचा खर्च भरून निघण्यासही पुरेशी नव्हती. त्याच्या इतर कामगिरीबद्दलचा मुशाहिरा राष्ट्रीयसभेकडे तसाच अडकून राहिला होता. अमेरिकन क्रांतीचे वेळीं पेननें निरनिराळ्या प्रकारानें किती महत्त्वाची कामगिरी बजावली हें तत्कालीन पत्रव्यवहारावरून आधुनिक लोकांच्या पूर्णपणें लक्षांत आणून देतां येणार नाहीं. परंतु ह्या कामगिरीबद्दल, वॉशिंगटन, फ्रँकलीन, जेफर्सन, ॲडाम्स, मेडिसन, रॉबर्ट मॉरिस, चॅन्सेलर लिव्हिंग्स्टन, आर. एच्. ली, जनरल ग्रीन, डिकिन्सन, वगैरे तत्कालीन कर्त्या—ज्यांच्याशीं पेनचा रात्रंदिवस अनेक रीतीनें संबंध येत असे—पुरुषांनीं त्याच्यासंबंधीं सररहा जे आदराचे उद्गार काढलेले आहेत, त्यावरून वाचकांस, त्यानें बजाविलेल्या कामगिरीच्या महत्त्वासंबंधानें पुष्कळसा अंदाज करितां येईल. अमेरिकन युद्धाच्या आठ वर्षांच्या कष्टमय काळांत पेनच्या देशभक्तीस, स्वार्थत्यागक्षमतेस अनुचित अशी एखादी गोष्ट जर त्याच्या हातून घडती अथवा एखादें काम त्यानें भाडोत्रीपणानें केलें असतें तर तें वरील थोर व चाणाक्ष लोकांच्या नजरेंतून खास चुकलें नसतें. या लोकांनाही 'सर्व संस्थानें पेनचीं ऋणी आहेत' ही गोष्ट मान्य होती; असें त्यांच्या उपलब्ध असलेल्या पत्रव्यवहारावरून स्पष्टपणें नजरेस येतें. पेनसंबंधानें खरा अभिप्राय देण्याची पात्रता असणाऱ्या त्याच्या समकालीन लोकांचा वरील अभिप्राय आहे. व तो आतां कधींही बदलूं शकणार नाहीं. राष्ट्रीयसभेकडून तीन हजार डॉलर मिळतांच पेन यांत्रिक शोधाच्या नादास लागला. एका लोखंडी पुलाचा नमुना (design) तयार करून तो पूल

ओतविण्याच्या व राष्ट्रीयसभेपुढें तो शोध मांडण्याच्या तयारीस तो लागला. यां वेळीं फ्रँकलीन हा सार्वजनिक काम सोडून फ्रान्समधून स्वदेशीं परत आला होता. त्याच्याशीं झालेल्या पेनच्या पत्रव्यवहारावरून त्याचा हा काल (१७८५ हें वर्ष सन) बराच आनंदांत गेला असें दिसतें. मेणबत्ती तयार करण्याचीही खटपट त्यानें ह्या वेळीं सुरू केली होती असें त्याच्या एका पत्रावरून दिसतें. ह्या यांत्रिक शोधांत व शिल्पकलेंत तो निमग्न असतां फिरून एकाएकीं त्यास आपली लेखणी पाजळावी लागली. वॉशिंगटनला मदत करण्याकरितां इ० स० १७८० च्या मे महिन्यांत पेननें वर्गणी करून जी बँक स्थापन करविली, तिचा नाश करण्यास उद्युक्त असलेला एक पक्ष ह्या वर्षाच्या अखेरीस (सन १७८५) फिलाडेल्फिया येथें उत्पन्न झाला. इ० स० १७८२ मध्यें ह्या बँकेस राष्ट्रीयसभेकडून कायदेशीर सनद मिळाली असल्याकारणानें त्या बँकेंत देवघेवीचा व्यवहार मोठ्या प्रमाणांत चालत असे. ह्या बँकेची सदर सनद रद्द करण्याविषयीं तिच्या कांहीं हितशत्रूंनीं खटपट चालविली होती. तेव्हां या संकटांतून त्या बँकेचा बचाव करण्याकरितां त्यानें 'डेझर्टेशन्स ऑन गव्हर्मेंट, दि अफेअर्स ऑफ दि बँक, अॅण्ड पेपर मनी' या नांवाचें एक लहानसें पत्रक प्रसिद्ध केलें. ह्या पत्रकांत त्यानें लोकसत्ताक राजसत्ता व वैयक्तिक राजसत्ता यांमधील भेद दाखवून लोकसत्ताक राज्यपद्धति ही न्यायाच्या तत्त्वावर उभारली असल्यामुळें सरकार व व्यक्ति अगर व्यक्ति-समूह यांच्यामध्यें लढा पडल्यास 'सरकारची इच्छा' अथवा विशिष्ट अधिकार असल्या तत्त्वांचें घोडें पुढें न ढकलतां दोघांस एकाच कायद्याच्या तराजूनें न्याय दिला पाहिजे, इत्यादि उदात्त तत्त्वांचें प्रतिपादन केलेलें आहे. हें पत्रक प्रसिद्ध झाल्यानंतर सुमारें एक वर्षानें अमेरिकन राष्ट्राची (Constitution) राज्यघटना ठरविण्यांत आली व तिची रचना ह्या पत्रकांतील मूलतत्त्वांच्या आधारावरच करण्यांत आली. तसेंच पुढें, एका संस्थानांतील प्रजाजनाचा व संस्थानचा जेव्हां एका करारासंबंधानें वाद उपस्थित झाला तेव्हां अमेरिकेच्या श्रेष्ठ न्यायकोर्टानें ह्या पत्रकांतील तत्त्वांचा आश्रय करून त्या वादाचा निकाल केला. ह्या दोन गोष्टींवरून ह्या पत्रकाचें खरें महत्त्व वाचकांच्या लक्षांत येईल. ह्या पत्रकाचें

कार्य झाल्यावर पेन पुन्हा आपल्या यांत्रिक शोधाकडे वळला. व त्यानें केलेल्या एक दोन नमुन्यांप्रमाणें कमानीचे पूल एक दोन ठिकाणीं बांधवून घेण्याची खटपट त्यानें सुरू केली. ह्या पुलांसंबंधानें पेनिसाल्व्हानिया येथील लोकसभेशीं व फ्रँकलीनशीं त्याचा पत्रव्यवहार सुरू असतांना मध्येंच त्याच्या वडिलांचें त्यास पत्र आल्यामुळें इंग्लंडला जाण्याचा विचार निश्चित करून तो त्या प्रवासाच्या तयारीस लागला. आपला हा प्रवासाचा बेत त्यानें फ्रँकलीन यास तारीख ३१ मार्च सन १७८७रोजीं पत्रानें कळविला असून त्यांत, फ्रान्समधल्या कांहीं प्रसिद्ध माणसांस, ओळख होण्यापुरतीं पत्रें देण्याविषयीं त्यानें विनंति केली आहे. इंग्लंडला जातांना फ्रान्सांत जाण्याचें जें त्यानें योजिलें तें, आपले यांत्रिक शोध—पुलांची कल्पना—यशस्वी करण्याकरितांच होय. कांहीं दिवसांपूर्वीं फ्रँकलीन यानें त्यास असें सुचविलें होतें कीं, जर फ्रान्सांतील कुशल इंजिनियर त्याचे पुलाचे नमुने पसंत करतील तर इंग्लंड व अमेरिका ह्या देशांत त्यांचा तेव्हांच प्रसार होईल. ह्या सूचनेप्रमाणें फ्रान्सांतील मोठमोठ्या तज्ज्ञांची गांठ घेऊन त्यांना आपली कल्पना समजावून सांगण्याकरितां व त्यांची सल्लामसलत घेण्याकरितां ह्याच प्रवासांत फ्रान्स देशांतील प्रवासही उरकून घेण्याचें त्यानें ठरविलें. इकडे पेनिसाल्व्हानिया संस्थानानें त्याच्या पुलाच्या योजनेचा विचार करण्याकरितां एक कमिटी नेमली होती तिचें काम चालूच होतें. त्या कमिटीशीं चर्चा करण्यांत ज्यावेळीं पेन गुंतला होता त्याचवेळीं राष्ट्रीयसभेनें अमेरिकेची कॉन्स्टिटयूशन (राज्यघटना) तयार करण्याकरितां एक कन्व्हेन्शन (लोकसभा) नेमिलें. ह्या कन्व्हेन्शनच्या बैठकी लवकरच सुरु व्हावयाच्या होत्या. परंतु पेननें त्यांत फारसें मन घातलें नाहीं. पेन हा पूर्णलोकसत्ताक राज्यपद्धतीचा अभिमानी होता. राजाची सत्ता व महाजनसत्ता ह्या दोन्ही गोष्टींचा त्यास सारखाच तिटकारा होता. अमेरिकन क्रांतीच्या वेळेस त्यांतील बहुतेक पुढाऱ्यांचीं मतेंही पेनप्रमाणेंच होतीं—निदान त्याच्या सदर मताच्या विरुद्ध तरी तीं खास नव्हतीं. परंतु क्रांतीचें काम पूर्ण झाल्यावर फ्रँकलीनशिवाय इतर सर्व (वॉशिंगटन, उइल्सन, रॉबर्ट मॉरिस, गव्हर्नर मॉरिस, क्लेमर, रश, विंगहॅम, ब्रॅडफर्ड, हेअर वगैरे) पुढाऱ्यांचीं मनें Aristocracy (बड्या लोकांची सत्ता) व Democracy

(सर्वसामान्य लोकांची सत्ता) यांचें मिश्रण असणारी राज्यपद्धति निर्माण करण्याकडे वळली होती. इंग्लंडमध्यें जर एक वड्या लोकांची व एक सामान्य लोकांची अशा दोन सभा आहेत तर अमेरिकेंतही त्या कां नसाव्यात? असें या लोकांस व त्यांच्या अनुयायांसही वाटूं लागलें. पेनच्या मतांत मात्र अशा प्रकारचें स्थित्यंतर झालेलें नव्हतें. 'वडे लोक' व 'सामान्य लोक' हे भेद वगळून कायद्याच्या दृष्टीनें सर्वांस सारखेंच लेखावें अशा प्रकारचीं मतें तो अद्यापही प्रतिपादीत होता. त्याच्या ह्या मतांविषयीं फ्रँकलीनची पूर्ण सहानुभूति होती; परंतु वार्धक्यामुळें त्या मतांचा पुरस्कार करण्याचें व बरोबरीच्या लोकांशीं त्याप्रीत्यर्थ झुंजण्याचें काम त्याच्या हातून होण्यासारखें नव्हतें. अर्थात् त्याला गप्प बसण्यावांचून दुसरा मार्ग नव्हता. ह्या बदललेल्या परिस्थितींत वर लिहिलेली सर्व मंडळी फ्रँकलीनच्या दिवाणखान्यांत राजकारणाची चर्चा करण्याकरितां वारंवार जमत असे. परंतु याप्रसंगीं पेन-एकंदर मंडळीचा कल वर लिहिल्याप्रमाणें असल्यामुळें मौन धारण करीत असे. त्याला जें काय सांगावयाचें तें तो लेख प्रसिद्ध करून सांगत असे. अशी स्थिति असल्यामुळें 'कॉन्स्टिट्यूटशन' तयार करण्याकरितां नेमलेल्या कन्व्हे-न्शनमध्यें त्यानें प्रत्यक्ष असा कांहीं भाग घेण्याचें टाळलें व त्या सभेच्या बैठकी सुरू होण्याचे सुमारास त्यानें इंग्लंडचा मार्ग धरला.

प्रकरण सातवें

जन्मभूमीस पुनरागमन

न्यू यॉर्क येथून एका फ्रेंच आगबोटींतून पेन इंग्लंडला जाण्याकरितां निघाला होता तो सन १७८७ च्या उन्हाळ्यांत पॅरिस येथें येऊन पोंचला. येतांना त्यानें फ्रँकलीनकडून दोन तीन गृहस्थांस पत्रें आणिलीं होतीं; परंतु त्याचे लेख व अमेरिकेंत त्यानें केलेलीं कामें यांमुळें तो इतका प्रसिद्धीस आला होता कीं, त्यास आतां कोणाच्या शिफारसपत्रांची जरूरच उरली नव्हती. अर्थात् फ्रँकलीनच्या पत्रांचा उपयोग करण्याचें त्यास कारणच पडलें नाहीं. ॲबे रेनॉलच्या 'अमेरिकन क्रांती'च्या इतिहासावर त्यानें केलेली टीका (याचा उल्लेख मागील प्रकरणांत आला आहे) फ्रान्सांतील प्रागतिक पक्षाच्या पुष्कळ लोकांस फार आवडली होती. आणि ह्यामुळें तो फ्रान्सांत येतांच त्या पक्षाच्या अनेक प्रमुख व थोर लोकांनीं त्याचें आदरपूर्वक स्वागत केलें. पॅरिसमध्यें जातांच पेननें तेथील 'Academy of Sciences' (शास्त्रप्रवर्तक मंडळ) पुढें आपली पुलाची कल्पना व त्याबरहुकूम त्यानें तयार केलेला एक नकाशा (model) हीं मांडलीं व त्यासंबंधानें त्या तज्ज्ञ व प्रख्यात विद्वन्मंडळाचा अभिप्राय मिळविण्याचा प्रयत्न सुरू केला. त्या मंडळानें त्याच्या विद्वत्तेस व योग्यतेस शोभेल असा त्याचा सत्कार करून त्याच्या 'नवीन शोधा'बद्दल योग्य अभिप्राय व्यक्त करण्याकरितां एक कमिटी नेमली. फ्रँकलीन अमेरिकेंत परत आल्यावर त्याच्या जागीं (अमेरिकन कन्सल) पॅरिस येथें जेफर्सन होता. त्याचीही पेननें मुलाखत घेतली. या दोघांमध्यें पूर्वीपासून स्नेहसंबंध होताच. तेव्हां जेफर्सनशीं मोकळ्या मनानें बोलण्यास व आपले हेतु त्यास निवेदन करण्यास पेनला मुळींच अडचण पडली नाहीं.

पुलासंबंधीं कमिटीचा रिपोर्ट तयार होईपर्यंत पेन पॅरिस येथें राहिली व तेवढ्या काळांत तेथील बहुतेक मान्यवर पुढाऱ्यांची व त्याची चांगली ओळख झाली. 'अमेरिकन क्रांति' घडवून आणण्याचे कामीं जरी पेननें

प्रमुख भाग घेतला होता तरी त्याची स्वाभाविक इच्छा व मनोवृत्ति यांचा कल शांततेकडे—युद्धाच्या विरुद्ध—होता. आणि राज्यक्रांत्यासुद्धां होतां होईल तोंपर्यंत शांततेचा भंग न करितां—म्हणजे युद्धाची वेळ येऊं न देतां कराव्यात असें त्याचें मत होतें. तसेंच राष्ट्रा-राष्ट्रांमध्यें परस्पर मत्सर व द्वेष नसावा, उलट त्यांचा परस्पर स्नेह असावा अशीही त्याची इच्छा होती. परंतु त्याची ही उच्च व उदात्त (ideal) मनोवृत्ति ह्या व्यावहारिक जगापेक्षां काव्यसृष्टींतच विशेष शोभण्यासारखी असल्यामुळें ती केव्हांही फलद्रूप झाली नाहीं. अमेरिकन क्रांतीनंतर शांततावादी बनण्याचा त्यानें निश्चय केला होता. पण पुढें लवकरच 'मानवी हक्कांचें संरक्षण' व 'शांततावादित्व' यांचें फ्रान्सच्या रंगभूमीवर द्वंद्व सुरू झालें व मानवी हक्कांच्या संरक्षणाकरितां बिचाऱ्या पेनला कल्पनेच्या वातावरणांतून निघून मानवी रक्ताचे निष्कारण (त्याच्या कल्पनेप्रमाणें) पूर वाहविणाऱ्या ह्या आसुरी व्यावहारिक जगाच्या भानगडींत पडावें लागलें! तथापि अशा वेळींही त्यानें आपली उपरोक्त उच्च मनोवृत्ति फलद्रूप करण्याचे शक्य तितके प्रयत्न केले आहेत आणि यांतच त्याचें खरें थोरपण आहे. उच्च प्रकारचें ध्येय डोळ्यांपुढें सतत ठेवून कसलाही प्रसंग आला तरी त्यांतून परिस्थितीच्या ओघाबरोबर वाहून न जातां त्या ध्येयाकडे जाण्याचा प्रयत्न करणें व आपल्या प्रत्येक कृतीवर त्या ध्येयाचा स्पष्ट छाप बसविणें हें कर्म महाकठीण आहे. व तें धैर्यानें, चिकाटीनें आणि धिमेपणानें करण्यास जे चुकत नाहींत तेच खरे थोर व ज्ञाते आणि नेते पुरुष समजले जातात. थॉमस पेन हा अशांपैकींच एक महात्मा होता आणि जरी मानवी प्राण्यास त्याच्या हक्कांचें ज्ञान करून देण्याकरितां व त्या हक्कांचें रक्षण करण्याकरितां त्यानें कित्येक प्रसंगीं जहाल विचार प्रदर्शित केले असले तरी या जहाल विचारांमध्येंच त्यानें शांततावादित्वाचा व पर्यायानें अहिंसेचा उपदेश केलेला असल्याचें आढळून येईल. त्याच्या अंगांत क्केकरचें रक्त खेळत असल्यामुळें असें व्हावें हें अगदीं साहजिक आहे. असो; उपरोक्त कमिटीच्या रिपोर्टाचें काम सुरू असतां इकडे इंग्लंड व फ्रान्स यांच्यामध्यें स्नेहसंबंध घडवून आणण्याची पेन खटपट करीत होता. ह्यासंबंधाच्या योजनेचा त्यानें एक मसुदा तयार केला व त्यास त्यानें फ्रेंच प्रधानाची अनुमति

मिळविली. पुढें थोड्याच दिवसांत त्याचा पुलाचा नमुनाही पसंत ठरल्यामुळें कमिटीच्या अभिप्रायासह त्यानें तो लंडन येथील रॉयल सोसायटीच्या अध्यक्षांकडे पाठविला व फ्रान्स व इंग्लंड यांमधील स्नेहसंबंधाची योजना बरोबर घेऊन तो लंडन शहरीं निघून गेला. तेथें त्यानें स्वतः एडमंड बर्कची गांठ घेऊन तो योजनेचा कागद त्यानें त्याच्या स्वाधीन केला. ही सर्व खटपट खासगी स्वरूपाची होती. लंडन येथें येऊन पोंचण्यापूर्वींच त्याचा बाप मरून गेला होता; त्यामुळें तेथून तावडतोब तो थेटफर्ड येथें आपल्या आईस भेटण्याकरितां गेला. माता व पुत्र यांची भेट होतांच उभयतांसही फार आनंद झाला. त्याची आई आतां अगदीं वृद्ध झाली होती व पेनकडून वारंवार येणाऱ्या पैशावरच तिचा निर्वाह अवलंबून असल्यामुळें त्याच्याशिवाय तिला दुसरा आधार नव्हता. तशांत तिचा नवराही नुकताच वारला होता. अशा स्थितींत पंधरा वर्षांच्या वियोगानंतर आपल्या एकुलत्या एक व तोही जगद्विख्यात झालेला, अशा पुत्राची प्रथम भेट होतांच त्या बाईला केवढा आनंद झाला असेल, याची बरोबर कल्पना तिच्या स्थितींत असलेल्या स्त्रियांवांचून इतरांस होणें शक्य नाहीं. ती ज्या घरांत रहात होती, तेथून जवळच केकर लोकांच्या सभा भरत असत. व त्या सभेस ती नित्य जात असे. तिची भेट झाल्यावर दर आठवड्यास नऊ शिलिंगप्रमाणें त्यानें तिला नेमणूक करून दिली.* व त्या वर्षाचा बहुतेक हिंवाळा त्यानें तिच्या सहवासांत राहून काढला. ह्या ठिकाणीं जुन्या मित्रांच्या सान्निध्यांत, गतकालाचें पर्यालोचन करण्यांत आणि जगाला शांततेचा उपदेश करण्यांत त्याचा वेळ मोठ्या आनंदांत जात होता. युद्धाच्या अनिष्टतेबद्दल त्यानें जे विचार प्रदर्शित केले आहेत त्यांपैकीं पुढील विचार सर्वकालीं व सर्व लोकांनीं मनन करण्यासारखे आहेत.

"युद्धापासून उद्भवणाऱ्या आपत्तींचा व दुःखांचा मनुष्यजातीवर काय परिणाम घडतो—त्यामुळें हजारों माणसें कशीं धुळीला मिळतात हें पाहिलें म्हणजे मनुष्याचें अंतःकरण हालवून सोडून त्यास विचार करावयास

* ही नेमणूक त्यावेळीं तिला सुस्थितींत राहण्यास पुरेशी होती.

लावणारें कांहीं तरी तत्त्व ह्या अंतःकरणांत खास आहे असें वाटूं लागतें. खरोखर परमेश्वराच्या प्रेरणेनें बनलेलें असें एखादें तत्त्व त्यांत खचित असून तें या दुःखाबद्दलचा खेद व सहानुभूति आत्म्याला कळवीत असतें. त्याकडे लक्ष देऊन, मनुष्याचा तत्त्वावर उभारलेला थोरपणा हाच राष्ट्रांचा खरा मोठेपणा आहे हें जाणण्यास मनुष्यानें शिकावें. * * * युद्धामध्यें अनपेक्षित व अकल्पित गोष्टी अशा तऱ्हेनें घडून येतात व अवांतर गोष्टीही अशा जमून येतात कीं, त्यांचा शेवट कसा होईल हें कोणाही शहाण्या मनुष्यास बरोबर सांगतां येणार नाहीं. मात्र त्यापासून करांची वृद्धि व्हावयाची एवढी एक गोष्ट अगदीं निश्चित असते. * * * गरीब, कारागीर, व्यापारी, शेतकरी व ज्यांच्यावर करांचा खरा बोजा पडतो ह्या सर्वांची बाजू मी घेत असतों; परंतु ह्या सर्वांपेक्षां मानुष्याची तरफदारी करणें मला विशेष उचित वाटतें."

या विचारांवरून इंग्लंड व फ्रान्स येथें रक्तपात करणारी क्रांति घडून यावी अगर येईल असें पेनला वाटत नव्हतें, हें उघड दिसतें. इंग्लंडचा तत्कालीन मुत्सद्दी (तरुण) पिट यास हॉलंडबरोबर युद्ध टाळण्याचा, फ्रान्सबरोबर सख्य करण्याचा, युद्धास मदत करण्यास भाग पाडणारे स्नेहसंबंध ऊर्फ तह न करण्याचा आणि राजा व प्रजा यांचें ऐक्य करून इंग्लंडचें स्वातंत्र्य (अर्थात् लोकस्वातंत्र्य) व संपत्ति यांची वाढ करण्याचा तो उपदेश करीत होता. फ्रान्समध्यें याच दिशेनें काम चालू आहे असें त्याच्या नजरेस आलें होतें आणि तोच कित्ता इंग्लंडनें गिरवावा असें त्याचें म्हणणें होतें. तो असें म्हणे कीं, "**सरकारच्या हिताच्या दृष्टीनें पाहिलें असतां स्वातंत्र्य** (राज्यकारभारांतील लोकस्वातंत्र्य) **हें प्रजेची किंमत दुप्पट वाढवितें. आणि जेव्हां सर्व प्रजेमध्यें ह्या लोकस्वातंत्र्याची भावना उद्भूत होते तेव्हांच राष्ट्राचें वैभव व सामर्थ्य हीं पूर्णपणें स्थिर व बळकट होण्याचा समय प्राप्त झाला असें समजावें.** प्रगतिपर व हितकर असे फेरबदल होत असतांना जर कांहीं गडबड उडाली तर त्यामुळें सरकारनें गांगरून जातां कामा नये. कारण सध्यां आपण ज्या स्थितीचा उपभोग घेत आहों ती एकेवेळीं अशाच गडबडींतून—घोटाळ्यांतून उत्पन्न झालेली आहे."

"राष्ट्रांतील लोक व सरकार यांचें ऐक्य झालें असतां त्या राष्ट्रावर परस्थांची

वक्रदृष्टि होऊं शकत नाहीं आणि यद्यपि झाली तरी त्यापासून कांहीं बाधा होत नाहीं." अशा प्रकारचे विचार प्रदर्शित करण्यांत आणि आपल्या यांत्रिक शोधांचा* प्रसार करून त्याबद्दल 'पेटंट' मिळविण्याच्या उद्योगांत सुमारें दोन वर्षें पेननें इंग्लंड व फ्रान्समध्यें फिरण्यांत घालविलीं. इ० स० १७८८ च्या ऑगस्ट महिन्यांत त्याच्या पुलाबद्दल त्यास इंग्लंड, स्कॉटलंड व आयर्लंड येथील पेटंटें मिळालीं. व त्यानंतर आपल्या नमुन्याप्रमाणें निरनिराळ्या कारखान्यांतून स्वतःच्या देखरेखीखालीं किंबहुना प्रसंगविशेषीं स्वतः काम करून त्यानें अनेक लोखंडी पूल तयार करविले. फ्रान्स व अमेरिका या देशांतही त्यानें हीं कामें सुरू करविलीं. हें काम चालू असतांच इंग्लंडांतील प्रमुख मुत्सद्यांशीं राजकारणविषयक चर्चा करण्याचें व त्यांस निरनिराळ्या प्रसंगीं सल्लामसलत देण्याचें कामही तो करीत असे. यॉर्कशायर परगण्यांतील रॉथरहॅम येथें मेसर्स वॉकर कंपनीनें पेनच्या कामाकरितां एक कारखाना उभा केला होता. त्या ठिकाणीं त्याला इंग्लंडांतील मोठमोठे इंजिनियर व राजकारणी पुरुष येऊन भेटत असत व तोही त्यांच्या विनंतीवरून त्यांच्या पाहुणचाराचा स्वीकार करण्याकरितां त्यांच्याबरोबर जात असे. एडमंड बर्क, ड्यूक ऑफ पोर्टलंड, लॉर्ड फिटझ् वुइल्यम, फॉक्स, लॉर्ड लॅन्सडाऊन, सर जॉर्ज स्टंटन, सर जोसेफ बँक्स इत्यादि तत्कालीन प्रमुख व कर्ती मंडळी त्यास वारंवार भेटून महत्त्वाच्या सार्वजनिक बाबीसंबंधानें त्याची सल्ला विचारीत व त्याच्या लेखणीचें साह्य मिळविण्याविषयीं खटपट करीत असत. या मंडळींशीं जरी त्याचा इतका दाट परिचय झाला होता तरी तो

---

* पेनचे एतद्विषयक परिश्रम केवढे व्यापक होते हें त्याच्या एका चरित्रकाराच्या पुढील उद्गारांवरून कळून येईल:--

"But it would require a staff of specialists, and a large Volume, to deal with Paine's scientific studies and Contrivances-with his planing machine, his new crane, his smokeless Candle, his wheel of Concentric rim, his scheme for using gunpowder as a motor, above all his iron bridge."

—*Dr. Conway.*

त्यांच्या भपक्याला व वैभवाला मात्र केव्हांही भुलला नाहीं. इतकेंच नव्हे, तर तो आपण होऊन त्यांच्याकडे कधींही जात नसे. वर सांगितलेल्य कारखान्यांत जेव्हां उपरोक्त मंडळीपैकीं कोणी स्वतः येऊन खेटे घालावेत तेव्हां तो–आणि तेंही विशेष आग्रहानें बोलाविलें तर–त्यांच्याकडे जावयाचा व त्यांच्या आदरसत्काराचा परामर्ष घ्यावयाचा. त्यांच्या मोठेपणामुळें दिपून जाऊन त्यानें आपलें स्वातंत्र्य–अर्थात् विचार-स्वातंत्र्य–केव्हांही गमाविलें नाहीं. हे लोक जेव्हां त्याला भेटावयास येत तेव्हां 'हातामध्यें हातोडा घेऊन काम करीत असलेली व फक्त अमेरिका आणि आपली सुंदर कमान (पुलाची) या दोन गोष्टींचा अभिमान वाहणारी–ह्या दोन गोष्टींतच दंग असणारी–अशी थॉमस पेनची मूर्ति (व्यक्ति) त्यांच्या नजरेस पडे! इंग्लंडांतील बड्या लोकांच्या (Aristocrats) वैभवाचा त्यास केव्हांही दर्द वाटत नसे. व त्यांच्याशीं वागतांना तो त्यांस इतर सामान्य सभ्य गृहस्थांप्रमाणेंच मानीत असे. इंग्लंडांतील एखादा सामान्य मनुष्य अमेरिकेच्या स्वतंत्र वातावरणांत गेला असतां तो केवढ्या योग्यतेस चढतो याचा प्रत्यक्ष साक्षात्कार पेनच्या राहणीवरून इंग्लंडांतील लोकांस होत होता. स्वातंत्र्याचा तर तो मूर्तिमंत पुतळाच असल्याचें त्यांस दिसून येत होतें. इंग्लंडमध्यें त्यावेळीं जे अमेरिकन कारागीर व इंजिनियर होते त्यांसही तो फार प्रिय झाला होता. तो इंग्लंडांत असतां अमेरिकेंतील महत्त्वाच्या प्रकरणीं इंग्लंडास योग्य माहिती व सल्ला देणारा आणि उलटपक्षीं अमेरिकन मुत्सद्यांसही इंग्लंडसंबंधानें योग्य माहिती पुरविणारा असा दुतर्फी वकीलच होता असें म्हणण्यास हरकत नाहीं. अमेरिकेस द्यावयाची सर्व माहिती तो त्याचा मित्र फ्रान्सांतील अमेरिकन वकील जेफर्सन यास लिहून कळवीत असे. जेफर्सन यास पेननें अनेक पत्रांतून इंग्लंडांतील तत्कालीन राजकारस्थानांची गुप्त व प्रकट अशा दोन्ही तऱ्हेची महत्त्वाची माहिती दिली आहे व त्यांतील कांहीं गोष्टींसंबंधीं व अमेरिकेच्या हितसंबंधाविषयीं त्यांत त्यानें मोकळ्या मनानें चर्चा केली आहे. हा पत्रव्यवहार बराच मोठा व ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाचा आहे; परंतु सामान्य मराठी वाचकांस तो कांहींसा दुर्बोध वाटण्याचा

संभव असल्यामुळें त्याचें वरीलप्रमाणें नुसतें दिग्दर्शन करूनच पुढें जाण्याचें योजिलें आहे.

पेन इंग्लंडमध्यें असतांना फ्रान्स देशांतील इतिहासप्रसिद्ध अशा राज्यक्रांतीस सुरवात झाली (इ० स० १७८९). त्यावेळीं फ्रान्समध्यें दुष्काळ पडला होता व सरकारी तिजोरीची स्थिति फार शोचनीय झालेली होती. इकडे अमेरिकेंतील क्रांतींतला मुख्य नायक जॉर्ज वॉशिंगटन हा ह्याच सुमारास अमेरिकन राष्ट्रीयसभेचा अध्यक्ष बनला होता. हें पाहून फ्रान्सांतील लोकपक्षाच्या लोकांस विशेषच स्फुरण चढलें. राज्यक्रांतीस सुरवात होतांच लोकपक्षाच्या सैन्यानें प्रथम राजकीय गुन्हेगारांचें माहेरघर बनलेला बॅसिली नांवाचा तुरुंग आपल्या स्वाधीन करून घेतला. ही गोष्ट घडली त्या सुमारास पेन फ्रान्समध्यें येऊन दाखल झाला. फ्रान्सांतील अमेरिकन वकील जेफर्सन हा आपला हुद्दा सोडून ह्या वर्षाच्या (१७८९) सप्टेंबर महिन्यांत अमेरिकेस निघून गेला; तेव्हां त्याच्या गैरहजेरींत, फ्रान्सचा तत्कालीन लोकपक्षाचा पुढारी लाफेते व त्याचे इतर अनुयायी हे पेनलाच अमेरिकेचा प्रतिनिधि मानूं लागले व लाफेते यानें बॅसिलीच्या तुरुंगाची किल्ली वॉशिंगटनला नजर करण्याकरितां (लोकपक्षाच्या विजयाची खूण म्हणून) पेनच्या हवालीं केली. याच सुमारास पॅरिस येथें पेनला एक गुप्तशत्रु उत्पन्न झाला व त्याच्या दुष्ट भावनेमुळें पेनला पुढें भयंकर आपत्ति भोगावी लागली. तो हृदयद्रावक कथाभाग पुढें येईलच. तूर्त त्याच्या ह्या गुप्तशत्रूची व वाचकांची साधारणपणें ओळख मात्र करून देतों. गव्हर्नर मॉरिस (रॉबर्ट मॉरीसचा मदतनीस व ज्यानें आठ वर्षांपूर्वीं पेनला जमाबंदी व युद्ध यासंबंधानें इष्ट लोकमत बनविणारे लेख लिहिण्याचा आग्रह केला होता तो) हाच तो शत्रु होय. हा पैशासंबंधीं कांहीं कामगिरी घेऊन इ० स० १७८९ च्या प्रारंभीं फ्रान्समध्यें आला होता. हा मोठा गोडबोल्या, लाघवी, कारस्थानपटु, कार्यसाधु व हेवेखोर असा माणूस होता. त्यानें वॉशिंगटनची मर्जी संपादन केली होती व तिच्या आधारावर तो फ्रान्सांतील मोठमोठ्या कर्त्या पुरुषांशीं विशेष दळणवळण ठेवूं लागला. जेफर्सन, पेन यांच्या बरोबरही तो बाहेरून मोठ्या प्रेमानें वागे. डीन प्रकरणांत गैरसमजानें पेनच्या विरुद्ध

वर्तन केल्याबद्दल त्यानें पेनजवळ आपला पश्चात्ताप व्यक्त केला होता. व पेनचा मान किंबहुना त्याची लहर संभाळण्यासही तो नेहमीं आपली तयारी दाखवीत असे; परंतु मनांतून मात्र तो पेनचा हेवा करीत होता. तथापि दुर्दैवानें ही गोष्ट पुष्कळ वेळपर्यंत (पेनवर संकट येऊन जाई-पर्यंत) पेनच्या लक्षांत आली नाहीं. पेन हा सरळ मनाचा माणूस असल्या-मुळें तो मॉरिसला आपला व अमेरिकेचा खरा मित्र मानीत असे व त्याला राजकारणासंबंधीं माहीत असलेल्या सर्व गुप्त गोष्टी सांगत असे. जेफर्सन गेल्यानंतर त्याच्या जागीं याची नेमणूक झाली व त्यामुळें पुढें पेनला संकटांत लोटून देण्याचें काम 'आयागो'ची भूमिका घेऊन त्यास करतां आलें. त्यानें आपल्या कारस्थानास सुरवात सन १७९०च्या जानेवारी महिन्यापासून केली असें त्याच्या डायरीवरून दिसतें. त्याच्या डायरींत तारीख २९ जानेवारी रोजीं पुढील आशयाची नोंद केलेली आढळते.

"आज ३॥ वाजतां मी लाफेते याच्याकडे गेलों. त्यानें मी, मि० शॉर्ट, मि० पेन यांच्याशीं आपल्या न्यायखात्यासंबंधानें खलबत करण्याचा विचार प्रदर्शित केला. मी त्यास पेनचा ह्या कामीं कांहीं उपयोग होणार नाहीं, कारण जरी तो उत्तम लेखक असला तरी असल्या गोष्टींवर विचार करतां येण्यासारखें त्याचें डोकें नाहीं—असें सांगितलें."

आठ वर्षांपूर्वीं राजकारणांतील मोठमोठ्या महत्त्वाच्या बाबींची चर्चा करण्याइतकें सामर्थ्य पेनच्या डोक्यांत असल्याबद्दल ज्याची खात्री होती, तो आतां पेनला न्यायखात्याच्या रचनेसंबंधीं अभिप्राय अगर सल्ला देण्याचें सामर्थ्य नाहीं असें गुप्तपणें हळूच—फ्रेंच पुढाऱ्याच्या कानांत सांगतो, याला काय म्हणावें ! असो; इ० स० १७९०च्या मार्च महिन्याच्या १७व्या तारखेस यॉर्कशायरमधील आपल्या पुलाचें काम पुरें झालेलें पहाण्याकरितां पेननें पॅरिस शहर सोडलें. तेथून निघण्याच्या आदले दिवशींच त्यानें फिलाडेल्फिया येथील आपल्या एका मित्रास फ्रान्सांतील राज्यक्रांती-बद्दल आशाजनक पत्र लिहिलें. याच पत्रांत अमेरिकेची थोरवी वर्णन करून 'अद्याप तेथें गुलामांची मुक्तता करण्याची व्यवस्था होत नाहीं' याबद्दल खेद प्रदर्शित करून त्यासंबंधीं जोराची चळवळ करण्याची व कांहीं चांगले

लोक गुलामांच्या मनामध्यें आत्मोद्धाराविषयीं जागृति उत्पन्न करण्यास पाठविण्याच्या सूचना त्यानें केल्या आहेत.

लंडन येथें आल्यावर त्याच्या एका जुन्या मित्राची व त्याची गांठ पडली. त्याच ठिकाणीं मॉरिस आपल्या भावास भेटण्याकरितां त्यावेळीं गेला होता. तेथें पेनची मनधरणी करून त्याचा पूर्ण विश्वास त्यानें संपादन केला. त्याच्या लाघवी वर्तनास—विशेषतः एकेवेळीं तो त्याचा (राजकीय) प्रतिपक्षी असूनही इतकी नम्रता (पेनच्या मतें उदार मनानें) दाखवीत असल्यामुळें—पेन तेव्हांच भाळला व त्याच्याशीं खऱ्या स्नेहभावानें मोकळेपणानें वागूं लागला.

बॅसिलीच्या तुरुंगाची किल्ली वॉशिंगटनला नजर करण्यांतील रहस्य चाणाक्ष वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल. पेननें रूटलेज नांवाच्या गृहस्थाबरोबर ती किल्ली वॉशिंगटन यास पाठविली. ती पोंचल्याचें उत्तर तारीख १० ऑगस्ट १७९० रोजीं वॉशिंगटननें पेन यास लिहिलें. यानंतर पुढील दोन चार महिन्यांत तो इंग्लंडहून पॅरिसला व पॅरिसहून लंडनला खेपा घालीत व आपल्या पुलांच्या रचनेची खटपट करीत असल्याचें दिसून येतें. या कामांत या वर्षाअखेर त्याला बूड येऊन पैशाची बरीच ठोकर लागली. परंतु पैशाची अडचण सहन करण्याची त्याला संवय असल्यामुळें त्याचें त्याला विशेष कांहीं वाटलें नाहीं. ह्या वर्षाच्या मे महिन्यांत त्याची आई वारली असल्यामुळें तिच्याकरितां म्हणून राखून ठेवलेल्या रकमेंतून त्यानें आपणांस आलेली बूड—कर्ज भागवून—भरून काढली व तो पुन्हा निष्कांचन बनला. दारिद्रय हें त्याच्या पाठीशीं नेहमींचें लागलें असल्यामुळें त्याचा त्याला फारसा विधिनिषेध वाटत नव्हता.

प्रकरण आठवें.

एक महत्त्वाचा ग्रंथ

मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें पुलाच्या एका व्यवहारांत जरी त्याला बूड आली तरी त्याचें 'पुलाचें प्रदर्शन' बऱ्या स्थितींत चाललें होतें. आसपासचे बरेच लोक तें पहाण्यास येत असत. व नदीकांठीं असलेल्या कित्येक शहरांतील लोक त्याच्या ह्या शोधाचा आपणांस कितपत उपयोग करून घेतां येईल याबद्दल विचार करण्याकरितां त्याजकडे आपले प्रतिनिधि पाठवीत होते. यामुळें फिरून द्रव्यार्जन करण्यास त्यास फारशी पंचाईत पडली नाहीं. याप्रमाणें शांततेच्या उद्योगांत त्याचें कालक्रमण सुरू असतां त्याचा स्नेही एडमंड बर्क यानें त्यास लोकस्वातंत्र्याचे रक्षणार्थ फिरून राजकारणाचे आखाड्यांत खेंचलें. ह्या वेळीं पेनला खुद्द बर्कशींच सामना करावयाचा होता; परंतु पेनला व्यक्तीपेक्षां तत्त्वाची व वैयक्तिक स्नेहसंबंधापेक्षां सार्वजनिक हिताची विशेष चाड असल्यामुळें त्यानें बर्कचा मोठेपणा व स्नेह क्षणभर बाजूस ठेवून त्याच्याशीं कसून (वाक्) युद्ध केलें. ह्या युद्धांत पेनचा विजय व बर्कचा पाडाव झालेला आहे. बर्कच्या इभ्रतीस व लौकिकास या पराजयामुळें इतका जबर धक्का बसला कीं, मरेपर्यंत बर्कला फिरून वर तोंड काढतां आलें नाहीं. उभयतांचें हें युद्ध फ्रान्सच्या राज्यक्रांतीसंबंधानें झालें. त्यांत Reflections on the French revolution' या नांवाचा आश्रय करून बर्कनें पूर्वपक्ष केला आहे व 'The Rights of man' ह्या नांवानें पेननें उत्तरपक्ष केला आहे. बर्कचा सदर ग्रंथ, येथील शाळाखात्याचे माजी डायरेक्टर मि० सेल्बी यांच्या टिपणांसह (Notes) इकडील कॉलेजांत नेहमीं पढला जातो. तेव्हां त्यासंबंधानें येथें विशेष माहिती देण्याचें कारण नाहीं. इतकें सांगितलें म्हणजे पुरे कीं, त्या ग्रंथांत फ्रेंच राज्यक्रांतीच्या पद्धतीचें (methods) व तिच्या मूलभूत तत्त्वांचें (principles) बर्कनें आपल्या जोरदार वाणीनें व खुबी-

दार कोटिक्रमानें खंडण केलें आहे. पेननें आपल्या 'the Rights of man' ह्या ग्रंथांत, बर्कचे बहुतेक मुद्दे सप्रमाण खोडून काढून बर्कनें पूर्वीं जीं मतें प्रतिपादिलीं होतीं त्या मतांचेंच फ्रेंच राज्यक्रांतींत अनुकरण होत असल्याचें दाखवून* बर्कवर, अभिलाषबुद्धीनें मतांतर केल्याचा साधार आरोप केलेला आहे. या दोघांही बुद्धिमान्, राजकारण-पटु व कुशल लेखकांचें प्रतिपादन वाचून कोणत्याही कालांतील विद्वान् व राजकीय तत्त्वज्ञानाचा अभ्यास करूं इच्छिणाऱ्या मनुष्यास पुष्कळ बोध व ज्ञान प्राप्त होण्याजोगें आहे. सामान्य वाचकांसही तें वाचून एकप्रकारची मौज वाटल्यावांचून राहणार नाहीं.

परंतु 'The Rights of man' हें पुस्तक लिहिण्यांत बर्कचा पराभव करणें एवढाच पेनचा हेतु नव्हता. बर्कचा पराभव करणें हें या पुस्तकाचें अगदीं कनिष्ठ प्रतीचें ध्येय होतें. त्याचा प्रधान हेतु, इंग्लिश राष्ट्राकरितां 'सनदशीर राज्यपद्धती'चा 'constitution' मसुदा लिहून काढण्याचा होता. आणि इंग्लंडची सध्यांची 'कॉन्स्टिटयूशन' ह्या मसुद्याशीं किती मिळती आहे हें पाहिलें असतां त्याचा हा हेतु किती उचित होता व तो कसा यशस्वी झाला आहे हें वाचकांच्या चांगलें लक्षांत येईल. पेनच्या ह्या पुस्तकाचा त्यावेळीं त्याच्या 'Commonsense' इतकाच लोकमता-वर विलक्षण परिणाम झाला. 'नियोजित हेतु पूर्णपणें सिद्धीस नेणारीं' ह्या दोन पुस्तकांसारखीं पुस्तकें जगाच्या इतिहासांत क्वचितच आढळून येतील! 'Commonsense' हें निरुत्तर करून टाकणारें पत्रक आहे

---

* बर्कचें पुस्तक इ० स० १७९०च्या पहिल्या नोव्हेंबरास प्रसिद्ध झालें. फ्रान्सच्या राज्यक्रांतींत पुढें जीं अघोर व अक्षम्य अशीं कृत्यें घडलीं त्यांचा ह्या वेळीं गंधही नव्हता. क्रांतीस सुरवात फार व्यवस्थितपणानें व धिमेपणानें झाली होती. कायदा, न्याय व नीति यांच्या अनुरोधानेंच सर्व कांहीं चाललें होतें. पुढें हें धोरण जेव्हां सुटूं लागलें तेव्हां पेननें सुद्धां त्याचा जोरानें निषेध करून स्वैराचारास आळा घालण्याचा यत्न केला. बर्कचें पुस्तकच (खंडण) फ्रान्सांतील प्रागतिकांस चीड आणण्यास व स्वैराचार उद्भवण्यास कारण झालें असें कित्येक तज्ज्ञांचें मत आहे.

असा त्याबद्दल वॉशिंगटनचा अभिप्राय पडला होता व 'the Rights of man'बद्दल बर्कनेंही निराळ्या शब्दांनीं हाच अभिप्राय व्यक्त केला होता. ह्या पुस्तकांत प्रथमतः पेननें मानवी प्राण्याचे नैसर्गिक हक्क, व त्यांतून निष्पन्न होणारे सामाजिक हक्क, निरनिराळ्या प्रकारच्या राज्यसंस्था व तत्संबंधीं लोकांचे व राजांचे अधिकार इत्यादि विषयांचें प्रतिपादन केलेलें आहे. त्यानंतर त्यानें फ्रेंच राज्यक्रांतींतील महत्त्वाच्या गोष्टींची खरी व साधार हकीकत देऊन तत्संबंधीं योग्य असें लोकमत बनविण्याचा प्रयत्न केलेला आहे. आणि त्यांतच अमेरिका व फ्रान्स येथील क्रांतीमध्यें भेद दाखविण्याचा बर्कचा प्रयत्न खोडून काढला आहे. हें पुस्तक छापणें हें इंग्लंडच्या तत्कालीन स्थितींत मोठें धाडसाचें काम होतें. एका प्रकाशकानें त्याचा पूर्वार्ध छापला व पुढें छापण्याचें बंद केलें; तेव्हां पेनला दुसरा प्रकाशक शोधावा लागला. पुस्तक छापण्यास ज्या अडचणी आल्या व त्यामुळें जो दुबार खर्च पडला त्याची, तें प्रसिद्ध झाल्यावर, चांगली भरपाई झाली. इंग्लंडांतील 'कॉन्स्टिटयूशनल सोसायटी'नें तें पुस्तक जणूं काय आपला मॅग्नाचार्टाच आहे असें समजून त्याचा मोठ्या उत्साहानें प्रसार केला. त्या संस्थेच्या सेक्रेटरीनें त्याच्या प्रती, इंग्लंड, स्कॉटलंड, फ्रान्स व आयर्लंड येथील सदर संस्थेच्या शाखांकडे पाठविल्या. आयर्लंडमध्यें हें पुस्तक विशेष लोकप्रिय झालें. व डब्लीनच्या प्रमुख प्रागतिकांनीं त्याचा आपल्या देशाच्या सर्व भागांत प्रसार करण्याची योजना मुक्रर करण्याकरितां एक मोठी सभाही भरविली. ह्या पुस्तकांच्या विक्रीचें उत्पन्न पेननें ह्या संस्थेसच दिलें. व त्याच्या प्रतीही लाखोंनीं खपल्या; परंतु त्यांतील बहुतेक सर्व फायदा त्यानें प्रकाशक व सदर संस्था यांसच घेऊं दिल्यामुळें तो आपल्या नेहमींच्या कंगाल स्थितींतच होता.* पेनचा

---

* यावेळीं त्याची राहणी इतकी गरिबीची होती कीं, गव्हर्नर मॉरिसनें या वेळच्या त्याच्या बसण्याच्या खोलीस 'Wretched apartment' (भिकार जागा) असें नांव दिलें आहे. त्याच्या ग्रंथाच्या लक्षावधी प्रति खपत असून त्याची राहणी पहावी तों अशी, ही त्याच्या स्वार्थत्यागाच्या वागणुकीची तऱ्हा पाहून त्यास त्यानें एका गुप्तपत्रांत 'वेडा' हें विशेषण दिलें.

हा ग्रंथ प्रसिद्ध होतांच लोकपक्षाचा वाली व पुढारी या नात्यानें बर्कचें असलेलें वजन नष्ट झालें. त्याचा मित्र फॉक्स व पिट या दोघांनींही त्यास सोडलें, बर्कनें आपलें पुस्तक राजाची मेहेरबानी संपादन करण्याकरितां त्याच्या प्रेरणेवरून लिहिलें असावें असा त्याच्या कित्येक स्नेह्यांस व अनुयायांस संशय आला व राजाकडून त्यानें गुप्त पेन्शन घेतलें असल्याची जी बातमी पेननें प्रसिद्ध केली होती त्याबद्दल उत्तर न देतां तो मूग गिळून बसल्यामुळें त्यासंबंधींचा वरील संशय जास्तच बळावला. सदर बातमी पेनचा ग्रंथ प्रसिद्ध होण्यापूर्वीं दोन महिने अगोदर पसरली होती व खोटी असल्यास तसें प्रसिद्ध करण्याची बर्कला संधि मिळावी म्हणूनच ती पेननें प्रसिद्ध केली होती. तशा प्रकारचा उल्लेख त्यानें आपल्या ग्रंथाच्या प्रस्तावनेंत केलेला आहे.‡ बर्कनें ह्या बाबतींत जे मूग गिळले ते उगीच नव्हेत असें पुढें लवकरच कळून आलें. तसेंच राजाला खुष करण्याकरितां त्याच्या प्रेरणेवरून बर्कनें आपलें पुस्तक लिहिलें असावें असा जो त्याच्या अनुयायांस संशय आला होता तोही कालांतरानें खरा ठरला.* एडमंड बर्कसारख्या थोर मनाच्या, उदात्त विचाराच्या व लोकस्वातंत्र्याकरितां कांहीं काल अविश्रांत श्रम करणाऱ्या

---

‡ 'I have mentioned it, that Mr. Burke may have an oppurtunity of Contradicting the rumor, if he thinks proper.'
—'*R. of man*' *London Edition*.

* ह्यासंबंधीं एका इतिहासकारानें फ्रान्स व इंग्लंड येथील या विषयासंबंधींचे कागदपत्र पाहून पुढील मजकूर लिहिला आहे:—

"Thirty thousond Copies of Burk's book were circulated in all the Courts and among the Europeon aristocracy as so many lighted brands to set Europe in flames. During this time the author by his secret correspondence, excited queen marie-Antoinette, the Court, the foreigners, to Conspire against the revolution 'No Compromises with rebels!' he wrote; 'appeal to soverign neighbors; above all trust to the support of foreign armies."
—*Histoire Le France*
Par Henri Martin I Page 137

माणसाची याप्रमाणें 'नैतिक च्युति' झालेली पाहून कोणास उद्विग्नता उत्पन्न होणार नाहीं? बर्कसारख्याचें हें उदाहरण पाहून लोकस्वातंत्र्याचें कंकण बांधून उदात्त राजनीतीचा योग–तिचें अंतिमसाध्य–साधूं जाणाऱ्याच्या मार्गांत केवढे बिकट मोहपाश व कांटे असतात, याची वाचकांस यथार्थ कल्पना करतां येईल. अध्यात्मज्ञान संपादन करणारा योगी जसा अनेक प्रकारच्या सिद्धींना वश होऊन मोह पावण्याचा व मायेच्या भोंवऱ्यांत सांपडून योगभ्रष्ट होण्याचा संभव असतो; तसेंच पुष्कळशा राजकीय योग्यांचीही स्थिति बर्कप्रमाणें होण्याचा संभव असतो. किंबहुना बहुतेकांची हीच दशा होते असें म्हणण्यास हरकत नाहीं. ह्या दशेंतून जे निभावतात त्यांच्याच हातून सत्यप्रणित राजनीतीचा वा राजधर्माचा खरा उत्कर्ष होतो आणि त्यामुळें व्यावहारिक जगांत ते अत्यंत वंदनीय पुरुष होऊन त्यांची कीर्ति अजरामर होते. अशा प्रकारचें भाग्य (थॉमस पेनसारख्या) फारच थोड्या लोकांच्या वांट्यास येतें. आणि म्हणून तें ज्यांच्या वांट्यास येतें, त्यांस लोक 'विभूति,' 'ईश्वरी अंश' 'अवतार' इत्यादि नांवांनीं संबोधितात! असो. पेननें बर्कला उत्तर देण्याचें जें काम पत्करलें तें केवळ कर्तव्य म्हणून व दुसरा कोणी तसें करण्यास तयार नव्हता म्हणून पत्करिलें. आणि तें काम करीत असतां बर्कच्या शोचनीय मनःस्थितीबद्दल त्यास फार वाईट वाटलें. कारण कांहीं कालापूर्वीं पेननें बर्कचा अतिशय गौरव केलेला होता. त्यास तो इंग्लंडांतील लोकस्वातंत्र्याचा मुख्य आधार समजत होता. तीन वर्षांपूर्वीं फ्रान्स व इंग्लंड यांच्यामध्यें सख्य करण्याची योजना त्यानें (पेननें) स्वतः त्यास सादर केली होती व त्याचा पाहुणचार घेण्यास व त्याच्याशीं मोकळेपणानें बोलण्यास पेनला यत्किंचितही शंका वाटत नसे. फ्रान्सांतील राज्यकारभारासंबंधीं अनेक गुप्त गोष्टी त्यानें त्यास सांगितल्या होत्या आणि त्यामुळेंच बर्कला तेथील राज्यक्रांतीच्या पद्धतीवर जोराचा हल्ला करितां आला. परंतु पेनच्या लेखणीचें सामर्थ्य बर्कनें अद्याप चांगलेंसें अजमावलें नव्हतें. अमेरिकन क्रांतीसारख्या बिकट प्रसंगांतून तो तावून सुलाखून निघाल्यामुळें अशा प्रसंगीं घडून येणाऱ्या प्रत्येक गोष्टीची खांचखोंच त्यास पूर्णपणें माहीत झालेली होती आणि राजकीय वादविवादाचे प्रसंगही

यापूर्वी त्यास पुष्कळ आल्यामुळें त्यांतील मर्मही तो उत्कृष्ट प्रकारें जाणत होता. यामुळें बर्कच्या प्रतिपादनाच्या चिंधड्या उडवून देण्यास त्याला फारसे सायास करावे लागले नाहींत. 'The Rights of man' इंग्लंड-मध्यें प्रसिद्ध होतांच त्याची एक प्रत अमेरिकेंत मि० बेकले याजकडे आली व त्यानें ती मि० जेफर्सन-हा त्यावेळीं 'सेक्रेटरी ऑफ स्टेट'च्या हुद्द्यावर होता-यास देऊन ती जे. बी. स्मिथ याजकडे पाठविण्यास सांगितलें. ह्याचा भाऊ एस्. एच्. स्मिथ ह्यानें अमेरिकेंत त्याची पुनरावृत्ति प्रसिद्ध केली. व त्याच्या प्रस्तावनेंत, त्यानें जेफर्सनचें सदर पुस्तकाची लोकांस शिफारस करणारें एक शिफारसपत्र छापलें.* तसेंच पेननें हें पुस्तक वॉशिंगटनला अर्पण केलें असल्यामुळें मूळ प्रतींत असलेलें अर्पण-पत्रही ह्या आवृत्तीस जोडण्यांत आलें होतें. अमेरिकन क्रांतीचें कार्य पूर्ण होऊन तेथील राज्यकारभारास सुस्थिरपणा प्राप्त होतांच तेथील लोकमतांत पालट होत गेल्याचा उल्लेख मागील एका प्रकरणांत आला आहेच. ह्या मतांतर केलेल्या लोकांनीं 'Anti republican party' या नांवाचा एक स्वतंत्र पक्ष निर्माण केला होता. ह्या पक्षाला, पेनच्या पुस्तकांतील उपरोक्त शिफारसपत्र व अर्पणपत्रिका पाहून फार राग आला व त्यांनीं त्याबद्दल मोठें काहूर माजविलें. तें पुस्तक हा जणुंकाय अध्यक्षाचा (अर्थात् सरकारचा) जाहिरनामाच आहे असें लोकांस भासवून वॉशिंगटन व जेफर्सन यांच्या विरुद्ध गिल्ला करून त्यांच्याविषयीं लोकमत कलुषित करण्याचा त्यांनीं प्रयत्न चालविला. पेननें प्रतिपादिलेलीं मतें जेफर्सन, मॅडिसन, रँडाल्फ इत्यादि अमेरिकन पुढाऱ्यांस मान्य असणारीं व अमेरिकन क्रांतीच्या वेळीं सर्व अमेरिकन पुढाऱ्यांस संमत असलेलीं अशींच होतीं. परंतु तीं इंग्लंडांतील तत्कालीन राजसत्तावादी व बडे लोक यांस रुचण्यासारखीं नव्हतीं. अमेरिकेंतही (Anti-republican) पक्ष हा बड्या लोकांच्या सत्तेचा अभिमानी बनला होता व वॉशिंगटनला

---

* "I am extremely pleased to find it will be reprinted and that something is atlength to be publikly said against the political heresies which have sprung up among us.

I have no doubt our citizens will rally a second time round the standard of commonsense."

आपल्या बाजूस ओढण्याचे त्यांचे प्रयत्न चालले होते. (त्यांचे हे प्रयत्न पुढें तीनचार वर्षांनीं सफल झाले.) पेनचें पुस्तक अमेरिकेंत प्रसिद्ध झालें त्यावेळीं ह्या पक्षाचें सरकारी राज्यकारभारांत बरेंच वजन वाढलें होतें. राष्ट्रीय सभेचा उपाध्यक्ष ह्याच पक्षाचा पुरस्कर्ता होता. यामुळें सामान्य जनतेस जरी तें पुस्तक फार आवडलें तरी सरकारी रीतीनें (officially) त्यास पाठिंबा देणें प्रशस्त नव्हतें. तसें केल्यास सरकारनें एका विवक्षित पक्षास आपणांस विकून घेतलें आहे असा त्याजवर आरोप करून त्यासंबंधानें मतदारांचीं मनें कलुषित करून देण्यास तें एक खासें साधन होण्याजोगें होतें. आणि तसा कांहींसा प्रकार झालाही. सदर पुस्तकासंबंधानें 'Publicola' ह्या टोपण नांवानें राष्ट्रीयसभेच्या उपाध्यक्षानें वर्तमानपत्रांत कडक टीका करून वादविवाद सुरू केला. व त्याचा फायदा घेऊन 'Anti-republican' पक्षाच्या राष्ट्रीय सभेंतील प्रतिनिधींनीं जेफर्सनच्या शिफारसपत्राबद्दल तक्रार केली. तेव्हां 'ती शिफारस आपण आपल्या हुद्याच्या नात्यानें केली नसून आपल्या खासगी मताचें तें प्रदर्शन आहे व सदर पुस्तकाच्या प्रकाशकानें तें चुकीनें छापलें' अशा अर्थाचा खुलासा जाहीर करणें जेफर्सनला भाग पडलें. वॉशिंगटनवरही (अर्पणपत्राबद्दल) टीका करण्यांत आली; परंतु त्यानें त्याबद्दल फक्त मौन धारण केलें व खासगी रीतीनें आपल्या प्रतिपक्षीयांचा रोष शमविण्याचा प्रयत्न केला. इंग्रज राष्ट्राचे जे प्रतिनिधि यावेळीं अमेरिकेंत होते त्यांनीं अमेरिकन 'Antirepublican' पक्षास पेनच्या पुस्तकाविरुद्ध गिल्ला करण्याचे कामीं अतिशय प्रोत्साहन दिलें व स्वतःही त्याबद्दल अकांड-तांडव माजविलें. 'Publicola' याच्या टीकेस पेनच्या वतीनें उत्तर देणारे अनेक वीर अमेरिकेंत यावेळीं पुढें आले व त्यांनीं मोठ्या कुशलतेनें पेनच्या मतांचें मंडन करून त्याविषयींची लोकप्रियता प्रगट केली. वॉशिंगटन यासही पेनचें पुस्तक मनापासून आवडलें; परंतु इंग्लंडशीं एखादा व्यापारसंबंधीं तह घडवून आणून अमेरिकेंत त्यांचें असलेलें सैन्य त्यांस परत नेण्यास लावण्याचें कारस्थान त्यानें सुरू केलें असल्यामुळें इंग्रज अधिकाऱ्यांच्या मनोवृत्ति दुखविण्यास तो तयार नव्हता; अर्थात् सदर पुस्तकासंबंधानें बरें वाईट मत प्रदर्शित करून आपली स्थिति विशेष नाजूक करून घेण्यास तो धजला नाहीं. 'विशेष नाजूक' म्हणण्याचें

कारण असें कीं 'अर्पणपत्रिका' व 'जेफर्सनचें शिफारसपत्र' यांच्या प्रकाशना-मुळें त्याची स्थिति अगोदरच नाजुक झाली होती. वॉशिंगटन यानें जरी या-संबंधीं मौन धारण केलें होतें तरी जेफर्सन, रँडॉल्फ यांनीं खासगी रीतीनें त्याबद्दल पूर्ण सहानुभूति प्रकट केली. सामान्य जनतेचे मनांत पेनबद्दल अगोदरच पूज्यभाव होता. आणि त्याच्या या पुस्तकासंबंधानें झालेला वाद-विवाद पूर्ण लोकसत्तावादी (Republican) पक्षास इतका फायदेशीर झाला कीं, त्यांच्या प्रतिपक्षाचें लोकांवर वाढत चाललेलें वजन खाड्कन् कमी होऊन त्यांच्या अनुयायांची संख्या भराभर फुगत चालली. ह्या संधीचा फायदा घेऊन जेफर्सन, रँडॉल्फ व मॅडिसन वगैरे वजनदार अमेरिकन पुढाऱ्यांनीं पेनला वॉशिंगटनच्या प्रधानमंडळांतील (Cabinet) एक जागा मिळवून देण्याचा प्रयत्न केला. परंतु अंशतः वॉशिंगटनच्या उपरोक्त उदासीन वृत्तीमुळें व अंशतः पेन परदेशांत असल्यामुळें त्या प्रयत्नास यश आलें नाहीं. *वॉशिंगटनचें इंग्लंडशीं सुरू असलेलें तहाचें कारस्थान पेनच्या वरील स्नेही मंडळीस माहीत नव्हतें. वॉशिंगटन, मॉरिस व ब्रिटिश प्रधान मंडळ यांच्या मध्येंच त्याची गुप्तचर्चा चालू होती. यामुळें वॉशिंगटनच्या मनोवृत्तीचा पेनच्या स्नेह्यांस बरोबर अंदाज करतां आला नाहीं. अमेरिकेंतील ब्रिटिश प्रतिनिधींनीं पेनच्या पुस्तकासंबंधानें जोराचा विरोध प्रगट केलेला पाहून इंग्लंडांतील अधिकारीवर्गही त्याविरुद्ध असावा अशी वॉशिंगटनची कल्पना झाली. पण ह्यावेळीं तशी कल्पना करण्याचें त्यास कांहीं साधार कारण नव्हतें. इंग्लंडमध्यें पेनचें पुस्तक प्रसिद्ध होऊन बरेच महिने लोटले होते व त्याच्या लाखो प्रती खपल्या तरी तेथील अधिकारीवर्गानें अद्याप त्याच्याविरुद्ध एक अवाक्षरही काढलें नव्हतें. उलट त्या पुस्तकामुळें पेनची लोकप्रियता वाढून सर्वत्र त्याचा सन्मान मात्र होत होता. पेनच्या ह्या आनंदी स्थितीचें द्योतक असें एक पत्र लंडनहून तारीख २१ जुलई सन १७९१ रोजीं त्यानेंच वॉशिंगटन यास लिहिलें आहे. त्यांतील कांहीं भाग वरील विधानाच्या पुष्ट्यर्थ येथें देतों:—

" गेल्या ऑगस्टापासून तुमचें मला पत्र नाहीं. व मींही यावेळपर्यंत तुम्हास कांहीं लिहिलें नाहीं × माझें 'Right of man' हें पुस्तक

---

* ह्या प्रयत्नाची बातमी पेनला पुढें पुष्कळ दिवसांनीं समजली.

मीं तुम्हास अर्पण केलें आहे ××× त्याच्या ५० प्रती तुमच्या व माझ्या इतर स्नेह्यांच्या उपयोगाकरितां म्हणून पाठवीत आहें त्यांचा स्वीकार करावा. 'शासनपद्धति' या विषयावर ह्या देशांत छापलेल्या पुस्तकांत, ह्याच्याइतका खप कोणत्याच पुस्तकाचा झाला नसेल; अद्याप त्याला मागणी आहेच. आयर्लंडमध्यें त्याची विक्री फार झाली. डब्लीन-हून गेल्या मेंत आलेल्या पत्रावरून समजतें कीं, त्यावेळीं चवथी आवृत्ति खपत होती. प्रत्येक आवृत्तीच्या किती प्रती काढल्या होत्या हें मला ठाऊक नाहीं. दुसरी आवृत्ति दहा हजारांची होती हें मात्र मला ठाऊक आहे. अमेरिकेंत मी प्रथम आलों तेव्हां मला जी स्थिति अनुभवावी लागली—उत्तम मित्र व भयंकर शत्रु—(असणें) तीचाच येथेंही अनुभव येत आहे. परंतु सामान्यतः एकंदर देशाचें लक्ष मजकडे असून त्यांची कर्णेंद्रियें माझे स्वाधीन असल्यामुळें मी आपला क्रम चालू ठेवून भ्रष्ट-तेच्या [लाचलुचपतीच्या] कक्षेपासून मनुष्यप्राणी दूर राहूं शकतो ही—ह्या देशांत नवीन असलेली गोष्ट मी त्यांच्या नजरेस आणून देणार आहें."

"मी सुमारें दहा दिवसांपूर्वी फ्रान्सांतून येथें आलों. मि० लाफेते खुशाल आहेत. त्या देशांतील क्रांतीचे प्रकारांत आता नवीन प्रकारची घडामोड सुरू आहे. 'शासनपद्धति' सर्वस्वी 'लोकसत्ताक' असावी कीं, राजसत्तेचें प्राधान्य त्यांत असावें याबद्दल तेथें चर्चा चालू आहे. मला वाटतें, पहिल्या मताचाच अखेर विजय होईल. ह्या प्रश्नासंबंधानें लोकांचे विचार राष्ट्रीयसभेच्या [विचारापेक्षां] फार पुढें गेले आहेत."

"अमेरिकन क्रांतीचें कार्य पूर्ण झाल्यानंतर पुन्हां माझें मन व्यावृत्त करणारा एखादा विशेष महत्त्वाचा प्रसंग उत्पन्न होईल असें मला वाटलें नव्हतें. ×× परंतु पुन्हां मला पूर्वीप्रमाणेंच काम करावें लागणार असें दिसतें. ×××× आपल्याला प्रतिस्पर्धि उत्पन्न होऊं नये अशी कीर्ति-मान् मनुष्यास इच्छा असणें साहजिक आहे; परंतु माझ्या मनाची समजूत याहून निराळी आहे. माझी जागा घेणारा दुसरा कोणी ह्या देशांत असता तर मला फार समाधान वाटलें असतें व मग मीं शांततेचा सुखानें उपभोग घेतला असता परंतु चुक्या व अनर्थ आपल्या डोळयासमोर

घडत असतां स्वस्थ बसणें खेदजनक आहे. याबद्दल माझ्या मनांतील तळमळ तुमचें मन तेव्हांच जाणील.

"मीं सोळा हजार प्रती ('Rights of man' च्या) छापविल्या आहेत; त्यांपैकीं ३–४ हजार अद्याप शिल्लक आहेत; त्या सर्व खपल्या म्हणजे मी एक अतिस्वस्त–'कामनसेन्स'प्रमाणें छपाई व कागद यांचा खर्च भागण्यापुरती किंमत ठेवून–आवृत्ति काढणार आहें." वगैरे.

ह्या पत्राचें उत्तर वाशिंगटननें नऊ महिन्यांनीं पाठविलें. आणि जरी त्या नऊ महिन्यांतील हकीगत अद्याप सांगावयाची राहिली आहे तरी हें उत्तर येथेंच नमूद करणें उचित असल्यामुळें तसें करून हें प्रकरण संपवितों:—

"फिलाडेल्फिया, ५ मे १७९२

प्रिय महाराज, माझे स्नेही व ज्यांना माझा उद्योग माहीत आहे त्यांस, त्यांच्या पत्रांचीं उत्तरें माझ्या स्वाभाविक इच्छेपेक्षां अधिक उशिरानें गेल्यास त्याबद्दल क्षमा मागण्याचें कारण पडणार नाहीं, अशी मला खात्री आहे. म्हणून आपल्या पत्राचें उत्तर लवकर कां दिलें नाहीं याचीं कारणें मी लिहीत नाहीं. तथापि आपल्या आठवणीची खूण म्हणून आपल्या पुस्तकाच्या ज्या ५० प्रती तुम्हीं पाठविल्या त्याबद्दल –मीं तत्काल उत्तर दिलें असतांना जितके आदरपूर्वक आभार मानले असते तितकेच त्यांत थोडा देखील कमीपणा न करितां–मी आपले आभार मानितों."

यानंतर पुढें, सध्यां आपण विशेष कामांत असल्यामुळें सदर पत्रांतील मुद्द्यांचें खुलासेवार उत्तर दिलें नाहीं असें लिहून पेनच्या इंग्लंडांतील भरभराटीबद्दल त्याचें अभिनंदन केलें आहे. व त्याबद्दल स्वतःचें समाधान मोघम रीतीनें व्यक्त केलें आहे. ह्या पत्रांत पेनबद्दल वाशिंग्टननें आपला प्रेमभाव व आदर मोठ्या खुबीनें व्यक्त करून बाकीचा मजकूर अगदीं मोघम–सावधगिरीनें जपून लिहिल्यासारखा–लिहिला आहे. यापूर्वीं त्यानें पेनला लिहिलेल्या पत्रांत जो मनमोकळेपणा दिसतो तो या पत्रांत दिसून येत नाहीं. पेनला

दुखविण्याची त्याची इच्छा नाहीं; पण त्याच्याशीं खुल्या दिलानें बोलण्यासही कांहींतरी अडचण आहे असें या पत्रावरून सहज कळून येण्यासारखें आहे. वॉशिंगटगच्या मनाची इतकी नाजुक स्थिति कां झाली हें मागें सांगितलेल्या (इंग्लंडशीं तह करण्यासबंधीं) हकीकतीवरून वाचकांच्या लक्षांत येण्यासारखें आहे.

प्रकरण ९ वें

इंग्लंड व फ्रान्स येथील चळवळी

'THE RIGHTS OF MAN' इंग्लंडमध्यें प्रसिद्ध झाल्याबरोबर पेन पॅरिस शहरीं आला व त्याचें फ्रेंच भाषेंत भाषांतर करण्याचें काम त्यानें एम्. लँथेनास याजकडे सोपविलें. त्यावेळीं फ्रान्सच्या राज्यक्रांतीचें काम बरेंच बिकट होत चाललें होतें. लोकपक्षाशीं मिळून वागण्याचें जें धोरण ह्या क्रांतीच्या प्रारंभीं तेथील राजानें स्वीकारलें होतें तें सुटल्यामुळें लोकपक्षानें त्यास ह्यावेळीं नजरकैदेंत ठेविलें होतें. अमेरिकेचा मित्र असलेला फ्रेंच पुढारी लाफेते याच्या ताब्यांत लुइ व त्याचें कुटुंब असल्यामुळें ही क्रांति चांगल्या रीतीनें पार पडेल असा रंग दिसत होता. परंतु दुर्दैवानें इतक्यांत (ता. २० जून, १७९१ रोजीं रात्रीं) राजा व राणी हीं मुलांसह अटकेंतून निसटून पळालीं. आणि त्यामुळें पुढें ह्या क्रांतीस अनिष्ट स्वरूप येत गेलें.

राजा आपल्या कुटुंबासह निसटून गेल्याची खबर समजतांच (ता. २१ जूनच्या) भल्या पहांटेस लाफेते मोठ्या गडबडीनें पेनच्या निजावयाच्या खोलींत आला व त्यास जागें करून 'The birds are flown' (पक्षी उडून गेले) असें म्हणून त्यानें त्यास तें वृत्त कळविलें. तेव्हां पेननें 'फार चांगलें झालें; आतां त्यांस पुन्हा परत आणण्याचा प्रयत्न न होईल तर बरें ' असें उत्तर दिलें व तो गडबडीनें पोषाख करून बाहेर पडला. ते दोघे बाहेर येतात तों लोकांमध्यें मोठी गडबड चालू असल्याचें त्यांस दिसून आलें. 'होतेल द व्हिला' नामक राजवाड्याजवळ लोकांची मोठी थोरली गर्दी जमली असून ते, राजास पळून जाण्याचे कामीं मदत केल्याचा लाफेते याजवर आरोप करीत असल्याचें त्यास आढळून आलें.

लोकांच्या ह्या मनोवृत्तीचा फायदा घेऊन क्रांतिपक्षाचा ज्वलज्जहाल पुढारी मारात यानें आपल्या स्वतःच्या वर्तमानपत्रांतून नेमस्त पुढारी लाफेते याजवर जोराचे हल्ले सुरू केले. त्यास पेनचा तरुण मित्र बोनेव्हिले यानें दुसऱ्या एका वर्तमानपत्रांतून उत्तरें देण्याचा क्रम सुरू केला. त्याच्या

उत्तरांत पेनच्या विचारांचेंच प्रतिबिंब उमटलेलें आहे. "No dictator! Assemble the people in the face of the sun; proclaim that the law alone shall be soverign-the law, the law alone and made for all!"* हा त्याचा लोकांस मुख्यतः उपदेश होता.

ता. २५ जून रोजीं लोकपक्षानें राजास पुन्हा पकडून परत पॅरिस येथें आणलें. व त्या दिवशीं लोक राजाचे विरुद्ध इतके खवळले होते कीं, लोकपक्षाची निदर्शक खूण (Cokade) पेनच्या टोपींत नसल्यामुळें रस्त्यांतील जमावानें त्यास Aristocrat (बडा सरदार) समजून त्याजवर हल्ला केला. ह्या हल्ल्यांतून इंग्रजी जाणणाऱ्या एका फ्रेंच मनुष्यानें त्याची सुटका केली व हल्ल्याचें कारण त्यास समजावून सांगितलें. राजाच्या परत येण्यानें क्रांतीस विनाकारण घोर स्वरूप येणार असें पाहून पेनला फार वाईट वाटलें. राजाचें राजपण (राजत्व) नष्ट करण्यास पेन तयार होता परंतु मनुष्य ह्या नात्यानें त्याचें रक्षण व्हावें असें त्याचें मत होतें. पण क्रांतीच्या खवळलेल्या समुद्रांत तो पुन्हां येऊन पडल्यामुळें त्याच्या जीविताबद्दल--तत्संबंधीं होणाऱ्या भावी रणकंदनाची कल्पना येऊन त्यास मोठी चिंता उत्पन्न झाली. तसेंच त्याच्या अदूरदर्शीपणाचा फायदा घेऊन पूर्णलोकसत्ताक (Republic) राज्यपद्धतीच्या स्थापनेस अडथळा करणारा एक पक्ष प्रबल होण्याचा संभव असल्यामुळें क्रांतीचे हेतु योग्य रीतीनें कसे सिद्धीस जातील याबद्दलही त्यास मोठा विचार पडला. तथापि तो लोकस्वातंत्र्याचा कट्टा अभिमानी असल्यामुळें अशा प्रकारच्या विचारांनीं भांबावून जाणारा नव्हता. राजास परत आणलेलें पाहून त्यानें एक रिपाब्लिकन क्लब† स्थापन केला व त्याच्या मार्फत,

---

* अनियंत्रित सत्ता गाजविणारा नको ! उघड्या प्रकाशांत (सूर्याच्या) लोकांना एकत्र जमवा व कायदा—फक्त कायदा—सर्वत्रांकरितां केलेला कायदा हाच राजा आहे हें त्यांस जाहीर करा !

† ह्या क्लबांत फक्त ५ च लोक होते व त्यांचीं नांवें अखेरपर्यंत गुप्त ठेवण्यांत आलीं होतीं. ह्या संस्थेचें अस्तित्व पुष्कळ दिवसपर्यंत जाहिर केलें नव्हतें. त्यांत पेन, एचिले, दचतेत, कांदरसेत, ब्रिझो व निकोलस बोनेविले इतकी मंडळी असावीत असा तर्क आहे.

क्रांतीचें पुढील धोरण व्यक्त करणारा एक जाहिरनामा त्यानें प्रसिद्ध केला. ह्या जाहिरनाम्याच्या प्रती पॅरिस शहरांत जागजागीं भिंतींवर चिकटविल्या होत्या. खुद्द लोकसभेच्या (National Assembly) दरवाजावरही त्याची एक प्रत चिकटविली गेली. हा जाहिरनामा पेनच्या लेखणींतून उतरला असून त्यांत, 'लोकसत्ताक राज्यपद्धति' स्थापन करण्याची आवश्यकता व राजाच्या जीवितांचें संरक्षण ह्या दोन मुद्द्यांवर विशेष जोर दिलेला होता. ह्या क्लबातर्फें ' The Republican ' या नांवाचें एक वर्तमानपत्र काढण्यांत आलें होतें. पण लोकसत्ताक राज्यपद्धतीचीं तत्त्वें समजण्याची व मान्य करण्याची पात्रता अद्याप फ्रेंच जनसमूहांत उत्पन्न झाली नसल्यामुळें त्याचा एक अंक निघून तें बंद पडलें. राजसत्ता व लोकसत्ता यांचें संमिश्रण असणारी 'शासनपद्धति' स्थापन करण्याचे प्रयत्न सध्यां फ्रान्सांत चाललेले होते. ह्या मिश्रणांत कोणत्या सत्तेचें विशेष प्राधान्य असावें या मुद्द्यावरच काय तीं रणें माजून राहिलीं होतीं. लोकांच्या मनांत राजाची सत्ता कमी करून लोकपक्षाच्या सत्तेचें प्राबल्य वाढूं द्यावयाचें होतें व उलटपक्षीं राजाच्या मनांतून लोकसत्तेवर आपला दाब ठेवण्याची इच्छा होती. राजाची सत्ता अजिबात नाहींशी करून अमेरिकेप्रमाणें ' लोकसत्ताक ' (Republic) राज्यपद्धति स्थापन करण्याची अद्याप फ्रान्सची तयारी नव्हती. यामुळें ' रिपब्लिकन ' हें पत्र फार दिवस चालू शकलें नाहीं. राजानें दिलेलीं वचनें व मान्य केलेली कॉन्स्टिटयूशन यांचा त्यानें भंग केल्यामुळें लोक त्याजवर फार संतापले होते हें खरें; तथापि राजघराणें अथवा वैयक्तिक राजसत्ता नाहींशी करून तिच्या जागीं स्वतंत्रपणें सबंध राष्ट्राची राजसत्ता (Soverignity of Nation) स्थापन करण्याची कल्पना अद्याप तेथील लोकांच्या मनांत बाणली नव्हती. लोकांचा कटाक्ष राजाच्या सत्तेपेक्षां त्याच्या व्यक्तीवरच विशेष होता. पेनचें मत याच्याविरुद्ध होतें. त्याचा कटाक्ष व्यक्तीवर (लुइ १६ वा) मुळींच नव्हता. राजाची सत्ता नाहींशी करून व्यक्ति खुशाल कायम राहूं द्यावी असें त्याचें मत होतें. व हें मत त्यानें यावेळीं उघडपणें जाहीर करून

टाकलें होतें. ‡ असो; पेनचा उपरोक्त जाहिरनामा फ्रान्सांत प्रसिद्ध झाल्यानंतर लवकरच इंग्लंडमध्यें 'बॅसिलीच्या विजयाबद्दल द्वैवार्षिक उत्सव' व्हावयाचा होता; त्यास हजर राहण्याचें निमंत्रण आल्यावरून पेन लंडनला निघून गेला (१३ जुलई १७९१). लंडन येथें आल्यावर, आपल्या फ्रान्सांतील जाहिरनाम्यामुळें तेथील लोकांचीं मनें फार उत्तेजित झालेलीं त्यास आढळून आलीं. आणि अशा स्थितींत सदर उत्सवांप्रीत्यर्थ भरणाऱ्या सभेस आपण हजर राहिल्यास लोक बेफाम होऊन आनंदाच्या व उत्साहाच्या भरांत स्वैराचार करण्यास प्रवृत्त होण्याचा संभव आहे असें पाहून त्या सभेस हजर राहण्याचा बेत त्यानें रहित केला. परंतु त्याच्या प्रतिपक्षीयांचें एवढयानें समाधान न होतां त्यांनीं सभागृहाच्या मालकास वश करून घेऊन ती सभाच भरूं न देण्याचा प्रयत्न केला. यामुळें लोकमत फारच क्षुब्ध झालें. यानंतर कांहीं दिवसांनीं फ्रेंच क्रांतीविषयीं सहानुभूति बाळगणाऱ्या मंडळीनें "Address and Declaration of the friends of Universal Peace and Liberty" या नांवाचा एक जाहिरनामा प्रसिद्ध केला. हा जाहिरनामा पेननें लिहिला व २० आगष्ट रोजीं 'थॅचेड हौस टॅव्हर्न' येथें भरलेल्या जाहिरसभेनें मंजूर करून अध्यक्ष मि. जॉन होर्न टूके याच्या सहीनें प्रसिद्ध केला. ह्या जाहिरनाम्यांत फ्रेंच राज्यक्रांतीचें समर्थन व अभिनंदन केलें असून फ्रेंच दरबारच्या धास्तीमुळें इंग्लंडला लष्करी खर्च वाढविण्याचा जो हव्यास लागून राहिला होता तो आतां कमी होईल व त्या मानानें लोकांच्या शिरावरील करांचें ओझें हलकें होईल, असें प्रतिपादिलें आहे. फ्रेंच राजाच्या (दरबारच्या) चुकीमुळें जरी इंग्लंडला असह्य लष्करी ओझें वहावें लागलें तरी ती राजसत्ता आतां नष्ट झाली असल्यामुळें त्या देशाकडून तशाच प्रकारच्या चुका फिरून होण्याचा संभव नाहीं;

‡ "I am not the personal enemy of kings. Quite the controry. No man wishes more heartily than myself to see them all in a happy and honorable state of private individuals; but I am the avowed open, and intrepid enemy of what is called Monarchy; etc."

तेव्हां इंग्लंडच्या राजदरबारनेंही ह्या नवीन स्थित्यंतराचें अभिनंदन करून आपल्या देशांतील लोकपक्षास–करांचा भार हलका करून संतुष्ट करावें असेंही त्या जाहिरनाम्यांत ध्वनित केलें होतें.

जोंपर्यंत फ्रेंच राज्यक्रांतीची लाट त्या देशाच्या किनाऱ्यापर्यंत थबकून राहिली होती तोंपर्यंत इंग्लिश दरबारला तेथील राजसत्तेचा नाश झाल्या-बद्दल समाधान वाटत होतें. परंतु त्या लाटेचा स्पर्श इंग्लिश किनाऱ्यालाही होणार, किंबहुना झाला, असें जेव्हां उपरोक्त जाहिरनाम्यावरून त्यास दिसून आलें तेव्हां ती लाट फ्रान्साकडे परतविण्याची व थोपवून धरण्याची त्यांस आवश्यकता भासूं लागली. ही लाट इंग्लंडमध्यें आणणारा माणूस पेन होता. अर्थात् त्याला इंग्लंडच्या लोकपक्षांतून दूर करणें जरूर होतें व यापुढें इंग्लिश अधिकारी मंडळानें त्या दिशेनें प्रयत्न सुरू केले. पण त्या प्रयत्नांत सरळपणें त्यास यश येणें अशक्य होतें. कारण थॉमस पेन ह्या व्यक्तीचें इंग्लंडच्या लोकपक्षांत यावेळीं फार मोठें माहात्म्य वाढलें होतें. विद्वान् लोक, प्रसिद्ध वक्ते, लेखक, ग्रंथकार व धर्मोपदेशक यांजवर त्याचें मोठें वजन होतें आणि सामान्य जनतेंत तर त्याजविषयीं अतोनात पूज्य-बुद्धि व सहानुभूति होती. इंग्लंड व आयर्लंड येथील 'कान्स्टिटयूशनल क्लबा'मध्यें त्याचें फार मोठें वर्चस्व होतें. ते त्याला आपला मुख्य अग्रणी समजत असत. फ्रान्स देशांतील जॅकोबिन पक्षाचा पुढारी रॉबिस्पियर याच्या हातीं यावेळीं जेवढी 'कर्तुमकर्तुम्' शक्ति होती तेवढी यावेळीं इंग्लंडांत पेनच्या हातींही होती. परंतु रॉबिस्पियरप्रमाणें त्यानें ह्या शक्तीचा दुरुपयोग मात्र केला नाहीं. तो धिम्या स्वभावाचा व शांत आणि परि-पक्व विचाराचा माणूस असल्यामुळें त्याच्या बोलण्यांत, लिहिण्यांत व कृतींत एक प्रकारची शिस्त व (आत्मनिग्रह) संयम हीं असत. बेफाम-पणा स्वैराविर्भाव व बेशिस्तपणा ऊर्फ अव्यवस्था यांस त्यांजकडून कधींही उत्तेजन मिळण्याचा संभव नसे. त्याचीं राजकीय मतें तत्कालीन सर्व लोकांपेक्षां जरी फार पुढें गेलेलीं होतीं तरी तीं मतें अमलांत आणतेवेळीं प्रचलित समाजरचना जेणेंकरून विस्खलित होणार नाहीं, अशा व्यवहार्य व शिस्तीच्या उपायांचा–साधनांचा–अवलंब करण्यास तो चुकत नसे. एकदम क्रांति घडवून आणण्यापेक्षां उत्क्रांतीच्या रूपानेंच अत्युच्च असें

राजकीय ध्येय साधण्याचा त्याचा प्रयत्न असे. दंगाधोपा, अत्याचार व दुष्ट कृत्यें हीं टाळण्याचा त्याचा संकल्प असे. यामुळें त्याच्या शत्रूंसही छिद्रान्वेषण करून त्याजवर तुटून पडण्यास फारसा अवकाश मिळत नसे. त्याच्या मताच्या जयजयकार करणाऱ्या लोकांच्या जाहिरसभा न भरूं देण्याविषयीं अधिकृत वर्गाकडून जेव्हां गुप्त प्रयत्न करण्यांत आले तेव्हां पेनच्या (नेमस्तपणाच्या) धोरणामुळेंच भयंकर दंगे होण्याचा संभव टळला गेला. त्यानें सभेंतून अथवा अन्य तऱ्हेनें लोकसमूहांत मिसळण्याचें सोडून दिलें व लंडनच्या एका कोपऱ्यांत तो दुसरें एक पुस्तक लिहिण्याच्या कामांत गढून गेला.

त्याचा भक्त व स्नेही थॉमस रिक्मन या नांवाचा एक गृहस्थ लंडनमध्यें पुस्तकविक्रीचा धंदा करीत असे; त्याच्या घरीं पेन यावेळीं राहिला होता. ह्या रिक्मनची व पेनची ओळख व मैत्री, लुईस येथें पेन अबकारी खात्यांत नोकर होता तेव्हांपासून जडली होती. पेनचीं मतें रिक्मनला पसंत होतीं व त्याच्या विद्वत्तेबद्दल व धैर्याबद्दलही त्याच्या मनांत अतिशय पूज्यभाव होता. यामुळें पेन जेव्हां जेव्हां,इंग्लंडमध्यें येई तेव्हां तो त्यास वरचेवर आपल्या घरीं बोलावून ठेवून घेत असे. लोकस्वातंत्र्याची रिक्मनची आवड इतकी विलक्षण होती कीं, त्यानें आपल्या मुलांचीं नांवें त्या स्वातंत्र्याचा पुरस्कार करणाऱ्या अमेरिकन पुढाऱ्यांच्या नांवांवरून ठेवलीं होतीं ! पेनच्या मनांतही त्याजविषयीं प्रेम व आदरभाव होता. वर निर्दिष्ट केलेलें पुस्तक लिहिण्याचें काम पेननें ह्या घरांतच सुरू केलें होतें. ह्या वेळच्या त्याच्या आयुष्यक्रमासंबंधानें 'रिक्मन'कृत पेनच्या चरित्रांत पुढील आशयाचा उल्लेख आहे.

" मि. पेन याचा लंडनमधील आयुष्यक्रम सुखाचा व शांततेचा होता. तो कांहीं काल लिहिण्यांत, मजबरोबर स्नेही वर्गाच्या भेटीस जाण्यांत व कांहीं निवडक स्नेहांची (घरीं) भेट घेण्यांत घालवीत असे. त्याचे स्नेही व ओळखीचे असे पुष्कळ मोठमोठे लोक होते.(येथें पुष्कळ नांवें दिलीं आहेत.) व तो माझ्या घरांत राहात असल्यामुळें माझे जे स्नेही सोबती होते ते त्याचेही होते. या कालांत, त्याचें वाचन फार थोडें असे. जेवण झाल्यावर तो थोडीशी झोंप घेत असे व संध्या-

काळीं माझ्या कुटुंबांतील मंडळीबरोबर बुद्धिबळें व इतर खेळ खेळत असे, परंतु पत्ते मात्र कधींही खेळत नसे. याशिवाय गाणें, बजावणें, गद्य–पाठ म्हणणें अथवा संभाषण ह्यांतही तो संध्याकाळचा वेळ घरांतील माणसांबरोबर घालवीत असे. त्याचें संभाषण फार मनोवेधक असून तें माहिती, मौज, विनोद व आख्यायिका यांनीं भरलेलें असे. कित्येक वेळां आम्ही सुसंस्कृत अशा मित्रांस भेटावयास जात असूं. व त्यांच्याबरोबर गप्पागोष्टी करण्यांत कधीं घरीं तर कधीं समुद्रकिनाऱ्यावर सहल करीत कालक्रमण करीत असूं. आमच्याबरोबर अमेरिका, फ्रान्स व युरोपांतील इतर देशांहून आलेले हुषार प्रवासीही असत. जेव्हां तो व मी आणि घरांतील मंडळी-एवढेच एकत्र असूं, तेव्हां आम्ही पुष्कळ रात्रपर्यंत व सकाळच्या वेळींही ममत्वाच्या व रहस्याच्या गुप्त गोष्टी एकमेकांस सांगून त्यासंबंधानें चर्चा करीत असूं. त्यावेळचें आमचें संभाषण म्हणजे एक बौद्धिक मेजवानीच असे. व ती अगदीं प्रेमळपणानें दिलेली असे.''

पेन रिक्‌मनच्या घरीं यावेळीं जें पुस्तक लिहीत होता तें 'Rights of man' याचा दुसरा भाग होय. हें पुस्तक लिहिण्याचें काम सुरू असतांना ता. ४ नोव्हेंबर स. १७९१ रोजीं एक महत्त्वाचा समारंभ लंडनमध्यें झाला व त्यांत पेनचा अतिशय सत्कार करण्यांत आला. ह्या प्रसंगीं पेननें केलेलें भाषण उपलब्ध नाहीं. तथापि त्याच्या या भाषणांत " राष्ट्रांतील क्रांत्या (पृथ्वीच्या गति ऊर्फ क्रांतीप्रमाणें) शांतपणें, कायदेशीर व (सु)फलोत्पादक अशा व्हाव्यात " हें त्याचें आवडीचें मत प्रतिपादिलेलें असावें असें त्याच्या चरित्रकाराचें मत आहे.

इ. स. १७९२ च्या प्रारंभी पेनच्या 'Rights of man' चा दुसरा भाग तयार झाला. तो छापण्यासंबंधानें बऱ्याच भानगडी उपस्थित झाल्या होत्या. त्यांत फेरफार करण्याबद्दल त्याच्या प्रकाशकास त्याच्या प्रतिपक्षाकडून लांच देऊं करण्यांत आला होता. व त्याच्या प्रकाशनास इतरही अडथळे आले त्यामुळें तो ठरल्यावेळीं प्रसिद्ध न होतां अंमळ उशीरानें प्रसिद्ध झाला. या भागांत त्यानें इंग्लंडच्या तत्कालीन राज्य-

पद्धतीची मीमांसा करून निष्ठुरपणें त्यांतील छिद्रान्वेषण केलें होतें. आणि याच कारणामुळें मुख्यतः पुढें त्या पुस्तकासंबंधानें त्याजवर खटला झाला. या खटल्यांत कायदेशीर रीतीनें जरी पेनचा पराजय झाला तरी नैतिक दृष्ट्या त्यानें आपल्या प्रतिपक्षावर विजयच मिळविला ! असो; पेननें जेव्हां ह्या पुस्तकाचा पहिला भाग प्रसिद्ध केला तेव्हां फ्रेंच कॉन्स्टिटयूशन-मध्यें राजाच्या सत्तेचा अंश मान्य केला गेला असल्यामुळें त्या भागांत, ती बाब गृहीत धरून लोकसत्ताक शासनपद्धतीच्या स्वरूपाचें त्यानें विवेचन केलें होतें. परंतु दुसरा भाग लिहिण्याचे वेळीं ही राजसत्ता समूळ नष्ट झाली असल्याकारणानें ह्या शासनपद्धतीचें पूर्ण व स्वयंसिद्ध असें स्वरूप त्यांत त्यानें दाखवून दिलें आहे.

त्याच्या सदर विवेचनांतील सार येणेंप्रमाणें:—

(१) व्यक्तीचे जे नैसर्गिक हक्क (स्वतः) त्यास संपादन करतां येत नाहींत आणि म्हणून जे सर्व प्रकारच्या हक्काच्या संरक्षणाप्रीत्यर्थ समाजाच्या स्वाधीन केलेले असतात; त्यांचा एकत्र समुच्चय ज्यांत होतो त्यास 'राज्य-संस्था' असें म्हणतात.

(२) ज्यामध्यें सर्व राष्ट्राचें कल्याण, हा हेतु असतो त्यास 'लोक-सत्ताक राज्यसंस्था' ऊर्फ शासनपद्धति म्हणतात.

(३) ज्यामध्यें सामान्यतः लोकापेक्षां व्यक्तीचे हितसंबंध श्रेष्ठ मानले जातात व जें थोड्या फार अंशानें अनियंत्रित असें असतें त्यास 'बादशाही शासनपद्धति' (Monarchy) म्हणतात.

(४) ज्यांत, सामान्यतः जनतेपेक्षां एका विवक्षित वर्गाचे हित-संबंध श्रेष्ठ मानले जातात व जें अंशतः अनियंत्रित असें असतें त्यास 'शिष्टप्रधान राज्यसंस्था' (Aristocracy) म्हणतात.

(५) दुय्यम प्रतीच्या साधनाशिवाय जेथें सर्व लोक आपला राज्य-कारभार चालवितात त्यास 'लौकिक राज्यपद्धति' (Democracy) म्हणतात.

(६) अखिल राष्ट्रानें निवडून दिलेल्या लोकांचा अंमल जेथें त्या राष्ट्रावर चालतो तेथें त्यास 'प्रातिनिधिक राज्यसंस्था' (Repre. Govt.) म्हणतात.

(७) The rights of man. मानवी प्राण्याचे हक्क म्हणजे राष्ट्रांतील सर्व लोकांचे प्रतिनिधित्वाचे हक्क. (प्रत्येकास प्रतिनिधि निवडून देण्याचा असलेला हक्क.)

(८) लौकिक–लोकसमूहानें चालविलेली–शासनपद्धति लहानशा समाजाच्या प्राथमिक अवस्थेंत चांगली,परंतु पुष्कळ लोकांच्या समूहास ती लागू केल्यास लवकरच त्यांत घोंटाळा उत्पन्न होऊन ती खालावते. ह्याच प्रकारच्या घोटाळ्यांतून बादशाही शासनपद्धति निर्माण होते. परंतु फार मोठ्या व व्यापक हितसंबंधाचें–ज्यांत पुष्कळांच्या अनुभवाची व ज्ञानाची मदत अवश्यक असते व जें एका व्यक्तीच्या ठायीं असणें शक्य नाहीं–रक्षण करण्याचा प्रसंग असल्यास तें काम करण्याची ऐपत नसल्यामुळें ही राज्यसंस्था खालावत जाते. बड्या लोकांच्या राजसत्तेंत, बादशाही राजसत्तेंत असलेलेच दोष व दुर्गुण असतात. मात्र ह्या प्रकारच्या राज्यपद्धतींत राज्यसूत्रें चालविणाऱ्यांची संख्या (एकाहून) अधिक असल्यामुळें चालविण्याची पात्रता, बादशाही राज्यपद्धतीपेक्षां ह्या प्रकारच्या राज्यपद्धतींत जास्त उत्पन्न होण्याचा संभव असतो. राज्यसंस्थेचे वर जे निरनिराळे प्रकार सांगितले त्यांपैकीं 'Representative Government' (प्रातिनिधिक राज्यसंस्था) पेनला विशेष पसंत होती. "ह्या तऱ्हेच्या राज्यसंस्थेंत राष्ट्रांतील 'शहाणपण' स्वभावतःच बिनचूक रीतीनें समाविष्ट होत असतें. 'शहाणपण' ही कांहीं परंपरेनें उत्पन्न होणारी वस्तु नव्हे. कोणत्याही समाजांत, त्याच्या हितसंबंधाचें रक्षण करण्यास पुरेंसें शहाणपण नेहमीं असतें परंतु तें अमक्याच एका ठिकाणीं–त्या समाजांतील अमुक एका वर्गांत अथवा माणसांत–नेहमीं–परंपरेनें–आढळेल असें मात्र नाहीं. तें कधीं या वर्गांत, या व्यक्तींत, तर कधीं, त्या वर्गांत, त्या व्यक्तींत, असें नेहमीं फिरत असल्याचें दिसून येतें. बापाचें शहाणपण मुलाचे ठायीं येतेंच, असें जसें म्हणतां येणार नाहीं, तद्वत् एका कालीं समाजाचा एक वर्ग शहाणा असून दुसरा अडाणी असल्यास सर्व कालीं हीच स्थिति कायम राहील असें मानून चालणार नाहीं. लक्ष्मीप्रमाणें 'शहाणपण'ही चंचल आहे व तें तिच्याप्रमाणेंच आज या कुटुंबांत, तर कांहीं कालानें दुसऱ्या कुटुंबांत असें सारखें परिभ्रमण करीत असतें. याकारितां कोणाही

एका घराण्यास अथवा वर्गास राज्यसंस्था चालविण्याचे हक्क असणें हें, 'शहाणपण, न्याय व मनुष्याचे हक्क' यांच्याविरुद्ध आहे. ज्याप्रमाणें वाङ्मयाचे बाबतींत कुठल्या पाहिजे तिथल्या प्रतिभाशक्तीला पुढें येण्यास अवसर सांपडल्यामुळें उत्तम प्रकारचे ग्रंथ निर्माण होतात त्याचप्रमाणें वरील प्रकारच्या शासनपद्धतींत समाजांत जेथें जेथें शहाणपणाचा अंश असेल तो सर्व एकवटून त्यापासून सर्वोत्तम कायदे निर्माण होण्याची सोय असते." असें या शासनपद्धतीसंबंधीं लिहितांना पेननें प्रतिपादन केलें आहे. याच भागांत त्यानें, राज्यव्यवस्थेची सुधारणा क्रांतीच्या द्वारें करण्यापेक्षां उत्क्रांतीच्या रूपानें करणें अधिक प्रशस्त असल्याचें सांगितलें आहे. विवक्षित परिस्थितींत एकदम क्रांति घडवून आणण्याचा प्रयत्न केल्यास विनाकारण पुष्कळ नाश व हानि होते. उत्क्रांतितत्त्वाचा अवलंब केल्यास पुष्कळ अंशीं हे दुष्परिणाम टाळून इच्छित कार्य सिद्धीस नेतां येतें, असें तो म्हणतो.

पेनच्या पुस्तकाचा हा दुसरा भाग प्रसिद्ध झाल्यावर--त्यांतील इंग्लिश राज्यपद्धतीवरील निर्भिड टीकेमुळें, त्याजवर खटला करण्याची इंग्लिश अधिकाऱ्यांस इच्छा झाली. व प्रथम त्यांनीं त्याचा प्रकाशक जॉर्डन याजवर खटला केला. पेन यावेळीं केंट परगण्यांत होता. त्यास ही बातमी कळतांच तो आपल्या प्रकाशकाचें रक्षण करण्याकरितां तावडतोब लंडन येथें आला.* परंतु जॉर्डन यानें खासगी रीतीनें सरकारपक्षास वश होऊन 'अपराध कबूल' करण्याचें व पेनची एतद्विषयक पत्रें सरकारच्या हवालीं करण्याचें कबूल केलें. याप्रमाणें प्रकाशक वश होतांच पेनवर खटला करण्यांत येऊन त्यासही समन्स लागू करण्यांत आलें. २१ मे रोजीं पेनवर समन्स बजावलें गेलें व खटल्याची तारीख ८ जून नेमली होती. ज्या दिवशीं त्याजवर समन्स बजावलें त्याच दिवशीं राजद्रोही लेखांच्या

---

* आपल्या पुस्तकावर खटला होण्याचा संभव आहे असें दिसून येतांच आपल्याबद्दल आपल्या प्रकाशकास त्रास होऊं नये म्हणून पेननें त्यास त्या पुस्तकाची सर्व जबाबदारी आपणाकडे घेणारें पत्र पाठवून त्याचा योग्य वेळीं उपयोग करण्याचा अधिकारही त्यास देण्यांत आला होता.

विरुद्ध सरकारी जाहिरनामा प्रसिद्ध झाला. हा जाहिरनामा प्रसिद्ध झाल्यावर त्या संबंधानें पार्लमेंटांत वादविवाद चालू असतां सेक्रेटरी डंडास व मि. अडॅम यांनीं पेनच्या लेखावर जोराचा हल्ला केला (२५ मे). तेव्हां पेननें डंडास यास एक जाहीर पत्र पाठवून त्यांत त्याचें म्हणणें आवेशानें खोडून काढलें. जार्डनचें व सरकारपक्षाचें संगनमत झालें आहे असें कळून येतांच पेननें त्याच्या रक्षणाची खटपट करण्याचें सोडून दिलें. समन्सप्रमाणें तारीख ८ जूनला पेन कोर्टांत हजर झाला परंतु त्याचा खटला त्या दिवशीं न चालतां तो डिसेंबरपर्यंत तहकूब करण्यांत आला. यामुळें त्याची मोठी निराशा झाली. या सुमारास त्यानें आपल्या प्रकाशकाकडे असलेले हजार पौंड 'कॉन्स्टिटयूशनल सोसायटीस' बक्षीस दिले. वर सांगितलेला सरकारी जाहिरनामा प्रसिद्ध होईपर्यंत पेनच्या वादविषयक पुस्तकाच्या दोन लक्ष प्रती खपल्या होत्या. जाहिरनाम्यानंतर मात्र त्याचा खप मंदावला.

ज्या पुस्तकाबद्दल इंग्लंडमध्यें पेनवर खटला झाला त्याच पुस्तकाबद्दल फ्रान्सांत त्याचे देव्हारे (त्याच वेळीं) माजविले जात होते! त्याच्या पुस्तकाचें मि० लांथेनास् यानें केलेलें सुंदर भाषांतर फ्रान्सांतील प्रत्येक कुटुंबांत आदरपूर्वक वाचलें जात होतें व त्याच्या जनकाचें छायाचित्र–तसबीर–प्रत्येक झोपडींत प्रमुखस्थानीं विराजमान झालेलें होतें! कल्पनेच्या वातावरणांत भराऱ्या मारणाऱ्या तेथील राजकीय सुधारकांना या पुस्तकांत व्यवहार्य अशी सुधारणापद्धति सांपडली. व तिचा उपयोग करण्याचें त्यांनीं मनांत आणलें. जेव्हां राजाच्या अदूरदर्शीपणामुळें त्याच्या व्हेटोचा अधिकार काढून घेणें लोकांस भाग पडलें त्यावेळीं कायद्याची सत्ता स्थापन करण्याकरितां कन्व्हेन्शन भरविण्याची जी कल्पना फ्रेंच लोकांच्या मनांत आली ती पेनच्या ह्या पुस्तकाच्या पहिल्या भागावरूनच होय. १७९१ च्या डिसेंबर महिन्यांत कन्व्हेन्शन भरविण्याचा ठराव तेथील लोकसभेनें पास केला व पुढील वर्षांत त्या प्रीत्यर्थ निवडणूक सुरू झाली. ता. २६ ऑगस्ट रोजीं एम्. गॉदेत याच्या सूचनेवरून पेन, पिस्टले, बेंथॅम, वुइलबरफोर्स, मॅकिंटाश, वॉशिंगटन, मॅडिसन व आणखी कांहीं—वगैरे परदेशस्थांस लोकसभेनें, फ्रेंच नागरिकत्वाचा हक्क दिला. ता० २५

सप्टेंबर रोजीं हा हक्क आणखी कांहीं प्रसिद्ध व्यक्तींस देण्यांत आल्यानंतर पेनला तीन परगण्यांतील लोकांनीं आपल्या तर्फे कन्व्हेन्शनचा 'प्रतिनिधि' म्हणून निवडलें. तिन्ही ठिकाणची निवडणूक एकमतानें झाली होती. त्यांपैकीं एका परगण्यांतलि लोकांनीं पेनला, त्याची निवडणूक झाल्यावर पुढील विनंति केली आहे:—

" मानुष्य, स्वातंत्र्य आणि समता यांविषयींचें तुमचें प्रेम व त्यांचें समर्थन करण्याकरितां अंतःकरणपूर्वक तुम्हीं लिहिलेलीं उपयुक्त पुस्तकें हीं तुमच्या निवडणुकीस कारणीभूत झालीं आहेत. तुमची निवडणूक झालेली ऐकून सर्वत्र आनंदीआनंद झाला आहे. अहो लोकपक्षाचे वाली ! एका मोठ्या जनसमूहाची–किंबहुना मनुष्यजातीची–भवितव्यता निश्चित करण्याकरितां जमणाऱ्या सभेंतील देशभक्तांची संख्या वाढविण्याकरितां आपण अवश्य या. राष्ट्रांच्या ज्या सुखकर कालाचें आपण भविष्य वर्तविलें तो काल येऊन ठेपला आहे. तरी अवश्य या. आमची निराशा करूं नका ! "

परंतु ही निवडणूक होण्यापूर्वींच कॅले शहरानें त्याची निवडणूक करून (सप्टेंबर ६) पेनला आणण्याकरितां एक म्युनिसिपल अधिकारी लंडन शहरास पाठविला होता. त्यानें पेनची गांठ घेऊन त्यास आपल्या निमंत्रणाचा स्वीकार करण्याची विनंति केली. पेनच्या मनांतून आपला खटला चालविण्याकरितां व त्यांत निदानचा नैतिक विजय तरी संपादन करण्याकरितां त्यावेळीं इंग्लंडांतून जावयाचें नव्हतें; यामुळें त्यानें कॅले येथील निमंत्रणाचा स्वीकार करणें तहकूब ठेवलें. पण इंग्लंडांतलि त्यावेळच्या परिस्थितीचा विचार करून त्याच्या मित्रांनीं त्यास तें आमंत्रण स्वीकारून पॅरीसला जाण्याची आग्रहपूर्वक सल्ला दिल्यावरून पुढें त्यानें त्या निमंत्रणाचा स्वीकार केला. यावेळीं इंग्लंडमध्यें फ्रेंडस् ऑफ लिबर्टी या नांवाची एक संस्था स्थापन झालेली होती. त्या संस्थेपुढें ता. १२ सप्टेंबर रोजीं पेननें एक उत्तेजक भाषण केलें होतें व ह्या भाषणांतील मुद्दे तो दुसरे दिवशीं आपला मित्र जॉन्सन याच्या येथें जमलेल्या मित्रमंडळीस सांगत होता. त्या ठिकाणीं उइल्यम ब्लेक हाही होता. ह्या भाषणाचा रिपोर्ट अधिकाऱ्यांच्या हातीं जातांच पेनला 'धरणें' येईल अशीं त्याची खात्री

झाली होती. सबब पेनला त्यानें तावडतोब फ्रान्सांत निघून जावयास सांगितलें. पेननें तत्काळ फ्रान्सला जाण्याची तयारी केली. मात्र निघण्यापूर्वी त्यानें त्यांतल्यात्यांत सवड साधून अमेरिकन वकील पिंकने याची गांठ घेतली. पेनच्याबरोबर फ्रॉस्ट व ऑादिबर्त (कॅलेचा म्युनिसिपल अधिकारी) हेही पॅारीसला जाण्याकरितां निघाले. शेवटच्या दोघां गृहस्थांना लंडनच्या अधिकाऱ्यांचे कांहीं बेत समजले होते. म्हणून मि० फ्रॉस्ट यानें आपल्या दोघां सोबत्यांस एका विवक्षित रस्त्यानें डोव्हरकडे नेलें. तेथें गेल्यावर कस्टमच्या कलेक्टरनें त्यांची कडक तपासणी केली. पेनच्या पेटींत कांहीं पत्रें सांपडलीं. त्यांत वॉशिंगटननें पेनच्या पत्रास ९ महिन्यांनीं पाठविलेलें उत्तर होतें. तें पत्र उघडून कस्टम-कलेक्टर वाचूं लागला तेव्हां पेन म्हणाला " कस्टमच्या अधिकाऱ्याच्या नजरेखालून गेल्याशिवाय जनरल वाशिंगटनला मला खासगी पत्रही लिहितां येऊं नये हें मोठें चमत्कारिक आहे." पेनचे हे शद्ब ऐकतांच फ्रॉस्ट यानें कलेक्टरच्या हातून तें पत्र घेतलें व त्याचा शेवटचा परिच्छेद तेवढा त्यास वाचून दाखवून वाशिंगटनची सही दाखविली. वाशिंगटनची सही पाहतांच कलेक्टरची गाळण उडाली व त्यानें सर्व कागदपत्र त्यांची याद करून ठेवून—पेनला परत दिले. नंतर लवकरच ते तिघेजण बोटीवर चढले व थोड्या वेळानें बोट सुटून २० मिनिटें होतात न होतात तोंच पेनला पकडण्याचा हुकूम तेथें येऊन पोंचला. पण 'वरातीपाठीमागून घोडें' अथवा 'बैल गेला आणि झोपा केला ' अशांतला हा प्रकार झाल्यामुळें तो हुकूम जागच्या जागींच राहिला!

प्रकरण १० वें

फ्रेंचक्रांतीच्या महापुरांत !

ह्या खेपेस फ्रान्सच्या किनाऱ्यावर येतांच पेनचें एवढें जंगी स्वागत करण्यांत आलें कीं, असें एकाद्या राजाचेंही मनापासून कोणीं केलें नसेल. त्याची बोट बंदरांत येतांच त्याच्या सन्मानार्थ तोफांची सरबत्ती—सलामी—देण्यांत आली. व किनाऱ्यावर जमलेल्या लोकांनीं मोठमोठ्यानें ओरडून त्याचा जयजयकार केला ! पेननें किनाऱ्यावर पाय टाकतांच त्यास लष्करी तुकडीनें प्रथम सलामी दिली; नंतर अधिकारी लोकांनीं त्यास भेटून त्याचें स्वागत केलें; एका सुंदर सभ्य स्त्रीनें फ्रेंच राष्ट्रीयत्वाची खूण (cockade) त्याच्या टोपींत खोंवली; व त्याच्या स्वागतार्थ थोडेंसें भाषणही केलें. नंतर गाडींत बसून त्याची मिरवणूक काढण्यांत आली. ही मिरवणूक चालली असतां (Vive Thomas Pain) 'थॉमस पेनचा जयजयकार असो;' ह्या शब्दांनीं सर्व वातावरण भरून गेलें होतें. अशा रीतीनें वाजत गाजत ही मिरवणूक टाऊन हॉलमध्यें येऊन पोंचली. तेथें आल्यावर त्याच्या स्वागतार्थ तेथील म्युनिसिपालिटीनें सभा भरविली. प्रत्येक म्युनिसिपल सभासद त्यास कडकडून भेटला व नंतर मेयरनें त्याच्या स्वागतार्थ भाषण केलें. हा समारंभ आटोपल्यावर कॅलेच्या कॉन्स्टिटयूशनल सोसायटीनें त्याच्या स्वागतार्थ सभा भरविली. त्या ठिकाणीं त्याच्या निवडणुकीचा रीतसर (Official) समारंभ होऊन त्यास अधिकारपत्र अर्पण करण्यांत आलें. त्यावेळीं जमलेल्या लोकांकडून 'Vive la Nation !' 'Vive Thomas Pain' या शब्दांनीं त्याचा जयजयकार करण्यांत आला. ह्या सभेची जागा लहान असल्यामुळें पुष्कळ लोकांना ह्या समारंभांत सामील होतां आलें नाहीं; म्हणून दुसरे दिवशीं त्या शहरांतील देवळांत जंगी जाहिरसभा भरविण्यांत आली. या सभेंत सर्व प्रकारचे लोक जमून त्यांनीं जाहीर रीतीनें व उत्साहपूर्वक पेनचें स्वागत व अभिनंदन केलें. त्या दिवशीं रात्रीं त्याच्या सन्मानार्थ एक नाटक करण्यांत येऊन तेथेंही सार्व-

जनिकरीत्या त्याचा सन्मान करण्यांत आला. याप्रमाणें पेनचें कॅले शहरानें स्वागत केलें. हें स्वागत पहाण्यास त्याची वृद्ध माता जगती तर तिला कितीतरी धन्यता वाटली असती ! आपल्या मुलाचें पुढें असे–राजा-प्रमाणें–सोहळे होतील हें त्या बिचारीच्या स्वप्नांतही कधीं आलें नसेल ! त्याची जिवंत असलेली बायको इलिझाबेथ ही सध्यां अशा स्थितींत होती कीं, तिला पेनच्या नवीन सृष्टीची–स्थित्यंतराची–मुळींच कल्पना होण्यासारखी नव्हती! तो सध्यां युरोपांत आहे, हें देखील त्या दुर्दैवी व हतभागी स्त्रीस माहीत नव्हतें! अर्थात् पेनच्या ह्या वैभवाचा वांटेकरी होण्यास फ्रान्स देशाशिवाय अन्य कोणी आप्तसंबंधी त्यास उरला नव्हता. असो; पेन कॅलेला येऊन पोंचण्यापूर्वींच डोव्हर येथें त्यास धरणें आल्याची खबर फ्रान्सांत येऊन पोंचली व पेनचें कॅले येथें जेव्हां स्वागत होत होतें तेव्हां ती खबर फ्रान्सांतील प्रत्येक गांवांत जाऊन पोंचत होती. ती खबर ऐकतांच पेनवर लोकांची जास्त श्रद्धा बसली व ते त्याचा अधिकाधिकच गौरव करूं लागले.* कॅले शहरातर्फे दुसरेही कित्येक प्रतिनिधी कन्व्हेन्शनकरितां निवडण्यांत आले होते. त्या सर्वांपेक्षां पेनचाच विशेष गौरव करण्यांत आलेला पाहून त्यांच्यापैकीं कांहींस मत्सर वाटणें संभवनीय होतें; परंतु त्यावेळीं तसा कांहींएक प्रकार दिसून आला नाहीं.

सप्टेंबर १९ ला (१७९२) पेन पॅरिस शहरीं येऊन पोंचला. २० तारखेस कन्व्हेन्शनवाल्यांच्या समारंभास तो हजर राहिला. २१ तारखेस सर्व प्रतिनिधींची मिरवणूक तुलरीज नामक राजवाड्याकडे निघाली. ती तेथें येऊन पोंचल्यावर लोकसभेनें त्यांचें स्वागत केलें व नंतर त्यांचीं अधिकारपत्रें तपासण्याचें काम सुरू झालें. त्यावेळीं ॲबे ग्रेगॉयेर यानें सर्व सभासदांस पेनची ओळख करून दिली; तेव्हां टाळ्यांचा मोठा गजर झाला. ह्या दिवसापासून फ्रान्सचीं राज्यसूत्रें कन्व्हेन्शनच्या हातीं आलीं. ता. २५ सप्टेंबर रोजीं पेननें आपल्या निवडणुकीबद्दल व आपणांस नागरिकत्वाचा

* पेनला धरणें आल्याची हकीकत 'मॉनिटयूर' नामक फ्रेंच पत्रानें (ता. २३ सप्टेंबर) प्रसिद्ध केली व त्यामुळें फ्रान्समध्यें त्याचें वर्चस्व (power)फार वाढेल असें भाकित केलें होतें व त्याप्रमाणेंच अखेरीस झालें.

हक्क दिल्याबद्दल फ्रान्सचें प्रेम व कृतज्ञतापूर्वक आभार मानण्याकरितां एक जाहीर पत्र छापलें. ह्या पत्रांत त्यानें फ्रेंच लोकांना धिम्मेपणा धारण करून क्रांतीचें काम ऐक्यानें व स्नेहभावानें तडीस नेण्याचा व सूड उगविण्याची दुष्ट भावना सोडून देण्याचा स्पष्ट उपदेश केला आहे.‡

ता. ११ आक्टोबर रोजीं फ्रान्सची कॉन्स्टिटयूशन तयार करण्याकरितां एक कमिटी नेमिली. त्यांत साईस, पेन, ब्रिझो, पीतिआँ, व्हर्ग्निऑद, गेन्सोने, बारेर दांते, कॉन्दरसेत् वगैरे मंडळी होती. साईस व पेन हे दोन गृहस्थ राज्यशास्त्रांत फार निपुण होते.

कांहीं दिवसांपूर्वीं राज्यसंस्थेच्या निरनिराळ्या प्रकारांसंबंधानें या उभयतांत खडाजंगीचा वाद झाला होता. ह्या कमिटीच्या निमित्तानें त्या दोघांत आतां ऐक्यभाव उत्पन्न झाला. ह्या कमिटीमध्यें पेनचेंच नांव प्रथम यावयाचें; परंतु त्याला फ्रेंच भाषा येत नसल्यामुळें त्याचें नांव दुसरे स्थानीं घालण्यांत आलें. या कमिटींतील सभासद ब्रिझो याची व पेनची अमेरिकेंत ओळख झालेली होती. व उभयतांची वाङ्मयाभिरुचि समान असल्यामुळें आणि निग्रो लोकांच्या मुक्ततेसंबंधानें दोघांचेंही मतैक्य असल्यामुळें त्यांच्यामध्यें पुष्कळ दिवसांपासून मित्रभाव वसत होता.

ता. २५ आक्टोबर रोजीं पेननें राजसत्तावादित्वांतील दोषांचें आविष्करण करणारा एक निबंध प्रसिद्ध केला. ह्या निबंधांत त्यानें राजाच्या अनियंत्रित सत्तेचे दुष्परिणाम दाखवून अखेरीस, हे दुष्परिणाम नाहींसे करूं इच्छिणारांनीं राजावर त्याबद्दल सूड उगवूं नये असा इषारा दिला.* व अशा रीतीनें सोळाव्या लुईचे प्राण वांचविण्याबद्दल लोकांचीं मनें वळविण्याचा मार्ग त्यानें तयार करून ठेविला. खासगी रीतीनेंही त्यानें आपल्या

‡ "Let us say to the agitated mind, be calm ! let us punish by iustruction, rather than by revenge. let us begin the new era by a greatness of friendship and hail the approach of union and success."

* तो म्हणतो:—" It is the kingly office, rather than the officer, that is destructive. This is not seen by every one."

म्हात्यांचीं मनें ह्या दिशेनें वळविण्याचा प्रयत्न केला. पॅरिसमध्यें त्यावेळीं जेवढे म्हणून कर्ते व लोकमान्य पुरुष होते त्या सर्वांत पेन हा अग्रस्थानीं होता. त्याची ह्या वेळची लोकप्रियताही विलक्षण होती. सामान्य जनता त्याचा शब्द झेलण्यास एका पायावर तयार होती. मोठमोठ्या विचारी लोकांसही त्याचा शब्द मान्य वाटत होता. एकंदरींत ह्यावेळची त्याची स्थिति अवर्णनीय होती खरी.*

फ्रान्समध्यें कन्व्हेन्शनची स्थापना मुख्यतः नवीन शासनपद्धतीची घटना (Constitution) तयार करण्याकरितां झाली होती. ही घटना तयार झाल्यावर त्यांतील तत्त्वांच्या अनुरोधानें नवें राज्ययंत्र निर्माण करून हें कन्व्हेन्शन विराम पावावयाचें होतें. ही घटना तयार होईपर्यंत मात्र देशांतील राज्यकारभाराचीं सूत्रें कन्व्हेन्शननें चालवावींत असें ठरलें होतें. परंतु १६ व्या लुईला पकडून, त्यानें केलेल्या विश्वासघाताबद्दल त्यास कायदेशीर रीतीनें शासन करण्याचा जेव्हां प्रसंग येऊन ठेपला,तेव्हां युरोपांतील बहुतेक राजे लुईचा पक्ष घेऊन फ्रान्सवर उठले. यामुळें फ्रेंच लोक फार चिडले व त्यांनीं 'नवी राज्यघटना' तयार होण्यापूर्वींच राजाचा निकाल करण्याचा प्रश्न हातीं घेतला. परराष्ट्रांतील राजे जर ह्या भानगडींत पडले नसते, लुईनें जर त्यांच्याशीं गुप्त कारस्थानें केलीं नसतीं तर राजाच्या चौकशीचें काम कन्व्हेन्शननें बहुधा इतक्या लवकर हातीं घेतलें नसतें व पुढें जे भयंकर प्रकार--कीं ज्यांच्या योगानें ह्या स्वातंत्र्याच्या चळवळीस काळिमा लागली—घडून आले ते घडतेना. असो; परराष्ट्रांशीं लुईनें लोकांच्या विरुद्ध केलेल्या गुप्त कारस्थानाचे कागदपत्र कन्व्हेन्शनच्या हातीं लागतांच लोकांच्या मनांत साहजिकच त्याबद्दल चीड उत्पन्न झाली व

---

*लॉर्ड एडवर्ड फिटझरल्ड या इंग्लिश गृहस्थानें यावेळीं (आक्टोबर ३०) पॅरिसहून आपल्या आईस लिहिलेल्या पत्रांत पेनसंबंधीं लिहिलें आहे—

"I lodge with Pain. ××× The more I see of his interior, the more I like and respect him. ××× there is a simplicity of manner in him, that I never knew a man before possess."

—Dr. Conway's Life of Paine.

ते त्याचा सूड घेण्याच्या गोष्टी बोलूं लागले. पेनचें मत पूर्वींपासूनच राजत्वाच्या (Kingly office) विरुद्ध होतें; परंतु त्याबद्दल राजा ह्या व्यक्तीवर सूड उगविणें त्यास बिलकूल पसंत नव्हतें.तेव्हां साहजिकच लुईचे प्राण वांचविण्याची खटपट तो करूं लागला. परंतु लोकमत लुईच्या विरुद्ध इतकें खवळलें होतें कीं, त्याची थोडीशी देखील तरफदारी करणें धोक्याचें झालेलें होतें. त्या योगानें तरफदारी करणाराबद्दलच उलट गैरसमज व्हावयाचा मग त्याचा हेतु कसा सिद्धीस जाणार ? तेव्हां लोकांचा कल पाहून, त्यांच्या उदार मनोवृत्ति जागृत करून, त्यास थोरपणा देऊन पेननें लुईसंबंधानें त्यांच्या मनांत दया उत्पन्न करण्याचा प्रयत्न केला. कन्व्हेन्शनच्या अध्यक्षास त्यानें या विषयासंबधानें एक महत्त्वाचें पत्र लिहून त्यांत लुईची चौकशी कोणत्या धोरणावर करावी हें सुचविलें आहे. परंतु पेनची सदर सूचना अमलांत येऊं शकली नाहीं. तेव्हां लुईला अपराधी ठरवून त्यास कैदेंत ठेवण्याची व फार तर हद्दपारीची शिक्षा देऊन संतुष्ट होणारें बहुमत कन्व्हेन्शनमध्यें तयार करण्याचा त्यानें प्रयत्न आरंभिला. लुईचे प्राण वांचविण्याचा हा एवढाच मार्ग त्याला उरला होता व त्या दिशेनें त्यानें अखेरपर्यंत आपली शिकस्त केली.

वर सांगितल्याप्रमाणें लुईचे प्राण वांचविण्याचें पवित्र कार्य पेन फ्रान्सांत करीत होता त्यावेळीं इंग्लंडमध्यें—त्याजवरील खटल्याची संधि साधून—त्याच्या प्रतिपक्षाचे त्याजवर हल्ले चालू होते. त्याच्या एका हित-शत्रूनें त्याचें चरित्र प्रसिद्ध करून त्याजवर खोटेनाटे आरोप केले होते. तसेंच सरकारपक्षानेंही त्याजबद्दल लोकांच्या मनांत बुद्धिभेद उत्पन्न करणारास उत्तेजन दिलें होतें. राजद्रोही लेखांविरुद्ध सरकारनें जो जाहिरनामा प्रसिद्ध केला होता त्याचें अभिनंदन करण्याकरितां निरनिराळ्या शहरांतून सरकार-पक्षाच्या वडया लोकांनीं सभा भरविल्या होत्या. ह्या सभांतील वक्त्यांस उत्तर म्हणून पेननें एक लहानसें पत्रक प्रसिद्ध केलें होतें. व त्या पत्रकांत त्यानें आपल्यावर खटला सुरू असतां आपल्याविरुद्ध लोकमत कलुषित करण्याचे जे प्रयत्न होत आहेत, ते निंद्य ठरवून 'अज्ञानें सत्य झांकलें जाणार नाहीं' असें बजावलें. ह्या पत्रकांतील कित्येक भाग तर तत्कालीन लोकपक्षास इतका आवडला, कीं त्यांनीं त्यास "Third part of the rights

of man" असें नांव मोठ्या प्रेमानें दिलें. त्यांतील कांहीं कांहीं वाक्यें व परिच्छेद तर नाटकांतील पदांप्रमाणें लोकांनीं पाठ केलीं! त्यांतील कांहीं नमुने पुढें देतों:—

(1) "It is a dangerous attempt in any Government to say to a Nation, '*Thou shalt not read*'."

(भावार्थ:–कोणत्याही सरकारनें राष्ट्रांतील प्रजेला वाचण्याची मनाई करण्याचा प्रयत्न करणें हें भयंकर कृत्य आहे.)

(2) "Thought by some means or other, is got abroad in the world, and Cannot be restrained, though reading may."

(भावार्थ:––वाचनावर नियंत्रण घालतां येईल; पण विचार हा कोणत्याना कोणत्या तरी रीतीनें बाहेर पडून जगांत प्रकटतो. त्याचें नियंत्रण करणें अशक्य आहे.)

(3) "Put a Country right, and it will soon put Government right."

(भावार्थ:––देशाची सुस्थिति करा, कीं तो उत्तम शासनपद्धति स्थापन करील.)

(4) "A thing moderately good is not good as it ought to be."

(भावार्थ:––जी वस्तु नेमस्तपणें चांगली असते ती जितकी चांगली असावयास पाहिजे तितकी चांगली नसते.)

(5) If ××× to lesson the oppression of taxes, to propose plans for the education of helpless infancy, and the comfortable support of the aged and distressed, to endeavour to conciliate nations with each other, to extripate the horried practice of war, to promote universal

peace, civilization and commerce and to break the chains of political superstition, and raise degraded man to his proper rank-if these things be libellous, let me live the life of a liabellers, and let the name of libeller be engraven on my tomb."

(भावार्थः-करांचें ओझें कमी करणें, निराश्रित मुलांच्या शिक्षणाची तरतूद करण्याच्या व निराश्रित आणि दुःखितांच्या सुखसोयीच्या योजना पुढें मांडणें, राष्ट्राराष्ट्रांमध्यें सलोखा घडवून आणण्याचा यत्न करणें, भयंकर युद्धें टाळणें, जगांत शांतता, संस्कृति व व्यापार यांची अभिवृद्धि करण्यास झटणें, राजकीय धर्मभोळेपणाच्या शृंखला तोडून टाकून हीनत्वास पोंचलेल्या मानवसमाजास त्याचें योग्य स्थान प्राप्त करून देणें, इत्यादि गोष्टी जर बेअब्रूकारक असतील तर बेअब्रूकारक असा हा धंदा करण्यांतच माझें सर्व आयुष्य जावो ! आणि माझ्या थडग्यावरही Libeller (बेअब्रू करणारा) ही पदवी खोदली जावो !!)

वरीलपैकीं शेवटच्या उताऱ्यांत पेनच्या विचारसरणीचें सार थोडक्यांत उतरलें आहे. हें पत्रक प्रसिद्ध झालें तरी पेनच्या प्रतिपक्षाचे डावपेंच चालूच होते. त्यांनीं पेनचे कागदी पुतळे करून ते जाळण्याचांही प्रयोग केला. हे प्रकार झाल्यानंतर लवकरच पेनचा खटला सुरू झाला. वास्तविक आतां त्या खटल्याशीं पेनला कांहींएक कर्तव्य नव्हतें. कारण त्याच्या परिणामापासून तो अलिप्त होता. परंतु हा खटला पेन ह्या व्यक्तीवर नसून लोकस्वातंत्र्याच्या तत्त्वावर-लोकपक्षावर-आहे अशी पेनची समजूत असल्यामुळें त्यानें आपल्यातर्फे वकील देऊन तो खटला चालविला. त्या वेळचा प्रख्यात वक्ता व वकील अर्स्किन हा पेनतर्फे ह्या खटल्याचें काम चालवीत होता. तथापि ह्या खटल्याचा निकाल पेनच्या विरुद्ध होणार हें अगोदर ठरल्यासारखेंच होतें.* तशांत ह्या खटल्यासंबंधानें पेननें सर-

---

* पेनच्या खटल्यांत जूरी कशा प्रकारची होती याचें डॉ० कानवे यांनीं पुढीलप्रमाणें वर्णन दिलें आहेः- "It is virtually selected by the master of the crown office, a dependent on the civil list,

कारी वकिलास एक आवेशयुक्त पत्र लिहिलें होतें. तें कोर्टापुढें आलें. त्यानें तर ह्या खटल्याचा निकाल निश्चितच करून टाकला. तो इतका कीं, जूरीनें सरकारी वकिलास अर्स्किनच्या भाषणावर उत्तरही देऊं न देतांच निकाल सांगितला. तो निकाल अर्थातच पेनच्या विरुद्ध होता. पेनला हद्दपारीची शिक्षा झाली. आणि याप्रमाणें एकदांचा त्याच्यावरील खटल्याचा शेवट झाला.

पेनच्या खटल्याचा निकाल जरी त्याच्या विरुद्ध झाला तरी त्याच्या वकिलानें केलेलें भाषण इतकें मुद्देसूद व आवेशाचें झालें कीं, लोकपक्षानें त्यास त्याबद्दल अतिशय धन्यवाद दिला. कित्येकांनीं तर त्यास कोर्टांतून आपल्या खांद्यावरून वाहून नेलें. लोकांच्या हक्कांचें विशदपणें समर्थन करणारें हें भाषण ऐतिहासिकदृष्टया फार महत्त्वाचें आहे.

इकडे फ्रान्सांत लुईचे प्राण वांचविण्याचे पेनचे प्रयत्न यशस्वी होण्याचा रंग दिसत होता. 'क्रांतीचें काम पूर्ण होईपर्यंत राजाला कैदेंत ठेवावा व नंतर त्यास अमेरिकेंत हद्दपार करावा' अशी सूचना कन्व्हेन्शन्‌पुढें आणण्याचें पेननें ठरविलें होतें. पेनच्या ह्या कृतीस अमेरिकन प्रतिनिधि मॉरिस याचीही अनुमति होती. आपली सूचना पास होण्यास आवश्यक तितकीं मतेंही पेननें खासगी रीतीनें आपलीशीं करून घेतलीं होतीं. इंग्लंडचा प्रतिनिधिही वरकरणी लुईबद्दल सहानुभूति दाखवीत होता; पण आंतून तो लुईच्या ऱ्हासास मदत करीत होता. यावेळीं फ्रेंच पुढारी दांते यानें एका इंग्रज गृहस्थास असें कळविलें कीं, "राजाचे प्राण वांचविण्यास आपण तयार आहोंत; परंतु त्याप्रीत्यर्थ मतें जमविण्यास एक लक्षाची रक्कम आठ दिवसांचे आंत माझ्या हातीं आली पाहिजे. इतकें केल्यावरही मी स्वतः मात्र राजास देहांतशासनच देण्याबद्दल मत देणार. कारण त्याचे प्राण वांचविण्यास जरी माझी खुषी असली तरी माझे प्राण घालविण्यास मी तयार नाहीं." सदर गृहस्थ व

---

assailed in his (Pain's) book. The special Jury is treated to a dinner and given two guineas for a conviction, and but one guinea and no dinner for acquittal."

स्पेनचा वकील यांनीं ही गोष्ट इंग्लिश मुत्सद्दी व प्रधान पिट याच्या काना-वर घातली; पण त्यानें ती रक्कम देण्याचें नाकारलें. ज्या राजाच्या रक्षणा-करितां पिटनें लढाई सुरू केली व इतरांकडून करविली त्या राजाचे प्राण-रक्षणाप्रीत्यर्थ त्यास कांहीं हजार पौंडही खर्च करवले नाहींत ! याप्रमाणें लुईचे प्राण वांचविण्याची धडपड सुरू असतां मध्येंच (ता. १ जानेवारी १७९३) एके दिवशीं कन्व्हेन्शनच्या एका सभासदानें पेनच्या खटल्या-चा निकाल कन्व्हेन्शनच्या बैठकींत सांगितला; व त्यावर पुष्कळ वक्त्यांनीं रागाचीं व आवेशाचीं (इंग्लिश राजनीतिविरुद्ध) भाषणें केलीं. ह्या नवीन उद्भूत झालेल्या प्रसंगामुळें (Incident) कन्व्हेन्शनवाल्यांचीं मनें लुईच्या विरुद्ध फार बिथरलीं व अनियंत्रित राजसत्तेचें अधिष्ठान नाहींसें करण्याचा त्यांनीं निश्चय केला. लुईचे प्राण वांचविण्याची भाषा बोलणारा दांते ह्यावें तर मन पालटलेंच; पण पेनचा स्नेही ब्रिझो यालाही लोकसत्तावाद्यांनीं राजाच्या देहांतशासनास संमति देणें भाग पाडलें ! पेनला फ्रेंच भाषा येत नसल्यामुळें यावेळीं त्यास लोकमताचा ओघ आंव-रून धरण्याचें काम करतां येईना; अर्थात् त्याला स्वस्थ बसणें भाग पडलें. परंतु येवढ्यानें तो हताश झाला नाहीं. त्यानें लोकांचीं मनें वळविण्याचा फिरून प्रयत्न सुरू केला; पण आतां लोकमत फारच खवळलें असल्यामुळें त्याच्या प्रयत्नास यश येण्याचा रंग दिसेना. तथापि शेवटपर्यंत त्यानें आपलें म्हणणें सोडलें नाहीं. राजाच्या शिक्षेसंबंधानें मतें घेण्याच्या वेळेस कन्व्हेन्शनपुढें त्यानें एक पत्र सादर केलें; पण तें वाचण्यांत आलें नाहीं. तेव्हां तें छापून प्रसिद्ध करण्यांत आलें. त्यांत त्यानें लुईच्यासंबंधानें पुढील विवेचन केलें आहेः—

" अमेरिकन संस्थानें हीं लुईचीं रक्षक आणि आश्रयस्थान होऊं द्या. राजमदामुळें उद्भवणारे गुन्हे व तज्जन्य यातना यांपासून भविष्यकाळीं त्याची मुक्तता झाल्यावर अमेरिकेंतील लोकांचें वैभव पाहून त्याला असें कळून येईल कीं, राज्य करण्याची अभिजात पद्धति राजांच्या अमदानींत उदय पावत नसून ती सन्मान्य, समतात्मक आणि न्याय्य अशा प्रातिनिधिक राज्यसंस्थेच्या अमदानींतच उदय पावते. दोन्ही (फ्रान्स व अमेरिका) देशांचा नागरिक ह्या नात्यानें मी या गोष्टीचा उल्लेख करून सदर सूचना

पुढें मांडीत आहें. अमेरिकन या नात्यानें फ्रान्सच्या प्रत्येक रहिवाशाशीं कृतज्ञपणें वागणें हें कर्तव्य समजून मी ही सूचना आपणांस सादर करीत आहें. राजे लोकांचा शत्रु असणारा परंतु राजेही मानवी दौर्बल्याधीन असतात, याची जाणीव बाळगणारा एक गृहस्थ या नात्यानें मी ती आपल्यापुढें ठेवीत आहें. फ्रेंच लोकसत्ताक राज्यांतील एक नागरिक या नात्यानें मी त्या सूचनेचा पुरस्कार करीत आहें. कारण सध्यांच्या स्थितींत तोच एक उत्तम मार्ग आहे असें मला वाटतें. ××× मृत्यूची शिक्षा बंद करावी असा ठराव आपणांपुढें अगोदरच आलेला आहे. लोकसभेंत रॉबिस्पियरनें या विषयावर जें हृदयभेदी व सुंदर भाषण केलें त्याची आठवण होऊन मला समाधान वाटत आहे. राजांच्या शासनसंस्थांनीं असल्या अघोर शिक्षा देण्याचे धडे मानवजातीस घालून दिले असले तरी लोकशासित राज्यसंस्थांनीं असल्या सूडाच्या व जुलमी कृत्यांचें अनुकरण करूं नये. ज्याप्रमाणें राजाची संस्था नष्ट करण्याचा पहिला मान सर्व युरोपियन राष्ट्रांत फ्रान्सनें मिळविला त्याचप्रमाणें मृत्यूची शिक्षा नाहींशी करण्याचा व त्याच्याऐवजीं सौम्य परंतु अधिक परिणामकारक शिक्षा अमलांत आणण्याचा पहिला मान फ्रान्सनें मिळवावा. ”

फ्रेंच कन्व्हेन्शनमध्यें नेमस्त (Girondists) व जहाल (jacobins) असे दोन पक्ष होते. पैकीं राजाचे प्राण घेण्यास जहाल पक्ष फार उतावीळ झाला होता. राबिस्पिअर हा जहाल पक्षाचा पुढारी होता व कांहीं दिवसांपूर्वीं (फ्रान्सच्या) लोकसभेमध्यें त्यानें ‘मृत्यूची शिक्षा’ बंद करण्याची सूचना आणून त्यासंबंधीं मोठ्या आवेशाचें भाषण केलें होतें. त्या भाषणाचा व प्रसंगाचा आधार घेऊन वरील पत्रांत पेननें राजाचे प्राण वांचविण्याबद्दल बुद्धिवाद केला आहे. या पत्राचा बराच परिणाम झाला. अद्यापपर्यंत राबिस्पिअर व सैतानी मनाचा मारात हे अद्याप फारसे बिघडले नव्हते. परंतु जहाल पक्षांतील अल्लड तरुणांचीं मनें इतकीं भडकलीं होतीं कीं, ते रोजच्या रोज लोकमताची क्षुब्धता (लुईच्याविरुद्ध) सारखी वाढवीत सुटले होते. यामुळें राजाचें प्राणरक्षण करण्याबद्दल मत देणें धोक्याचें होत चाललें होतें. दंडुक्याच्या जोरावर ह्या प्रश्नाचा निकाल लावण्याचें ह्या भकलेल्या लोकांनीं अवसान घातल्यामुळें नेमस्त पक्षाच्या पुढाऱ्यांची गाळण

उडून गेली. तथापि पेननें अखेरपर्यंत धीर सोडला नाहीं. त्याच्या पक्षाच्या बहुतेक पुढाऱ्यांनीं भीतिवश होऊन राजाला मृत्यूची शिक्षा देण्याबद्दल आपलें मत दिलें व कित्येकांनीं त्या मतास 'दये'ची पुरवणी जोडली परंतु असल्या अर्धवट कृतीचा कांहींएक उपयोग होण्यासारखा नव्हता. पेनचा सहाध्यायी साईस यानें देखील मृत्यूच्या शिक्षेच्या बाजूचें मत दिलें. परंतु पेनवर जेव्हां मत देण्याची पाळी आली तेव्हां त्यानें फ्रेंच भाषेंत तयार केलेलें आपलें स्पष्ट मत पुढीलप्रमाणें दिलें:–" युद्ध संपेपर्यंत लुईला या देशांत ठेवण्याविषयीं व नंतर त्यास कायमचा हद्दपार करण्याविषयीं मी आपलें मत देतों." पेनप्रमाणेंच त्याच्या पक्षाच्या इतर पुढाऱ्यांनीं जर धैर्य दाखविलें असतें तर त्याचा हेतु कदाचित् सिद्धीस गेला असता. कारण मतांची गणति करतांना असें आढळून आलें कीं, केवळ २५ मतांच्या बहुमतानें लुईस देहांतशासन देण्याचा ठराव पास झाला ! याप्रमाणें जहालांचा विजय होतांच त्यांना अधिक चेव आला व ही शिक्षा ताबडतोब अंमलांत आणण्याची त्यांनीं मागणी सुरू केली ! पेननें ह्या शिक्षेची अंमलबजावणी लांबणीवर टाकण्याची सूचना केली. ह्या प्रश्नावर दुसरे दिवशीं वादविवाद करण्याचें ठरलें. जॅकोबिन्स पक्षाच्या लोकांना इतर नेमस्तांचीं तोंडें सहज बंद करतां आलीं; परंतु पेनचें तोंड बंद करण्याचें काम फार दुर्घट होतें. लोकसत्ताक राज्यपद्धतीचा तो उत्पादक असल्यामुळें त्याजवर राजसत्तावादित्वाचा आरोप लादणें अशक्य होतें. तथापि काय पाहिजे ती युक्ति योजून त्याचें तोंड बंद करावयाचेंच असा आतां खुद्द मारात (जहालांचा एक पुढारी) यानेंच निश्चय केला होता. दुसरे दिवशीं पेन जेव्हां बोलावयास उठला तेव्हां मारात यानें मध्येंच उठून असें सांगितलें कीं, 'पेन हा क्वेकर पंथाचा असल्यामुळें या प्रश्नावर मत देण्यास तो नालायक आहे.' इतकें बोलून, तो खालीं बसला व जहालांच्या कंपूत गडबड सुरू झाली व पेनच्या भाषणास व्यत्यय येऊं लागला. परंतु 'भाषणस्वातंत्र्याच्या हक्काची' आठवण पेननें त्यास वरचेवर दिल्यामुळें गडबड बंद झाली व त्याचें भाषण सुरू झालें. त्यांतील सारांश असा:–

" कन्व्हेन्शननें राजाच्या शिक्षेसंबंधानें काल केलेल्या ठरावाबद्दल मला फार वाईट वाटतें. स्वातंत्र्याच्या चळवळीसंबंधानें माझा अनुभव

तुमच्यापेक्षां अधिक आहे. आज सुमारें २० वर्षेपर्यंत मी ती चळवळ करीत आलों आहें.आणि या सर्व काळांत स्वातंत्र्य व मानुष्य यांस साजेल अशीच भाषा मी वापरीत आलों आहें. कोणत्याही परिस्थितींत ह्या दोन तत्त्वांचें एकीकरण करण्यासारखी राष्ट्रांना दुसरी कोणतीही भूषणास्पद गोष्ट नाहीं. फ्रान्स व विशेषतः पॅरिस येथील लोकांचीं मनें त्यांच्या भोंवतालच्या भयंकर परिस्थितीमुळें अतिशय तप्त व क्षुब्ध झालेलीं आहेत; परंतु ज्यावेळीं ही स्थिति नाहींशी झाली असेल अशा भविष्य काळाकडे जर आपण नजर फेंकली तर आज जें कृत्य न्यायाचें दिसत आहे तें त्यावेळीं सुडाचें द्योतक असलेलें दिसून येईल. फ्रान्सच्या कार्याविषयीं मला जी कळकळ वाटते तीच यावेळीं त्याच्या अब्रू-विषयीं माझ्या पोटांत धास्ती उत्पन्न करीत आहे. ×××× हें कन्व्हेन्शन फार थोड्या मुदतीकरितां नेमलेलें आहे. त्याच्या हातून कॉन्स्टिट्यूशन-चें काम पूर्ण झाल्यावर पुढें नवीन निवडणूक होईल व त्यावेळीं या प्रश्नाचा निकाल लावतां येईल. या कन्व्हेन्शनचें आयुष्य फार थोडें असल्यामुळें आपल्या जागीं येणाऱ्या भावी नागरिकांचा मार्ग जेणें-करून बिकट होईल अशी कोणतीही गोष्ट आपण करूं नये हेंच उचित आहे.×××फ्रान्सला सध्यां उपयोगी पडणारा असा एकच मित्र आहे आणि तो अमेरिकन राष्ट्र हें होय. लुईच्या देहांतशासनानें त्या राष्ट्राला अतिशय दुःख होईल हें मी खात्रीपूर्वक सांगतों. कारण अमेरिकेच्या संकट प्रसंगीं तिला मदत केली असल्यामुळें ती फ्रान्सला आपला मित्र मानते. जर मला फ्रेंच भाषा येत असती तर राजाला क्षमा करण्याबद्दल अमेरिकेच्या वतीनें मी आपला अर्जदार बनलों असतों."

पेननें हें भाषण इंग्रजींत केलें व त्याचें तेथील दुभाष्यानें फ्रेंच भाषांतर करून सांगितल्यावर बरीच गडबड उडाली. मारात यानें तर हें भाषांतर चुकीच आहे म्हणून ओरड करण्यास सुरवात केली. त्यास दुसऱ्या एकानें तें बरोबर आहे म्हणून उत्तर दिलें. कांहीं वेळानें गडबड जेव्हां थांबली तेव्हां कन्व्हेन्शनच्या कारकुनानें लुईची शिक्षा तहकूब करून अमेरिकेच्या प्रेमाखातर

आपण तसें केलें आहे असें एका वकिलामार्फत त्या राष्ट्रास कळवावें अशी पेनची इच्छा असल्याचें सांगितलें. हें ऐकतांच मारात फार चिडला व पेन क्वेकर पंथाचा असल्यामुळें असें बोलला आहे असें त्यानें ओरडून सांगितलें. तेव्हां 'राजकीय व नैतिक या दोन्ही दृष्टींनें मीं देहांतशासनाविरुद्ध मत दिलें आहे' असें पेननें त्यास उत्तर दिलें. पेनचें धैर्य पाहून त्याचा मित्र ब्रिझो हाही आतां त्यास मदत करण्यास तयार झाला होता व त्याच्या उपरोक्त भाषणानें इतरांचींही मनें त्याच्या बाजूकडे वळलीं होतीं. अशा स्थितींत जर त्या प्रश्नावर मतें घेतलीं असतीं तर पेनच्या बाजूस बहुमत पडून लुईचे प्राण वांचले असते. पण मारात व त्याचे अनुयायी यांनीं आपली सैतानी इच्छा तृप्त करण्याचा जणुं काय विडाच उचललेला असल्यामुळें हरएक प्रयत्न करून त्यांनीं ह्या प्रश्नावर मतें घेण्याचें काम दुसऱ्या दिवसावर घालविलें. दुसऱ्या दिवशीं ह्या निहिलिस्ट लोकांनीं कन्व्हेन्शनच्या सभागृहाभोंवतीं गुंड जमवून दंग्याची पूर्वतयारी करून ठेविली. या दिवशीं लोकमत फारच क्षुब्ध झालें होतें. अशा स्थितींत कन्व्हेन्शनचें काम शांतपणें पार पडणार नाहीं असें समजून व अंशतः भीतीमुळें ५०० सभासद गैरहजर राहिले. राजाच्या शिक्षेसंबंधानें मतें घेतलीं तेव्हां फक्त ६९० सभासद हजर होते. यांत अर्थातच मारातचे अनुयायीच फार होते, सबब मतें घेतलीं तेव्हां ७० मतांच्या बहुमतानें लुईला देहांतशासन करण्याचा ठराव पास झाला ! याप्रमाणें पेनचे सर्व प्रयत्न विफल होऊन फ्रान्सांत चालू असलेल्या स्वातंत्र्याच्या पवित्र चळवळीस डाग लागला व त्यानंतर ती दिवसानुदिवस अधिकाधिक भ्रष्ट होत गेली. ती इतकी कीं, अखेरीस पेनला तिचा वीट येऊन त्याचें अंतःकरण विदीर्ण होऊन गेलें ! तें कसें यासंबंधींचा हृदयद्रावक वृत्तांत पुढील प्रकरणांत देऊं.

प्रकरण ११ वें

महापुरांत वादळ !

राजाच्या शिक्षेसंबंधानें जॉकोबिन (ज्वलत्-जहाल) पक्षानें जरी जय मिळविला तरी राष्ट्रामध्यें व कन्व्हेन्शनमध्यें अद्याप त्यांचें कायमचें वर्चस्व झालेलें नव्हतें. राजाच्या शिक्षेसंबंधीचा जय तरी त्यांनीं धमक्या व दंडेली यांच्या जोरावर व अंशतः जनतेच्या राजाविरुद्ध खवळलेल्या मनोवृत्तीचा फायदा घेऊन मिळविला होता. राजाचा निकाल लावण्याचें ठरल्यावर पुन्हा लोकमत अंमळ शांत झालें व राजा फांशीं जाणार याबद्दलही कित्येकांस वाईट वाटूं लागलें. लोकांच्या मनांत सुरू झालेल्या ह्या प्रतिक्रियेचा जोर हळुहळू इतका वाढूं लागला कीं, त्याचा फायदा राजाला मिळतो कीं काय अशी भीति वाटून तो थांबविण्याचे प्रयत्न जॉकोबिन पक्षाला करावे लागले. व ते करून त्यांनीं एकदांची लुईच्या आत्म्याला गती दिली! दुर्दैवी लुईचा याप्रमाणें शेवट झालेला पाहून पेनला फार वाईट वाटलें; पण त्यामुळें तो कर्तव्यपराङ्मुख मात्र झाला नाहीं. उलट ह्या अनुभवाचा धडा घेऊन त्यानें राज्यक्रांतीचें पुढील कार्य निर्दोष व निष्कलंक होण्याविषयीं प्रयत्न सुरू केले. असें करण्याचा पहिला मार्ग म्हटला म्हणजे कॉन्स्टिटयूशन (राज्यघटना) लवकर पास करून घेऊन 'कायदेशीर राज्यपद्धति' स्थापन करणें हा होता. म्हणून यापुढें त्यानें आपलें सर्व लक्ष त्या कामाकडे लाविलें. कॉन्स्टिटयूशनचा मसुदा तयार करण्याकरितां कन्व्हेन्शनकडून एका कमेटीची नेमणूक झाल्याचें वृत्त वाचकांस माहित आहेच. ह्या कमिटींत पेन होता हेंही वाचकांच्या स्मरणांतून गेलें नसेलच. सदर कमिटीनें आपलें काम १७९३ च्या हिंवाळ्यांत पुरें केलें. व ता० १५ फेब्रुवारी रोजीं कॉन्स्टिटयूशनचा मसुदा—खर्डा—कन्व्हेन्शनपुढें वादविवादाकरितां मांडण्यांत आला. परंतु त्यावेळीं जिरॉंदिस व जॉकोबिन (प्रागतिक व ज्वलत् जहाल) या दोन पक्षांमध्यें द्वंद्व सुरू झालें असल्यामुळें ह्या मसुद्याची तपासणी व त्यावरील वादविवाद तहकूब ठेवण्यांत आला.

तथापि त्याच्या छापील प्रती सर्व सभासदांस वांटण्यांत आल्या. ह्या मसुद्यावरील वादविवाद तहकूब केल्यानंतर कन्व्हेन्शनच्या कांहीं प्रमुख सभासदांची–राज्यसूत्रचालकांची–एक गुप्त बैठक त्या रात्रीं भरली होती व त्या बैठकींत सदर मसुदा नापसंत ठरविण्यांत आला. ज्वलत्-जहाल पक्षाचा पुढारी रॉबिस्पियर व त्याचा साथिदार कौथन ह्यांची नेमणूक 'कॉन्स्टिटयूशन कमिटींत' न केल्यामुळें हे लोक व त्यांचा पक्ष ह्यांच्या मनामध्यें असंतोष माजून राहिला होता. ह्या असंतोषास पुढें उग्र स्वरूप येत जाऊन अखेरीस व्यक्तिद्वेषांत त्याचें पर्यवसान झालें. उपरोक्त दोन पुढाऱ्यांनीं, 'पेन–कांदरसेत' कमिटीनें तयार केलेला कॉन्स्टिटयूशनचा मसुदा वादविवादाकरितां पुढें येऊं द्यावयाचा नाहीं व आलाच तर पास होऊं द्यावयाचा नाहीं, असा निश्चय केला. हा निश्चय गुप्त ठेवण्यांत आला होता. प्रागतिकपक्षानें सदर मसुदा कन्व्हेन्शनपुढें पुन्हा ता. १ मार्च रोजीं चर्चेकरितां मांडला. ह्या दिवशीं कन्व्हेन्शनपुढें त्या मसुद्याचें पहिलें वाचन झालें व त्यावरील वादविवादाकरितां १५ एप्रिल ही तारीख नेमण्यांत आली. हें पाहून जहाल पक्षाचें प्रागतिकांवर उघडपणें दोषारोप करून त्यांचा पाडाव करण्याचा निश्चय केला. १५ एप्रिल रोजीं जेव्हां कन्व्हेन्शनची बैठक कॉन्स्टिटयूशनसंबंधीं वादविवाद करण्याकरितां भरली तेव्हां पॅरिसच्या मेयरनें जिरांदिस (प्रागतिक) पक्षाच्या बावीस पुढाऱ्यांवर देशद्रोहात्मक आरोप ठेवून त्यांस पकडण्याविषयीं शहरांतील पस्तीस विभागांच्या स्थानिक पंचायतींतर्फे एक अर्ज सादर केला. ह्या बावीस पुढाऱ्यांच्या मालिकेंत कॉन्स्टिटयूशन कमेटीचे मुख्य पांच व साहाय्यक दोन असे एकंदर सात सभासद होते. हा अर्ज पुढें येतांच अगोदर त्याचा विचार व्हावा व तोंपर्यंत कॉन्स्टिटयूशनसंबंधीं वादविवाद तहकूब करावा अशी जॅकोबिन पक्षाच्या लोकांनीं सूचना केली. शिवाय ह्या सुमारास त्यांचा पुढारी मारात याजवर खटला सुरू असल्यामुळें त्याचा निकाल होईपर्यंत कॉन्स्टिटयूशनसंबंधीं चर्चा होतां कामा नये असेंही त्यांनीं बजावलें. परंतु त्यांच्या ह्या विरोधाचा कांहींएक उपयोग न होतां कन्व्हेन्शननें मेयरचा सदर अर्ज व कॉन्स्टिटयूशनचा मसुदा ह्या दोन्ही बाबींवर बरोबरच वादविवाद सुरू केला. हा वादविवाद दोन दिवस

चालला व अखेरीस ह्या दोन्ही बाबींचा निकाल जॅकोबिन्स पक्षाच्या इच्छे-विरुद्ध झाला. कन्व्हेन्शननें मेयरचा अर्ज 'निंद्य' समजून त्यास परत केला व कॉन्स्टिटयूशनचा मसुदा पसंत ठरविला. ह्या पराभवामुळें राबिस्पियर फार चिडला. तथापि त्यानें आपला राग बाहेर न दाखवितां कॉन्टिटयूशन-संबंधीं अखेरचा ठराव करण्याचें काम मोठ्या खुबीनें लांबणीवर टाकविलें. 'कॉन्स्टिटयूशन पास करून तिचा अंमल करण्यापूर्वी आपल्या हक्कांच्या जाहिरनाम्याची*(Declaration of Rights)चर्चा करून त्यास निश्चित

---

* हा हक्कांचा जाहिरनामाही पेन व कॉंदरसेत यांनींच तयार केला होता व तो कॉंदरसेत यानें कॉन्स्टिटयूशनबरोबरच कन्व्हेन्शनला सादर केला होता. यामुळें त्याजवर चर्चा करण्यासंबंधींची रॉबिस्पियरची सूचना जिरॉंदिस (प्रागतिक) पक्षासही अमान्य करतां येण्यासारखी नव्हती. सदर जाहिरनाम्यांत पुढील कलमांचा समावेश करण्यांत आलेला होता:–

(१) मनुष्यांनीं एकत्र होऊन समाजस्थापना करण्याचें मुख्य कार्य, त्यांच्या स्वाभाविक अशा राजकीय व सामाजिक हक्कांचें संरक्षण करणें हें असून त्यांच्या आधारावरच समाजबंधनांची इमारत उभारली पाहिजे. जी कान्स्टिटयूशन ह्या हक्कांचें संरक्षण करिते तिच्या रचनेपूर्वी ह्या हक्कांचें अस्तित्व जाहीर करणें जरूर आहे.

(२) स्वातंत्र्य, समता, सुरक्षितपणा, मालमत्तेचें व सामाजिक संरक्षण, आणि जुलमांचा प्रतिकार करणें, हे मनुष्याचे स्वाभाविक राजकीय व सामाजिक हक्क आहेत.

(३) जेणेंकरून दुसऱ्यांच्या हक्कांची पायमल्ली होणार नाहीं तें वर्तन हें स्वातंत्र्य होय. प्रत्येकाला बिनधोकपणें आपल्या स्वाभाविक हक्कांचा उपभोग घेतां आला पाहिजे.

(४) स्वातंत्र्याचें रक्षण कायद्यावर अवलंबून असतें. कायदा म्हणजे सर्व जनसमूहाच्या इच्छाशक्तीचें व्यक्त स्वरूपच होय (म्हणजे त्यांच्या इच्छेवरूनच तो ठरतो). कायद्यानें जें कृत्य मना केलें नसेल तें केल्याबद्दल कोणास दोष देतां येणार नाहीं.

(५) प्रत्येक मनुष्यास आपले विचार व मतें व्यक्त–प्रसिद्ध करण्याची मोकळीक आहे.

स्वरूप देणें जरूर आहे' असा उपक्रम करून त्यानें कन्व्हेन्शनचें चित्त द्विधा केलें व अखेरीस त्याची सदर सूचना तर्कशास्त्रास अनुसरून असल्यामुळें पसार झाली. आणि अशा प्रकारें कॉन्स्टिटयूशनचा प्रश्न फिरून एकवार मागें पडला.

रॉबिस्पियर, मारात व जॅकोबिन पक्षाचे बहुतेक लोक यांचा आतां असा विचार ठरला होता कीं, फ्रान्समध्यें तूर्त नवीन शासनपद्धति स्थापन न करितां सर्व राज्यसूत्रें कन्व्हेन्शनमार्फतच-(चाललीं होतीं तशींच) चालवावींत. कारण कन्व्हेन्शनच्या द्वारें त्यांस अनियंत्रित सत्ता गाजविण्यास अवसर मिळत असे, तो कॉन्स्टिटयूशनच्या आधारें स्थापन होणाऱ्या शासनपद्धतींत मिळण्याचा संभव नव्हता. किंबहुना, अशा प्रकारची शासनपद्धति स्थापन झाल्यास आपल्या पक्षाच्या बहुतेक लोकांना अधिकारभ्रष्ट होऊन घरचा मार्ग धरावा लागेल अशीही ह्या लोकांस भीति वाटत होती. आणि वास्तव रॉबिस्पियर, मारात वगैरे (जलाल) जॅकोबिन पक्षाच्या पुढाऱ्यांनीं कॉन्स्टिटयूशन अमलांत आणण्याचे कामांत नानाप्रकारचे अडथळे उपस्थित करण्याचा निश्चय केला. त्यांच्या सुदैवानें त्यांना एक-लोकांच्या मनावर ज्याबद्दल विशेष परिणाम घडवून आणतां

---

(६) छापखान्याचें (व मतप्रदर्शनाचें अन्य साधन यांचें), वाणीचें स्वातंत्र्य नष्ट अगर मर्यादित करतां कामा नये.

(७) एकाच प्रकारच्या हक्कांचा सर्वांनीं सारखा उपभोग घेण्यांतच समतातत्त्व आहे.

(८) शिक्षा, प्रतिबंध, बक्षीस या सर्व बाबतींत कायद्याची दृष्टि सर्वांवर सारखीच असावी.

(९) सर्व नागरिकांना सर्व प्रकारच्या सरकारी नोकऱ्या, अधिकार व कामगिरी मिळविण्याचा सारखाच हक्क आहे. सद्‌गुण व योग्यता यांवांचून ह्या प्रकारच्या कामीं दुसरी कोणतीही कसोटी स्वतंत्र लोक ओळखत नाहींत.

(१०) कायद्यानें नमूद केलेल्या बाबींखेरीज करून इतर कोणत्याही वेळीं व कोणत्याही कारणावरून कोणावर आरोप करणें, त्यास पकडणें व प्रतिबंधांत ठेवणें इत्यादि क्रिया करतां कामा नयेत.

येईल असें व्यंग पेन–काँदरसेत यांनीं तयार केलेल्या कॉन्स्टिटयूशनमध्यें सांपडलें! ह्या कॉन्स्टिटयूशनमध्यें परमेश्वराचा नामानिर्देश करण्यांत आलेला नव्हता. रॉबिस्पियरनें त्यांतील हें व्यंग दाखवून त्यावरच खूप आकांडतांडव माजविलें. त्याच्या अनुयायांनींही त्याबद्दल कल्लोळ करून सोडला. तेव्हां सदर कॉन्स्टिटयूशनमध्यें 'परमेश्वराच्या कृपेनें' वगैरे शब्द घालून योग्य ती दुरुस्ती करण्याकरितां पुन्हा एका कमिटीची नेमणूक करण्यांत आली. ह्या कमिटींत जॅकोबिन पक्षाचे बरेच लोक नेमण्यांत आले. याच सुमारास मारात याजवरील खटल्याचा निकाल होऊन तो दोषमुक्त ठरला. त्यामुळें जिराँदिस पक्षाचें (प्रागतिकांचें) धाबें दणाणून गेलें. मारात हा सैतानी स्वभावाचा–दुष्ट, खुनशी–मनुष्य होता. त्याजवर जिराँदिस पक्षानें रास्त असे दोषारोप केलेले होते; परंतु पॅरिस येथें जॅकोबिन पक्षाचें प्राबल्य दिवसेंदिवस वाढत गेल्यामुळें 'क्रांतिप्रवर्तक न्यायमंडळा'वरही त्यांचा शह बसला आणि त्याच कारणामुळें मारात दोषमुक्त होऊन सुटला. मारातचा परदेशस्थ लोकांवर फार मोठा कटाक्ष होता. त्यांचे हाल-हाल करून त्यांस मारावें असे उद्गार त्यानें काढलेले होते. पेन हा परदेशस्थ असल्यामुळें त्याचे प्राण घेण्याचाही विचार मारातच्या मनांत आला असें त्यावेळीं घडलेल्या एका गोष्टीवरून दिसून येतें. तो इंग्लंडमध्यें असतांना जॉन्सन ह्या नांवाच्या एका श्रीमंत इंग्रज गृहस्थाबरोबर त्याची मैत्री जडली होती. तो जेव्हां फ्रान्समध्यें आला तेव्हां त्याच्याबरोबर तोही आला. पेनवर त्याची अत्यंत दृढ भक्ति होती. व पॅरिस येथें तो त्याच्या घरींच रहात असे. मारातच्या मनांतून पेनचा प्राण घ्यावयाचा आहे असें त्यास समजतांच त्यानें आत्महत्या करण्याचा निश्चय केला व स्वतःवर दोन गोळ्या झाडल्या. तिसरी झाडणार, इतक्यांत कोणी माणूस तेथें आला व त्यानें त्यास आवरून धरलें व पुढें पेननें त्याचें प्राणसंरक्षण केलें. हें कृत्य झाल्यानंतर लवकरच (ता० १६ एप्रिल) पॅरिस येथील 'ला पेत्रियत' नामक वर्तमानपत्रांत त्याची हकीकत प्रसिद्ध झाली व त्यांत, जान्सननें आत्महत्येचा प्रयत्न करण्यापूर्वीं लिहून ठेवलेलें पत्रही प्रसिद्ध झालें. त्या पत्रांत जान्सननें पुढील उद्गार काढले आहेत:—"स्वतंत्रतेचा उपभोग घेण्याकरितां मी फ्रान्समध्यें आलों;

परंतु मारातनें तिचा खून केलेला दिसत आहे. अनियंत्रित–जुलमी–राजसत्तेपेक्षां अराजकपणा अतिशय क्रूर आहे. बुद्धिमत्ता व सद्गुण यांवर दुर्गुण व अमानुषता यांचा वरचष्मा झाल्याचा हा खेदजनक देखावा सहन करवत नाहीं." जान्सनच्या ह्या उद्गारांवरून तत्कालीन जॅकोबिन पक्षाच्या राजकीय हालचालींचा वाचकांस चांगला अंदाज करितां येईल.

तारीख २० एप्रिल रोजीं कन्व्हेन्शनमध्यें जॅकोबिन पक्षाचें वर्चस्व होऊन जिराँदिस पक्षाच्या बावीस पुढाऱ्यांना पकडण्याविषयींचा पूर्वोक्त अर्ज फिरून कन्व्हेन्शन पुढें मांडण्यांत आला व तो मंजूरही करण्यांत आला! हा अर्ज मंजूर झाल्यावर मात्र पेनची निराशा झाली. अमेरिकेप्रमाणेंच युरोपखंडामध्येंही एक नमुनेदार लोकसत्ताक राज्य स्थापन करावें ह्या हेतूनेंच तो फ्रान्सच्या राज्यक्रांतीच्या चळवळींत पडला होता; परंतु जॅकोबिन पक्षांतील लोकांच्या आसुरी वर्तनामुळें त्या क्रांतीस जेव्हां वर सांगितल्याप्रमाणें अनीतीचें, क्रौर्याचें–खुनशीपणाचें–स्वरूप प्राप्त होऊं लागलें तेव्हां साहजिकच त्याच्या आशेचा भंग होऊन त्याचें मन उदास व अंतःकरण विदीर्ण झालें! ह्यावेळीं त्याच्या मनाची काय स्थिति झाली होती हें त्यानें त्यावेळीं जेफर्सन यास पाठविलेल्या पुढील पत्रावरून वाचकांच्या ध्यानांत येईल:–

"२० एप्रिल १७९३.

"प्रिय मित्र, ××× आम्ही सध्यां विलक्षण संकटांत आहोंत. आणि त्याबद्दलचा दोष येथील लोकांकडे बराच येतो. ड्युमेरिझ* हा अंशतः मूर्खपणामुळें व अंशतः जॅकोबिन पक्षानें केलेल्या छळामुळें शत्रुपक्षास जाऊन मिळाला आहे. जॅकोबिन लोक हे दूरदर्शित्व व नीति ह्यांस सोडून वर्तन करीत आहेत. ××× राज्यक्रांति प्रथम ज्या तत्त्वांवर सुरू झाली त्याच तत्त्वांवर जर ती अखेरपर्यंत चालली असती तर युरोपखंडामध्यें–त्यांतील बऱ्याच मोठ्या भागास–स्वतंत्रतेचा लाभ करून देतां आला असता. परंतु आतां मी ती आशा सोडून देत आहें. ××× ज्याअर्थी सर्वसाधारण स्वातंत्र्याच्या

* हा फ्रेंच क्रांतिपक्षाचा सेनापति होता. तो मोठा देशभक्त असून प्रागतिक मताचा होता; परंतु कांहींसा दुर्बल मनाचा होता.

नाड्या आंखडूं लागलेल्या दिसत आहेत. त्याअर्थीं मी आतां परत घरीं (अमेरिकेस) येण्याचा विचार करीत आहें. कॉन्स्टिटयूशनचें अखेर काय होतें तें पाहून मग मी युरोपखंडाची कायमची रजा घेणार आहें.

" थॉमस पेन "

हें पत्र लिहिल्यानंतर चारच दिवसांनीं मारात याची लोकांनीं (mob) देवाप्रमाणें पूजा केली. त्यानें त्यांचा अधिपति होऊन सर्वाधिकार गाजविण्याची इच्छा प्रदर्शित केली व लोकांनीं त्याचा जयजयकार करून त्यास रुकार दिला !!! अज्ञजनसमूहाचीं मनें चळवळीच्या वेळीं पाहिजे तशीं कशीं वळविलीं जातात व स्वैरपणें तीं किती व कशीं भकतात ह्याचें हें एक ठळक उदाहरण आहे. मानवजातीच्या दुर्दैवानें अशा प्रकारचीं अनेक उदाहरणें फ्रेंच राज्यक्रांतींत घडून आलीं आणि त्याच कारणामुळें लोकस्वातंत्र्याप्रीत्यर्थ सुरू झालेल्या ह्या क्रांतीचें अखेर पर्यवसान नेपोलियनच्या अनियंत्रित राज्यसत्तेंत (Dictatorship) झालें ! 'स्वातंत्र्य, समता, भ्रातृभाव' इत्यादि शब्दांची गर्जना ह्या क्रांतीच्या चळवळींत जितकी होत होती तितकी जगांतील दुसऱ्या कोणत्याही देशांतील क्रांतींत झालेली नाहीं; परंतु त्याबरोबरच हेंहीं लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, वरील शब्दांच्या द्वारें व्यक्त होणाऱ्या उदात्त भावना पायाखालीं तुडविणारीं अत्याचाराचीं कृत्येंही ह्याच राज्यक्रांतींत मनस्वी झालेलीं आहेत. तेव्हां ज्या कोणास ह्या क्रांतीचें अथवा त्यांतील उपरोक्त शब्दांच्या गर्जनेचें कौतुक करावेंसें वाटेल त्यानें त्यास काळिमा आणणाऱ्या अनिष्ट कृत्यांचाही विचार केला पाहिजे. असो; जॅकोबिन पक्षाचें वर्चस्व वाढून जेव्हां त्याच्या हातून अनिष्ट व विघातक अशीं कृत्यें होऊं लागलीं तेव्हां पेननें त्या पक्षाचा एक पुढारी दँतन यास पुढीलप्रमाणें पत्र लिहिलें:—

"पॅरिस, ६ मे १७९३.

" सिटिझन दँतन,

"ज्याअर्थीं तुम्हाला इंग्रजी वाचतां येतें त्याअर्थीं मी हें पत्र भाषांतरकाराच्या हातीं दिल्याशिवाय तसेंच तुम्हांकडे पाठवीत आहें. सध्यां आपल्यामध्यें मतभेद, मत्सर, असंतोष, अस्वस्थता वगैरे जे प्रकार

माजून राहिले आहेत त्यांमुळें माझें चित्त गोंधळून गेलें आहे. जर हे प्रकार असेच चालू राहिले तर ते लोकसत्ताक राज्याचा नाश व अपकीर्ति करण्यास कारण होतील. जेव्हां इ० स० १७८७ मध्यें मीं अमेरिका सोडली तेव्हां त्याच्या पुढील वर्षी तेथें परत जाण्याचा माझा विचार होता; परंतु फ्रेंच राज्यक्रांतीमुळें, स्वातंत्र्य व भ्रातृभाव यांचा युरोपांत प्रवेश करून देण्याची संधी लाभेल ह्या आशेनें मी सहा वर्षांहूनही अधिक कालपर्यंत येथें राहिलों. पण आतां सदर आशेचा भंग होत आहे; माझा आशाभंग परराष्ट्रांच्या हल्ल्यामुळें अथवा बडे लोक व पाद्री यांच्या अनिष्ट गुप्त कारस्थानांमुळें होत आहे असें नाहीं, तर राज्यक्रांतीचा अंतर्गत कारभार चालवितांना जें निंद्य आचरण करण्यांत येत आहे तेंच माझ्या आशाभंगाचें कारण आहे. ××× कॉन्स्टिटयूशन अमलांत येतांच मी अमेरिकेस परत जाणार; आणि यापुढें फ्रान्सचें वैभव कितीही वाढो तें ऐकून समाधान मानण्यापलीकडे त्याचा मला कांहीं उपयोग करून घेतां येणार नाहीं. परंतु अशी स्थिति प्राप्त होईपर्यंत मध्यंतरीं सध्यां जो अनिष्ट प्रकार चालला आहे व नैतिक तत्त्वें झुगारून देण्याकडे जी लोकांच्या मनाची प्रवृत्ति होत चालली आहे; त्याबद्दल माझें मन फार उद्विग्न होत आहे. ह्या असल्याच गोष्टींनीं राज्यक्रांतीची हानि होते व त्याच स्वातंत्र्याच्या चळवळीच्या प्रगतीस अडथळा उत्पन्न करितात. एकमेकांवर तुटून पडण्याची जी प्रवृत्ति सध्यां वाढत चालली आहे तिला कांहींतरी मर्यादा असणें जरूर आहे. जर प्रत्येक व्यक्ति आपला खाजगी द्वेष उगविण्याकरितां अगर स्वतःची खाजगी महत्त्वाकांक्षा पूर्ण करण्याकरितां दुसऱ्यावर हवें तसें तोंडसुख घेऊं लागेल अथवा पुराव्याशिवाय दोषारोप करूं लागेल तर सर्वत्र अविश्वास मात्र उत्पन्न होईल व सर्व सत्तेचा लय होईल. निंदा हा एक विश्वासघाताचाच प्रकार असल्यामुळें विश्वासघाताच्या इतर प्रकाराप्रमाणेंच त्याबद्दलही शासन करणें जरूर आहे. निंदा हा खाजगी स्वरूपाचा दुर्गुण आहे; परंतु त्यापासून सार्वजनिक अहितही होतें. कारण नित्य निंदा केल्यानें ज्या लोकांची प्रवृत्ति असंतुष्टपणाकडे नसते त्यांनाही चीड येऊन ते असंतुष्ट बनतात. याकरितां अंध-

विश्वासाबद्दल जितकी दक्षता बाळगावी लागते तितकीच निराधार अशा दोषारोपाविषयीं–निंदेविषयीं–बाळगणें जरूर असतें. ××× जिरॉंदिस पक्षाच्या ज्या बावीस पुढाऱ्यांवर दोषारोप करण्यांत आले आहेत त्यांच्या नैतिक व राजकीय शीलाविषयींचा निर्णय त्यांजवर दोषारोप करणारांपेक्षां त्यांस निवडून देणाऱ्या परगण्यांतील लोकांस अधिक चांगला करतां येईल. त्या लोकांच्या दृष्टीनें ह्या कृत्यामुळें पॅरिसची किंमत कमी होऊन त्यांच्या इभ्रतीस धक्का बसेल. कारण त्यामुळें कोणत्या प्रकारचे प्रतिनिधि त्यांनीं निवडावे हें त्यांस बजावून सांगितल्याप्रमाणें होणार आहे. कन्व्हेन्शनमध्यें माझ्या परिचयाचे जे लोक आहेत ते बहुतेक ह्या मालिकेंत (बावीस लोकांच्या) आहेत. आणि त्यांच्याइतके चांगले–भले व देशभक्त–दुसरे नाहींत हें मला ठाऊक आहे.

"मारात ह्यालाही मीं आजच एक पत्र पाठविलें आहे, वाटल्यास तो तें तुम्हास दाखवील."

"थॉमस पेन"

वरील पत्रांत उल्लेखिलेलें मारातचें पत्र अद्याप उपलब्ध झालेलें नाहीं. तथापि एवढें खरें कीं, तें पत्र पोचल्यानंतर म्हणजे वरील पत्राच्या तारखेनंतर मारातनें पेनला उपसर्ग देण्याचें सोडून दिलें. यावरून पेनच्या पत्राचा त्याजवर कांहींतरी विलक्षण परिणाम झाला असावा असें दिसतें. तारीख २ जून रोजीं जिरॉंदिस पक्षाचे बावीस पुढारी पकडण्यांत आले. परंतु पेन व त्याचा मित्र आणि सहकारी कॉंदरसेत ह्या दोघांच्या कोणी वाटेस गेलें नाहीं; इतकेंच नव्हे, तर पेनच्या पुस्तकांचीं फ्रेंच भाषेंत भाषांतरें करणारा लॅंथनस याचें नांवही मारातच्या सूचनेवरून अपराध्यांच्या यादींतून काढून टाकण्यांत आलें. त्यानंतर मारात याचेंही कन्व्हेन्शनमधून उच्चाटन करण्याचा जॅकोबिन्स लोकांनीं प्रयत्न चालविला. तारीख ७ जून रोजीं रॉबिस्पियर यानें परदेशस्थ लोकांसंबंधीं कडक कायदा करण्याची मागणी (कन्व्हेन्शनला) केली व लवकरच तशा प्रकारचा एक कायदा पास करण्यांत येऊन त्याअन्वयें राजकीय चळवळीशीं संबंध असणाऱ्या सर्व परदेशस्थांस पकडण्याचा हुकूम सोडण्यांत आला. मात्र हा कायदा

कन्व्हेन्शनचे दोन परस्थ सभासद–पेन व क्लुत्झ–यांस लागू करूं नये असें ठरलें होतें; तथापि त्यापासून त्यांनीं सावध व्हावें अशी मात्र जॅकोबिन पक्षाच्या पुढाऱ्यांची इच्छा होती. व त्याप्रमाणें दँतन यानें पेनला कन्व्हेन्शनमधून गैरहजर राहण्याची सूचनाही खाजगी रीतीनें केली होती. परदेशस्थांसंबंधीं कायदा पास झाल्यानंतर कन्व्हेन्शनमध्यें जॅकोबिन्स लोकांनीं बेलगामी वर्तन करण्यास सुरवात केली. त्यांच्याविरुद्ध जे बोलतील त्यांस त्यांनीं धमक्या व शिव्या देण्याचा उपक्रम सुरू केला व त्यांजवर खटले करण्याचेही प्रयत्न सुरू केले. नवीन कॉन्स्टिटयूशनवर टीका करण्याबद्दल काँदरसेत यासही अशा प्रकारची धमकी देण्यांत आल्यावरून त्याला पळून जाणें भाग पडलें. प्रागतिक पक्षाचे दुसरेही कित्येक प्रमुख लोक पळून गेले. त्यांत ब्रिझो व दचतेल हे पेनचे विद्वान् व समंजस असे मित्र होते. त्याचे अन्य मित्र अगोदरच पकडण्यांत आलेले होते. याप्रमाणें जिरॉंदिस पक्षाची वाताहत सुरू असतां कन्व्हेन्शनमध्यें त्यांच्यातर्फे बोलणारा मुख्यतः पेनच काय तो उरलेला होता. आपल्या नामांकित मित्रांचीं आसनें रिकामीं पडलेलीं असून त्यांच्या समंजस धोरणाचा पुरस्कार करण्याचें काम आपण एकटेच करीत आहों व तें सर्व 'अरण्यरोदनवत्' असेंच होत आहे, असा देखावा पाहून पेनचें अंतःकरण विदीर्ण होत असे. आपल्या मित्रांचे सद्गुण, त्यांचें धोरण व त्याबद्दल उच्छृंखल व भकलेल्या अशा त्यांच्याच देशबंधूंकडून त्यांचा होत असलेला छळ वगैरे गोष्टी त्याच्या डोळ्यांसमोर येऊन त्याचें मन खिन्न व संतप्त करून सोडीत !

प्रकरण १२ वें

आशा व निराशा !

मागील प्रकरणांत सांगितलेल्या गोष्टी घडल्यानंतर लवकरच जॅकोबिन पक्षाचा पुढारी मारात हा मरण पावला. मारात मरण पावतांच पेनच्या मनांत पुन्हा आशेचा अंकुर उत्पन्न झाला. कारण त्याच्यानंतर जॅकोबिन पक्षाचीं सूत्रें दँतन अथवा रॉब्रिस्पियर यांपैकीं कोणातरी एकाच्या हातीं येणार हें तो जाणून होता; व हे दोघेही मारातइतके दुष्ट नव्हते हेंही त्यास माहीत होतें. दँतन हा पेनशीं मित्रभावानेंच वागत होता. शिवाय त्याचीं मतें जरी जहाल होतीं तरी मारातप्रमाणें तो अंतःकरणशून्य (Heartless) नसल्याबद्दल पेनची खात्री होती. त्याचप्रमाणें रॉबिस्पियर—ज्यानें एकवार मृत्यूची शिक्षा अजिबात बंद करण्याची सूचना राष्ट्रसभेपुढें आणली होती,-तो रॉबिस्पियरही निरपराधी लोकांचे व्यर्थ प्राण घेण्याइतकी अमानुषता दाखविणार नाहीं असेंही त्यास वाटत होतें. आणि या सर्व कारणांमुळें त्या दोघांपैकीं कोणीही जरी जॅकोबिन पक्षाचा पुढारी झाला तरी आतां जिरॉंदिस पक्षाच्या बावीस पुढाऱ्यांचे प्राण वांचविणें शक्य आहे असें त्यास वाटूं लागलें. अर्थात् त्याच्या मनांत निराशेनें जी कालवाकालव करून सोडली होती ती नाहींशी होऊन—निदान पुष्कळशी कमी होऊन त्याचे ठायीं भावी स्थितीसंबंधानें फिरून आशांकुर उद्भवला- व पुढें जॅकोब्रिन पक्षाचीं सूत्रें रॉब्रिस्पियरच्या हातीं आल्यावर त्यानें जेव्हां भरसभेंत निष्कारण रक्तपात करण्याच्या प्रवृत्तीचा निषेध केल्याचें पेननें पाहिलें, तेव्हां त्याचा हा आशांकूर अधिक बळावला. यापुढें पेननें औदासिन्य व खिन्नता दूर सारून आपल्या मित्रांचे प्राण वांचविण्याची खटपट जारीनें सुरू केली. पॅरिस येथील अधिकारीवर्गांत त्याचें अद्याप चांगलें वजन होतें व त्याचा उपयोगही तो चांगल्या रीतीनें करीत असे. पॅरिस शहरांत यावेळीं इंग्लंड व अमेरिका येथील प्रख्यात व विद्वान् लोक जमा झालेले होते व त्यांपैकीं बहुतेकांचा पेनशीं स्नेहसंबंध जडलेला होता. कांहीं

तर पेनच्या घरींच रहात होते. पेन ह्यावेळीं मॅडम द पांपेदोर हिच्या जुन्या राजवाड्यांत रहात होता. हा राजवाडा भव्य असून त्याचे सभोंवार एक सुंदर बाग होती. ह्या बागेंत मित्रमंडळीसह गप्पागोष्टी करीत बसण्याचें त्याचें एक स्थान होतें; तेथें त्याचे स्नेही नित्य जमा होत व प्रचलित गोष्टी-संबंधानें चर्चा करीत. त्याचा ह्या ठिकाणचा कार्यक्रम (आयुष्यक्रम) कशा प्रकारचा होता हें त्याचा मित्र रिकमन ह्यानें पुढील शब्दांत नमूद केलें आहे:—

"तो साधारणपणें सात वाजण्याच्या सुमारास निजून उठे. ××× न्याहारी केल्यावर तो बागेंत तास दोन तास आपल्या निवडक स्नेह्यां-बरोबर हिंडत असे. याच ठिकाणीं हिंडतांना त्यानें आपणांस एका विशिष्ट जातीच्या कोळिष्टकाच्या जाळयावरून लोखंडी पुलाची कल्पना कशी सुचली तें सांगितलें, त्यावेळीं त्याच्याजवळ जी मंडळी होती त्यांना त्यावेळच्या सुखकर व आनंददायक कालाची स्मृति नेहमीं होत असे. ह्या मंडळींबरोबर तो आपल्या बालपणच्या गोष्टी बोलत असे; त्यांच्याशीं बुद्धिबळादि अनेक प्रकारचे खेळ खेळत असे व अनेक प्रकारची माहिती व आख्यायिका सांगून त्यांची करमणूक करीत असे. सकाळचें हिंडणें झाल्यावर तो आपल्या बसावयाच्या खोलींत जात असे व तेथें त्याच्याकरितां निरनिराळया प्रकारचे पुष्कळ कागदपत्र त्याची वाट पहात पडलेले असत. ह्या ठिकाणीं तो संध्याकाळपर्यंत आपला वेळ घालवी व नंतर ब्रिझो अगर अशाच कोणातरी निकट स्नेह्याच्या घरीं घटकाभर जाऊन पुन्हा आपल्या घरांतील मंडळींत येऊन मिसळे व त्यांच्याशीं संभाषण करण्यांत वेळ घालवी. त्याचें संभाषण मनोहर, विनोदप्रचुर, मुद्देशीर व माहितीनें भरलेलें असे. शुद्ध व चोख मार्गानें आणि कळकळीनें इतर ठिकाणाप्रमाणेंच फ्रान्समध्येंही त्यानें आपला राजकीय कार्यक्रम चालू ठेविला होता व कोणीं कांहींही म्हटलें तरी त्या क्रमापासून तो कधींही मागें वळला नाहीं."

परदेशस्थ लोकांसंबंधानें कन्व्हेन्शननें कडक कायदा पास केल्यापासून पॅरिस येथील इंग्रज लोकांस विशेष त्रास होऊं लागला होता. अशा लोकांस परदेशांत जाण्यासंबंधीं परवाने (passports) मिळविण्याचें व इतर हरएक

कामीं पेनचा फार उपयोग होत असे. त्याची शिफारस अधिकारीवर्ग मान्य करीत असत व ह्या सुमारास त्यानें पुष्कळ परदेशस्थांना आत्म-संरक्षणाचे कामीं वरील प्रकारानें मदत केली असल्याचे दाखले आहेत.

याप्रमाणें पेनचें कालक्रमण चाललें असतां व आशावादित्वानें फिरून एकवार त्याच्या मनाचा ठाव घेतला असतांना इकडे त्याचा गुप्त शत्रु गव्हर्नर मॉरिस हा गुप्तपणें त्याच्या नाशाची तयारी करीत होता. मॉरिसला पेनचें वर्चस्व बिलकुल खपत नव्हतें. मॉरिस हा जरी अमेरिकेचा कायदे-शीर प्रतिनिधि—वकील होता तरी त्याचा ओढा इंग्लंडकडे व राजाच्या सत्तेकडे असल्यामुळें कन्व्हेन्शनला तो आवडत नव्हता. फ्रेंच लोक पेनलाच मान देत व अमेरिकेशीं स्नेहदर्शक जो व्यवहार करणें असेल तो बहुधा त्याच्या द्वारें करीत. मॉरिसला परत बोलावण्याची सूचनाही फ्रेंच अधिकाऱ्यां-कडून अमेरिकन सरकारास झाली होती; परंतु मॉरिस हा लाघवी असल्या-मुळें व वॉशिंगटन यास इंग्लंडशीं तह करण्याचे कामीं त्याचा उपयोग करून घ्यावयाचा असल्यामुळें फ्रेंचांच्या सदर सूचनेचा फारसा उपयोग झाला नाहीं. शिवाय मॉरिसचा पाताळयंत्रीपणा वॉशिंगटनलाही समजलेला नव्हता. फ्रान्समध्यें असतांना मॉरिस जीं कारस्थानें करीत होता त्याची बरोबर माहिती वॉशिंगटनला देणारा पेनवांचून दुसरा कोणी नव्हता व त्यानें तर लवकरच अमेरिकेला जाण्याचा आपला संकल्प मॉरिसला कळविला होता. तो अमेरिकेस गेल्यास आपलीं सर्व बिंगें तेथील अधिकाऱ्यांस कळतील हें जाणून त्यानें पेनला जिरॉंदिस लोकांच्या सत्रांत स्वाहा करण्याचा बेत योजिला व हें कारस्थान त्यानें इतक्या बेमालुम रीतीनें रचिलें कीं, वाशिंगटन, पेन, जेफर्सन वगैरे पुढाऱ्यांना तें बहुत कालपर्यंत कळलें नाहीं व सुमारें शंभर वर्षेपर्यंत तत्संबंधींचा पुरावा पुढें येऊं शकला नाहीं ! वॉशिंगटन जेफर्सन, फ्रेंच सरकारचा परराष्ट्रीय खात्याचा प्रधान ह्या सर्वांना मॉरिसनें चकविलें. पेनला त्याचा संशय आला व एक दोन पत्रांत तो त्यानें व्यक्तही केला आहे; परंतु मॉरिसच्या पदरीं माप घालण्याजोगा पुरावा त्यास उपलब्ध झाला नाहीं.

संन्याशाकडून साप मारविण्याची युक्ति योजून पेनचा कांटा काढून टाकण्याचा मॉरिसचा विचार ठरला होता. अर्थात् त्यानें फ्रेंच अधिकारी व

पुढारी लोकांतील त्याचें वजन नष्ट करण्याचे उपाय सुरू केले. पेन जिरॉंदिस पुढाऱ्यांची बाजू घेऊन कन्व्हेन्शनच्या सभासदांस नेमस्तपणाचा उपदेश करीत होता. हीच गोष्ट त्याच्याविरुद्ध लोकमत बनविण्यास मॉरिसला साधनीभूत झाली व त्यानें अनेक युक्त्या योजून त्या कामीं यश मिळविलें. पेनचें लोकांवरील वजन हळुहळू कमी होत गेलें व जिरॉंदिस पुढाऱ्यांना वांचविण्याची त्याची आशा निष्फळ ठरली. ह्या पुढाऱ्यांची चौकशी होऊन त्यांना फांशीची शिक्षा सांगण्यांत आली व तारीख ३१ आक्टोबर रोजीं त्या शिक्षेचा अंमल होऊन गेला !!! पेनचें मन पुन्हा निराशेनें व्याप्त झालें !

जॅकोबिन पक्षाचा पुढारी जो रॉबिस्पियर तो मोठा धूर्त माणूस होता. पेन जरी त्यास अप्रिय झाला होता तरी त्यानें अमेरिकेंत व फ्रान्समध्यें लोकस्वातंत्र्याप्रीत्यर्थ जे परिश्रम केले होते ते रॉबिस्पियरच्या ध्यानांतून जाणें शक्य नव्हतें. शिवाय तत्कालीन अमेरिकन प्रेसिडेंट वॉशिंगटन याचा पेन-वर लोभ असल्याचेंही त्यास माहीत होतें. दुसरी गोष्ट अशी कीं, अमेरिकन प्रतिनिधि मॉरिस हा त्याला मनापासून आवडत नव्हता. त्याला अमेरिकन सरकारानें परत बोलवावें म्हणून देखील त्यानें (रॉबिस्पियरनें) खटपट चालविली होती. पेनबद्दल मात्र त्याच्या अंतःकरणांत सहानुभूति वसत होती; परंतु त्यानें नियोजित केलेल्या कार्यक्रमास पेनकडून उघडपणें अडथळा होत असल्यामुळें कोणीकडून तरी त्यास गप्प बसवावें—त्याची हालचाल बंद पाडावी—अशा विचारांत तो होता. त्याचा नाश करावा असें त्याच्या मनांत नव्हतें; तथापि पेनच्या मनांत भीति उत्पन्न करण्याचा मात्र त्यानें निश्चय केला होता असें दिसतें. हें कार्य साधण्याकरितां त्यानें साधन म्हणून मॉरिसचा उपयोग करून घेतला. पेनसंबंधानें मॉरिस जे गैरसमज उत्पन्न करीत होता त्यास रॉबिस्पियरनें अपरोक्ष रीतीनें उत्तेजन दिलें. तसें करण्यांत अमेरिकन सरकारकडून मॉरिसची फजिती करवावी असाही एक त्याचा हेतु होता. कारण पेन व वॉशिंगटन हे परस्पर स्नेही असल्यामुळें पेनची मॉरिसनें नालस्ती केल्यास ती वॉशिंगटनला खपणार नाहीं असें रॉबिस्पियर यास वाटत होतें व तें यथार्थ होतें. परंतु मॉरिसची एतद्विषयक

कृष्णकारस्थानें वॉशिंगटनला अखेरपर्यंत कळलीं नाहींत. इंग्लंडशीं तह करण्यासंबंधींच्या कारस्थानांत वॉशिंगटन ह्यावेळीं गुंतलेला होता व या कामीं मॉरिस हा त्याचा हस्तक असल्यामुळें त्यानें त्यास आपल्या कृपाछत्राखालीं घेतलें होतें. 'Rights of man' ह्या पुस्तकाबद्दल इंग्लंडच्या अधिकारीवर्गाची पेनवर नुकतीच खप्पा मर्जी झालेली होती. तेव्हां, मनांतून जरी पेनबद्दल वॉशिंगटनला सहानुभूति वाटत असली तरी उपरोक्त कार्यसिद्धीकारितां ती व्यक्त न कारितां पेनच्या हालचालीबद्दल कांहीं काल मौन धारण करणें वॉशिंगटन यास भाग होतें. ह्या परिस्थितीचा फायदा घेऊन मॉरिस यानें आयागोची कामगिरी करून पेनबद्दल वॉशिंगटनचें मन कलुषित करण्याचा प्रयत्न सुरू केला. त्यानें वॉशिंगटनला यावेळीं जीं पत्रें लिहिलीं आहेत त्यांत, "पेनबद्दल आपण योग्य ती कळकळ व काळजी बाळगीत आहों; परंतु तोच दिवसानुदिवस जास्त भकत चालल्यामुळें आपणावर संकट ओढवून घेत आहे," असें वॉशिंगटन यास भासविण्याचा त्यानें प्रयत्न केला आहे. या प्रयत्नामुळें वॉशिंगटनचें मन पेनबद्दल कितपत कलुषित झालें हें बरोबर कळण्यास मार्ग नाहीं; तथापि पेनबद्दल यापुढें वॉशिंगटन उदासीन बनत गेला हें मात्र तत्कालीन पत्रव्यवहारावरून सिद्ध होत आहे.

मॉरिसचा गुप्त पत्रव्यवहार रॉबिस्पियरच्या हातीं लागला होता व इतर रीतीनेंही त्याच्या विश्वासघातकी वर्तनाचा पुरावा त्यानें गोळा केला होता व त्यांच्या आधारें त्यानें मॉरिसविरुद्ध अमेरिकन सरकाराकडे तक्रारीही केल्या होत्या. इकडे स्वपक्षाच्या आग्रहावरून त्यानें पेनला अटकेंत ठेवण्यास मंजुरी दिली; परंतु ही गोष्ट त्यानें एकप्रकारचा डावपेंच समजून केली. पेन व मॉरिस ह्या दोघांचीही बाजू अमेरिकन सरकारापुढें जावी व दोघांपैकीं कोण खरा हें त्या सरकारानें ठरवून जो खोटा असेल त्यास त्यानें शासन करावें अशी रॉबिस्पियरची इच्छा होती. पेननें आपली बाजू जेफर्सन* व वॉशिंगटन यांजपुढें मांडल्यास मॉरिसची खास फजिती होईल व त्याला

---

* हा पेनचा मित्र असून त्यावेळीं अमेरिकन सेक्रेटरी ऑफ स्टेट ह्या हुद्द्यावर होता.

परत बोलावण्यांत येईल असें रॉबिस्पियर यास वाटत होतें. तसेंच पेनला अटक केल्याबद्दलही अमेरिकन सरकार कांहीं विचारपूस करील असेंही त्यास वाटत होतें; परंतु बराच काळ लोटला तरी जेव्हां जेफर्सन अगर वॉशिंगटन यांजकडून पेनबद्दल एक अवाक्षरही विचारण्यांत आलें नाहीं व मॉरिसचें महत्त्व कोणत्याही प्रकारें कमी होईना, तेव्हांच रॉबिस्पियर यानें क्रांतिप्रवर्तक न्यायमंडळापुढें पेनची चौकशी होण्याबद्दल हुकूम केला. हा सर्व प्रकार कसा घडून आला व त्याचे पेनवर काय काय परिणाम झाले, याविषयाची हकीकत पुढील प्रकरणांत सांगूं.

प्रकरण १३ वें

प्राणसंकट !

मागील प्रकरणांत सांगितलेलीं मॉरिसचीं कारस्थानें (पेनविरुद्ध) चालू होण्यापूर्वींच फ्रान्सच्या नॅशनल कन्व्हेन्शननें परदेशस्थ लोकांसंबंधानें एक कडक कायदा केला होता हें वाचकांच्या ध्यानांत असेलच. पेन हा त्या कन्व्हेन्शनचा सभासद असल्यामुळें व त्यास अमेरिकन सरकारचें पाठबळ आहे, अशी फ्रेंच पुढाऱ्यांची समजूत असल्यामुळें त्यांनीं त्या कायद्याचा अंमल त्याजवर बरेच दिवस केला नाहीं. परंतु मॉरिसचीं कारस्थानें चालू असतांना वॉशिंगटननें पेनसंबंधीं औदासिन्य प्रकट केलेलें त्यांस आढळून येतांच त्यांनीं पेनला इंग्लंडांतील रहिवाशी समजून नवीन कायद्यान्वयें अटक करण्याचा संकल्प केला. पेनला ह्या गोष्टीचा सुगावा लागला होता; पण त्यानें स्वतः आपला जीव बचावण्याकरितां पलायन कां केलें नाहीं हें कळण्यास मार्ग नाहीं. त्याच्याबरोबर रहाणारे सर्व इंग्रज व अमेरिकन मित्र प्राणरक्षणार्थ दुसऱ्या देशांत निघून गेले व त्यांना परवानेही (passports) त्यानेंच मिळवून दिले. त्याच्याकरितां मागें जीव देण्यास तयार झालेला जॉन्सन व त्याचा दुसरा मित्र चॅपिन हे दोघेजण त्यांना पकडण्याचें वारंट सुटण्यापूर्वीं दोनच दिवस अगोदर निसटून गेले व त्यानंतर सुमारें एक महिन्यानें पेनला पकडण्यांत आलें. यासंबंधानें त्यानें आपला इंग्रज स्नेही सर रॉबर्ट स्मिथ याच्या पत्नीस पुढील पत्र लिहिलें आहे.

" जॉन्सन बरा झाल्यावर, फ्रान्सांतून निघून जाण्याचा जेव्हां त्यानें बेत केला तेव्हां तो व मि० चॅपिन यांजकरितां परवाने मिळविले. ते संध्याकाळीं फार उशिरानें मिळाले तेव्हां ते पहाटे चारच्या सुमारास बॅसले येथें जाण्याकरितां निघाले. तेथें ते सुखरूप पोंचल्याचें पत्र जेव्हां आलें तेव्हां मला संतोष वाटला. ज्या देशांत ते देशभक्तीच्या उत्साहानें आले होते तथून त्यांस पळ काढावा लागला ! हे फ्रान्स देशा!

सद्गुणांच्या प्रेरणेवरून सुरू झालेल्या राज्यक्रांतीच्या शीलाचा तूं विध्वंस करून टाकिला आहेस; आणि ज्यांनीं ही क्रांति घडवून आणली त्यांचा- ही तूं नाश करून टाकिला आहेस ! ××× अद्याप मी तेवढा एकटा मात्र वांचलों आहें.

" ते निघून गेल्यानंतर दोन दिवसांनीं–रात्रीचेवेळीं मी रहात असले- ल्या घराचा दरवाजा कोणी ठोठावीत असल्याचें माझ्या कानावर आलें. तेव्हां मीं आपल्या निजण्याच्या खोलींतील खिडकींतून डोकावून पाहिलें तों घरवाला मेणबत्तीचा दिवा घेऊन दार उघडीत असल्याचें मला दिसून आलें. त्यानें दार उघडतांच हत्यारबंद शिपाई घरांत शिरले. ते बहुधा मजकरितांच आले असावेत–कारण मीच कायतो परका तेथें राहात होतों–असें वाटून मी कारागृहांत जाण्याविषयीं आपल्या मनाची तयारी करून बिछान्यावर जाऊन पडलों. पण ते शिपाई जॉन्सन व चॅपिन यांस नेण्याकरितां आले होते असें मला मग समजलें. परमेश्वरी कृपेनें ते यापूर्वींच त्यांच्या आटोक्याबाहेर जाऊन पोंचले होते. "

" यानंतर सुमारें एक महिन्यानीं रात्रीं पुन्हा अशाच प्रकारचे शिपाई या घरांत आले व त्यांनीं त्या घरवाल्यास व मला पकडलें. तुम्ही मजकडे येऊन गेल्यानंतर लवकरच हा प्रकार झाल्यामुळें सर रॉबर्ट यांजकरितां जी मदत तुम्हीं मागितली ती करण्यास आतां मी समर्थ नाहीं याबद्दल फार दिलगिरी वाटते. "

जान्सन गेल्यानंतर केव्हां तरी आपण पकडले जाणार असें पेनला निश्चयपूर्वक वाटत होतें. व इतर जिरॉंदिस पुढाऱ्यांची जी वाट झाली तीच आपलीही व्हावयाची असेंही त्यास वाटत असावें असें त्याच्या एका पत्रांतील पुढील उल्लेखावरून दिसतें. तो म्हणतोः–

" माझे मित्र शिरच्छेद करणाऱ्या यंत्रास भराभर बळी पडत होते आणि मजवरही तो प्रसंग येणार असें मला प्रत्येक दिवशीं वाटत असे. मी जणुं काय मृत्युशय्येवरच पडलों आहें असें मला वाटे; कारण सर्व बाजूंनीं मला मृत्यूच दिसत होता. म्हणून मीं आपलें काम (पुस्तक लिहिणें) सुरू करण्याचा निश्चय केला. व माझा हेतु इतक्या उत्तम

रीतीनें तडीस गेला कीं, मला पकडण्यापूर्वीं सहाच तास अगोदर मीं आपल्या पुस्तकाचा पहिला भाग लिहून संपविला. फ्रान्समध्यें नास्तिकपणाचा फार झपाट्यानें प्रसार होत चालला होता; आणि त्यास आळा घालण्याकरितां मीं प्रथम माझ्या सदर भागाचें फ्रेंच भाषेंत भाषांतर करविलें; व 'परमेश्वरावर माझा विश्वास आहे' हें जें मानवी प्राण्याचें ब्रीद तें त्यांच्या मनावर पूर्णपणें ठसविलें."

वरील अवतरणांत ज्या पुस्तकाचा उल्लेख केला आहे त्याचें नांव 'Age of reasou–'बौद्धिक युग' असें आहे. याचा पहिला भाग केव्हां लिहिला हें वर सांगितलेंच आहे. त्याचा दुसरा भाग पेननें प्रत्यक्ष कारागृहांत लिहिला. हें पुस्तक धार्मिक तत्त्वज्ञानाची चर्चा करणारें असून त्यांत तत्कालीन खिस्ती लोकांच्या धर्मभोळ्या समजुती व त्या आधारें खिस्ती धर्मगुरु व सरकारें यांजकडून लोकांवर होणारा जुलूम यांचें खंडण करून खिस्ती धर्माचें व त्याच्या प्रस्थापकाचें खरें–शुद्ध–स्वरूप दाखविलें आहे. त्यासंबंधानें पुढें एका प्रकरणांत स्वतंत्र रीतीनें विवेचन होणार असल्यामुळें येथें त्याचें नुसतें दिग्दर्शन करूनच पुढें जातों.

पेनला तारीख २७ डिसेंबर १७९३ रोजीं, परकीय लोकांविरुद्ध पास केलेल्या कायद्यान्वयें–त्यास इंग्लंडचा रहिवाशी मानून–पकडण्यांत आलें* व तारीख २८ डिसेंबर रोजीं त्यास 'लक्झेंबर्ग' येथील तुरुंगांत पाठविण्यांत आलें.

---

* पेनला पकडण्याचा हुकूम पुढीलप्रमाणें होता:––

"NATIONAL CONVENTION."

"Committee of General surety and Surveilance of the national convention.

"On the 7th nivose (December 27th) of the 2nd year of the french republic, one and indivisible.

"To the deputies.

The committee resolves, that the persons named Thomas paine and Anacharsis, clootz, formerly deputies to the national convention, be arrested and imprisoned, as a

तुरुंगांत गेल्यावर लवकरच मेजर जॅक्सन नामक एका अमेरिकन अधिकाऱ्यानें पॅरिस येथील अमेरिकन लोकांच्या तर्फे, पेनला 'अमेरिकन रहिवासी' समजून मुक्त करण्याबद्दल अर्ज केला. मेजर जॅक्सन ह्यास अमेरिकन सेक्रेटरी जेफर्सन यानें मि० मॉरिसला देण्याकरितां एक परिचय-पत्रिका दिली होती, ती मेजर जॅक्सननें कन्व्हेन्शनपुढें सादर करून अमेरिकेच्या वतीनें ह्या प्रकरणांत रदबदली करण्याचा आपला हक्क प्रस्थापित केला. कन्व्हेन्शननें त्या अर्जाचा निकाल लावण्याचें काम 'कमिटी ऑफ जनरल शुअर्टी' व 'कमिटी ऑफ पब्लिक सेफ्टी'वर सोंपविलें. इकडे पेन यानेंही मि० मॉरिस यास, 'अमेरिकन रहिवासी' ह्या नात्यानें आपली सुटका करविण्याबद्दल पत्र लिहिलें. परंतु पेनची सुटका व्हावी अशी मॉरिसची बिलकूल इच्छा नव्हती. तथापि तसें व्यक्त करण्याची मात्र त्याची छाती नव्हती. कारण अमेरिकन सेक्रेटरी जेफर्सन हा पेनचा मित्र व चहाता होता व वॉशिंगटनचें मतही पेनला प्रतिकूल नव्हतें. तेव्हां त्या दोघांना कांहींतरी क्लृप्ति काढून गप्प बसविणें मॉरिसला भाग होतें व तसें करण्याकरितां त्यानें फ्रेंच सरकारचा परराष्ट्रीय खात्याचा प्रधान देफार्गु यास अनुकूल करून घेतलें व पेनच्या बाबतींत पेन व अमेरिकन सरकार या दोघांसही चकविण्याची मसलत त्यांनीं योजिली. तदनुसार त्या दोघांमध्यें पुढील पत्रव्यवहार झाला:—

" पॅरिस १४ फेब्रुवारी १७९४.

" महाराज,

" संयुक्त संस्थानचा रहिवासी या नात्यानें आपली सुटका करविण्याबद्दल थॉमस पेन यानें मजकडे नुकताच अर्ज केला आहे. मला वाटतें

measure of general surety; that an examination be made of their papers, and those found suspicious put under seal and brought to the committee of general surety "Citizens jean baptista Martine lamy, bearers of the present decree are empowered to execute it for which they ask the help of the civil authorities and, if need be, of the army." यापुढें कमिटीच्या सभासदांच्या सह्या आहेत.

त्याच्यासंबंधीं हकीकत अशी आहे—तो इंग्लंडमध्यें जन्मला, नंतर संयुक्त संस्थानचा रहिवासी बनून त्यानें तेथील क्रांतीविषयक लेख लिहून प्रसिद्धि मिळविली त्यावरून फ्रेंच राष्ट्रानें त्यास नागरिकत्वाचा हक्क दिला व नंतर तो कन्व्हेन्शनचा सभासद निवडला गेला. त्यानंतरच्या त्याच्या वर्तनाचा विचार करणें हें माझ्या अधिकाराबाहेरचें काम आहे. सध्यां तो लक्झेंबर्ग येथील तुरुंगांत असण्याचें कारण काय, तें मला माहित नाहीं; परंतु त्याची सुटका न होण्याजोगीं कांहीं कारणें असतील तर तीं मला कळविण्याची मेहेरबानी करावी म्हणजे मी तीं संयुक्त संस्थानच्या सरकारास कळवीन." आपला नम्र सेवक

"मॉरिस."

सदर पत्रास देफार्ग्यु यानें पुढीलप्रमाणें उत्तर पाठविलें:—

पॅरिस १ XXX रिपब्लिकचें दुसरें वर्ष

(१९, फेब्रुवारी १७९४)

परराष्ट्रीय खात्याच्या प्रधानाकडून संयुक्त संस्थानच्या प्रतिनिधीस–

"तुमच्या XXXपत्रांत थॉमस पेनच्या सुटकेसंबंधानें विचारणा करण्यांत आली आहे. इंग्लंडमध्यें जन्मून हा डेप्युटी नंतर अमेरिकन व फ्रेंच नागरिक बनला आहे. शेवटची पदवी जेव्हां त्यानें धारण केली व येथील कायदे करणाऱ्या मंडळाचा जेव्हां तो सभासद झाला तेव्हांच ह्या राष्ट्राच्या कायद्यांच्या मर्यादेंत तो आला. अर्थात् अमेरिकन राष्ट्राचा त्याजवरील ताबा व रक्षणाचा हक्क यांस तो मुकला आहे.

"त्याला अटकेंत ठेवण्याचा हेतु व कारणें मला माहित नाहींत. परंतु त्यास योग्य कारणें असावींत असा माझा समज आहे. तथापि तुमची मागणी मी 'कमिटी ऑफ सेफ्टी' यांजकडे पाठवितों व त्यांचा निकाल तुम्हास लवकरच कळविण्यांत येईल.

"देफार्ग्यु"

ह्या दोन पत्रांवरून मॉरिसचें व देफार्ग्युचें कशा प्रकारचें संगनमत झालें असावें याची वाचकांस चांगली कल्पना होईल. फ्रेंच परराष्ट्रीय

खात्याचा कारभार गुप्तपणें चालत असल्यामुळें मॉरिसचें उपरोक्त पत्र बाहेर येऊन त्याची परिस्फुटता होण्याचा व तो जेफर्सन किंवा वॉशिंगटन यांच्या कानांवर जाण्याचा बिलकूल संभव नव्हता. हें पत्र पेनचे चरित्र-लेखक डॉ० कॉनवे यांनींच प्रथम शोधून काढून छापलें. तोंपर्यंत तें फ्रेंच सरकारच्या संग्रहालयांत तसेंच पडून राहिलें होतें.

देफार्ग्युशीं पत्रव्यवहार करून वरीलप्रमाणें त्याचें उत्तर मिळविल्या-नंतर मॉरिसनें अमेरिकन सेक्रेटरी जेफर्सन यास ह्या प्रकरणीं पुढील आशयाचें पत्र लिहिलें:––

“ पेनच्या कारागृहवासाचा उल्लेख मीं केलाच आहे. मेजर जॅक्सन यानें आपल्या पत्राच्या आधारावर पेनची सुटका करण्याची जबाबदारी शिरावर घेऊन कन्व्हेन्शनला अर्ज केला. ××× तो अर्ज योग्य मार्गानें आला नसल्यामुळें कमिटीनें फेटाळून लावला आहे. पेननेंही मला या-विषयीं लिहिलें त्यावरून मी फ्रेंच परराष्ट्रीय खात्याच्या प्रधानास पत्र पाठविलें. त्याच्या उत्तराची नक्कल सोबत ठेवली आहे त्यावरून काय तें लक्षांत येईल. त्या उत्तराची नक्कल पेनकडेही मीं पाठविली; परंतु त्यावर पेननें मला एक लांबलचक पत्र एका इंग्रज गृहस्थाबरोबर पाठविलें. पेनचा मित्र समजून त्यास मीं कळविलें कीं, 'हल्लींच्या स्थितींत जर मी पेनबद्दल विशेष आग्रह धरीन तर त्याची चौकशी होण्याचा प्रसंग मात्र लवकर प्राप्त होईल आणि ही चौकशी म्हणजे काय हें त्याचा मित्र ब्रिझो व त्याचे साथीदार यांच्या उदाहरणावरून त्याच्या लक्षांत येईलच. जर (फ्रेंच) सरकारच्या मनांतून त्यास सोडून द्यावयाचें असतें तर त्यास तसें करण्यास पुष्कळ सवड होती. ×××× कोणत्याही दृष्टीनें पाहिलें तरी फ्रेंच कायद्यानुसारच त्याचा निर्णय होणार आणि तसें झाल्यास त्याचा परिणाम फार वाईट होईल. कारण त्यास ब्रिझोचा साथीदार मानण्यांत येतें.”

पेनला फक्त तो परदेशस्थ असल्यामुळेंच (परकीयांविरुद्ध झालेल्या नवीन कायद्यान्वयें) पकडण्यांत आलें होतें. त्याजवर कोणत्याही तऱ्हेचे इतर दोषारोप करण्यांत आलेले नव्हते; परंतु मॉरिस यानें देफार्ग्युशीं संगन-

मत करून ही खरी गोष्ट दाबून टाकली व जिरॉंदिस पुढाऱ्यांवर लादलेले आरोप पेनच्या अटकेसही कारणीभूत आहेत असें त्यानें अमेरिकन सरकारास भासविलें. त्यामुळें साहजिकच वॉशिंगटन व जेफर्सन यांस या बाबतींत, फ्रेंच सरकारचा निकाल कळेपर्यंत मौन धारण करणें भाग पडलें. मॉरिसच्या ह्या कौटिल्यामुळें पेनचा प्राण जाण्याचा प्रसंग येऊन ठेपला ! पण मानवी कौटिल्यापेक्षां अनंतपटीनें सामर्थ्यवान् असलेल्या ईश्वरी कृपादृष्टीमुळें त्याचें मोठया विलक्षण तऱ्हेनें संरक्षण झालें ! तें कसें हें पुढील हकीगतीवरून ध्यानांत येईल.

लक्झेंबर्ग येथील तुरुंगांत जेव्हां पेन आला तेव्हां तेथें केवळ संशयावरून कैद केलेले अनेक कुलीन घराण्यांतलि व प्रख्यात फ्रेंच नागरिक जमा झाले होते. हे सर्व लोक एकाच जागीं ठेवलेले होते. ह्या तुरुंगावरचा अधिकारी बेनॉय हा फार सज्जन माणूस होता. यामुळें या राजकीय कैद्यांना पुष्कळ सवलती मिळत असत. तो त्यांस फार दयाळुपणानें वागवीत असे. त्याच्या आंगच्या ह्या सद्गुणामुळें त्याजवर पुढें लवकरच वाईट प्रसंग आला; परंतु सद्गुणांचा वाली जो परमेश्वर त्यानें त्यास त्यांतून निभावून नेलें. कारागृहांत येतांच पेननें Age of reasonचा दुसरा भाग लिहिण्यास सुरवात केली. पुढें पुष्कळ दिवस लोटले तरीही जेव्हां अमेरिकन सरकाराकडून त्याच्यासंबंधीं विचारपूस होईना तेव्हां त्याचें चित्त कांहींसें अस्वस्थ झालें. अमेरिकन सरकार (वॉशिंगटन) आपणांस ह्या स्थितींत फार दिवस खितपत पडूं देणार नाहीं अशी त्याच्या मनाची खात्री होती. परंतु तशा प्रकारचीं कांहीं चिन्हें जेव्हां दिसेनाशीं झालीं तेव्हां मात्र साहजिकच त्याचें मन अत्यंत क्षुब्ध झालें. तशांत त्याला जोराचा ताप येऊन त्याच्या डाव्या कुशींत एक गळूं झालें. त्यामुळें तो फारच हैराण होऊन गेला. ह्या प्रसंगीं तुरुंगाच्या उपरोक्त अधिकाऱ्यानें त्याची फार काळजी घेतली. तेथील डॉक्टर मऱ्हास्की यानेंही त्याची प्रेमपुरःसर सुश्रूषा केली. ह्या दुखण्यानें तो सुमारें एक महिनाभर 'अत्यावस्थ' स्थितींत होता. नंतर त्याचा ताप गेला; पण तो फार अशक्त बनला व त्याची ती जखम (कुशींतील) अद्याप तशीच वहात होती.

अमेरिकन सरकार पेनची कांहीं काळजी घेत नाहीं असें दिसून येतांच रॉबिस्पियरनें त्याची चौकशी करण्याचा हुकूम केला. त्यावेळीं 'चौकशीचा हुकूम' म्हणजे 'फांशीचा हुकूम' अशी स्थिति होती. कारण जेथें नुसत्या संशयावरून रोज शेंकडों माणसें वधस्थानीं नेण्यांत येत होतीं तेथें खरी चौकशी ती काय होणार ? त्यावेळीं पॅरिस येथील तुरुंग संशयास्पद मनुष्यांनीं भरून गेलेले होते. व रोज १००।१५० मनुष्यें त्यांतून काढून त्यांचा चौकशीचा फार्स करीत व त्यास देहांतशासन करण्यांत येई. दुसरे दिवशीं ज्या लोकांना ह्याप्रमाणें बळी द्यावयाचें असेल त्यांचीं नांवें वधस्थानाच्या अधिकाऱ्यास आदले दिवशीं कळविण्यांत येत असत. व त्या यादीप्रमाणें तो अधिकारी सदर मनुष्यांस पहाटेपूर्वींच तुरुंगांतून काढून नेत असे. या यादींत एकदां पेनचेंही नांव आलें होतें; परंतु सत्याचा वाली व सद्‌गुणांचा चहाता जो परमेश्वर त्यानें ह्या प्रसंगांतून त्याचें कसें रक्षण केलें हें खुद्द पेनच्याच शब्दांनीं सांगतों.

" एका रात्रीं लक्झेंबर्ग तुरुंगांतून १६८ मनुष्यें बाहेर काढण्यांत आलीं व त्यांपैकीं १६०सच दुसरे दिवशीं देहांतशासन करण्यांत आलें. ह्या मंडळींत माझेंही नांव होतें हें मला माहित होतें. परंतु ज्या विचित्र प्रकारामुळें माझें त्यावेळीं रक्षण झालें त्यास केवळ 'योगायोग' हेंच नांव शोभेल. ज्या खोलींत मला ठेवलें होतें ती तळमजल्यावर असून तिचा दरवाजा बाहेरून उघडला असतां दार भिंतीस चिकटावें अशा तऱ्हेचा होता. त्यामुळें दरवाजा उघडा असल्यास आंतली बाजू बाहेर व बाहेरची बाजू भिंतीस लागलेली अशी असे. मजबरोबर आणखी तीन कैदी त्या खोलींत होते. जेव्हां २०।२५।१०० अशीं माणसें एकदम वधस्थानाकडे नेण्याकरितां तुरुंगांतून बाहेर काढावयाचीं असतील तेव्हां तें काम बहुधा रात्रीं करण्यांत येत असे. व रात्रीच्या वेळीं कैदी बाहेर काढतांना चूक होऊं नये म्हणून अधिकारी लोक, जे कैदी न्यावयाचे असतील त्यांच्या खोलीच्या दरवाजाच्यापृष्ठभागावर आदले दिवशीं खडूनें खूण करीत असत. याप्रमाणें आमच्या खोलीच्या दरवाजावरही वरील प्रसंगीं खूण करण्यांत आली. परंतु ती खूण दरवाजा उघडा असतांना केली असल्यामुळें ती दरवाजाच्या पृष्ठभागावर न होतां आंतल्या बाजूस केली गेली. पुढें रीती-

प्रमाणें दरवाजे लावले गेले व रात्रीं जेव्हां आम्हांस नेण्यास अधिकारी आला तेव्हां आमच्या खोलीच्या दरवाजावर खूण नाहीं असें पाहून साहजिकच तो पुढें चालता झाला."

पेनचें मृत्यूच्या दाढेंतून ह्याप्रमाणें रक्षण झालेलें पाहून, मानवी शक्तीनें सत्य व सद्गुण यांस आपल्या पायाखालीं चिरडून टाकण्याचा किती जरी प्रयत्न केला तरी परमेश्वर त्या गुणांचें–त्या गुणांचें अधिष्ठान असणाऱ्या व्यक्तीचें–अकल्पित तऱ्हेनें कसें रक्षण करितो, याची साक्ष वाचकांच्या मनास उत्कृष्ट रीतीनें पटेल यांत शंका नाहीं.

अत्याचार, अन्याय व जुलूम ह्यांच्या जोरावर जो कोणी सत्ताधीश होतो तो स्वतःही कालांतरानें 'गुरुची विद्या गुरूलाच भोंवते' ह्या न्यायानें वरील त्रयींस बळी पडतो; असा साधारण नियम आहे. ह्या नियमाचा प्रत्यक्ष अनुभव फ्रेंच राज्यक्रांतींत फार ठळक रीतीनें आलेला दिसून येतो. जॅकोबिन्स ऊर्फ अत्याचारवादी पक्षाच्या पुढाऱ्यांनीं नीति, न्याय, कायदा व सुविचार ह्यांस धाब्यावर बसवून जिरॉंदिस नामक प्रागतिक पक्षाच्या पुढाऱ्यास फांसावर चढवून जेव्हां सर्व सत्ता आपल्या हातीं घेतली तेव्हां फ्रेंच राज्यक्रांतीस अघोर स्वरूप प्राप्त झालें व त्यांत अखेरीस ह्या घोरकर्म्यांचीही आहुति पडली! असो; पेनचें वर सांगितल्याप्रमाणें रक्षण झाल्यानंतर लवकरच रॉबिस्पियरचा पाडाव त्याच्याच पक्षांतील त्याच्याहूनही अघोरवृत्तीच्या माणसांनीं केला व अखेरीस त्यांनीं त्यास देहांतशासनही दिलें! रॉबिस्पियरच्या मृत्युनंतर पेनच्या फ्रेंच मित्रांनीं त्याची सुटका करण्याबद्दलचे प्रयत्न सुरू केले. त्याच्या ग्रंथांचा फ्रेंच भाषांतरकार लॅंथेनस यानें 'कमिटी ऑफ पब्लिक सेफ्टी'चा प्रमुख सभासद मर्लिन यास 'एज ऑफ रिझन'ची एक प्रत पाठवून पुढील आशयाचें पत्र लिहिलें:—

" जुलमी सत्ताधाऱ्यांचा आपण पाडाव केल्यानंतर आतां थॉमस पेन यास कां अटकेंत ठेवलें आहे? याचा तपास करणें हें आपल्या लोकसत्ताक राज्याच्या हिताचें आहे असें मला वाटतें. ह्या गोष्टीची फेरतपासणी करण्याचीं अनेक कारणें आहेत व जो कोणी स्वातंत्र्याचा खरा मित्र असून आपल्या राष्ट्राच्या उन्नतीची चाड बाळगणारा असेल त्याच्या लक्षांत तीं सहज येण्याजोगीं आहेत. त्याच्याविरुद्ध कोणताही

आरोप अगर संशय नसूनही जर त्यासंबंधानें कमिटीस कांहीं शंका असेल व त्याचा मला जो अनुभव आहे त्यावरून ती दूर होण्यास मदत होणार असेल तर मी त्याच्याविषयीं जरूर ती माहिती कमिटी-पुढें मोठ्या आनंदानें मांडीन."

याचवेळीं पेन यानेंही सदर कमिटीस व तिच्या मार्फत कन्व्हेन्शनला आपल्या वतीनें पत्रें लिहिलीं; परंतु कमिटींतील कित्येक सभासद मॉरिसचे मित्र असल्यामुळें व मॉरिसला पेनची सुटका होणें इष्ट वाटत नसल्यामुळें सदर पत्रें तशींच दाबून टाकण्यांत आलीं. तीं कन्व्हेन्शनकडे गेलींच नाहींत !

इकडे, मॉरिसविरुद्ध फ्रेंच पुढाऱ्यांकडून अमेरिकन सरकाराकडे सारख्या तक्रारी चालू होत्याच. कारण मॉरिसचा ओढा इंग्लंडकडे विशेष होता व फ्रेंचांना—मग तो कोणत्याही पक्षाचा असो—त्यावेळीं ती गोष्ट खपण्यासारखी नव्हती. मॉरिसविरुद्ध एकसारख्या तक्रारी येत गेल्यामुळें वॉशिंगटनच्या प्रधान मंडळांत मतभेद होऊन बहुमत मॉरिसच्या विरुद्ध बनलें. तेव्हां साहजिकच त्यास परत बोलावणें वॉशिंगटनला भाग पडलें. तथापि तसें करणें भाग पडल्याबद्दल त्यानें खेद प्रदर्शित करणारें एक खाजगी पत्र मॉरिसला पाठविलें. मॉरिसच्या जागीं 'मनरो' नामक एका गृह-स्थाची नेमणूक झाली व तो आपलीं अधिकारपत्रें घेऊन पॅरिस येथें येऊन पोंचला. त्यानें आपल्या आगमनाचें वृत्त फ्रेंच सरकारास कळवून कायदे-शीर रीतीनें आपली जागा आपल्या स्वाधीन करण्याविषयीं मॉरिसला विनंती केली. परंतु मॉरिस तसें करण्याची टाळाटाळ करूं लागला. मॉरिस-च्या मनांतून आपली जागा सोडावयाची नव्हती, व त्याप्रीत्यर्थ त्यानें अमेरिकेशीं पत्रव्यवहार सुरू केला होता; परंतु मनरोनें त्याची आठ दिवस वाट पाहिल्यानंतर आपला दर्जा मान्य करण्यासंबंधींचें पत्र प्रत्यक्ष कन्व्हेन्शा-नलाच सादर केलें. त्याबरोबर कन्व्हेन्शननें तत्काळ (२८ ऑगस्ट १७९४) सरकारी रीतीनें त्याचें स्वागत करून त्यास अमेरिकेचा प्रतिनिधि मानण्यास सुरवात केली. अर्थात् मॉरिसला आपल्या अधिकाराची शिक्काकट्यार त्याच्या हवालीं करणें भाग पडलें. याप्रमाणें अधिकारभ्रष्ट झाल्यावरही मॉरिस सुमारें महिनाभर फ्रान्सांत होता. त्याचें कारण असें कीं, पेनसंबंधानें

'कमिटी ऑफ पब्लिक सेफ्टी'च्या कांहीं सभासदांशीं त्यानें जो गुप्त पत्रव्यवहार केला होता; तो उघडकीस न येऊं देण्यासंबंधीं कांहींतरी तजवीज त्यास करावयाची होती. रॉबिस्पियरचा वध झाल्यानंतर पेनबद्दल फ्रेंच पुढाऱ्यांत पुन्हा सहानुभूति उत्पन्न होत होती व उपरोक्त कमिटींतही त्यास अनुकूल अशा घडामोडी सुरू होत्या. अशा स्थितींत त्या कमिटींतील आपल्या मित्रांचीं कृष्णकृत्यें उघडकीस येऊन आपला पत्रव्यवहार केव्हां बाहेर पडेल याचा नेम नाहीं, असें मॉरिसला वाटत होतें. व तो पत्रव्यवहार दाबून टाकण्याची शक्य तितकी खटपट तो करीत होता. परंतु त्या कामांत त्याला यावें तसें यश आलें नसावें, व त्यामुळेंच निराश होऊन घाईघाईनें त्यानें फ्रान्सांतून पलायन केलें असावें. आक्टोबर १८ तारखेच्या सुमारास त्यानें स्वित्सर्लंडाचा किनारा गांठला !

मनरो जेव्हां मॉरिसच्या जागीं आला तेव्हां पेन ज्वराच्या दुखण्यानें हैराण झालेला होता. तापांतून उठल्यानंतर त्याला मनरोच्या आगमनाचें वृत्त कळलें. तेव्हां त्यानें त्यास आपली स्थिति कळविली. ती कशी होती हें पेनच्याच शब्दांनीं सांगतों:—

"दुखण्यांतून उठल्यावर मला लिहिण्याचें सामर्थ्य येतांच तुरुंगांतील दिवे लावणाऱ्या माणसांकडून मि० मनरो यास मी एक चिठी पाठविली. XXX थोड्याच दिवसांत त्यांजकडून एका तिऱ्हाईत मनुष्यामार्फत उत्तर आलें. त्यांत त्यानें मजकरितां शक्य तितकी खटपट करण्याचें आश्वासन देऊन मला धिमेपणानें आपला काल कंठण्याबद्दल सूचना केली होती. ह्या गोष्टीस पंधरा दिवस लोटले तरीही जेव्हां कांहीं कळून येईना तेव्हां मी माझ्या एका मित्रास, आपल्यासंबंधानें काय झालें—कारण त्याबाबतींत कांहींतरी चालू आहे अशी माझी खात्री होती—म्हणून पत्रद्वारें विचारलें. XXX ह्या पत्राचें उत्तर सुमारें दहा दिवसांनीं आलें. त्यांत असें लिहिलें होतें कीं, मि० मनरो यांस माझ्यासंबंधीं अमेरिकन सरकाराकडून कांहींएक हुकूम अगर सूचना आलेली नाहीं. तथापि माझ्या सुटकेविषयीं तो शक्य तितके प्रयत्न करील. याच पत्रांत, लेखकानें 'अमेरिकन सरकार मला आपल्या राष्ट्राचा रहिवासी समजत नाहीं' अशी अफवा लोकांत पसरली असल्याचाही उल्लेख केला होता."

ही अफवा अर्थातच मॉरिसनें पसरविली होती. ती पसरल्याची बातमी पेनला वरील पत्रलेखकाकडूनच प्रथम समजली. तेव्हां तत्काळ त्यानें एक लांबलचक पत्र लिहून तें योग्य मार्गानें मनरोस पाठविलें. त्यांत त्यानें आपली एकंदर हालहवाल कळवून आपणांसंबंधानें उठलेल्या बातम्या खोट्या असून त्यांवर विश्वसून आपल्या सुटकेसंबंधी शैथिल्य प्रकट करूं नये म्हणून विनंति केली. ह्या पत्राचें उत्तरही मनरो यानें लवकर पाठविलें (तारीख १८ सप्टेंबर). परंतु मॉरिसच्या उपाद्यापामुळें* तें पेनला सुमारें एक महिनापर्यंत—म्हणजे मॉरिस स्वित्सर्लंडास जाऊन पोहोंचेपर्यंत (तारीख १८ आक्टोबर) मिळालें नाहीं. ह्या पत्रांत मनरोनें, 'पेनला अद्याप अमेरिका विसरली नाहीं—तुमच्याविषयीं ती कृतघ्न होणार नाहीं,' वगैरे गौरवपर व उत्तेजक मजकूर लिहून पेनचें समाधान करण्याचा प्रयत्न केला होता व योग्य कालापर्यंत शांतपणा धारण करण्याची मित्रत्वाच्या नात्यानें त्यास सूचना केली होती. 'तुम्हाला आतां कसलीही भीति उरलेली नाहीं' असेंही त्यानें पेनला कळविलें होतें. पेनला ह्याप्रमाणें कळवून मनरो त्याची सुटका करण्याची खटपट करूं लागला. परंतु ह्या प्रकरणांतील सरकारी कागदपत्र जेव्हां त्यानें पाहिले तेव्हां त्याला पेनची चमत्कारिक स्थिति कळून आली. पेनला अमेरिकन रहिवासी मानतां येईल कीं नाहीं, याबद्दलच त्याच्या पूर्वीच्या अधिकाऱ्यानें—मॉरिसनें सरकारी कागदपत्रांत शंका व्यक्त करून ठेवलेली होती. त्याशिवाय त्याजवर कांहीं भयंकर आरोप असल्याचेंही त्यानें नमूद करून ठेविलें होतें. पेनच्या पत्रावरून तें खोटें असल्याचें मनरोला कळून आलें. परंतु तेवढ्यानें त्याचा मार्ग सुलभ होण्याचा संभव नव्हता. त्यानें जेव्हां (पेनसंबंधीं) फ्रेंच अधिकाऱ्यांशीं बोलणें सुरू केलें तेव्हां त्यांनीं हा मागील इतिहास लक्षांत आणून मनरोला 'ह्यासंबंधांत आम्हास जाब विचारण्यास अमेरिकन सरकारकडून तुम्हांस अधिकार—हुकूम—मिळाला आहे काय?' असा रोकडा सवाल केला. पेनबद्दल

---

* पेनकडून अमेरिकन प्रतिनिधीस व त्याजकडून पेन यास उघडपणें जाणारीं पत्रें फ्रेंच अधिकाऱ्यामार्फत जावीं लागत असत. ह्यांपैकीं कांहीं मॉरिसचे मित्र असल्यामुळें मॉरिसला सदर पत्र इतका काल दाबून ठेवतां आलें.

मॉरिसनें आपलें करावयाचें कर्तव्य केलें अशी अमेरिकन सरकारची समजूत असल्यामुळें त्यांनीं ह्या बाबतींत मनरोला विशिष्ट हुकूम दिलेला नव्हता. मॉरिसचें कृष्णकारस्थान तिकडे (अमेरिकेंत) कळण्यास मार्ग नव्हता. तेव्हां वरील सवाल होतांच मनरोची स्थिति फार नाजूक झाली. कोणत्या रीतीनें पेनची सुटका करावी, याचा त्यास मोठा विचार पडला. या विचारांत बरेच दिवस गेल्यावर अमेरिकन सेक्रेटरी रँडॉल्फ यांजकडून त्यास एक पत्र आलें (तारीख ३० जुलई). त्यांत त्याला पेनची सुटका करण्यास उपयुक्त होणारें एक वाक्य सांपडलें व त्याच्या आधारें त्यानें पेनच्या सुटकेचा प्रश्न फिरून फ्रेंच अधिकाऱ्यांपुढें मांडला. त्यास आधारभूत होणारें वाक्य असें होतें:—

"We have heard with regret that several of our citizens have been thrown into prison in France, from a suspicion of criminal attempts against the Government. If they are guilty we are extremely sorry for it; if innocent we must protect them."*

ह्या वाक्याचा आधार घेऊन मनरोनें तारीख २ नोव्हेंबर रोजीं 'कमिटी ऑफ जनरल शुअर्टी'स पेनचें संरक्षण करण्याविषयींचा आपला हक्क प्रस्थापित करणारा व एक तर त्याची चौकशी करा किंवा त्यास सोडून द्या, अशी निकराची मागणी करणारा खलिता लिहिला. हा खलिता येतांच सदर कमिटीचे डोळे उघडले व त्यांनीं ह्या प्रकरणाचा निकाल तत्काल लावला. तो निकाल काय होता हें पुढील प्रकरणांत सांगूं.

---

* सरकाराविरुद्ध गुन्हे केल्याच्या संशयावरून आमचे कित्येक नागरिक फ्रान्सांतील कारागृहांत पडल्याचें ऐकून आम्हांस फार वाईट वाटत आहे. जर ते अपराधी असतील तर त्याबद्दल आम्हांस फार खेद वाटेल; पण जर ते निरपराधी असतील तर त्यांचें संरक्षण करणें आम्हास भाग आहे.

प्रकरण १४ वें

सुटका व नंतर.

अमेरिकन प्रतिनिधि मनरो यानें मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें पेनचें संरक्षण करण्यासंबंधी स्पष्ट मागणी करणारा पहिला खलिता लिहितांच पेनची ताबडतोब सुटका झाली. यासंबंधानें मनरो यानें अमेरिकन सरकारास तारीख ७ नोव्हेंबर रोजीं जो खलिता लिहिला आहे त्याचा सारांश असाः—

"तो (पेन) फक्त संयुक्त संस्थानचाच नागरिक आहे. तो ब्रिटिश नागरिक तर नाहींच; पण फ्रेंच नागरिकही नव्हे. कारण येथें राज्यसंस्था नियोजित करण्याकरितां केवळ निमंत्रणावरून आला असून तें काम झाल्यावर परत अमेरिकेस जाण्याचा त्याचा विचार होता. खुद्द कन्व्हेन्शननें त्यास 'परदेशस्थ' समजूनच आपल्या बैठकीस येण्याची मनाई केली. यावरूनही हीच गोष्ट सिद्ध होत आहे. ××× अखेरीस मी त्याच्या बाबतींत, 'कमिटी ऑफ जनरल शुअर्टी'स लिहिण्याचा निश्चय केला. ××× परवांचे दिवशीं सदर कमिटीकडून त्यास सोडून देण्याचा हुकूम आला. मग लागलीच मी तो लक्झेंबर्ग येथील तुरुंगाच्या अधिकाऱ्याकडे पाठवून त्याच दिवशीं त्याची सुटका करविली व मला कळविण्यास आनंद वाटतो कीं, त्याचें स्वातंत्र्य त्यास हल्लीं उपभोगावयास मिळालें असून तो मोठ्या आनंदांत आहे."

पेनच्या सुटकेबद्दलचा हुकूम असा होताः—

"Brumaire, 13th.—Third year of the French Republic. The Committee of General Surety orders that the citizen Thomas Paine be set at liberty, and the seals taken from his papers, on sight of these presents."

ह्या हुकुमावर ज्यांनीं सह्या केल्या होत्या त्यांपैकीं एकजण पेनला पकडण्याविषयींच्या हुकुमावर सही करणारा होता. अर्थात् त्याला ह्या प्रकरणाची पूर्वपीठिका माहित होती. पेनला पकडलें तेव्हां त्याच्याजवळचे कोणतेही कागदपत्र जप्त केलेले नव्हते. असें असूनही 'कागदपत्र जप्त केले असल्यास मोकळे करावेत' असा उल्लेख वरील हुकुमांत आहे. त्यावरून फ्रेंच सरकार ह्या बाबतींत किती उदासीन व निष्काळजी होतें हें दिसून येईल. पेनला तुरुंगांत ठेवण्यांत त्या सरकारपेक्षां मॉरिसचाच विशेष हितसंबंध होता. यामुळें एकदां तो तुरुंगांत गेल्यानंतर त्या सरकारनें त्याच्यासंबंधानें विशेष कांहीं हालचाल केली नाहीं व त्याच्या प्रकरणाकडेही (case) त्यांनीं फारसें लक्ष दिलें नाहीं. फ्रेंच सरकारच्या मनांतून जर पेनचा नाश करावयाचा असता तर त्यास पकडल्याबरोबर त्यांनीं त्याच्यावर कांहींतरी दोषारोप ठेऊन त्यास सहज फांशी दिलें असतें. मनरोनें जेव्हां त्याची चौकशी होण्याबद्दल मागणी केली तेव्हां देखील पेनच्या विरुद्ध कोणताही आरोप कागदोपत्रीं नमूद केलेला नव्हता. आणि मुख्यतः त्याच कारणामुळें त्याचा खलिता येतांच त्याची सुटका झाली. मनरोनें हें जें काम केलें त्याबद्दल अमेरिकन सरकारनेंही आपली पसंति दर्शवून त्याची प्रशंसा केली.

तुरुंगांतून सुटल्यानंतर पेन मनरोच्या घरींच राहिला. कारण अद्याप त्याची प्रकृति चांगली सुधारलेली नव्हती. त्याच्या कुशींत झालेलें गळूं अद्याप बरें झालें नव्हतें; त्यांतून रक्त व पू अद्याप जातच होता. मनरोनें त्यास मोठ्या प्रेमळपणानें वागवून त्याची सुश्रूषा ठेविली. यावेळीं मनरोचे जे पेनवर उपकार झाले त्याची फेड होणें अशक्य होतें; तथापि फ्रेंच राज्यक्रांतीच्या सर्व स्थित्यंतरांतून पार पडलेला व तिचे अंतरंगाची पूर्ण माहिती असलेला असा मनरोचा एवढाच एक स्नेही फ्रान्समध्यें असल्यामुळें व मनरो हा तेथें नवीनच आलेला असल्यामुळें सल्लागार ह्या नात्यानें त्यास पेनचा अतिशय उपयोग झाला. पेनची याप्रमाणें सुटका होऊन तो आनंदांत असतांना इकडे इंग्लंडमध्यें त्यास फांशीं दिल्याचें वृत्त प्रसिद्ध होऊन त्याच्यासंबंधानें मृत्युलेख प्रसिद्ध होऊं लागले होते! यांपैकीं कांहीं लेख खुद्द पेनच्याही वाचण्यांत

आले! त्याला जेव्हां प्रथम पकडलें तेव्हांही इंग्लंडमध्यें अशाच प्रकारची अफवा पसरली होती.

पेन ज्यावेळेस हे मृत्युलेख वाचीत होता त्याचवेळेस फ्रेंच कन्व्हेन्शनकडून आपल्या बैठकीस येण्याविषयींची निमंत्रणपत्रिका त्याच्या हातीं आली होती! एका हातांत मृत्युलेख व एका हातांत सदर निमंत्रणपत्रिका हा योगायोग त्यास किती विलक्षण वाटला असेल बरें! हें निमंत्रण कसें आलें हें पुढील हकीकतीवरून ध्यानांत येईल.

रॉबिस्पियर मेल्यानंतर कन्व्हेन्शनच्या कांहीं सभासदांनीं पेनच्या सुटके-संबंधानें चर्चा सुरू केली होती हें मागें सांगितलेंच आहे. मनरोच्या खट-पटीमुळें त्याची सुटका होतांच त्याच्या बाबतींत झालेल्या अन्यायाचें शक्य तितकें परिमार्जन करण्याचा ह्या लोकांनीं विचार केला. तारीख ७ डिसेंबर १७९४ रोजीं 'थिबादूयु' नामक सभासदानें पेनला कन्व्हेन्शन (सभासद, ह्या नात्यानें)मध्यें बोलावण्यासंबंधाची सूचना आणली. तो म्हणाला:—

"कन्व्हेन्शनला अद्याप एक न्यायाचें कृत्य करावयाचें आहे. स्वतंत्र-तेचा उत्कट संरक्षक—थॉमस पेन यास येथें परत बोलावण्याची मी सूचना करितों. (टाळ्या) माझी ही सूचना, ज्यानें आपल्या सामर्थ्यानें मानवी हक्कांचें रक्षण करून आपल्या कालास भूषण आणलें व अमेरिकन क्रांतींत बजावलेल्या कामगिरीबद्दल ज्याची फार मोठी ख्याति झाली आहे, अशा माणसाबद्दल आहे. फ्रेंच राष्ट्रीयसभेनें त्यास नागरिकत्वाचा हक्क दिल्या-वरून लोकांनीं त्यास सभासद निवडलें होतें. केवळ कृष्णकारस्थानामुळेंच त्यास कारागृहांत जावें लागलें. ×××त्यास येथें येण्याविषयीं आमंत्रण द्यावें अशी मी मागणी करितों."

ही सूचना एकमतानें पास झाली. पेनचा सत्कार येवढयानेंच थांबला नाहीं; तर तेथील 'कमिटी ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन'नें वाङ्मयसेवा कर-णाऱ्या लोकांस पेन्शन देण्याची जी योजना त्यावेळीं केली होती त्यांत पेनचें नांव पहिलें होतें.* पेनची स्थिति यावेळीं जरी गरिबीची होती तरी

---

* चेनियर नामक सभासदानें हें नांव सुचवितांना पुढील उद्गार काढले होते:—

त्यानें तें पेन्शन आभारपूर्वक नाकारलें. कन्व्हेन्शननें सन्मानपूर्वक दिलेल्या आमंत्रणाचा मात्र त्यानें स्वीकार केला. फ्रेंच राष्ट्रानें याप्रमाणें, आपणासंबंधीं केलेल्या पातकाचें परिमार्जन केलेलें पाहून पेनला संतोष वाटला, परंतु वॉशिंगटन या समयीं आपणास विसरला असें त्यास वाटून ती गोष्ट त्याच्या मनाला लागून राहिली. तथापि त्या गोष्टीचा विचार करण्याइतकी अद्याप त्याला शक्ति आलेली नसल्यामुळें त्यानें ती गोष्ट तशीच मनांत ठेवली होती. तथापि त्या संतप्त व उदास विचारामुळें त्याचें मन वरचेवर खिन्न होऊन त्याचा अनिष्ट परिणाम त्याच्या शरीरावरही होत असे. तेव्हां मनरो त्याचें लक्ष त्या विचारापासून दूर करण्याचा शक्य तितका प्रयत्न करून त्यास नेहमीं आनंदी ठेवण्याची खटपट करीत असे. ह्या सुमारास फ्रान्सांतील वातावरणही निवळत चाललें असल्यामुळें त्या बाजूनेंही पेनला समाधान वाटण्यास जागा झाली होती. कायदा व नीति यांस धाब्यावर बसवून ज्या आसुरी वृत्तीच्या लोकांनीं राजसत्ता बळकाविली होती त्यांचे त्याच सत्तेस एकामागून एक बळी पडल्यानंतर आतां जिकडेतिकडे शांततेची लाट उसळली होती. आसुरी व अघोर कृत्यांनीं लोकांचीं मनें विटून गेलीं असल्यामुळें त्यांस आतां सनदशीर राज्यपद्धति स्थापन करण्याची उत्कट इच्छा झालेली होती. व ते 'अन्न आणि १७९३ ची कॉन्स्टिटयूशन' यांची मागणी करूं लागले होते. ही कॉन्स्टिटयूशन म्हणजे पेन व कॉंदरसेत यांनीं मागें तयार केलेली तीच होय. ही तयार करण्याचें काम ज्या कमिटीकडे सोंपविलें होतें त्यांपैकीं फक्त साईस व पेन हे दोघेच कायते जिवंत राहिले; बाकी सर्व ह्या वेळपर्यंतच्या सत्रांत नाश पावले होते. 'वारा वाहील तशी पाठ देण्याचें व्रत' पाळून साईसनें आपलें रक्षण केलें व पेन 'तसें न करण्याचें व्रत' पाळून जिवंत राहिला. साईस व पेन यांची मैत्री होती व साईस हा पेनला फार मान देत असे.

" We again see Thomas paine, the man of genios without fortune, our colleague, dear to all friends of humanity a cosmopolitan, persecuted equally by pitt and by Robespiere. Who by two immortal works, has deserved well of the human race and consecrated liberty in the two worlds."

परंतु पेनचा लोकसत्तावाद (Republicanism) साईसला पसंत नव्हता. कॉन्स्टिटयूशनची मागणी लोकांकडून होतांच कन्व्हेन्शननें ती आपणांपुढें सादर करण्याकरितां पुन्हा ११ गृहस्थांची एक कमिटी नेमिली. त्यांत साईस हा प्रमुख होता. सर्वांत तोच जुना व विशेष माहितगार असल्यामुळें कॉन्स्टिटयूशनचें सर्व काम मुख्यत: त्याच्या इच्छेप्रमाणेंच होणारें होतें. पेनला त्याचीं मतें व स्वभाव पूर्णपणें माहित होता. यावेळीं जर आपण स्वस्थ बसलों तर सदर कॉन्स्टिटयूशनमध्यें राजाच्या सत्तेचा कांहींतरी अंश साईस खास उत्पन्न करील, असें पेनला वाटलें व जरी त्याच्या अंगांत फारशी शक्ति नव्हती तरी त्यानें लोकमत जागृत करण्याकरितां 'Disser tation on First principles of Government' नांवाचें एक पत्रक लिहून प्रसिद्ध केलें. इ. स. १७९३ची कॉन्स्टिटयूशन ज्या तत्त्वांवर रचिली होती त्या तत्त्वांचें ह्या पत्रकांत थोडक्यांत आविष्करण केलेलें आहे व नुकत्याच घडून आलेल्या कित्येक खेदजनक गोष्टींच्या दृष्टांतानें, त्या तत्त्वांचें अवलंबन करण्याची आवश्यकता लोकांच्या मनावर ठसविण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांतून एक लहानसा उतारा मासल्याकरितां पुढें देत आहे:—

"दोन वर्षांपूर्वीं जर एखादी कॉन्स्टिटयूशन अंमलांत आणली असती तर (आणि ती आणणें जरूर होतें) त्या वेळेपासून ज्या अत्याचारामुळें फ्रान्सची धुळधाण उडाली आहे व ज्यामुळें ह्या क्रांतीचें स्वरूप बिघडलें आहे त्या अत्याचारांस प्रतिबंध करितां आला असता. त्या योगानें राष्ट्रामध्यें ऐक्यभाव उत्पन्न झाला असता व प्रत्येक व्यक्तीला आपल्या वर्तनाची दिशा योग्य प्रकारें कळून आली असती. परंतु तसें न करितां (कॉन्स्टिटयूशनच्याऐवजीं) तत्त्वत: अथवा अधिकाराच्या दृष्टीनें ज्याची फारशी किंमत नाहीं असें एक क्रांतिकारक राज्ययंत्र निर्माण करण्यांत आलें; त्यामुळें सद्‌गुण–सत्कृत्य–अथवा गुन्हा ह्या गोष्टी केवळ परिस्थितीवर अवलंबून राहिल्या. अर्थात् आज जी गोष्ट देशभक्तीची द्योतक, ती उद्यां देशद्रोहात्मक ठरूं लागली. ह्या सर्व गोष्टी 'कॉन्स्टिटयूशन'च्या अभावामुळें घडून आलेल्या आहेत. सर्व प्रकारच्या पक्षांस एका विवक्षित धोरणाचा अवलंब करावयास लावून प्रत्येक पक्षाला 'अमुक एका मर्यादेपर्यंतच तुमची

गती आहे, त्यापुढें तुम्ही जातां कामा नये असें बजावण्याचें सामर्थ्य केवळ कॉन्स्टिटयूशनमध्येंच असतें. तिच्या अभावीं माणसें पक्षाभिमानानें अंध होतात आणि मग तत्त्वापेक्षां पक्षाभिमानाचेंच महात्म वा प्राबल्य वाढतें.

" शासन करण्याची–सूडाची–उत्कट इच्छाही स्वातंत्र्यविघातक आहे. ती मनुष्याचे ठिकाणीं सर्वोत्तम अशा कायद्यांचाही भलताच अर्थ करून त्यांचा दुरुपयोग करण्याची प्रवृत्ति उत्पन्न करिते. जो कोणी आपलें स्वतःचें स्वातंत्र्य रक्षण करील त्यानें आपल्या शत्रूवर देखील जुलूम होऊं देतां कामा नये. कारण जर त्यानें हें कर्तव्य बजाविलें नाहीं तर त्याचें तें कृत्य उदाहरण होऊन पुढेंमागें त्यासच भोंवतें."

हें पत्रक प्रसिद्ध झाल्यानंतर लवकरच, कॉन्स्टिटयूशनचा एक नवीन मसुदा लोकांच्या विचाराकरितां प्रसिद्ध करण्यांत आला. त्यांत पेनला मान्य असणारीं बहुतेक तत्त्वें गोंवलेलीं होतीं; परंतु त्यांत पेनच्या दृष्टीनें लोकसत्ताक राज्यसंस्थेस अहितावह–अपायकारक–असें एक तत्त्व होतें. 'जे लोक प्रत्यक्ष कर देणारे असतील त्यांनाच तेवढा निवडणुकीचा हक्क असावा, असें हें तत्त्व होतें व त्यायोगानें सुमारें अर्ध्या राष्ट्रास हा हक्क मिळणें शक्य नव्हतें. हें अनिष्ट तत्त्व नाहींसें करण्याकरितांच पेननें कारागृह-वासानंतर (७ जुलई १७९५) कन्व्हेन्शनच्या बैठकींत प्रथम-प्रवेश केला. कन्व्हेन्शन सोडून त्यास ह्यावेळीं दोन वर्षें झालेलीं होतीं. तेवढ्या काळांत त्याचे थोर मित्र व सहचर इहलोकांस मुकले होते! कन्व्हेन्शनमध्यें प्रवेश करितांच ह्या गोष्टीची स्मृति होऊन त्याचें अंतःकरण भरून आलें व त्याचें मन क्षणभर खिन्न झालें! परंतु त्याच्या ह्या मनोवृत्ति दूर करण्याकरितांच कीं काय, कोण जाणे, त्याचा फ्रेंच मित्र लँथेनस यानें, त्यास कॉन्स्टिटयूशनसंबंधीं भाषण करूं देण्याबद्दल विशेष सूचना त्याचवेळीं कन्व्हेन्शनपुढें आणली. त्यावेळीं त्याच्या नांवाचा उच्चार होतांच सभासदांकडून टाळ्यांचा गजर सुरू होऊन त्यांतच सदर सूचना एकमतानें पसार झाली. पेनच्या अंगीं अद्याप चांगलीशी शक्ति आलेली नव्हती. तथापि त्याच्या मेंदूचें सामर्थ्य कोणत्याच प्रकारें कमी झालेलें नसल्यामुळें त्यानें ह्या प्रसंगीं करावयाचें भाषण लिहून आणलेलें होतें. तें भाषणाचें पुडकें हातीं घेऊन आपल्या अशक्त पायांच्या मदतीनें तो कसातरी एकदां

व्यासपीठावर जाऊन पोंचला व त्यानें आपलें भाषण तेथील एका सेक्रेटरीस वाचण्याकरितां दिलें. त्या भाषणांतील पहिलें वाक्य ऐकूनच ऐकणारांच्या मनोवृत्ति उचंबळून गेल्या. त्याचा प्राथमिक कांहीं थोडासा भाग येथें देतों:—

" नागरिकहो ! लक्झेंबर्ग येथील कारागृहांत आलेल्या भयंकर तापाच्या अनिष्ट परिणामामुळें आपल्या सभेच्या बैठकीस मला इतके दिवस हजर राहतां आलें नाहीं. आणि हल्लीं देखील आपल्यापुढें चर्चेसाठीं आलेल्या विषयाच्या महत्त्वामुळेंच मी या स्थानीं आलों आहें. ××× फ्रेंच राज्यक्रांतीचें समर्थन केल्याबद्दलच इंग्लंडनें मला हद्दपार केलें व त्याच कारणाकरितां खुद्द फ्रान्समध्येंही मला असह्य असा कारागृहवास भोगावा लागला. ××× तथापि मला हें सांगितलें पाहिजे कीं, दोन्ही देशांतील लोकांकडून माझा छळ झालेला नाहीं. दोन्ही राष्ट्रांतील अनियंत्रित (despotic) राज्यकारभाराचेंच तें फळ आहे. परंतु जरी माझ्या छळास ह्या देशांतील लोकांकडून सुरवात झाली असती तरी देखील माझीं मतें व वर्तन हल्लींप्रमाणेंच कायम राहिलीं असतीं. जुलुमामुळें जीं मतें अगर तत्त्वें बदलूं शकतात त्यांचें वास्तव्य (मानवी) अंतःकरणांत नसतें. ××× जर तुम्हीं क्रांतीच्या मूलाधारावरच कुठार घातली, जर तुम्ही तत्त्वांना झुगारून देऊन क्षणिक सोईकडेच लक्ष देऊं लागलां; तर क्रांतीचें आजपर्यंत जीवितसर्वस्व असलेला उत्साह तुम्ही नष्ट करून टाकाल; आणि त्याच्याजागीं नैराश्यजनक औदासिन्य व स्वार्थमूलकता यांची स्थापना कराल. व त्यांचेंही फिरून लबाडी, कृष्णकारस्थानें व नामर्दपणा यांत पर्यवसान होईल."

सर्व लोकांना, भेदाभेद न करितां विवक्षित तत्त्वानुसार निवडणुकीचा हक्क देण्यांत यावा असें एकंदरींत पेनचें प्रतिपादन होतें. परंतु अशा तऱ्हेचें प्रतिपादन त्यावेळीं निर्धास्तपणें त्याला एकट्यालाच करितां येण्यासारखें होतें. कारण फ्रेंच क्रांतीच्या सर्व स्थित्यंतरांतून पार पडलेला निष्कलंक असा काय तो, तोच एकटा होता. कन्व्हेन्शनच्या इतर सभासदांपैकीं बहुतेकांनीं आजपर्यंतच्या अत्याचारास प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष संमति दिलेली होती.

पेनच्या मताप्रमाणें सर्वांस निवडणुकीचा हक्क दिल्यास ह्या सर्व

लोकांना राज्यकारभारांतून गचांडी मिळण्याचा संभव होता व ती गोष्ट तर त्यांस मुळींच पसंत नव्हती. ती न घडावी म्हणून त्यांनीं सदर कॉन्स्टिटयूशनला, 'अस्तित्वांत असलेल्या कन्व्हेन्शनपैकीं निदान $\frac{2}{3}$ सभासदांचा तरी नवीन राज्यसंस्थेंत समावेश व्हावा' अशा अर्थाचें एक कलम जोडलें होतें. हें कलमही पेनला पसंत नव्हतें. परंतु पेनच्या एतद्विषयक उपदेशाचा, त्याचे आभार मानून गौरव करण्यापलीकडे फारसा उपयोग झाला नाहीं. पेनचा कन्व्हेन्शनमधला हा प्रवेश व भाषण हीं शेवटचींच होत. कारण पुढें लवकरच कन्व्हेन्शन मोडून 'डायरेक्टरी'ची स्थापना झाली व पेन हा अमेरिकन नागरिक असल्यामुळें फ्रेंचांसारखा परराष्ट्रीय लोकांच्या कायमच्या राज्यसंस्थेंत त्यास सामील होतां येणें शक्य नव्हतें.

वॉशिंगटन व पेन यांच्यामध्यें केवढें सख्य व प्रेम होतें हें वाचकांस माहित आहेच. हें प्रेम अगर सख्य नाहींसें होण्यासारखें असें एखादेंही कृत्य पेनच्या हातून घडून आलेलें नव्हतें. असें असूनही पेनच्या संकटप्रसंगीं वॉशिंगटननें त्याची विचारपूस केली नाहीं हें पाहून पेनला सहजिकच वॉशिंगटनच्या वर्तनाचा संताप आला. मॉरिसनें आयागोची भूमिका घेऊन वॉशिंगटनचा गैरसमज केल्याचें वृत्त पेनला कळणें शक्य नव्हतें, यामुळें त्यानें वॉशिंगटनला एक फार कडक पत्र लिहिलें. परंतु मनरोच्या सांगण्यावरून त्यानें तें पाठविण्याचें तहकूब केलें. पण कन्व्हेन्शनच्या बैठकींत वादविवाद करून आल्यानंतर श्रमातिरेकामुळें पेनची प्रकृति फार बिघडली. ती इतकी कीं, त्यांतून आपण जगूं कीं नाहीं याचा त्याला भरंवसा वाटेना. तेव्हां त्यानें वॉशिंगटनला पुढील पत्र लिहिलें:—

"महाराज, मीं तुम्हांस फ्रेंच कन्सल मि० ले तोंबे, याजबरोबर पाठविण्याकरितां एक पत्र लिहिलें होतें; परंतु मनरोच्या विनंतीवरून तें पाठविण्याचें रहित केलें तें अद्याप मजजवळ आहे. मी लवकरच अमेरिकेस येणार असल्यामुळें मनरोची विनंति त्यावेळीं मीं मान्य केली. परंतु सध्यां मला जें दुखणें आलें आहे त्यामुळें माझें तिकडे येणें होण्याचें दिसत नाहीं. जर मी आलों असतों तर माझ्या बाबतींत तुम्हीं मनरो अगर मॉरिस यास काय हुकूम केले आहेत ते जाणण्याकरितां

मी तुमच्या सरकारी (व खाजगीही) पत्रांच्या नकला मिळण्याविषयीं तुम्हाकडे अर्ज केला असता; कारण फ्रान्समध्यें मला कारागृहांत ठेवल्याबद्दल चौकशी करणें हें तुमचें काम होतें. ××× ह्या बाबतींत तुम्हीं मौन धारण केल्यामुळें तुमची त्या गोष्टीस संमति होती असा माझा समज होणें अपरिहार्य असून तसाच येथील लोकांचा समज आहे व तो खोटा असल्याचें प्रसिद्ध करण्यास तुमचेकडून कांहीं आधार न सांपडल्यास अमेरिकेचाही तसाच समज होईल म्हणून मी तुम्हांस या पत्रद्वारें अशी विनंति करतों कीं, या बाबतींतला संशय दूर करण्यासारखीं कांहीं पत्रें जर तुमचेजवळ असतील तर त्यांच्या नकला मजकडे पाठवा. रॉबिस्पियरनें मजवर आरोप करणारी जी यादी लिहिली आहे त्यांत 'अमेरिका व फ्रान्स यांच्या हिताकरितां' असे शब्द आहेत. तुमचें मौन पाहून तुमचीही माझ्या प्रतिबंधास संमति आहे असा समज झाल्यावांचून त्या यादींत रॉबिस्पियरनें अमेरिकेचें नांव घातलें नसतें. इंग्लंडमध्यें मी जन्मलों या सबबीवर मला पकडण्यांत आलें आणि माझ्यासंबंधानें तुम्ही चौकशी न करतां मौन धारण केल्यामुळें तुम्हीं मला लोटून दिल्यासारखें झालें. तुम्ही विश्वासघात केल्याचा संशय मला यावयास नको होता; परंतु मी ह्या दुखण्यांतून उठो अगर न उठो, तुमचेकडून संशयनिवृत्ति करणारा पुरावा येईपर्यंत मी तुम्हांस विश्वासघातकीच समजत राहणार. या बाबतींत तुम्हीं जर आपलें योग्य कर्तव्य बजावलें असतें तर तुम्हांस यावेळीं विशेष समाधान वाटलें असतें; कारण इंग्रज सरकारास खूष करण्याकरितां, फ्रान्समध्यें माझा नाश झालेला पाहून फ्रेंच क्रांतीविरुद्ध ओरड करण्याची संधी मिळविण्याकरितां, अथवा अमेरिकन राज्यकारभारास कमी विरोध व्हावा या हेतूनें माझा नायनाट करण्याकरितां, यांपैकीं कोणत्याही सबबीवर जरी तुम्हीं मला निराधार सोडलें असलें तरी तुमच्याकडे दोष येईल व त्यांतून तुमची मुक्तता होणें कठीण होईल.

" थॉमस पेन "

तसेंच Age of reason ह्या पुस्तकाचा दुसरा भाग (कारागृहांत सुरू केलेला) अपूर्ण राहिला होता तोही त्यानें पुरा केला. हें पुस्तक जेव्हां

छापण्यास दिलें तेव्हां त्याची प्रकृति अतिशय खालावली होती. तें पुस्तक प्रसिद्ध झाल्यावर एकदां त्याच्या मृत्यूचीही बातमी पसरली होती. खुद्द मनरोलाही त्याच्या जीविताची चिंता वाटूं लागली होती; परंतु अद्याप त्याच्या 'आयुष्य तैलाचा' अंत झालेला नव्हता. यामुळें पवनप्रकोपामुळें जाऊं पाहणारी दीपज्योति जशी वातावरण शांत होतांच हळुहळू प्रज्वलित होऊं लागते तद्वत् त्याची मालवूं पहाणारी प्राणज्योति कांहीं काल जातांच हळुहळू प्रदीप्त होऊं लागली.

पेननें आपल्या अत्यवस्थ स्थितींत मोठ्या तांतडीनें उपरोक्त पत्र वॉशिंगटनला अशाकरितां लिहिलें कीं, त्याजकडून झाल्या गोष्टींबद्दल कांहीं तरी समाधानकारक खुलासा आपल्या मृत्यूपूर्वी आपणांस मिळाल्यास पहावा. परंतु दुर्दैवानें ह्या पत्राचें उत्तर देण्याची बुद्धि वॉशिंगटनला झाली नाहीं. पेननें त्याच्या उत्तराची सुमारें एक वर्षभर वाट पाहिली. तेवढ्या कालांत वर सांगितल्याप्रमाणें त्याची प्रकृति सुधारत जाऊन तो फिरून नीट झाला. नंतर त्यानें मनरोच्या इच्छेवरून पाठविण्याचें तहकूब केलेलें पत्र व उपरोक्त पत्र यांसह वॉशिंगटनला उद्देशून आपल्या कारागृहवासासंबंधीं एक जाहिरपत्रक पत्रक प्रसिद्ध केलें. ह्या पत्रकांत त्यानें वॉशिंगटनच्या अनेक चुकांचें प्रदर्शन करून आपल्या बाबतींत त्यानें केलेल्या दूषणास्पद वर्तनाबद्दल त्याचा खरपूस समाचार घेतलेला आहे. पेनच्या कारागृहवासासंबंधींची समग्र कहाणी अमेरिकन लोकांस ह्या पत्रकाच्याद्वारेंच प्रथम समजली. ह्या पत्रकासही वॉशिंगटननें उघडपणें उत्तर दिलेलें नाहीं. त्यासंबंधानें एका खाजगी पत्रांत मात्र त्यानें प्रतिकूल व कांहीं अंशीं निंदास्पद टीका केली आहे. वॉशिंगटन व पेन हे दोघेही थोर पुरुष होते व दोघांनींही अमेरिकन स्वातंत्र्याप्रीत्यर्थ खांद्यास खांदा लावून सारखेच परिश्रम केलेले आहेत. अशा स्थितींत उभयतांमध्यें परस्परांविषयीं विपरीत भाव उत्पन्न होऊन त्यांत दोष कोणाचा, ह्या प्रश्नाचा निर्णय करण्याची पाळी यावी हें कोणाही विचारी माणसास खेदास्पदच वाटेल यांत शंका नाहीं. परंतु चरित्रलेखकावर जी जबाबदारी असते तिचा विचार करून आम्हीं या गोष्टीचा उल्लेख केला आहे. व ती पूर्ण करण्याकरितांच वरील प्रश्नाचा निर्णय, त्यासंबंधीं दोन्ही बाजूंचे कागदपत्र पाहून

त्यांचा योग्यप्रकारें विचार करणाऱ्या खि० डॉ० कॉनवेच्या शब्दांनींच देऊन आम्ही ह्या खेदजनक प्रकरणाची रजा घेतों.

डॉ० कॉनवे म्हणतों:—

"It is easy for the Washington worshipper of today to condemn paine's pamphlet, especially as he is under no necessity of answering it. But could he immagine himself abandoned to long imprisonment and imminent death by an old friend and comrade, whose letters of friendship he cherished, that friend avowedly able to protect him, with no apparent explanation of the neglect but deference to an enemy against whom they faught as comrades, an unprejudiced reader would hardly consider paine's letter unpardonable even where unjust. Its tremendous indignation is its apology so far as it needs apology. A man who is stabbed cannot be blamed for crying out. It is only in poetry that dying Desdemonas exonerate even their deluded slayers. Pain, who when he wrote these personal charges felt himself dying of an abscess traceable to washingtion's neglect, saw not Iago behind the president. His private demand for explanation, sent through Bache, was answered only with cold silence. × × × By his silence, even in the confidence of friendship, the truth which might have come to light was suppressed beyond his grave. For such silence the best excuse to me immaginable is that, in ignorance of the part Morris had acted, the president's

mind may have been in bewilderment about the exact facts.

As for paine's public letter, it was an answer to Washingtion's unjustifiable refussal to answer his private one. It was the natural outcry of an ill and betrayed man to one whom we now know to have been also betrayed.* Its bitterness and wrath measure the greatness of the love that was wounded. The mutual personal services of washington and paine had continued from the begining of the American revolution to the time of paine's departure for Europ in 1787. Although he recognized, as washington himself did, the Commandar's (वाशिंगटनच्या) mistakes paine had magnified his successes; his all-powerful pen defended him against loud charges on account of the retreat to the Delaware, and the failures near Philadelphia. In those days what 'commonsense' wrote was accepted as the people's Verdict. It is even doubtful whether the proposal to supersede Washington might not have succeeded but for paine's fifth *crisis*.‡

---

* By Marris.

‡ "When a party was farming, in the latter end of seventy seven and begining of seventy-eight, of which John Adams was one, to remove Mr. Washington from the command of the Army, on the complaint that he *did nothing*, I wrote the fifth member of the *crisis*, and published it at Lancaster (congress then being at yorktown) to ward off that meditated blow; for though I well knew that the black times of seventy-six were the natural consequence of his

वरील अवतरणाचा मराठी सारांशः—

(आजकालच्या वॉशिंगटनच्या पूजकाला पेनच्या सदर पत्रकाचा निषेध करणें–विशेषतः त्याचें उत्तर देण्याची त्यास आवश्यकता नसल्यामुळें फार सोपें जाणार आहे. परंतु तो स्वतः जर आपणास त्याच्या जागीं कल्पून, ज्या मित्राचीं मित्रभाव-द्योतक पत्रें पाहून त्यास संतोष वाटावयाचा व ज्याचे अंगीं त्याचें रक्षण करण्याचें सामर्थ्य खास होतें, अशा मित्रानें त्याची हेळसांड–व तीही ज्या शत्रूबरोबर ते दोघेही खांद्यास खांदा लावून लढले त्यास खूष करण्याकरितां केल्यामुळें त्यास दीर्घकालिक कारागृहवासांत व मृत्यूच्या द्वारीं खितपत पडण्याची पाळी यावी व त्याबद्दल त्यानें कांहींएक खुलासाही करूं नये इत्यादि गोष्टी लक्षांत घेईल तर त्यांस–पूर्वग्रहानें दूषित न झालेल्या अशा वाचकांस–पेनचें सदर पत्न किंवहुना त्यांतील अयोग्य भागही अक्षम्य आहे असें क्वचितच वाटेल. त्याबद्दल क्षमा मागण्याची जर जरूर असेल तर त्यांतील उत्कट सात्विक त्वेष, तें कार्य करीत आहे. एखाद्यावर कोणीं वार केला असतां जर तो ओरडला तर त्याबद्दल त्यास दोष देतां येणार नाहीं. मरण-द्वारीं पडलेल्या डेस्डिमोनासारख्या स्त्रिया आपल्या भ्रांत मारेकऱ्यास दोषमुक्त करीत असल्याचा देखावा फक्त काव्यसृष्टींतच आढळून येईल. (येतो.) पेननें जेव्हां हे व्यक्तिविषयक आरोप प्रसिद्ध केले तेव्हां, वॉशिंगटनच्या निष्काळजीपणामुळें आपण गळवानें आजारी पडून मृत्युमुखीं पडण्याच्या बेतांत होतों अशी त्याची भावना होती. वॉशिंगटनच्या मागें असलेला आयागो त्यावेळीं त्यास दिसत नव्हता. त्यानें खासगी रीतीनें जेव्हां वॉशिंगटनला खुलासा विचारिला तेव्हां त्यानें मौन धारण केलें. त्याच्या ह्या मौनवृत्तीमुळें, मित्रत्वाच्या नात्यानें खासगी रीतीनें जें सत्य बाहेर

---

want of military judgement in the choice of positions into which the army was put about Newyork and Newgercy. I could see no possible advantage, and nothing but mischief, that could arise by distracting the army into parties, which would have been the case had the intended motion gone on."—Paine's letter III to the P. of U. States (1802).

पडण्याचा संभव होता तें त्याच्या मृत्यूनंतरही बाहेर पडूं शकलें नाहीं. माझ्या मतें ह्या मौनवृत्तीचें कारण असें दिसतें कीं, मॉरिसनें ह्यासंबंधांत केलेल्या वर्तनाची बरोबर माहिती नसल्यामुळें वस्तुस्थितीबद्दल वॉशिंगटनेच मनांत घोटाळा उत्पन्न झाला असावा.

पेनच्या जाहीरपत्राविषयीं म्हणाल तर, वॉशिंगटननें त्याच्या खासगी पत्राचें उत्तर देण्यांत जी निष्कारण टाळाटाळ केली त्याचें तें फळ होतें. आजारी व विश्वासघातानें खिन्न झालेल्या मनुष्याच्या स्वाभाविक क्षोभाचें तें प्रदर्शन होतें. त्यांतील झणझणीतपणा व त्वेष हीं भंग पावलेल्या स्नेहाचें महत्त्व केवढें मोठें होतें हें व्यक्त करीत आहेत. वॉशिंगटन व पेन यांचा स्नेह व परस्पर उपयोग अमेरिकन क्रांतीच्या सुरवातीपासून तों इ० स० १७८७ त पेन युरोपमध्यें जाईपर्यंत अव्याहत चालू होता. युद्धामध्यें वॉशिंगटनच्या झालेल्या चुका जरी पेनला माहीत होत्या—वॉशिंगटनलाही त्या कबूल होत्या—तरी त्यानें त्याच्या विजयांचेंच महत्त्व गाइलें होतें. त्यावेळीं डिलावेअर येथें परत फिरल्यामुळें आणि फिलाडेल्फियाजवळ मिळालेल्या अपयशामुळें वॉशिंगटनवर जे आरोप ठेवण्यांत आले होते, त्यांपासून पेनच्या सर्वशक्तिमान् अशा लेखणीनें त्याचें संरक्षण केलेलें होतें. त्या काळांत 'कॉमनसेन्स' ऊर्फ पेन जें जें कांहीं लिही, त्याजवर लोकमान्यतेचा छाप बसत असे. वॉशिंगटनला त्याच्या हुद्दयावरून काढण्याची जी सूचना त्यावेळीं पुढें आली होती ती, पेननें जर आपलें 'पांचवी आणीबाणीची वेळ' हें पत्रक लिहिलें नसतें तर जागच्याजागीं जिरली असती कीं काय, याची शंकाच आहे.)

प्रकरण १५ वें

बौद्धिक युग. (Age of reason)

'The rights of man' हा जसा पेनचा राजकीय तत्त्वज्ञानाचा ग्रंथ आहे, त्याचप्रमाणें 'The Age of reason' (बौद्धिक युग) हा त्याचा धार्मिक तत्त्वज्ञानाचा ग्रंथ आहे. हे दोन्ही ग्रंथ सारखेच प्रख्यात असून अद्यापपर्यंत त्यांचें महत्त्व कायम आहे. बौद्धिक युगाचा पहिला भाग पेन कारागृहांत जाण्यापूर्वींच तयार झाला होता व दुसरा भाग लिहिण्याचें काम लक्झेंबर्गच्या तुरुंगांत सुरू होऊन मनरोच्या घरीं संपूर्ण झालें होतें. हे दोन्ही भाग प्रसिद्ध होतांच त्यावेळीं त्यावर चोहोंकडून टीकेचा भडिमार सुरू झाला व कित्येक दिवसपर्यंत पेन व त्याचे प्रतिपक्षी ह्यांच्यामध्यें त्या-संबंधानें एकसारखें रण माजून राहिलें होतें. या वाक्युद्धामध्यें पेनच्या प्रतिपक्षीयांनीं त्याजवर अनेक प्रकारचे घाणेरडे आरोप करून त्याचा पाडाव करण्याचा प्रयत्न केलेला आहे; परंतु त्या सर्व प्रकारास तोंड देऊन पेनचा ग्रंथ जिवंत राहिला; इतकेंच नव्हे तर, बहुजनसमाजास प्रिय होऊन बसला आहे. अलीकडे तर त्याच्यासंबंधीचा विरोध बहुतेक नष्ट झाला असून सर्व धर्मांच्या व पंथांच्या लोकांस तो विचारार्ह वाटूं लागला आहे. ह्या ग्रंथामध्यें पेननें खिस्ती राष्ट्रांत धर्माच्या नांवावर जे अमानुष प्रकार तत्कालीं चालू होते* त्यांचें आविष्करण करून त्यांस संमति देणाऱ्या

---

* ह्या अमानुष प्रकारांचें वर्णन डॉ० कॉनवे असें देतोः--

"Paine's book is the uprising of the human *heart* against the religion of Inhumanity. × × × × the Religion of Inhumanity did exist, and it defended against Paine a god of battles, of pomp, of wrath; an instigater of race hatreds and exterminations; an establisher of slevery; a Commander of massacres punishment of theslogical beliefs; a sender of lying spirits to deceive men, and of destroying angels to afflict them with plagues; a creator of millions of human-

अनेक धर्मकल्पनांचा व त्यांचें स्तोम माजविणाऱ्या धर्मगुरूंचा त्यानें धुव्वा उडवून दिला आहे. त्यावरून कित्येक तत्कालीन विद्वानांनीं—विशेषतः धर्मगुरूंनीं—त्याजवर नास्तिकपणाचाही आरोप केला होता; परंतु तो टिकूं शकला नाहीं. कारण जरी ह्या ग्रंथांत त्यानें तत्कालीन खिस्ती धर्मांतील दूषणास्पद प्रकारांचें आवेशानें खंडण केलेलें असलें तरी त्या धर्मांचें खरें व उज्ज्वल स्वरूप व्यक्त करण्याकरितांच केलेलें आहे. परमेश्वराचें अस्तित्व व त्याचें सामर्थ्य नाकबूल करण्याचा त्यांत कोठेंही प्रयत्न केलेला नाहीं. इतकेंच नव्हे, तर खिस्ती धर्माचा उत्पादक जो येशू खिस्त त्याची थोर योग्यताही तो विसरलेला नाहीं. ह्या ग्रंथाच्या पहिल्या भागांत त्यांतील टीकापर विवेचनासंबंधीं तो लिहितोः—

"येथें जें लिहिलें आहे तें दूरान्वयानें सुद्धां जीझस खाइस्टच्या खऱ्या शीलाचा उपमर्द करूं शकणार नाहीं. तो फार सद्गुणी व समंजस मनुष्य होता. त्यानें ज्या नीतीचा उपदेश केला व जी त्यानें स्वतः आचरिली ती अत्यंत हितकर होती. × × × त्यानें फार उत्तम

---

beings under a certainty of their eternal torture by devils and fires of his own creation. This apotheosis of Inhumanity is here called a religion, because it managed to survive from the ages of savagery by violence of superstition, to gain a throne in the Bible by killing off all who did not accept its authority to the letter, and because it was represented by actual inhumanities. The great obstruction of Science and Civilization was that the Bible was quoted in sanction of war, crusades against alien religions, murders for witch craft, divine right of despots, degradation of reason, exaltation of credulity, punishment of opinion and unbiblical discovery, Contempt of human virtues and human nature, and costly ceremonies before an invisible majesty, which exacted from the means of the people, were virtually the offering of human sacrifices."—Dr. Conway on the Age of reason—Paines Life.

प्रकारच्या नीतिमत्तेचा व मानवी समतेचा उपदेश केला; परंतु त्यानें ज्यू धर्मगुरूंच्या भ्रष्ट व स्वार्थमूलक प्रवृत्तीवरही टीका केली—तिच्याविरुद्ध भाषण केलें—आणि त्यामुळें त्यानें त्यांचें शत्रुत्व संपादन केलें. × × × ह्या (दोन पक्षांच्या) भांडणांत हा सद्गुणी व धार्मिक सुधारक प्राणास मुकला. × × × इतर मनुष्यें ज्याप्रमाणें परमेश्वराचीं लेंकरें आहेत त्याप्रमाणेंच तोही परमेश्वराचा पुत्र होता (कारण परमेश्वर हा सर्वांचाच पिता आहे). × × × जीझस ख्राइस्टनें नवीन धर्म स्थापन केला नाहीं. त्यानें मनुष्यांस नीतीचें—नैतिक गुणांचें—आचरण करण्याचा व एकाच देवावर—परमेश्वरावर—विश्वास ठेवण्याचा उपदेश केला. त्याच्या शीलाचा मुख्य विशेष परोपकार हा होय."

ह्याच भागाच्या शेवटीं तो आणखी लिहितो:—

"जी दृश्य सृष्टि आपल्या दृष्टीस पडत आहे ती परमेश्वराची खरी व चिरकाल टिकणारी सृष्टि असून त्यासंबंधानें आपण फसणें शक्य नाहीं. ती सृष्टि, त्याची सत्ता व शहाणपण व्यक्त करीत आहे व तीच त्याचा चांगुलपणा आणि कल्याणेच्छा यांचेंही प्रदर्शन करीत आहे. सर्व प्राण्यांच्या उत्पत्तींत परमेश्वरानें जो चांगुलपणा व जी कल्याणेच्छा व्यक्त केली आहे त्यांचें अनुकरण करणें हेंच मनुष्याचें कर्तव्य आहे. × × × मनुष्यांनीं परस्परांचा छळ करण्याची व सूड उगविण्याची वासना धरणें, तसेंच प्राणिमात्रासंबंधानें (जनावरें वगैरे) क्रूरबुद्धि धारण करणें म्हणजे आपल्या नैतिक कर्तव्याचा भंग करणें होय." परमेश्वरासंबंधानें ज्यानें वरील प्रकारचे उद्गार काढले आहेत त्याच्यावर संतप्त झालेल्या त्याच्या प्रतिपक्षियांनीं रागाच्या आवेशांत केलेले नास्तिकपणाचे आरोप कसे टिकावेत ?

पेनच्या पूर्वीं इंग्लंडमध्यें कांहीं फ्री-थिंकर्स (स्वतंत्रपणें विचार करणारे) होऊन गेले. त्यांपैकीं ब्लाऊंट नामक ग्रंथकाराचा 'Oracles of Reason' या नांवाचा ग्रंथ पेनच्या तारुण्यांत त्यास वाचावयास मिळाला होता. त्याच्या ग्रंथाच्या नांवावरूनच त्यास The Age of reason हें नांव सुचलें असावें असा तज्ज्ञांचा तर्क आहे. तथापि पेनच्या ग्रंथांतील विवेचन वरील ग्रंथकाराहून अधिक सतेज व परिणामकारक आहे. त्यांत निषेधात्मक व विधायक असे दोन्ही प्रकार असून निषेधपर विवरणांत दीर्घकालिक अनु-

अनेक धर्मकल्पनांचा व त्यांचें स्तोम माजविणाऱ्या धर्मगुरूंचा त्यानें धुव्वा उडवून दिला आहे. त्यावरून कित्येक तत्कालीन विद्वानांनी—विशेषतः धर्मगुरूंनीं—त्याजवर नास्तिकपणाचाही आरोप केला होता; परंतु तो टिकूं शकला नाहीं. कारण जरी ह्या ग्रंथांत त्यानें तत्कालीन खिस्ती धर्मातील दूषणास्पद प्रकारांचें आवेशानें खंडण केलेलें असलें तरी त्या धर्माचें खरें व उज्ज्वल स्वरूप व्यक्त करण्याकरितांच केलेलें आहे. परमेश्वराचें अस्तित्व व त्याचें सामर्थ्य नाकबूल करण्याचा त्यांत कोठेंही प्रयत्न केलेला नाहीं. इतकेंच नव्हे, तर खिस्ती धर्माचा उत्पादक जो येशू खिस्त त्याची थोर योग्यताही तो विसरलेला नाहीं. ह्या ग्रंथाच्या पहिल्या भागांत त्यांतील टीकापर विवेचनासंबंधीं तो लिहितोः—

"येथें जें लिहिलें आहे तें दूरान्वयानें सुद्धां जीझस खाइस्टच्या खऱ्या शीलाचा उपमर्द करूं शकणार नाहीं. तो फार सद्गुणी व समंजस मनुष्य होता. त्यानें ज्या नीतीचा उपदेश केला व जी त्यानें स्वतः आचरिली ती अत्यंत हितकर होती. × × × त्यानें फार उत्तम

---

beings under a certainty of their eternal torture by devils and fires of his own creation. This apotheosis of Inhumanity is here called a religion, because it managed to survive from the ages of savagery by violence of superstition, to gain a throne in the Bible by killing off all who did not accept its authority to the letter, and because it was represented by actual inhumanities. The great obstruction of Science and Civilization was that the Bible was quoted in sanction of war, crusades against alien religions, murders for witch craft, divine right of despots, degradation of reason, exaltation of credulity, punishment of opinion and unbiblical discovery, Contempt of human virtues and human nature, and costly ceremonies before an invisible majesty, which exacted from the means of the people, were virtually the offering of human sacrifices."—Dr. Conway on the Age of reason—Paines Life.

प्रकारच्या नीतिमत्तेचा व मानवी समतेचा उपदेश केला; परंतु त्यानें ज्यू धर्मगुरूंच्या भ्रष्ट व स्वार्थमूलक प्रवृत्तीवरही टीका केली—तिच्याविरुद्ध भाषण केलें—आणि त्यामुळें त्यानें त्यांचें शत्रुत्व संपादन केलें. × × × ह्या (दोन पक्षांच्या) भांडणांत हा सद्गुणी व धार्मिक सुधारक प्राणास मुकला. × × × इतर मनुष्यें ज्याप्रमाणें परमेश्वराचीं लेंकरें आहेत त्याप्रमाणेंच तोही परमेश्वराचा पुत्र होता (कारण परमेश्वर हा सर्वांचाच पिता आहे). × × × जीझस ख्राइस्टनें नवीन धर्म स्थापन केला नाहीं. त्यानें मनुष्यांस नीतीचें—नैतिक गुणांचें—आचरण करण्याचा व एकाच देवावर—परमेश्वरावर—विश्वास ठेवण्याचा उपदेश केला. त्याच्या शीलाचा मुख्य विशेष परोपकार हा होय."

ह्याच भागाच्या शेवटीं तो आणखी लिहितोः—

"जी दृश्य सृष्टि आपल्या दृष्टीस पडत आहे ती परमेश्वराची खरी व चिरकाल टिकणारी सृष्टि असून त्यासंबंधानें आपण फसणें शक्य नाहीं. ती सृष्टि, त्याची सत्ता व शहाणपण व्यक्त करीत आहे व तीच त्याचा चांगुलपणा आणि कल्याणेच्छा यांचेंही प्रदर्शन करीत आहे. सर्व प्राण्यांच्या उत्पत्तींत परमेश्वरानें जो चांगुलपणा व जी कल्याणेच्छा व्यक्त केली आहे त्यांचें अनुकरण करणें हेंच मनुष्याचें कर्तव्य आहे. × × × मनुष्यांनीं परस्परांचा छळ करण्याची व सूड उगविण्याची वासना धरणें, तसेंच प्राणिमात्रासंबंधानें (जनावरें वगैरे) क्रूरबुद्धि धारण करणें म्हणजे आपल्या नैतिक कर्तव्याचा भंग करणें होय." परमेश्वरासंबंधानें ज्यानें वरील प्रकारचे उद्गार काढले आहेत त्याच्यावर संतप्त झालेल्या त्याच्या प्रतिपक्षियांनीं रागाच्या आवेशांत केलेले नास्तिकपणाचे आरोप कसे टिकावेत ?

पेनच्या पूर्वीं इंग्लंडमध्यें कांहीं फ्री-थिंकर्स (स्वतंत्रपणें विचार करणारे) होऊन गेले. त्यांपैकीं ब्लाऊंट नामक ग्रंथकाराचा 'Oracles of Reason' या नांवाचा ग्रंथ पेनच्या तारुण्यांत त्यास वाचावयास मिळाला होता. त्याच्या ग्रंथाच्या नांवावरूनच त्यास The Age of reason हें नांव सुचलें असावें असा तज्ज्ञांचा तर्क आहे. तथापि पेनच्या ग्रंथांतील विवेचन वरील ग्रंथकाराहून अधिक सतेज व परिणामकारक आहे. त्यांत निषेधात्मक व विधायक असे दोन्ही प्रकार असून निषेधपर विवरणांत दीर्घकालिक अनु-

भवानें व अवलोकनानें मनांत निश्चित झालेले विचार सामान्य मनुष्याच्या बुद्धीसही सहज पटतील अशा रीतीनें, अगदीं नित्याच्या व्यवहारांतील दृष्टांतानें खुलवून सांगितले आहेत. त्यांतील विधायक भागही ज्ञानेश्वराच्या ज्ञानेश्वरींतील तत्त्वनिरूपणाप्रमाणें उदात्त व हृदयंगम असा आहे. हा ग्रंथ लिहिण्याची कल्पना पेनच्या मनांत अमेरिकन क्रांतीच्या वेळेपासून घोळत असावी असें त्याच्या लेखांतील एका उल्लेखावरून दिसतें. त्याच्या दीर्घायुष्यामध्यें त्याला राजसंस्था व धर्मसंस्था यांसंबंधीं जे अनेक निरनिराळे अनुभव आले त्यांचा विचार केला असतां हा ग्रंथ लिहिण्यास तो सर्वस्वीं पात्र होता–किंबहुना या विषयावर लिहिण्याची पात्रता त्याच्याइतकी दुसऱ्या ग्रंथकाराचे ठायीं क्वचितच आढळून येईल, असें डॉ॰ कॉनवे ह्या प्रख्यात अमेरिकन इतिहाससंशोधकाचें मत आहे. पेनचा हा ग्रंथ विद्वन्मान्य होण्याचें मुख्य कारण त्यांतील तुलनात्मक व ऐतिहासिक पद्धतीची विवेचनशैली हें होय. बायबलमध्यें ज्या गोष्टी सांगितल्या आहेत, त्यांची वरील पद्धतीनें त्यानें इतकी सुंदर छाननी केली आहे कीं, ती वाचून विद्वान् चिकित्सकांनीं मानाच डोलवाव्या! येशू ख्रिस्ताच्या पुनरागमनाविषयीं बायबलमध्यें जी गोष्ट सांगितली आहे तत्संबंधीं पेननें केलेलें विवरण पाहिलें असतां ह्या गोष्टीची साक्ष पटेल. हें 'पुनरागमन' त्यानें मोठ्या खुबीदार कोटिक्रमानें अविश्वसनीय ठरविलें आहे.* बायबलमध्यें सांगितलेल्या

---

* पॉल, त्याचे ५०० साक्षिदार व शुभवर्तमानें यांतील हकीकती–ऊर्फ पुरावा अग्राह्य ठरवून अखेरीस तो असा सिद्धांत काढतो.—

"Stories of this kind had been told of the assassination of julias Cæsar, not many years before, and they generally have their origin in violent deaths, or in the execution of innocent persons. In cases of this kind compassion lends its aid, and benevolently stretches the story. It goes on a little and a little further, till it becomes a most certain truth. Once start a ghost, and credulity fills up its life and assigns the cause of its appearance." थोड्या वर्षांपूर्वीं जुलियस सीझरच्या वधासंबंधानेंही अशाच प्रकारच्या गोष्टी सांगण्यांत येत असत. भयंकर रीतीचे

कित्येक गोष्टी पेनला लहानपणापासूनच हास्यास्पद वाटत होत्या असें त्याच्या पुढील उल्लेखावरून दिसतें:—

" मला पक्कें आठवतें कीं, मी सात आठ वर्षांचा असतांना, माझ्या एका श्रद्धाळू नातेवाईकानें 'Redemption by death of The Son of God' (ईशपुत्राच्या मृत्यूमुळें मिळणारी मुक्ति) ह्या विषयावर एक उपदेश वाचवला. मीं तो ऐकिला. तो संपताच मीं बागेंत गेलों व तेथील पायऱ्यांवरून खालीं उतरत असतां (ती जागा मला पक्की आठवते) मीं जें कांहीं ऐकलें होतें त्याची स्मृति होतांच माझें मन उद्विग्न झालें, व मी आपल्याशीं विचार करूं लागलों कीं, एखाद्या मनोविकारवश मनुष्याप्रमाणें परमेश्वरास —दुसरा कांहीं मार्ग नाहीं असें पाहून—आपला पुत्र मारावयास लावण्यासारखें तें कृत्य होतें व मनुष्यानें जर असलें कृत्य केलें तर त्यास खास फांशीं देतील; तेव्हां असले उपदेश ते कशाकरितां करितात कोण जाणे, असें मला वाटूं लागलें. माझ्या ह्या विचारांत पोरकटपणाचा कांहींएक अंश नव्हता. मला खरोखरीच ती गोष्ट गंभीर स्वरूपाची वाटली. कारण परमेश्वरासंबंधीं माझी जी भावना होती, त्यावरून त्याला असलें कृत्य करण्याची जरूरी नाहीं व त्याच्या हातून तें घडणार नाहीं अशी माझी समजूत होती. सध्यांही माझी तीच समजूत कायम आहे व मला असें वाटूं लागलें आहे कीं, ज्या धर्मांत लहान मुलांच्या मनास धक्का देणारी एखादी गोष्ट असेल तो धर्म खरा नव्हे."

अशा प्रकारच्या गोष्टी ज्या ग्रंथांत आहेत त्यांतील मतें प्रमाण मानून त्याच्या आधारावर धार्मिक व राजकीय बाबतींत जुलूम होत असलेले जेव्हां त्यानें पाहिले तेव्हां ख्रिस्ती धर्माचें खरें व उज्ज्वल स्वरूप व्यक्त करण्याची

आकस्मिक मृत्यु अथवा निरपराधी माणसांचे वध झाले असतां त्यावरून सामान्यतः अशा प्रकारच्या गोष्टी उत्पन्न होतात. त्यांस दयार्द्रभावाचें पाठबळ मिळून सद्बुद्धीनें—चांगुलपणामुळें—त्या अधिकाधिक प्रचलित होत जाऊन अखेरीस त्यास खरेपणाचें स्वरूप प्राप्त होतें. एकदां एखाद्या भूताचा उल्लेख करा कीं, भोळेपणा लागलींच त्यांत जीव घालून—त्याची एखादी कहाणी बनवून त्याच्या आगमनाचें कारणही सांगून टाकतो.

आवश्यकता व उत्कट इच्छा त्यास वाटावी हें अगदीं साहजिक आहे. 'Commonsense' ह्या नांवाचें प्रसिद्ध पत्रक जेव्हां त्यानें लिहिलें तेव्हां-पासूनच प्रस्तुत धर्मविषयक ग्रंथ लिहिण्याची कल्पना त्याचे मनांत घोळत असावी असें दिसतें. राजकीय बाबतींत जसें त्यास व्यक्तिस्वातंत्र्य असावेंसें वाटे तसेंच तें धार्मिक बाबतींत असलें पाहिजे अशी त्याची ह्या काळा-पासूनच (इ० स० १७७६) समजूत होती. क्वेकर लोकांना उद्देशून त्यानें ह्या वेळीं जे लेख लिहिले आहेत त्यांत एके ठिकाणीं तो म्हणतोः—

"धर्माविषयीं म्हणाल तर माझें असें मत आहे कीं, सरकारानें सर्व प्रकारच्या धर्मपंथांच्या आचार्यांचें सारखेंच रक्षण करणें जरूर आहे. या-शिवाय सरकारनें त्या बाबतींत दुसरें कांहींएक करितां कामा नये. मनुष्यानें जर आपली स्वार्थपर संकुचित बुद्धि सोडून दिली तर ह्या बाबतींत त्याला भय उरणार नाहीं. संशय हा क्षुद्र प्राण्यांचा मित्र असून समाजाचा शत्रु आहे. माझ्या स्वतःविषयीं म्हणाल तर मला मनःपूर्वक असें वाटतें कीं, धर्ममतांमध्यें वैचित्र्य असणें ही परमेश्वरी इच्छाच आहे; त्यायोगानें आपल्या दयाळुत्वास अधिक अवसर सांपडण्यासारखा आहे. ××× आपल्या धर्मा-तील निरनिराळीं मतें हीं एकाच कुटुंबांतील मुलांप्रमाणें असून फक्त त्यांच्या नांवांतच काय तो भेद आहे असें मी समजतों."

ह्या अवतरणावरून पेनची धर्मविषयक भावना किती उदार व उदात्त स्वरूपाची होती याची वाचकांस कल्पना होईल. अशा प्रकारच्या उदात्त धार्मिक भावनेचा प्रसार करण्याकरितां The age of reason हा ग्रंथ त्यानें लिहिला. धर्माच्या बाबतींत विवक्षित मताच्या लोकांनीं, त्या मतांविषयीं सरसहा सर्वांनीं आदर व्यक्त करण्याबद्दल आग्रह धरणें व त्याविषयीं कोणी कोणावर जुलूम करणें त्यास बिलकूल पसंत नव्हतें. अशा गोष्टींची त्याला फार चीड येत असे. यामुळें तत्कालीन ख्रिस्तीधर्मप्रवर्तकांच्या एतद्विषयक प्रवृत्तीवर त्यानें सडकून कोरडे ओढले आहेत. परंतु तसें करण्यांत ख्रिस्ती धर्माचा विरोध करण्याचा त्याचा हेतु केव्हांही नव्हता. त्या धर्माचें शुद्ध व सोज्ज्वल स्वरूप व्यक्त करून तद्द्वारें मनुष्यास आत्मोन्नतीच्या उच्च मार्गाचा लाभ करून द्यावा हेंच त्याचें त्या धर्मांतील कित्येक बाबींवर टीका करितांना ध्येय होतें.

'बौद्धिक युग' (Age of reason) या ग्रंथांतील पेनचा ईश्वरविषयक सिद्धांत असा आहेः—

"ह्या विशाल विश्वाचें अवलोकन केलें म्हणजे त्यांतील रचनाकौशल्यावरून ह्याला कोणी निर्मिता असावा अशी खात्री पटते. मनुष्याला विवेचकबुद्धि आहे व स्वभावतः त्याची प्रवृत्ति सन्मार्गाकडे असते, ही गोष्टही ईश्वराचें अस्तित्व दर्शविते. ईश्वर कोणालाही प्रत्यक्ष भेट देत नाहीं. सृष्टीचें विशाल रूप व मनुष्याची सहज सत्प्रवृत्ति हींच त्याचा साक्षात्कार होत. निसर्ग हेंच ईश्वराचें स्वरूप व विवेचकबुद्धि हीच तें पहाण्यास लागणारी दिव्यदृष्टि होय."

याशिवाय याच विषयास अनुसरून तो आणखी म्हणतो—

"प्राणीमात्राकरितां झटणें, त्यांची सुखसंपत्ति वाढविण्याकडे आपलें बुद्धिकौशल्य खर्च करणें म्हणजेच ईश्वराची आराधना करणें होय. धर्माकरितां मनुष्यांचा संहार करणें हें अत्यंत अनुचित होय. मानवी प्राण्यास जर ह्या गोष्टीची जाणीव असती तर कितीतरी युद्धें व रक्तपात टळले असते. मानवसमाज हें ईश्वराचेंच स्वरूप किंबहुना तोच प्रत्यक्ष ईश्वर आहे. अर्थात् ईश्वराकरितां म्हणून माणसांचा बळी घेणें हें अत्यंत निंद्य आहे. ईश्वर दयाळू व न्यायी आहे. तो कोणाचें अनिष्ट करीत नाहीं. ईश्वराला सर्वशक्तिमान् म्हणून (समजून) त्याजकडे विश्वांतील दुःखाचें कर्तृत्व देण्यापेक्षां त्या दयाघन प्रभूला दुःख हरण करण्याविषयीं असमर्थ ठरविलेलें पुरवलें. ईश्वर नेहमीं चांगल्याचाच पक्षपाती आहे." वगैरे.

याप्रमाणें या ग्रंथांतील मुख्य शिकवण आहे. पेननें ह्या ग्रंथांत प्रतिपादन केलेलीं वरील प्रकारचीं मतें व तत्कालीन प्रचलित मतांवर त्यानें केलेली विघातक–कडक–टीका यांच्या योगानें युरोपियन समाजांत अत्यंत प्रचंड विचारक्रांति घडवून आणलेली आहे. प्रारंभीं ह्या क्रांतिप्रवर्तकास त्याच्या स्पष्टोक्तीबद्दल पुष्कळच त्रास व जाच सोसावा लागला; परंतु सत्य, सुसमंजसपणा व उदात्तपणा हे त्याच्या प्रतिपादनांतील विशिष्ट गुण असल्यामुळें अखेरीस त्याच्या मतांचाच विजय झाला. पेनच्या समकालीन अशा कांहीं धर्मप्रवर्तकांनीं त्याजवर पुष्कळ आग पाखडली; परंतु नवीन पिढींतील विचारी लोकांचीं मनें त्याच्या विचारसरणीनें भराभर काबीज केलीं. त्याच्या-

वरील आक्षेपांचें निरसन करण्यास ह्या नूतन पिढींतील लोक स्वयंस्फूर्तीनें तयार होऊं लागले! अमेरिकेमध्यें तर प्रथमारंभीं एका धार्मिक मंडळानें पेनचें हें पुस्तक 'धर्म-पुस्तक' म्हणून प्रसिद्ध केलें. व्हर्जिनियामध्यें वॉशिंग-टनचा जुना मित्र पॅर्सनवीम्स यानें त्याचा प्रसार केला व अद्यापही अमेरिकेंत त्यास 'धर्म–पुस्तक' मानूनच त्याचा प्रसार केला जात असतो. आणि जरी त्यांत कित्येक ठिकाणीं बायबलवर कडक टीका केलेली असली तरी वस्तुतः तें 'धर्ममार्गदर्शक' असेंच पुस्तक आहे; व त्यांत कसल्याही प्रकारची सुधारणा अगर छाटाछाट होतां कामा नये असें अमेरिकेंतील फ्री-थिंकर विद्वान् डॉ० कॉनवे यांचें मत आहे.

कारागृहांतून पेनची सुटका झाल्यानंतर फ्रान्समध्यें त्याचें वजन व लोकप्रियता हीं पूर्वीपेक्षां अनेकपटीनें जास्त वाढलीं. त्याच्यासंबंधानें फ्रेंच-कन्व्हेन्शनकडून अन्याय घडल्यामुळें त्यास निष्कारण हाल सोसावे लागले, हें पाहून बहुतेक फ्रेंच पुढारी खजिल झाले होते; तशांत पेननें त्यांचे अपराध क्षमा करून पूर्वीप्रमाणेंच फ्रेंच राष्ट्राचे कल्याणाप्रीत्यर्थ फिरून प्रयत्न सुरू केलेले पाहून तर एखाद्या साधूप्रमाणें तो त्यांस पूज्य वाटूं लागला! फ्रेंच जनतेचेंही त्याजवरील प्रेम दुणावून त्यांस भक्तीचें स्वरूप प्राप्त झालें होतें. फ्रेंच अधिकारीमंडळ तर हरएक बाबतींत त्याची सल्ला-मसलत घेऊं लागलें होतें. ह्या मंडळाचा त्याजवर इतका विश्वास होता कीं, फ्रान्सांतून अमेरिकेंत जाणाऱ्या प्रतिनिधींस परिचयपत्रिका देण्याकरितां ते मनरोजवळ याचना न करितां पेनजवळ याचना करीत. मनरोलाही त्याबद्दल आनंदच वाटे. त्यालाही पेनचा अतिशय उपयोग होत असे, हें मागें एकदां सांगितलेंच आहे. ह्या सुमारास त्यानें फ्रान्सांतील स्थितीसंबं-धानें अमेरिकेंतील एक गव्हर्नर सॅम्युअल ॲडाम्स यास जें पत्र लिहिलें आहे त्यावरून तत्कालीन फ्रेंच अधिकारीमंडळाशीं त्याचा किती निकट संबंध होता हें कळून येण्यासारखें आहे. त्या पत्राचा सारांश पुढें दिला आहे:—

" प्रिय मित्र मि० मोझर्ड, ज्यांची तिकडे कन्सलच्या जागीं नेमणूक झाली आहे ते तुम्हास हें पत्र देतील. ×××जेव्हां मी अमेरिका सोडून इकडे आलों तेव्हां एक वर्षानें तिकडे परत येण्याचा माझा बेत होता व

तेव्हांपासून दरवर्षी मी असाच बेत करीत आहें; परंतु वस्तुस्थिति अशी आहे कीं, मी येथील क्रांतींत पडलों आहें व ती पूर्ण झाल्याखेरीज–जरी त्यांत मजवर भयंकर प्रसंग आले तरीही–ती सोडून जाणें मला आवडत नाहीं. ज्यांनीं क्रांतीस सुरवात केली त्यांपैकीं मी एकटाच सध्यां जिवंत आहें व मीच एकटा कसा वांचलों हें मला कळत नाहीं. तथापि त्या बाबतींत अमेरिकन सरकारचें मी कांहीं लागत नाहीं हें मात्र मला ठाऊक आहे. ××× मि०मनरो यांनीं केवळ स्वयंस्फूर्तीनें माझें रक्षण केलें.

"××× वर्तमानपत्रद्वारें तुम्हास फ्रेंचांचा सर्वत्र विजय झालेला कळून आला असेलच. त्यांनीं ऑस्ट्रिया, प्रशिया, इंग्लंड, स्पेन, हॉलंड यांच्या सैन्याचा पराभव केला असून हॉलंड देश तर सर्वस्वीं पादाक्रांत केला आहे. त्या देशांत आतां अंतस्थ क्रांति सुरू झाली आहे.

"तुमच्या तिकडे काय हकीकत आहे ती मला माहित नाहीं; परंतु सर्व कांहीं असावें तसें नाहीं असें मला वाटतें. मि० मॉरिस यांच्या नेमणुकीइतकी चुकीची व दुर्दैवाची दुसरी कोणतीही गोष्ट नसेल. माझें हें मत त्यावेळींच मि० जेफर्सन ह्यास कळविलें व मॉरिसलाही येथें बोलून दाखविलें. त्याला जेव्हां परत बोलाविलें त्यावेळीं जर तसें करण्यांत आलें नसतें तर ह्या दोन (फ्रान्स व अमेरिका) राष्ट्रांत लढा पडला असता व मग एक तर त्यास घालवून देण्यांत आलें असतें किंवा अटकेंत ठेवलें असतें. कारण तो ब्रिटिश सरकारचा गुप्त हेर असावा अशी शंका बळावण्यास पुष्कळ कारणें घडून आलीं होतीं.

"मि० जे इंग्लंडांत काय करीत आहे तें मला बरोबर माहीत नाहीं. परंतु ज्यानें अमेरिकन स्वातंत्र्यास मदत केली त्यास जेनें ग्रेनव्हिल यास लिहिलेली यादी वाचून लज्जा व संताप वाटल्यावांचून राहील काय?"*

---

* मि० जे हा अमेरिकेच्या वतीनें इंग्लंडशीं तहाचें बोलणें करण्याकरितां वॉशिंगटनच्या आज्ञेवरून इंग्लंडांत गेला होता. हें कारस्थान अमेरिकेच्या बाण्यास व इभ्रतीस कमीपणा आणण्यासारखें होतें. फ्रान्स व इंग्लंड यांचें त्या वेळीं बरें नव्हतें व अमेरिकेशीं फ्रान्सचें सख्य होतें. तेव्हां अमेरिकेचें हें कारस्थान फ्रान्सला अर्थातच आवडण्यासारखें नव्हतें व मॉरिस

हें पत्र लिहिलें त्यावेळीं पेनची प्रकृति अशक्तच होती. ती पुढें लवकरच अतिशय बिघडली व ह्या वर्षीच्या हिंवाळ्यांत तो अगदीं मरणोन्मुख झाला. फिरून एकवार इंग्लंडमध्यें त्याच्या मृत्यूची वार्ता प्रसिद्ध झाली, व ती ऐकून तेथील दुर्धारक लोकास आनंद वाटला. परंतु पेननें फिरून एकवार त्यांची निराशा केली ! त्याच्या ह्या आजारीपणांत त्याच्या मनास धक्का बसण्यासारखी एक गोष्ट घडून आली. ती अशी कीं, त्याचा 'The age of reason' ह्या ग्रंथ वाचून इंग्लंडांतील त्याच्या कित्येक प्रिय राजकीय मित्रांचा त्याजवर रोष होऊन वर्तमानपत्रांतून त्यांनीं त्याजवर जोराचा हल्ला केल्याचें वृत्त त्यास समजलें. गिल्बर्ट वेक्‌फिल्ड नामक त्याच्या एका मित्रानें तर त्याच्या ग्रंथाचें सविस्तरपणें खंडन करण्याचा आव घालून त्यांत त्याजवर शिव्याशापांचा सडकून भडिमार केला होता. अशा वेळीं पेनच्या जागीं जर दुसरा कोणी कच्च्या दिलाचा माणूस असता तर सदर दुखण्यांत (ह्या धक्क्यामुळें) त्याची इतिश्रीच झाली असती ! पेनच्या मनावरही त्याच्या शारीरिक दौर्बल्यामुळें ह्या आकस्मिक व स्फोटकारक भडिमाराचा बराच अनिष्ट परिणाम झाला; परंतु त्यानें मोठ्या धैर्यानें तो सहन केला. मि० वेक्‌फिल्ड यास पेननें त्याच्या कृतीचा निषेध करणारें एक जोरदार खासगी पत्र यावेळीं लिहिलें आहे. त्यावरून त्यावेळीं त्याच्या मनोवृत्ति अतिशय क्षुब्ध झाल्या असल्याचें स्पष्ट दिसून येतें. मि० वेक्‌फिल्ड-शिवाय इंग्लंडांतील कित्येक धर्मगुरूंनींही त्याच्या ग्रंथावर टीकेचा भडिमार केलेला होता व त्या सर्वांस पेननें पुढें आजारांतून उठल्यावर खरपूस व बिनतोड उत्तरें दिलेलीं आहेत. त्यांचा विचार पुढें योग्य वेळीं करूं.

ह्या तर त्या कारस्थानांतला मुख्य हस्तक होता. त्याचा स्वाभाविक ओढाही इंग्लंडकडेच होता. अर्थात् तो फ्रान्समध्यें साहजिकच अप्रिय होत गेला.

प्रकरण १६ वें

एका नवीन संस्थेची स्थापना.

थिओफिलॅंथ्रफी.

इ० स० १७९५ च्या अखेरीस (नोव्हेंबर, डिसेंबर) पेनचे दिवस फारच कष्टांत गेले. तथापि पुढील वर्षाच्या जानेवारीपासून त्याची प्रकृति सुधारत गेली व एप्रिल महिन्यांत तो पूर्ण बरा झाल्यावर हवा पालटण्याकरितां व्हर्सिलस येथें गेला. तेथील सुंदर हवापाणी व सृष्टिसौंदर्य यांनीं त्याच्या शारीरिक व मानसिक व्याधि दूर करून त्यास फिरून एकवार ताजेंतवानें केलें. ह्या कामीं त्याच्या मित्रमंडळीचे सत्कारपूर्वक केलेले परिश्रमही कारणीभूत झाले. मि० व मिसेस मनरो, सर रॉबर्ट व लेडी स्मिथ, मॅडम लाफेते, मि० व मिसेस बार्लो, मि० व मॅडम् बोनेव्हिले वगैरे मंडळींनीं ह्यावेळीं त्याच्यासंबंधानें फारच काळजी घेतली. सर रॉबर्ट स्मिथ हा इंग्रज असून पॅरिस येथील श्रीमान् पेढीवाला होता. त्याच्या पत्नीची व पेनची मागेंच ओळख झालेली होती; ती ओळख आतां इतकी दुणावली कीं, तिचा व सर रॉबर्ट याचा तो आतां आराध्यदैवत बनून राहिला. त्याचें रहाणें व जेवणखाणही बहुधा त्यांच्याच घरीं असे. वरील मित्रांच्या आनंदी सहवासानें पेनच्या मानसिक दुःखावर (वॉशिंगटनच्या कृतघ्नपणासंबंधीं) पुष्कळसें विरजण पडून तो आतां चांगला आनंदांत काळ घालवूं लागला होता. ह्यावेळीं त्यानें अनेक कविता करून त्या आपल्या मित्रमंडळांत प्रसिद्ध केल्या. ह्या कविता गाणें, गप्पागोष्टी सांगून स्वतःची व मित्रवर्गाची करमणूक करणें, त्यांच्या समवेत सहल करणें, प्रचलित राजकारणाची चर्चा करणें यांत पेनचा वेळ हांहां, म्हणतां मोठ्या मजेंत जात होता. ह्या सुमारास त्यानें "the decline and fall at the English system of Finiance" ह्या नांवाचें एक पत्रक प्रसिद्ध केलें. त्यांत त्यानें इंग्लंडची बँक लवकरच बंद करावी लागेल असें

भविष्य केलें होतें व तें पुढील वर्षी खरें ठरलें. हें पत्रक प्रसिद्ध केल्या-मुळें तत्कालीन फ्रेंच सरकारास तो फारच प्रिय होऊन त्या सरकारांत त्याचें वजन आणखी विशेष वाढलें. त्या सरकारच्या परराष्ट्रीय खात्यानें ह्या पत्रकाच्या हजार प्रती विकत घेतल्या असल्याचा उल्लेख सांपडतो. ह्या पत्रकाची सर्व युरोपियन भाषांत भाषांतरें होऊन तें जगभर प्रसिद्ध झालें. हें पत्रक लिहिलें तेव्हां पेन कांहींसा अशक्तच होता. अशा स्थितींत आंकडेशास्त्राचें सूक्ष्म निरीक्षण करून प्रतिपक्षावर बिनतोड बाजू देणारें हें पत्रक त्यानें लिहिलें, त्यावरून त्याच्या मेंदूच्या सामर्थ्याची—बळकटीची—वाचकांस कांहींशी कल्पना करितां येईल.

अमेरिकेच्या वतीनें जेच्यामार्फत इंग्लंडशीं तह करण्यासंबंधीं जें कारस्थान वॉशिंगटननें सुरू केलें होतें तें इ. स. १७९६ च्या उन्हाळ्यांत यशस्वी होऊन त्या दोन राष्ट्रांत तह घडून आला. ही गोष्ट त्यावेळीं फ्रेंच राष्ट्रास अनिष्ट होती. अर्थात् हा तह होतांच अमेरिकन प्रतिनिधि मनरो व फ्रेंच सरकार यांचे परस्पर संबंध फार नाजुक झाले. इंग्लंडवर तर ह्यावेळीं फ्रेंचांचा विशेषच रोष झाला होता. अर्थात् इंग्रज व अमेरिकन नागरिकांचें जीवित धोक्यांत पडण्यासारखी स्थिति ह्यावेळीं फ्रान्स-मध्यें उत्पन्न झाली होती. त्या सर्वांना आतां काय तो फक्त पेनचाच आधार उरला होता. कारण त्याच्याइतकें दुसऱ्या कोणाही अमे-रिकन अगर इंग्रज गृहस्थाचें त्यावेळीं फ्रेंच सरकारांत वजन नव्हतें. पेन-च्या कित्येक मित्रांना तेथें राहणें अशक्य होऊं लागलें होतें; परंतु पेननें कृतज्ञबुद्धीनें त्यांचें रक्षण केलें. जे त्याच्या फारसे उपयोगी पडले नाहींत अशाही अमेरिकन व इंग्रज गृहस्थांस ह्यावेळीं त्यानें अवश्य ती मदत केलेली आहे.

वॉशिंगटननें ह्यावेळीं इंग्लंडशीं जो तह केला तो पेन व जेफर्सन ह्यांस बिलकूल आवडला नाहीं. अमेरिकन क्रांतीच्या मुळाशीं जीं तत्त्वें होतीं त्या तत्त्वांस कांहींसा बाधक असा हा तह असल्यामुळें वरील दोन गृहस्थां-शिवाय आणखीही कित्येक विचारी अमेरिकन लोकांस तो आवडला नाहीं व वॉशिंगटनला उद्देशून लिहिलेल्या जाहिरपत्रांत पेननें जेव्हां ह्या तहांतील वैगुण्य व अनिष्टसूचक गोष्टी दाखवून देऊन वॉशिंगटनची खरड-

पट्टी काढली (exdosep) तेव्हां तर सबंध अमेरिकन राष्ट्र वॉशिंगटनवर क्षुब्ध झालें व त्यामुळें वॉशिंगटनच्या इभ्रतीस जबर धक्का बसला.

पेनची प्रकृति चांगली सुधारल्यानंतर त्यानें आपल्या 'The age of reason' (बौद्धिक युग) ह्या ग्रंथाच्या आक्षेपकांस उत्तरें देण्यास सुरुवात केली. त्याचे प्रमुख आक्षेपक, बिशप ऑफ लँडॉफ् , बिशप वॉटसन् व आणखी कांहीं इंग्रज धर्मगुरु होते. त्या सर्वांना पेननें यथास्थित उत्तरें दिलीं आहेत. ह्या सर्व उत्तरांतून बायबल व खिस्ती धर्माचें तत्त्वज्ञान ह्यांची निर्भीडपणें व चिकित्सक बुद्धीनें मीमांसा केली असून ती सामान्य वाचकांस कांहींशी दुर्बोध वाटण्याचा संभव असल्यामुळें त्यांचा येथें विशेष विचार करीत नाहीं. येथें इतकें सांगितलें म्हणजे पुरें कीं, सदर ग्रंथावरील पांच-पन्नास लोकांच्या टीका व त्यांजवरील पेनच्या प्रतिटीका ह्या सर्व आतां विसरल्या जाऊन त्याचा मूळ ग्रंथ मात्र आतां सर्व सुधारलेल्या राष्ट्रांतील विचारी लोकांच्या आदरास पात्र झालेला आहे.

'The Age of reason' ह्या ग्रंथामुळें इंग्लंडमध्यें जी चळवळ उडाली त्याची हकीकत फ्रेंच पत्रांतून प्रसिद्ध होतांच फ्रान्सच्या लोकांचेंही त्या पुस्तकाकडे लक्ष वेधलें. त्या पुस्तकांतील तत्त्वें साररूपानें फ्रेंच भाषेंत "Manuel des The'san tropophiles" ह्या नांवानें प्रसिद्ध करण्यांत आलीं. हें पुस्तक इ० स० १७९६ च्या सप्टेंबर महिन्यांत प्रसिद्ध झालें व नंतर थोड्याच दिवसांनीं (जानेवारी १७९७) पेननें पॅरिस येथील पांच कुटुंबांच्या मदतीनें 'थिओफिलँथ्रफी' नामक एक नवीन धर्मसंस्था स्थापन केली. 'थिओफिलँथ्रफी' हा शब्द, 'ईश्वर, प्रेम आणि मनुष्य' ह्यांस असलेल्या तीन ग्रीक शब्दांचा वाचक असून त्यासंबंधानें पेननें 'ईश्वर व मनुष्य यांवर प्रेम करणारे' अथवा 'ईश्वराची आराधना करणारे आणि मानवाचे मित्र' असा खुलासा केला. ही संस्था पॅरिस येथें लॅंबर्द स्ट्रीटच्या कोपऱ्यावर ३४ नंबरच्या घरांत स्थापन करण्यांत आली. ह्या संस्थेचे सभासदांस परमेश्वराचें आस्तित्व व आत्म्याचें अविनाशित्व मान्य होतें. संस्थेच्या स्थापनेच्या प्रसंगीं पेननेंच प्राथमिक भाषण करून तिचें अस्तित्व जाहीर केलें. ह्या भाषणाच्या प्रारंभीं तो म्हणतो—

"धर्माला दोन मुख्य शत्रु आहेत; एक धर्मवेड व दुसरा नास्तिक-

पणा ऊर्फ निरीश्वरवाद. पहिल्याचा बुद्धिवाद व नीति यांच्या साहाय्यानें उच्छेद केला पाहिजे व दुसऱ्याचें नैसर्गिक तत्त्वज्ञानानें निर्मूलन केलें पाहिजे." ह्या भाषणाचे शेवटीं तो म्हणतो:—

"ही संस्था सध्यां बाल्यावस्थेंत असून तिचें सामर्थ्यही थोडें आहे. परंतु धर्मशास्त्राचा अभ्यास शास्त्रोक्त रीतीनें व्हावा अशा रीतिचें शिक्षण देण्याची लवकरच सोय करण्याचा माझा विचार आहे. हें काम उत्तम रीतीनें करण्याकरितां वरचेवर माहिती व खुलासा प्रसिद्ध करणारीं साधनें या संस्थेस उत्पन्न करावीं लागतील; परंतु ज्याअर्थीं ह्या संस्थेचीं मतें व्यक्तीप्रमाणेंच समाजाच्या कल्याणासही कारण होणारीं आहेत आणि ज्याअर्थीं तिनें प्रतिपादिलेल्या तत्त्वांशीं कोणाचा विरोध असण्याचा फारसा संभव नाहीं; त्याअर्थीं हीं साधनें निर्माण करण्यास फारशी अडचण पडणार नाहीं. सध्यांच्या शिक्षणास जर आपण वरील हेतूनें एखाद्या व्याख्यानमालेची जोड दिली तर पहिली गोष्ट, आपणांस धर्मशास्त्राचा अभ्यास इतर सर्व अभ्यासाहून अधिक चित्तवेधक करितां येईल व त्याखेरीज दुसरें असें कीं, त्यायोगानें ज्या कोणास इतर मार्गानें शास्त्रीय पद्धतीचें शिक्षण मिळत नसेल त्यांस तें आपणांस देतां येईल." वगैरे.

ह्या संस्थेचा जो पहिला वार्षिक अहवाल प्रसिद्ध झाला आहे त्यावरून आमच्याकडील एखाद्या प्रार्थनासमाजाप्रमाणें तिचा कार्यक्रम होता असें दिसून येतें. ह्या संस्थेच्या प्रार्थनामंदिरांत चिनी, हिंदु व ग्रीक ग्रंथकारांच्या नैतिक व धार्मिक ग्रंथांतून–ग्रंथांच्या आधारें रचलेलीं–घेतलेलीं पद्यें म्हणण्यांत येत असत. ह्या वर्षाच्या अखेरीस ह्या संस्थेनें एक वाचनालय व मासिकही सुरू केलें होतें. ह्याप्रमाणें फ्रान्समध्यें पहिली नैतिक व धार्मिक संस्था पेननें स्थापन केली. सर्व धर्मांमध्यें ऐक्यभाव–भ्रातृभाव–ह्या संस्थेच्या द्वारें उत्पन्न करावा अशी पेनची भावना–महत्त्वाकांक्षा होती; परंतु पुढें नेपोलियनच्या हातीं फ्रान्सची राज्यसत्ता गेल्यावर ह्या संस्थेचा त्यानें बींमोड केल्यामुळें त्याची ही महत्त्वाकांक्षा सफल होऊं शकली नाहीं. हें सबंद वर्ष पेननें धर्मसंबंधीं चर्चा व वादविवाद करण्यांत घालविलें. पेनचें 'The Age of reason' हें पुस्तक इंग्लंडमध्यें प्रसिद्ध होऊन त्याच्या बऱ्याच आवृत्ति निघाल्यानंतर त्याचा प्रकाशक वुइल्यम्स याजवर त्यासंबंधानें

खटला झाला. व त्यांत मौजेची गोष्ट अशी कीं, 'The rights of man' ह्या पुस्तकासंबंधींच्या खटल्यांत पेनच्या वतीनें ज्या प्रख्यात अर्स्किन नामक कायदेपंडितानें काम चालविलें त्यानेंच 'The Age of reason' वरील खटल्यांत सरकारतर्फे काम चालवून 'लॉर्ड' हा किताब मिळविला! ह्या पुस्तकासंबंधानें इंग्लंडच्या पाद्री लोकांनीं जें काहूर उठविलें होतें, त्यावरून हा खटला उपस्थित झाला; परंतु त्यांत नैतिक जय ह्या पुस्तकाचाच झाला. पेननें फ्रान्समधून ह्या पाद्रीवर्गास उत्तरें देऊन त्यांचा खरपूस समाचारही घेतला होता. ह्या खटल्यानंतर पुढें कांहीं कालानें पेनच्या सदर ग्रंथासंबंधानें खुद्द इंग्लंडच्या लोकांमध्येंही आदर उत्पन्न होऊं लागला.

प्रकरण १७ वें

युरोपांतील अखेरचे दिवस.

पेन व मनरो यांचें फ्रान्सांतील सान्निध्य मॉरिसच्या मनांत सारखें डांचत होतें. त्यानें स्वित्झर्लंडांतून इंग्लंडमध्यें प्रयाण केल्यावर मनरोची नालस्ती करणारीं पत्रें वॉशिंगटनला लिहिलीं. इंग्लंडशीं तह करण्याचें वॉशिंगटननें सुरू केलेलें कारस्थान पेनप्रमाणें मनरोलाही पसंत नव्हतें. परंतु तो अमेरिकन सरकारचा नोकर असल्यामुळें पेनप्रमाणें त्याला ह्या कारस्थानाचा उघडपणें निषेध करितां येणें शक्य नव्हतें. तथापि हीं दोन माणसें एकत्र असणें आपल्या कारस्थानास विघातक आहे अशी मॉरिसनें वॉशिंगटनची समजूत करून दिल्यामुळें त्यानें मनरोस इ० स० १७९६ च्या अखेरीस परत बोलाविलें. त्यावरून १७९७च्या वसंतऋतूंत मनरो सहकुटुंब अमेरिकेस जाण्यास निघाला. त्यांच्याबरोबर जाण्याचा विचार करून पेन हाव्रे येथपर्यंत आला; पण पुढें समुद्रांत इंग्रज बोटी त्याला धरण्याकरितां हिंडत असल्याचें त्याला समजल्यावरून तो तेथून परत फिरला. व ह्या प्रसंगाचें वर्णन करणारें एक पत्र त्यानें जेफर्सन (हा आतां अमेरिकेचा व्हॉईस प्रेसिडेंट झाला होता) यास लिहिलें. ह्यावेळीं इंग्लंड व फ्रान्स ह्यांच्यामध्यें तहाचें बोलणें सुरू होतें, तें कांहीं कारणानें थांबलें. युद्ध बंद करण्याकरितां उभयपक्षांनीं तडजोड करावी असा पेनचा हेतु होता. तेव्हां ही तडजोड कशाप्रकारें करावी याची चर्चा करणारा एक निबंध त्यानें लिहिला व तो तत्कालीन 'डायरेक्टरी'कडे पाठविला. ह्या युद्धाच्या विषयावर त्यानें 'The people of France and the French Armies' या नांवाचें एक पत्रकही फ्रेंच लोकांस उद्देशून प्रसिद्ध केलें. ह्या पत्रकांत त्यानें सर्व युरोपखंडांत शांतता राखण्याचे उपाय सुचविले आहेत. परंतु शांततेचा उपदेश व्यर्थ जात आहे असें पाहून त्यानें इ० स० १७९७ च्या अखेरीस इंग्लंडवर स्वारी करण्याची एक योजना तयार केली. ह्या योजनेसंबंधानें आपल्या मित्र-

मंडळांत तो चर्चा करीत असतांना नेपोलियनच्या कानावर ती गोष्ट गेली. नेपोलियन हा इटलींतून नुकताच विजय संपादून आला होता. त्याला पेनची योजना कळतांच त्यानें त्यास आपल्या घरीं बोलावून एक मेजवानी दिली व त्यावेळीं नेपोलियननें लोकस्वातंत्र्याचे आपण पुरे भक्त आहों अशी खात्री करणारें भाषण पेनशीं केलें. 'The rights of man' हें पुस्तक आपणांस इतकें प्रिय आहे कीं, तें नेहमीं आपल्या उशाशीं असतें. अशा ग्रंथकाराचा सन्मान सोन्याचा पुतळा उभारून करणें जरूर आहे, वगैरे शब्दांनीं त्यानें पेनची खूप स्तुति केली. त्यानें पेनची योजना समजावून घेतली व ती अमलांत आणण्याचें ठरवून त्या स्वारीबरोबर येण्याचें पेनला त्यानें आमंत्रणही दिलें. पेननें ती गोष्ट कबूल केली. त्या योगानें इंग्लंडमध्यें लोकपक्षाला आपल्या इच्छेप्रमाणें राज्यसंस्था स्थापन करितां येऊन शांतता घडवून आणतां येईल अशी पेनची समजूत होती.† ह्याप्रमाणें इंग्लंडमध्यें लोकस्वातंत्र्याचा विजय करून देण्याच्या कल्पनेनें पेन इतका भारून गेला होता कीं, ह्या बाबतींतील नेपोलियनची इच्छा तृप्त करण्याकरितां त्यानें उत्साहपूर्वक अटोकाट प्रयत्न केले. ह्यासंबंधानें फ्रान्समध्यें जो फंड उभारण्यांत आला होता त्या फंडास स्वतःची गैरसोय करूनही पेननें १०० लिव्हर्स दिले. त्याची ही देणगी फ्रेंच डायरेक्टरीनें सत्कारपूर्वक स्वीकारली व त्याचें तत्संबंधींचें पत्र प्रसिद्ध करण्याचा एकमतानें ठराव केला. ह्या डायरेक्टरीचा अध्यक्ष लारेव्हेरियर-लीपॉक्स ह्या नांवाचा गृहस्थ असून तो पेननें स्थापन केलेल्या 'थिओफिलॅंथ्रॉफिक सोसायटी'चा चहाता होता. पेननें आपली इंग्रजी भाषेंत लिहिलेली सदर स्वारीची योजना ह्या गृहस्थाचे स्वाधीन केली. त्यानें त्याचें फ्रेंच भाषांतर करविलें व तें डायरेक्टरीच्या सभासदांपुढें विचाराकरितां मांडलें. तेव्हां डायरेक्टरीनें ती योजना मंजूर केली. त्यावरून तोफांच्या २५० बोटी

---

†'Pain consented, as (so he wrote Jefferson) the intention of the expedition was to give the people of England an apportunity of forming a Government for themselves, and thereby bring about peace.'

Dr. Conway.

बांधण्यांत आल्या. परंतु नेपोलियनच्या कपटव्यूहामुळें ह्या स्वारीचा बेत जागच्या जागींच राहिला. नेपोलिनयचा बेत ह्यावेळीं इजिप्टवर स्वारी करण्याचा होता व त्याप्रीत्यर्थ त्यानें तयारीही चालविली होती. ह्या स्वारीसंबंधानें लोकांचा विरोध प्रकट न व्हावा व या स्वारीस लागणारी साधनसामुग्री सहज तयार व्हावी म्हणून नेपोलियननें केवळ लोकाराधन करण्याकरितां इंग्लंडवर स्वारी करण्याच्या योजनेसंबंधानें आपली पसंती (किंबहुना उत्साह) व्यक्त केली. याप्रमाणें या स्वारीचा बेत फिसकटल्या-वर पेननें फ्रान्सच्या राजकारणांतून आपलें अंग काढून घेतलें; व त्यानें आपलें लक्ष फिरून आपल्या यांत्रिक शोधांकडे वळविलें. पेन ह्या-वेळीं पॅरिस येथें निकोलस द बोनेव्हिले यांच्या घरीं पाहुणा म्हणून राहिला होता. ह्याच घराण्याशीं त्याचा पुढें निकट संबंध जडला व तो मरेपर्यंत कायम होता. बोनेव्हिले हा एक ३७ वर्षांचा तरुण व कुलीन फ्रेंच पत्रकर्ता होता. पेनचीं मतें त्याला फार आवडल्यामुळें ह्या उभयतांत प्रथम स्नेहसंबंध व नंतर घरोबा उत्पन्न झाला होता. ह्या गृहस्थानें पॅरिस येथें एक स्वतंत्र विचाराचें वर्तमानपत्र चालविलें असून तो मधूनमधून उपयुक्त अशीं पुस्तकें व पत्रकेंही प्रसिद्ध करीत असे. त्याकरितां त्यानें एक छापखानाही घातला होता. तो आपल्या पत्रांतून पेनच्या मतांचा उत्साहपूर्वक प्रसार करीत असे. पेन त्याला आपल्या जेवण्याखाण्याचा खर्च देऊन आणखीही शक्य ती मदत आपल्या लेखणीच्या द्वारें करीत असे. ह्या गृहस्थाच्या घरीं राहून पेन आपले पूल, स्टीम एंजिन, स्टीम-बोट, वगैरे यांत्रिक शोधांच्या कल्पना सिद्ध करण्यांत गर्क झाला. त्यानें जरी आतां राजकारण बहुतेक सोडून दिलें होतें तरी सार्वजनिक कामांत पुढाकार घेणारे व इतर विद्वान् हे त्याला वारंवार तेथें येऊन भेटत व सल्लामसलत विचारीत. या भेटी कधीं कधीं इतक्या त्रासदायक होत असत कीं, त्यामुळें त्याच्या कामाची खोटी होत असे व ती न व्हावी म्हणून त्याच्यातर्फे त्या टाळण्याचें काम मॅडम बोनेव्हिले या बाईस करावें लागे. या गोष्टीवरून त्याची तत्कालीन लोकप्रियता व महत्त्व यांचा चांगला अंदाज होण्यासारखा आहे.

नेपोलियनची सत्ता जों जों वाढूं लागली तों तों, फ्रान्समध्यें लोकस्वातंत्र्या-

चा संकोच होऊं लागला हें पाहून निलोकस बोनेव्हिले यानें आपल्या पत्रांत नेपोलियनवर टीका केली. त्यावरून त्याजवर खटला होऊन त्यास शिक्षा झाली; व त्याचें पत्र आणि छापखाना हीं बंद झालीं. ह्या वेळीं पेन बेल्जममध्यें आपल्या एका जुन्या मित्रास भेटण्याकरितां गेलेला होता. त्याला जेव्हां ही हकीकत समजली तेव्हां तो परत आला. त्यावेळीं बोनेव्हिले हा तुरुंगांतून सुटला होता; परंतु त्याचें पत्र व छापखाना गेल्यामुळें त्याची सांपत्तिक स्थिति फार वाईट झाली होती. त्याचा सहवास करणें सुद्धां यावेळीं कांहींसें धोक्याचें होतें. परंतु पेन असल्या विचारानें गर्भगळित होणारांपैकीं नव्हता. तो पूर्वींप्रमाणेंच आपल्या या मित्राच्या घरीं राहिला इतकेंच नव्हे तर, त्यानें त्याच्या कुटुंबाचा खर्चही चालविला! पॅरिसला परत आल्यावर पेननें इंग्लंड, अमेरिका व फ्रान्स या देशांमध्यें परस्पर तहासंबंधीं जीं बोलणीं चालू होतीं (इ०स० १७९८) त्यांसंबंधानें व समुद्रावरील व्यापारासंबंधानें कांहीं किरकोळ, परंतु त्यावेळीं अत्यंत महत्त्वाचीं अशीं ३।४ पत्रकें प्रसिद्ध केलीं. पेनला आतां फ्रान्समध्यें कांहींएक काम उरलेलें नव्हतें. नेपोलियनच्या कारकीर्दींत फ्रान्स देशांत लोकसत्ताक राज्यपद्धति नामशेष होणार हें त्यास पूर्णपणें कळून चुकलें असून तशा अर्थाचें भविष्यही त्यानें वर्तविलें होतें. परंतु बहुत दिवस फ्रान्सनें अंतस्थ व बाह्य शत्रूंशीं तोंड देण्यांत आपलें बहुतेक सामर्थ्य खर्च केलेलें असल्यामुळें त्या राष्ट्रांत नेपोलियनच्या महत्त्वाकांक्षेस त्याचा विरोध संपादन करून आळा घालण्याचें सामर्थ्य उरलें नव्हतें. फ्रेंच राष्ट्रास आतां शांततेची व परशत्रूपासून रक्षण करण्याची आवश्यकता भासत होती व त्या राष्ट्राची ही गरज तात्पुरती तरी नेपोलियननें भागविली होती. अशा स्थितींत लोकमत फिरून त्यास प्रतिकूल करून राज्यक्रांतीचा झगडा पुन्हा सुरू करणें हें फ्रान्सच्या हिताच्या दृष्टीनें गैरमुत्सद्दीपणाचें होतें. सबब प्राप्त झालेल्या स्थितबिद्दल नुसता खेद व्यक्त करण्यापलीकडे पेनला दुसरें कांहींएक करतां येणें शक्य नव्हतें.* म्हणून त्यानें आतां अमेरिकेला

* नेपोलियनसंबंधीं पेनची भविष्यवाणी अशी होती:—

You will shortly see the real strength and figure of Bonaparte. He is wilful, headstrong, proude, morose, presump-

निघून जाण्याचा आपला निश्चय कायम केला व 'एखादें अमेरिकन राष्ट्रीय जहाज फ्रान्सला आल्यास त्यांतून आपणांस स्वदेशीं नेण्याची सोय जमल्यास करावी' असें त्यानें जेफर्सन यास लिहिलें (१ आक्टोबर इ० स० १८००).

इ. स. १८०१ च्या जुलई महिन्यांत नेपोलियन व सातवा पोप यांच्यामध्यें (धर्मसंबंधीं) एकवाक्यतेचा करार झाला. अर्थात् पोपची धार्मिक सत्ता सरकारी रीतीनें नेपोलियननें मान्य केली. ह्या गोष्टीचा पहिला परिणाम असा झाला कीं, सर्व धर्मांचा स्वतंत्र बुद्धीनें विचार करून धार्मिक तत्त्वज्ञानाचा सशास्त्र पद्धतीनें खल करण्याकरितां पेननें जी 'थिओफिलॅंथ्रफिक सोसायटी' स्थापिली होती ती मोडून टाकण्यांत आली. तथापि पेनच्या वाटेस मात्र कोणी गेलें नाहीं. नेपोलियनची सत्ता जरी प्रतिक्षणीं सारखी वाढत होती तरी पेन आपलीं मतें व विचार अद्याप निर्भयपणें व निर्भिडपणें व्यक्त करूं शकत होता. तथापि प्रत्यक्ष राजकारणांत मात्र तो ह्या २।३ वर्षांत पडला नाहीं. ह्या कालांत फ्रेंच सरकारच्या दरबारांतही त्याचें चांगलें वजन होतें, असें त्याच्याशीं फ्रान्सच्या प्रधानाचा ह्यावेळीं त्याच्या पुलांच्या योजनेसंबंधानें झालेल्या पत्रव्यवहारावरून दिसतें. इ. स. १८०१ मध्यें जेफर्सन हा अमेरिकेचा प्रेसिडेंट (अध्यक्ष) निवडून आला. त्यानें मार्च १८ ला पेनला जें पत्र लिहिलें आहे त्यांत त्यानें डौसन नांवाच्या अधिकाऱ्यास, पेनला अमेरिकन जहाजावरून अमेरिकेस पाठविण्याबद्दल हुकूम केल्याचा उल्लेख आहे.*परंतु पेन ह्या जहाजाचा फायदा घेऊं शकला

---

tions; he will be guided no longer; he has pulled the pad from his forehead, and will break his nose or braise his cranium against every table, chair and brick in the room, until at last he must be sent to the hospital. × × × By his intemperate use of power and thirst of dominion, he will cause the people to wish for their old Kings, forgetting what beasts they were."

* ह्या पत्रांत जेफर्सननें पेनचा गौरव केला असून त्यास अमेरिकेंत परत येण्याबद्दल आदरपूर्वक निमंत्रणही करण्यांत आलें आहे.—संपादक.

नाहीं. तथापि जेफर्सन अध्यक्ष झालेला पाहून व आपणासंबंधानें त्याच्या पत्रांतील आदर व प्रेम पाहून पेनला फार आनंद झाला व त्यानें आपले डोळे आतां अमेरिकेकडे लावले. तथापि त्याला आणखी कित्येक महिने फ्रान्सांत काढावे लागले. या अखेरच्या दिवसांत, हेनरी रेडहेड यॉर्क या नांवाचा एक त्याचा इंग्लंडांतलि जुना मित्र त्यास भेटावयास आला होता (जुलंई ते सप्टेंबरच्या दरम्यान). त्या भेटीचा वृत्तांत मोठा हृदयंगम असल्यामुळें पुढें देण्यांत येतें आहे:—

यॉर्क लिहितो:—" कालानें त्याच्या सर्व शरीरावर भयंकर हल्ले केले असून त्याच्या चेहऱ्यावर औदासिन्याची छटा कायमची वसविल्यासारखें दिसत होतें. त्यानें मला जवळच्या एका आसनावर बसावयास सांगितलें व जरी त्याला पुष्कळ वेळपर्यंत माझी ओळख पटली नाहीं तरी तो नेहमींप्रमाणें प्रेमळपणानें बोलत होता. तो माझी ओळख विसरल्याचें पाहून मला फार आश्चर्य वाटलें; परंतु होतां होईल तोंपर्यंत त्याला आपली ओळख देण्याचें टाळण्याचा मीं निश्चय केला. त्याची स्मृति जागृत करण्याकरितां तो व मी एकत्र रहात असल्या वेळच्या अनेक गोष्टी मीं त्यांस सांगितल्या, परंतु आपण एकत्र रहात होतों ही गोष्ट मात्र सांगितली नाहीं. त्या ऐकत असतां तो वारंवार आपला हात आपल्या कपाळास लावून म्हणे कीं 'हो! हा आवाज माझ्या परिचयाचा दिसतो, पण तो कोठला कोण हें मात्र मला आठवत नाहीं!' अखेरीस त्याचा संशय दूर करण्याची ही संधि साधून मीं त्याला एक गतगोष्ट सांगितली व त्यावरून तत्काल त्याला माझी ओळख पटली. ती पटतांच त्याच्या चेहऱ्यांत जो एकदम फरक झाला त्याचें वर्णन करणें अशक्य आहे. त्याच्या चेहऱ्यावर लागलींच टकळाई आली; त्यानें आपल्या हातानें माझा हात दाबला व त्यास गहिंवर येऊन त्याच्या डोळ्यांतून हळूच एक अश्रुबिंदु निघून त्याच्या गालावर पडला. मलाही कांहीं कमी गहिंवर आलेला नव्हता. आम्ही दोघेही कांहीं वेळ स्तब्ध होतों; दोघांच्याही तोंडांतून शब्द उमटेना. अशा स्थितींत कांहीं क्षण गेल्यावर मी म्हणालों, 'याप्रमाणें दहा वर्षांनंतर फिरून एकवार आपली गांठ पडली.' तो म्हणाला, 'हो, अशा रीतीनें येथें आपली गांठ पडेल असें कोणास वाटलें असतें?' नंतर त्यानें मला

फ्रान्समध्यें येण्याचें कारण विचारलें. तें मीं सांगितल्यावर तो म्हणाला, 'त्यांनीं* स्वातंत्र्याकरितां पुष्कळ रक्तपात केला व आतां त्यांना तें पूर्ण मिळालें आहे. प्रामाणिक मनुष्यास राहण्यास हा देश अयोग्य आहे. लोकसत्ताक राज्यपद्धतीचीं तत्त्वें त्यांना समजत नाहींत आणि उत्तम गोष्ट म्हटली म्हणजे त्यांच्या वाटेस न जाणें हीच होय. त्यांनीं सर्व युरोपखंड पादाक्रांत केलें आहे परंतु तें पूर्वीपेक्षांही अधिक वाईट स्थितींत टाकण्याकरितांच होय.' यावर मी म्हणालों कीं, 'मनुष्यजातीच्या भवितव्यतेसंबंधानें असले निराशेचे उद्गार तुमच्या तोंडांतून निघालेले पाहून आश्चर्य वाटतें; लोकस्वातंत्र्याकरितां अद्यापही येथें कांहीं तरी करितां येईल.' 'लोकस्वातंत्र्य!' तो उद्गारला, 'तुम्ही ह्याला लोकस्वातंत्र्य म्हणतां काय ? कॉन्स्टांटिनोपलच्या गुलामापेक्षांही ह्यांची स्थिति वाईट आहे. कारण तेथल्या गुलामगिरीबद्दल परलोकीं श्रेष्ठ–बादशहा–होण्याची तरी त्यांना आशा असते. पण ह्यांना पहावें तों स्वर्ग व नरक यांवर ह्यांचा विश्वास नसल्यामुळें तीही आशा नाहीं आणि असें असूनही हे खुषीनें गुलाम बनले आहेत. जगामध्यें अमेरिकेशिवाय दुसरें कोठेंही खरें लोकस्वातंत्र्य नाहीं; फक्त तोच देश तुमच्या आमच्या सारख्यांस रहाण्यास योग्य आहे. ह्या देशांतून शक्य तितके लवकर निघून जाण्याचा माझा बेत आहे. मी बहुधा पुढील हिंवाळ्यांत जाईन म्हणतों; तुम्ही तरुण आहां आणि कदाचित् तुम्हांस (येथें) चांगले दिवस पहावयास मिळतील; परंतु युरोप व तेथील दास्यत्वजन्य राजकारण याचा मला वीट आला आहे.' या पहिल्या भेटीनंतर यार्क व पेन यांचा कित्येक दिवस जो सहवास होता त्यासंबंधानें यॉर्क म्हणतो—

"ह्या भेटीनंतर मीं पेनच्या अनेक भेटी घेतल्या आहेत. त्याच्या तत्त्वज्ञानासंबंधीं इंग्लंडांतील लोकमतासंबंधानें त्याचें औदासिन्य पाहून मला कमी आश्चर्य वाटलें नाहीं. त्याला तो विषय काढलेला फारसा आवडत नसे. परंतु एकदां त्यावर चर्चा करण्याविषयीं त्यास स्फूर्ति व्हावी म्हणून मीं मुद्दाम त्यास त्याच्या कित्येक तत्त्वांविरुद्ध अलीकडे माझें मत बनलें असल्याचें सांगितलें. तेव्हां तो म्हणाला, 'तुम्हाला तसें करण्याचा खास

* फ्रेंच लोक.

हक्क आहे; परंतु तुम्हाला वस्तूंचा स्वभाव बदलतां येणें शक्य नाहीं. फ्रेंचांनीं सर्व प्रामाणिक मनुष्यांस घाबरें करून सोडलें आहे, परंतु अद्याप, सत्य तें सत्यच आहे (सत्यानें सत्यत्व सोडलें नाहीं). जरी माझ्या मतांचा प्रसार इंग्लंडांत दुःखकारक परिणामावांचून होणें शक्य नाहीं असें तुम्हास वाटत असलें तरी त्यांच्या न्यायीपणाबद्दल तुमची खात्री झाली आहे हें खास.' येथें त्यानें ××× गृहस्थाबद्दल चर्चा केली. त्यावरून त्याच्या 'एज ऑफ रीझन' विषयीं बोलण्यास संधि मिळाल्यावरून मीं म्हटलें कीं, 'तुमच्या सदर पुस्तकामुळें इंग्लंडांतील तुमच्या अनेक मित्रांची तुमचेवर खप्पा मर्जी झाली आहे.' हें ऐकतांच तो मोठ्या आवेशानें व उत्साहानें म्हणाला. 'परमेश्वरासंबंधानें अत्युच्च अशी भावना मनुष्याच्या ठायीं निर्माण करण्यास तें पुस्तक मदत करणार नाहीं असें जर मला वाटलें असतें तर तें मीं खास लिहिलें नसतें.' नंतर त्यानें आमच्या ठराविक—परंपरागत चालत आलेल्या—मतांचा जोरानें निषेध केला व तसें करीत असतांना परमेश्वराच्या थोरवीविषयीं त्याच्या तोंडून मीं कधींही न ऐकलेल्या अशा अनेक उदात्त व उच्च कल्पना बाहेर पडत होत्या. स्वतःच्या मतांचें समर्थन करण्याकरितां आपण प्राण खर्ची घालण्यासही तयार असल्याचें त्यानें सांगितलें व म्हणाला, 'बिशप ऑफ लँडॉफ' यांनीं पाहिजे तर मला स्मिथफिल्ड येथें भाजून काढावें; पण अशा प्रकारच्या मानवी छळानें माझीं मतें बदलणार नाहींत!' नंतर त्यानें (त्या) बिशपचें पुस्तक काढून त्यांतील आक्षेपार्ह भागावरील आपलें म्हणणें वाचून दाखविलें व अखेरीस सदर बिशपच्या उदार स्वभावाची प्रशंसा करून इतर आक्षेपकांचे ठायीं इतकें मनौदार्य नसल्याबद्दल त्यानें खेद व्यक्त केला. राजकारणाविषयीं तो जितका (त्यावेळीं) उदासीन दिसला तितकाच धार्मिक बाबीसंबंधानें उत्साहपूर्ण दिसला. त्याचें एक उदाहरण पुढें देतों. आमच्या ओळखीच्या एका इंग्रज सभ्य स्त्रीनें पेनची ओळख करून घेण्याची इच्छा व्यक्त केली. त्यावरून मीं एके दिवशीं त्यास जेवणाचें आमंत्रण दिलें. ही स्त्रीही त्या दिवशीं यावयाची होती. परंतु ती रोमन कॅथॉलिक पंथाची होती, तथापि पेनशीं परिचय करून घेण्यास उत्सुक होती- सबब धर्मासंबंधीं कांहीं बोलूं नये अशी मीं पेनला अगोदरच सूचना दिली व त्यानेंही मोठ्या आनंदानें तसें करण्याचें कबूल केलें. ××

सुमारें चार तासपर्यंत त्यानें सर्व मंडळीला आपल्या बहुश्रुत, विनोदी व आख्यायिकापूर्ण भाषणानें गार करून टाकलें. प्रतिभा व अभिरुचि ह्यांविषयीं त्यानें केलेली चर्चा तेथें हजर असलेल्यांपैकीं कोणीही विसरणार नाहीं. ह्याप्रमाणें सर्व कांहीं माझ्या इच्छेप्रमाणें चाललें होतें व तेथें असलेल्या सुंदर शांपेनमुळें त्याच्या भाषणास विशेष रंग चढून आम्ही सर्वजण मोठ्या आनंदांत होतों. परंतु इतक्यांत दुर्दैवानें तेथील एका माणसानें त्याच्या 'एज ऑफ रीझन'संबंधानें कांहीं उल्लेख केला. लागलींच त्यानें पूर्वींचा विषय सोडून दिला व त्या गृहस्थास उद्देशून आपल्या सदर पुस्तकासंबंधानें तो चर्चा करूं लागला. व म्हणाला कीं, 'ताऱ्यांच्या गतीचें यत्किंचित् निरीक्षणही मोजेसला खोटा ठरविण्यास पुरें आहे.' त्याचें अशा प्रकारचें भाषण कांहीं केल्या थांबेना. मीं विषय बदलण्याची आपल्याकडून शर्थ केली पण व्यर्थ! अखेरीस मला खंती वाटून मीं त्याला त्याच्या वचनाची आठवण दिली व याप्रमाणें स्त्रियांच्या मनोवृत्ति दुखविणें इष्ट नाहीं असें त्यास सांगितलें. तेव्हां तो म्हणाला, 'हो ! हो ! अशा प्रकारें लोक पूर्वग्रहपीडित असावेत ही केवढी अनुकंपनीय स्थिति आहे बरें !' यावर मीं म्हटलें, 'त्यांचे पूर्वग्रह हे सद्‌गुणही असूं शकतील.' तो म्हणाला, 'तसें असेल तर त्यांचा बहर, दिसण्यास कदाचित् चांगला असूं शकेल पण त्यांचें मूळ दुर्बल–कुजकें–आहे.' ××× मि० पेन याच्या अंगचा मुख्य गुण असा आहे कीं, त्याची स्मरणशक्ति फार विलक्षण आहे. आपल्या आयुष्यांत लिहिलेल्या ग्रंथांतील बहुतेक प्रमुख ग्रंथ त्यास पाठ आहेत. वगैरे."

ह्या वर्षाच्या ऑगस्ट महिन्यांत पॅरिस येथील पेनचा प्रिय मित्र सर रॉबर्ट स्मिथ हा वारला. त्यामुळें पॅरिसमधला त्याचा आणखी एक स्नेहतंतु विलयास गेला. आतां तर त्यास पॅरिस केव्हां सोडीन असें होऊन गेलें. त्याचा मित्र बोनेव्हिले यानें सहकुटुंब अमेरिकेस येण्याचें कबूल केलें. कारण नेपोलियनच्या राज्यपद्धतीस तो कंटाळला होता. पेननें त्याची इच्छा पूर्ण करण्याचें त्यास अभिवचन दिलें. पॅरिसहून अमेरिकेस जाण्याचा आपला बेत त्यानें इंग्लंडांतील त्याचा परममित्र, भक्त व प्रकाशक रिक्मन यास अगोदरच कळविला असल्यामुळें तोही त्याचा अखेरचा निरोप

घेण्याकरितां ह्यावेळीं पॅरिस येथें आला होता. त्याच्याबरोबर पेन हावरे येथें गेला व तेथून तारीख १ सप्टेंबर रोजीं पेननें अमेरिकेस प्रयाण केलें. 'The Rights of man' ह्या पुस्तकांतील स्वतंत्र विचाराच्या प्रदर्शनाबद्दल सारखाच छळ सोसणाऱ्या ह्या दोन देशभक्तांनीं परस्परांचा जेव्हां अखेरचा निरोप घेतला तेव्हांचा तो हृदयद्रावक देखावा कोणासही सहज गहिंवर आणण्यासारखा होता. पेनच्या आगबोटीच्या शिडाचें अखेरचें टोंक अदृश्य होईपर्यंत रिक्मन त्याकडे सारखा टक लावून पहात धक्क्यावर उभा होता; व जेव्हां ती आगबोट पार दृष्टीआड झाली तेव्हां धक्क्यावरील बांकावर बसून त्यानें पेनच्या अभीष्टचिंतनपर पुढील कविता तयार केली.

" Thus smooth be thy waves and thus
gentle the breeze,
As thou bearest my Paine far away,
O waft him to comfort and regions of ease,
Each blessing of freedom and friendship
to seize,
And bright be his setting sun's ray."

ही कविता गुणगुणत तो खिन्न होत्साता परत फिरला.

प्रकरण १८ वें

अमेरिकेंत पुनरागमन.

अमेरिकेस जाण्याकरितां म्हणून आगबोटींत पाय ठेवतांच पेनच्या मनांत अनेक प्रकारचे आनंदकारक विचार-तरंग उसळूं लागले होते. अमेरिका सोडून त्यास ह्यावेळीं पंधरा वर्षें होऊन गेलीं होतीं. ज्या तत्त्वांकरितां त्यानें अमेरिकेंत अनेक प्रकारचे कष्ट सोसले त्याच तत्त्वांच्या प्रसाराकरितां तो युरोपमध्यें आला होता व ह्या पंधरा वर्षांत त्याला जो नानाप्रकारचा खेदजनक अनुभव आला त्यामुळें त्याचें मन त्रस्त झालेलें होतें. अमेरिका हें लोकस्वातंत्र्याचें व शांतीचें अधिष्ठान असल्यामुळें तेथें आपल्या त्रस्त मनाला शांति व अनेक प्रकारच्या आपदांनीं जीर्ण झालेल्या शरीरास आराम—सौख्य—मिळेल असें त्याला वाटावयास लागलें होतें. वॉशिंगटननें जरी त्याच्याशीं अयोग्य वर्तन केलें असलें तरी तो मृत होऊन बराच काल लोटला असल्यामुळें व सध्यांचा अमेरिकन प्रेसिडेंट जेफर्सन हा त्यास प्रेमभरानें आलिंगन देण्यास तयार असल्यामुळें सरकारदरबारींही आपली चांगली मानमान्यता राहील असें त्यास वाटत होतें. अमेरिकन लोकमतामध्यें जरी ह्या पंधरा वर्षांच्या अवधींत प्रतिक्रिया सुरू झालेली होती तरी त्याची पूर्ण माहिती पेनला नसल्यामुळें सामान्य जनता पूर्वींप्रमाणेंच आपलें आदरपूर्वक स्वागत करील अशी त्याची कल्पना होती. आपल्या कित्येक जुन्या मित्रांना लहानाचे मोठे झालेले व सुस्थितींत असलेले पाहण्याचा योग येणार ह्या विचारानेंही त्याचें मन प्रफुल्लित झालेलें होतें. बॉर्डनटौन येथील आपले तरुणपणचे संवगडी आपणांस मोठ्या प्रेमानें भेटावयास येतील व आनंदांत भर घालतील वगैरे अनेक प्रकारचे विचार त्याच्या मनांत घोळूं लागले होते. त्या विचारांच्या वातावरणांत त्याचे प्रवासाचे साठ दिवस कसे हां-हां म्हणतां निघून गेले व ता. ३० आक्टोबर १८०२ रोजीं तो अमेरिकेच्या बॉल्टिमोअर बंदरांत उतरला. तेथें येतांच त्यानें जेफर्सन यांस पुढील पत्र लिहिलें.

" हावरेहून निघून ६० दिवसांच्या प्रवासानंतर मी शनवारीं येथें येऊन पोंचलों. माझें ओझें-फुलांचे नमुने, चक्रें वगैरे-मी लवकरच जॉर्जटाऊनला पाठवितों व नंतर तुमच्या भेटीस येतों. "

आपला
" थॉमस पेन "

पेन जेव्हां वॉशिंगटन शहरीं आला तेव्हां त्यास, मनरोची पुन्हा फ्रान्सांतील वकिलाचे जागीं नेमणूक झाल्याचें वृत्त समजलें. मनरो त्या-वेळीं फ्रान्सांत जाण्याच्या तयारींत गुंतला होता. त्याजबरोबर त्यानें सर रॉबर्ट स्मिथच्या जांवयास देण्याकरितां एक पत्र दिलें व त्याच लखोट्यांत मि० रिक्मन याकरितांही एक पत्र घातलें. त्या पत्रांत आपल्या आगमनासंबंधीं तो लिहितोः—" माझ्या आगमनामुळें उडालेल्या चळवळीची तुम्हांस कल्पना होणें शक्य नाहीं. प्रत्येक पत्र (मजविषयीं) स्तुति अगर निंदा यांनीं भरलेलें आहे. ह्या देशांतील माझ्या मालमत्तेचें माझ्या मित्रांनीं चांगलें रक्षण केलें असून तिची किंमत सध्यां सहा हजार पौंड आहे. त्याचें बँकेंत ठेवल्यास दरसाल ४०० पौंड उत्पन्न होईल. तुमचें कुटुंब व माझें मित्रमंडळ यांस माझा नमस्कार कळवा " वगैरे.

अमेरिकेंत गेल्यावर आपणास शारीरिक व मानसिक स्वास्थ्य मिळेल म्हणून ज्या काल्पनिक सृष्टींत पेन आगबोटींत असतांना गुंग होता ती अनुभवानें केवळ स्वप्नसृष्टीच ठरली ! कारण पेनचें 'एज ऑफ रीझन' (बौद्धिक युग) अमेरिकेंत प्रसिद्ध झाल्यापासून तेथील लोकमत त्याच्या-विरुद्ध बनत चाललें होतें. अमेरिकेंतील बहुतेक लोक, राजकीय गुलाम-गिरींतून मुक्त होण्यास मदत करणारें पेनचें तत्त्वज्ञान ऐकण्यास उत्साह-पूर्वक तयार होते; परंतु धार्मिक गुलामगिरींतून त्यांची सुटका व्हावी म्हणून त्यानें उपदेशिलेलें तत्त्वज्ञान वाचतांच कित्येकांचीं माथीं इतकीं फिरलीं कीं, ते पेनवर 'नास्तिक, सैतान, धर्मलंड ' वगैरे शेलक्या शब्दांचा वर्षाव करूं लागले होते ! मनुष्याच्या असंबद्ध व दुराग्रही स्वभावाचा हा नमुना लक्षांत ठेवण्यासारखा आहे. राजकीय गुलामगिरी नको म्हणणारांस धार्मिक गुलामगिरीचा कंटाळा न यावा ही खरोखरीच मोठी विस्मयकारक

गोष्ट आहे यांत शंका नाहीं, परंतु दुर्दैवानें मानवसमाजांत अशा प्रकारचा असंबद्धपणा अनेक वेळां आढळून आल्याचें इतिहासावरून दिसून येतें. मानवी प्राण्याच्या ह्या असंबद्धतेंतच आजपर्यंत होऊन गेलेल्या मोठमोठ्या धर्म-सुधारकांच्या छळांचें बीज सांठवून ठेवलेलें आढळून येईल. पेन हाही एक उत्तम प्रकारचा—उच्च वर्गांतील—धर्मसुधारक होता. अर्थात् त्यालाही धार्मिक स्वातंत्र्य व सुधारणा यांचा उपदेश करण्याबद्दल लोकच्छल सोसणें भाग पडावें हें साहजिकच आहे. परंतु अमेरिकन लोकांच्या शहाणपणाबद्दल त्याच्या मनांत फाजील विश्वास असल्यामुळें त्याला प्रथम ह्या छळाची कल्पना आली नाहीं. असो. पेन अमेरिकेंत आला तेव्हां त्याच्या उपरोक्त (धार्मिक) पुस्तकामुळें लोकमत त्यास प्रतिकूल होत चाललें होतेंच; याशिवाय राजकीय बाबतींतही अमेरिकेंत ह्यावेळीं 'फेडरॅलिस्ट' व डिमोक्रॅट* असे दोन पक्ष झालेले होते. हे दोन्ही पक्ष प्रबल असून सध्यां डिमोक्रॅट पक्ष अधिकारारूढ होता. तथापि लोकमत आपल्या बाजूस कायम ठेवण्याकरितां त्यास आपल्या प्रतिपक्षाशीं फार जपून वागावें लागे. जेफर्सन हा ह्या पक्षाचा एक पुढारी असून सध्यां अमेरिकेचा अध्यक्ष होता. पेन हा त्याचा पक्का दोस्त असल्याबद्दल सर्वत्र ख्याति होती. तेव्हां अध्यक्षाच्या मदतीनें तो अमेरिकन राज्यकारभारांत घुसेल अशी भीति वाटून फेडरॅलिस्ट पक्षानें अगोदरपासूनच त्याच्याविरुद्ध काहूर माजविण्यास सुरवात केली होती. इतक्यांत पेन वॉशिंगटनला येऊन पोहोंचला व त्यानें जेफर्सनची गांठ घेतली. तेव्हां त्यानें त्याचें फारच सत्कारपूर्वक स्वागत केलें; तें पाहून तर उपरोक्त पक्षाची भीति जास्तच दुणावली. त्या पक्षाच्या वर्तमानपत्रांनीं पेन व जेफर्सन ह्या दोघांवरही टीकेचा भडिमार सुरू केला. तेव्हां जेफर्सनची बाजू बळकट करण्याकरितां पेननें, 'कोणत्याही प्रकारच्या सरकारी हुद्दयाचा स्वीकार करण्याचा आपला विचार नसून अखेरपर्यंत आपण लेखनव्यवसाय व यांत्रिक शोध यांतच आपला काल घालविणार' असें जाहीर केलें. तरीही

---

* हे दोन पक्ष अनुक्रमें इंग्लंडांतील 'कॉन्झरव्हेटिव्ह' व 'लिबरल' ह्या दोन पक्षांसमान होते.

किल्येक पत्रांचीं तोंडें मिटेनात. त्यांनीं जेफर्सनवर टीका करण्याचा सारखा सपाटा चालविला. तेव्हां त्याचें संरक्षण करण्याकरितां पेनला त्या टीकेस प्रत्युत्तर देण्याचें काम करावें लागलें.

ह्या सुमारास 'लुशियाना' नामक संस्थान फ्रेंचांपासून विकत घेण्याचा अमेरिकन सरकारचा प्रयत्न चालू होता. त्यासंबंधानें जेफर्सन यानें पेनला सल्ला विचारल्यावरून त्यानें ह्या बाबतींत सुमारें तीन चार विस्तृत पत्रें त्यास लिहिलीं आहेत. त्यांत या योजनेचा, व ती पूर्ण झाल्यावर सदर संस्थानांत सुरू करावयाच्या शासनपद्धतीचा सांगोपांग विचार केलेला आहे. पेनच्या धार्मिक मतांसंबंधानें अमेरिकेंतील किल्येक प्रख्यात व वजनदार अशा धर्मगुरूंचाही प्रतिकूल अभिप्राय बनलेला होता. ते त्यास 'नास्तिक' मानूं लागले होते व त्याच्याशीं स्नेह ठेवल्याबद्दल जेफर्सन ह्यासही ते दोष देऊं लागले होते. एकानें तर 'पेनला साहाय्य करून जेफर्सन नास्तिकपणाला उत्तेजन देत आहे' असेंही विधान केलें. त्यानंतर जेफर्सन यानें कांहीं दिवस पेनची गांठ घेतली नाहीं. ह्या गोष्टीचा पेनच्या मनावर फार परिणाम झाला व त्यानें लागलीच तत्संबंधीं जेफर्सन यास एक पत्र लिहिलें. पेनचा गैरसमज झाला आहे असें दिसून येतांच जेफर्सननें तत्काळ त्यास आपल्या घरीं बोलाविलें व तेथें त्याचा पाहुणचार घेत तो किल्येक दिवस राहिला. जेफर्सन त्याच्याशीं अगदीं मोकळ्या मनानें बोलत असे; व ते दोघेही भररस्त्यांतून हातांत हात घालून चालत, इतकी त्या उभयतां-मध्यें सलगी होती. येथें कांहीं दिवस राहिल्यानंतर पेन प्रवास करीत करीत बॉर्डनटौन येथें गेला. वाटेंत फिलाडेल्फिया येथें आपल्या जुन्या मित्रांस भेटण्याच्या हेतूनें तो उतरला होता; परंतु त्याच्या धार्मिक मतांच्या बागुलबुवास भिऊन गेल्यामुळें ते त्यास भेटले नाहींत. यानंतर कांहीं कालानें जेफर्सन पुन्हा अध्यक्षाच्या जागेकरितां उमेदवार म्हणून पुढें आला. तेव्हां त्यास मतें मिळविण्याच्या चळवळींत पेन प्रमुखपणें भाग घेऊं लागला. हें त्याचें कृत्य अदूरदर्शीपणाचें होतें; परंतु मित्रकार्याच्या वेळीं इतका पोंच ठेवण्याचा विचार त्याच्या मनांत केव्हांही येत नसे. जेफर्सनच्या कारकीर्दीवर त्याच्या प्रतिपक्षानें एक टीकारूप पत्रक प्रसिद्ध केलें होतें. त्यास पेननें सप्रमाण देऊन त्याच्या प्रतिपक्षास चीत करून

टाकलें. बॉर्डनटौनमध्यें असतांना ह्यावेळीं त्याची दिनचर्या कशा प्रकारची होती, हें मि० उडवर्ड नामक एका तत्कालीन लेखकानें आपल्या पत्रांत नमूद केलें आहे. त्यांतून एक लहानसें अवतरण पुढें देतों.

" आपल्या वाङ्मयात्मक व्यवसायांत व लिहिण्यांत पेन बहुतेक सदा सर्वकाळ गढून गेलेला असे. तथापि दिवसाचे वेळीं तो कित्येकांस भेटत असे. चालतांना तो बहुधा विचारमग्न असे आणि त्यामुळें त्याच्या जवळून जरी कोणी गेलें तरी प्रत्यक्ष त्याच्याशीं बोलल्याशिवाय तें त्याच्या क्वचितच लक्षांत येई. ××× त्याच्या धार्मिक मतांमुळें सामान्य जनतेचा त्याच्यावर रोष झाला होता; तथापि कित्येक लोकांस त्यानें आपल्या मताची दीक्षा देऊन आपणांसारखे बनविलें होतें. त्याचा मित्र कर्नल किर्कब्राइड यासही त्याचीं धार्मिक मतें आवडत नव्हतीं !"

बॉर्डनटौन व त्याच्या आसपासचा प्रदेश यांत तो फारच अप्रिय झाला होता. तो रस्त्यावरून जात असतां लोक त्याचा अपमान करीत; परंतु तो त्यांजवर न रागावतां त्यांच्या अज्ञानाबद्दल त्यांची कींव करीत असे ! १८०३ च्या मार्च महिन्यांत तो मनरोला निरोप देण्याकरितां न्यूयॉर्क येथें आला. तेथें त्याच्या राजकीय व धार्मिक मतांसंबंधानें दोन पक्ष झालेले होते. एक पक्ष त्यास अनुकूल असून त्यानें त्याचें मोठ्या थाटानें स्वागत केलें व दुसऱ्या पक्षानें त्याची नालस्ती करण्याचा सपाटा सुरू केला.

पेनजवळ धर्मविषयक लेखांचा बराच मोठा संग्रह सांठून राहिलेला होता. तो प्रसिद्ध करण्याचें काम त्यानें ह्यावेळीं सुरू केलें. इ. स. १८०४ मध्यें एल्यू पामर नामक त्याच्या मित्रानें 'धि प्रास्पेक्ट ऑर धी व्ह्यू ऑफ धी मॉरल वर्ल्ड' या नांवाचें पत्र सुरू केलें व पुढें त्यांतूनच 'धी टेंपल ऑफ रीझन' नामक पत्राचा उदय झाला. ह्या पत्रांत ह्या वर्षाच्या फेब्रुवारीपासून पेननें लेख लिहिण्यास सुरवात केली. त्याचा पहिला लेख 'मॉडर्न इन्फायडेलिटी' (आधुनिक नास्तिकपणा) नामक एका व्याख्यानास उत्तर म्हणून लिहिलेला आहे. त्यांत त्यानें आपल्या आक्षेपकांस समर्पक कोटिक्रमानें कुंठित करून टाकलें आहे. याखेरीज त्यानें ह्या पत्रांतून अनेक महत्त्वाचे धार्मिक चर्चात्मक लेख लिहिले आहेत.

पेनचा फ्रान्सांतील मित्र निकोलस बोनेव्हिले हा अमेरिकेस येणार असल्याचा उल्लेख मागें एकदां आलाच आहे. पेन जेव्हां निघाला तेव्हां कांहीं कारणामुळें त्यास त्याच्याबरोबर येतां येईना; परंतु पेन अमेरिकेंत पोंचल्यावर लवकरच त्यानें आपलें कुटुंब व मुलेंबाळें पेनकडे पाठवून दिलीं. पेननें आपल्या बॉर्डनटौन येथील घरांत ही मंडळी ठेवली व तेथेंच मॅडम बोनेव्हिले हिला त्यानें फ्रेंच शिकविण्याच्या शिकविण्या मिळवून दिल्या. याखेरीज त्यांना अवश्य त्या वस्तु तो पुरवीत असे. परंतु मॅडम बोनेव्हिले हिला इंग्रजी भाषा येत नसल्यामुळें (पेन न्यूयॉर्कला आल्यावर) बॉर्डनटौन येथें राहणें तिला कंटाळवाणें वाटूं लागलें. म्हणून ती न्यूयॉर्क येथें राहिली. ह्या सुमारास पेन आणखी एकदां आजारी पडला असल्याचें त्याच्या पत्रव्यवहारावरून दिसतें. मॅडम बोनेव्हिलेच्या मागून लवकरच तिचा यजमान येणार होता; परंतु इ० स० १८०४ पर्यंत जेव्हां तो येईना तेव्हां त्याच्या कुटुंबाचा खर्च चालविण्याबद्दल पेनला बरीच काळजी उत्पन्न झाली. पुढें आणखी कांहीं कालानें तर असें कळून आलें कीं, निकोलस बोनेव्हिले यास राजकीय कारणामुळें फ्रान्स देश सोडतां येईना. मॅडम बोनेव्हिले हिला तर न्यूयॉर्क सोडण्याची इच्छा होईना, परंतु तिचीं मुलें तिला सोडून पेनजवळ राहण्यास कबूल होतीं; म्हणून त्यांना घेऊन तो न्यूरॉचेल येथील आपल्या मिळकतीच्या जागेंत राहाण्याकरितां गेला (इ०स० १८०५).मॅडम बोनेव्हिले मात्र एका लहान मुलासह न्यूयॉर्क येथें राहिली व तेथें पेननें तिला फ्रेंच भाषा शिकविण्याच्या शिकवण्या मिळवून दिल्या. तिच्या दोघां मुलांना त्यानें न्यूरॉचेल येथें शाळेंत शिकावयास पाठविलें. न्यूरॉचेल येथून तो मधूनमधून न्यूयॉर्क येथें येऊन कांहीं थोडे दिवस रहात असे. न्यूरॉचेल येथें येऊन राहिल्यावर पेननें आपल्या जमिनीची सुधारणा करून तेथें एक नवीन घर बांधिलें. ह्या घरांत असतांना एके दिवशीं मध्यरात्रीं त्याच्या एका कुळानें दुष्ट बुद्धीनें त्यास ठार मारण्याचा प्रयत्न केला; पण तो जागा असल्यामुळें तो फसून मारेकरी पकडला गेला व त्याजवर रीतीप्रमाणें काम चालून त्यास शिक्षा झाली. न्यूरॉचेल हें लहानसें गांव होतें, व तेथील हवापाणी फार चांगलें होतें. यामुळें तेथें येऊन राहिल्यावर पेनची प्रकृति आणखी जास्त सुधारली.

पेन जरी येथें शांततेचा उपभोग घेण्याकरितां म्हणून राहिला होता, तरी अमेरिकन राष्ट्रांतील बहुतेक महत्त्वाच्या घडामोडी व चळवळी यांशीं असलेला त्याचा संबंध तुटला नव्हता. त्याची अप्रतिहत चालणारी लेखणी येथूनही त्याचे विचार सर्व जगभर पसरवीत होती. 'गुलामांची मुक्तता,' 'लुशियाना,' 'डेमिंगो,' वगैरे संस्थांची व्यवस्था इत्यादि महत्त्वाच्या बाबतींत जेफर्सन यास त्यानें येथून पत्रद्वारें सल्लामसलत दिलेली आहे. तसेंच आपल्या राजकीय तत्त्वज्ञानाचा प्रसार करणारीं पत्रकेंही त्यानें येथून लिहिलेलीं आहेत. इ. स. १८०६च्या सुमारास पेनची सांपत्तिक स्थिति फार खालावली. त्याची प्राप्ति अगदीं बेताची होती. त्यास एकट्यास ती पुरली असती; परंतु मॅडम बोनेव्हिलेच्या मुलांचा वाढता खर्च त्यास चालवावा लागत असल्यामुळें त्यास पैशाची टंचाई पडूं लागली. तेव्हां त्यानें जेफर्सनला एक पत्र लिहून आपली स्थिति कळविली. त्याचा कितपत उपयोग झाला हें कळण्यास कांहीं साधन नाहीं. ह्या सुमारास पेननें 'पीतज्वराची सांथ व ती नाहींशी करण्याचे उपाय' व 'फ्री मेसनरी' या विषयांवर दोन पत्रकें प्रसिद्ध केलीं.

इ.स.१८०६मध्यें तर पेनची सांपत्तिक स्थिति फारच खालावली. मॅडम बोनेव्हिले हिच्या कुटुंबाचा खर्च चालविण्याकरितां त्यास ब्रॉर्डनटौन येथील आपलें घरदार विकावें लागलें! ही बाई फार खर्चिक स्वभावाची असून पेनजवळ जणुं काय पैशाची खाण आहे अशा भावनेनें वागत असल्यामुळें तिला वारंवार कर्ज होई व तें पेनला फेडावें लागे. तिचा नवरा राजकीय छळास बळी पडल्यामुळें त्याच्या कुटुंबाचें आपत्काळीं रक्षण करण्याचा बोजा मित्र या नात्यानें पेननें आपल्या शिरावर घेतला होता; परंतु तिला ह्या गोष्टीची जाणीव क्वचितच असे. तिच्या कर्जबाजारीपणामुळें पेनवर एकदां सावकाराची फिर्यादही झाली होती! त्याचा स्नेही कर्नल किर्कब्राइड हाही मरून गेला होता व त्याचे इतर अभिमानी व स्नेही त्याजपासून दूर अंतरावर—शहरांत—होते. या सर्व कारणांमुळें त्याला अमेरिकेचा कंटाळा येऊन फिरून एकवार युरोपमध्यें जाण्याची इच्छा झाली. ह्यावेळेस नेपोलियनची इंग्लंडवर स्वारी होणार असल्याबद्दल फ्रान्समध्यें चर्चा सुरू झाली होती. इंग्लंडवर स्वारी न झाल्यास फ्रान्स व इंग्लंड यांचा तह

होणार होता. ह्या तहाचे वेळीं अमेरिकन हितसंबंधाचें रक्षण करण्याकरितां शक्य असल्यास आपणांस फ्रान्समध्यें पुन्हा जाण्याची संधि देण्याबद्दल त्यानें जेफर्सन यास लिहिलें. परंतु पेनची ही इच्छा तृप्त व्हावयाची नव्हती. कारण त्याच्या चारित्र्याचा शेवट होण्याची वेळ नजिक येत चालली होती. त्यानें आपली सदर इच्छा १८०६ च्या जानेवारीअखेर जेफर्सन यास कळविली. त्याची ही इच्छा पूर्ण करण्याचा योग येईल कीं नाहीं, याचा निर्णय होण्यास आणखी ४।५ महिन्यांचा अवधि होता. त्या कालांत पेननें 'स्वप्नासंबंधीं एक निबंध' लिहून प्रसिद्ध केला. महत्त्वाचा असा त्याचा हा शेवटचाच लेख होय. कारण तो प्रसिद्ध झाल्यानंतर लवकरच त्याची प्रकृति फार बिघडली. १५ ऑगस्ट १८०६ रोजीं एका मित्रास लिहिलेल्या पत्रांत तो लिहितोः—

"आजपासून बरोबर तीन आठवड्यांपूर्वी मला एकाएकीं मस्तक-शूलाचा झटका आला व त्यानें मी अगदीं बेशुद्ध पडलों. माझी नाडी व श्वासोच्छ्वास हीं बंद झालेलीं पाहून माझ्या जवळच्या लोकांस मी मेल्याचा भास झाला. त्या दिवशीं माझी प्रकृति चांगली होती व जेवण करून मी नुकताच निजावयास जात असतां वाटेंतच एकदम माझ्या मस्तकांत कळ उठली व त्यासरशीं मी पायऱ्यांवरून धाडकन् खालीं आपटलों. त्यायोगानें माझें आंग फार दुखत आहे. मला बिछाना सोडवत नाहीं. परंतु इतक्या सर्व प्रकारांतून माझी बौद्धिकशक्ति अद्याप शाबूत राहिली आहे. जो प्रकार घडून आला तो मला मरणाच्या प्रयोगाप्रमाणें वाटला व आतां मला मृत्यूचें मुळींच भय वाटेनासें झालें आहे."

यापुढें त्यानें सदर पत्रांत आपल्या धार्मिक मतांचें समर्थन केलेलें आहे. पेन ह्या आजारांतून उठला; पण पुढें त्याची प्रकृतिमात्र दिवसानुदिवस क्षीण होत चालली. तशांत त्याच्या मनाला धक्का बसण्यासारखा आणखी एक प्रकार घडून आला. तो असा कीं, न्यूरॉचेल येथील ज्या भागांत तो रहात होता त्या भागातर्फे मत देण्याचा त्याचा अधिकार तो अमेरिकन रहिवासी नाहीं असें समजून तेथील इन्स्पेक्टरांकडून नाकबूल करण्यांत आला. तसें करण्यांत त्यांनीं मॉरिसच्या कृतीचा (फ्रान्सांतील

पेन प्रकरण) आधार सांगितला! ज्या राष्ट्राच्या स्वातंत्र्याकरितां व सुखाकरितां पेननें आपल्या तरुणपणीं अनेक प्रकारच्या आपात्ति भोगल्या त्या राष्ट्रांतील लोकांनीं त्याचा नागरिकत्वाचा हक्क नाकबूल करावा ह्यापरता दैवदुर्विलासाचा आणखी विलक्षण प्रकार कोणता असूं शकेल? परंतु ही गोष्ट कांहीं अंशीं अपरिहार्य होती. कारण पेन जेव्हां युरोपांतून अमेरिकेंत आला तेव्हां त्याच्या पिढीचे बहुतेक कर्ते व त्याची माहिती असलेले लोक मृत होऊन तेथें दुसरी पिढी उदयास येत चालली होती. या पिढीच्या लोकांस पेनची पूर्वीची कामगिरी व तिचें महत्त्व असावें तसें माहीत असण्याचा संभव नव्हता. त्यांतून न्यूरॉचेलसारख्या लहानशा गांवांत तर तो संभव खास नव्हता. तशांत तो अमेरिकेंत येतांच त्याच्या 'बौद्धिक युगां'-तील धार्मिक मतांमुळें जिकडे तिकडे त्याची नालस्ती चालू होती. कांहीं ठराविक मित्र व विचारी लोक यांखेरीज बहुतेक जनतेस त्याचीं तीं मतें आवडत नव्हतीं. अशा स्थितींत तेथील लोकांनीं त्याचा याप्रमाणें उपमर्द केल्यास त्यांत कांहीं फारसें नवल नाहीं. परंतु पेनला ती गोष्ट सहन होण्याजोगी नव्हती. त्यानें लागलीच व्हाइस प्रेसिडेंट मि० क्लिंटन यांस, मनरोनें फ्रान्सांत त्याची सुटका केल्याविषयींच्या पत्रव्यवहाराच्या नकला मागितल्या व ज्या इन्स्पेक्टरांनीं त्याचा हक्क नाकबूल केला त्याजवर दिवाणी कोर्टांत फिर्याद मांडली. परंतु या फिर्यादींत त्यास यश आलें नाहीं. जेफर्सन, मॅडिसन, क्लिंटन वगैरे पेनची मित्रमंडळी वरिष्ठ अधिकारी असतांना पेनला या बाबतींत कां व कसें यश आलें नाहीं तें कळण्यास मार्ग नाहीं. कारण ह्या प्रकरणाचे कागदपत्र नष्ट झाले आहेत.

अमेरिकेमध्यें पेन जेव्हां आला त्यावेळीं एक आयरिश गृहस्थही त्याच्याबरोबर आला होता; व त्यानें न्यूयॉर्क येथें 'The peoples friend' या नांवाचें एक पत्र काढलें होतें. त्या पत्रांत या सुमारास फ्रान्स व अमेरिका यांच्यामध्यें गैरसमज उत्पन्न करणारा एक पत्रव्यवहार प्रसिद्ध झाला होता. त्याचें खंडन करणें अवश्य वाटल्यावरून पेननें तें काम उत्साहपूर्वक केलें. हें खंडन त्यानें 'The public Advertiser' नामक पत्रांतून केलें. त्यामुळें हें पत्र फार लोकप्रिय होऊन त्याचा संपादक मि० फ्रँक व पेनचा शत्रू चिथॅम (अमेरिका सिटिझनचा संपादक) यांच्यामध्यें चुरस

उत्पन्न झाली. चिथॅमनें आपल्या पत्रांतून फ्रँक व पेन यांजवर हल्ले सुरू केले व पेननें त्यास यथायोग्य उत्तरेंही दिलीं. चिथॅमनें पेनवर 'दारूबाज-पणा'चा आरोप केला, तेव्हां पेननें त्याजवर अब्रुनुकसानीची फिर्याद केली. परंतु तिची चौकशी सुरू होण्यापूर्वींच पेनचें देहावसान झाल्यामुळें तो प्रश्न तसाच राहिला व चिथॅमला पेनची हवी तशी नालस्ती करण्याचा मार्ग खुला झाला !

प्रकरण १९ वें

अखेरचे दिवस व मृत्यु !

पेनच्या आयुष्याचे आतां थोडे दिवस उरले होते. इलिशावॉर्डच्या इन्स्पेक्टरांनीं त्याचा मत देण्याचा हक्क नाकबूल केल्यावरून त्यांजवर त्यानें केलेल्या फिर्यादीचा निकाल त्याच्याविरुद्ध झाल्यामुळें त्याचें मन साहजिकच खिन्न झालें. तशांत त्याची सांपत्तिक स्थितिही सारखी खालावत चालल्यामुळें तर त्याच्या मनाचें अस्वास्थ्य वाढतच गेलें. त्यानें ह्या सुमारास कॉंग्रेसकडून आपल्या पूर्वींच्या कामगिरीबद्दल हक्कानें मिळावयाचा पैसा मिळण्याबद्दल अर्ज केला (२१ जानेवारी सन १८०८). कॉंग्रेसनें त्याच्या देण्याचा विचार करण्याचें काम असल्याच प्रकारचीं कामें पाहणाऱ्या कमिटीकडे सोंपविलें. ह्या वर्षांत पेननें जेफर्सन यास फ्रान्स, इंग्लंड व अमेरिका यांच्या परस्पर तहप्रकरणीं दोन महत्त्वाचीं पत्रें लिहिलीं. राजकारणाच्या विषयावरील हीं त्याचीं शेवटचीं पत्रें होत. ह्या वर्षांत त्यानें आपल्या राहण्याचीं स्थानें दोन-तीन वेळ बदललीं. अखेरीस तो मॅडम बोनेव्हिले जेथें रहात होती त्या घरांत येऊन राहिला. १८०९ च्या जानेवारींत तर त्याची प्रकृति फारच क्षीण झाली. ह्या महिन्याचे १८ व्या तारखेस त्यानें आपलें मृत्युपत्र लिहिलें. त्यांत त्यानें आपली न्यूरॉचेल येथील जमीन व इतर मिळकत मॅडम बोनेव्हिले व तिचीं मुलें यांस दिली असल्याचें व आपलीं धार्मिक मतें मरेपर्यंत तशींच कायम असल्याचें नमूद करून ठेविलें. ता. १ फेब्रुवारी रोजीं कॉंग्रेसच्या कमिटीनें अमेरिकन क्रांतींत त्यानें बजावलेल्या कामगिरीचें महत्त्व कबूल केलें; परंतु कांहीं कायद्याच्या मुद्दयांवरून त्याची मागणी नामंजूर केली.* ता. २५ फेब्रु-

---

* इ. स. १७८२ मध्यें कर्नल लारेन्सच्या विनंतीवरून पेन फ्रान्सची अमेरिकेस मदत मिळण्याकरितां तेथें गेला होता. कर्नल लारेन्सची ही विनंति सरकारी रीतीनें केली असल्याची पेनची समजूत होती व त्यावेळीं त्याचा खर्च

वारीस त्यास ताप आला. अलीकडे कांहीं दिवस त्यानें मद्यस्पर्श केला नव्हता त्यावरून हा ताप आला, अशी त्याच्या स्नेह्यांची समजूत होऊन त्यांनीं त्यास मद्य पिण्याचा आग्रह केला. परंतु पुढें सुमारें पंधरा दिवसांनीं पेनला उदर झाल्याचीं चिन्हें दिसूं लागलीं. मॅडम बोनेव्हिले या दुखण्यांत पेनची शुश्रूषा उत्तम प्रकारें करीत होती. त्याचा न्यूयॉर्कचा मित्र डॉ० रोमेन हा त्यास औषधोपचार करण्याकरितां मुद्दाम त्याच्या घरीं येऊन राहिला होता. मरणसमयीं तरी पेनला आपल्या धार्मिक लेखांसंबंधीं व मतांविषयीं उपरति होईल, अशा भावनेनें कित्येक भोळेबापडे धर्मगुरु व बाया त्या दुखण्यांत त्याची गांठ घेण्याकरितां आल्या होत्या; परंतु त्यांपैकीं कोणाचीही त्यानें डाळ शिजूं दिली नाहीं. जून महिन्यांत त्याचें दुखणें वाढलें व ता. ८ जून १८०९ रोजीं सकाळीं आठ वाजतां त्याचें देहावसान झालें! मरणापूर्वीं कित्येक महिने पेन अंथरुणावर पडून होता. त्याला दुखण्यामुळें पुष्कळ वेदना होत असत; परंतु त्याबद्दल त्यानें केव्हांही खेद व्यक्त केला नाहीं. त्याचें मन अखेरपर्यंत शांत होतें. व मरेपर्यंत स्मृति व बुद्धिसामर्थ्य हीं कायम होतीं. मरणापूर्वीं थोडा वेळ त्यानें डॉ० रोमेन बरोबर वादही केला. मरणसमयीं त्याचें वय ७२ वर्षांचें होतें. पेनची प्रकृति मूळची फार कांटक होती, म्हणूनच तो तो इतक्या आपत्ति सोसूनही ७२ वर्षांपर्यंत जगला. पेन वारल्या-

---

व मुशारा कॉंग्रेसकडे बाकी येणें होता, त्याबद्दल पेननें मागणी केली. परंतु सदर विनंतीसंबंधीं कोणताही उल्लेख त्यावेळच्या सरकारी कागदपत्रांमध्यें नसल्यामुळें पेनची मागणी नामंजूर झाली. अध्यक्ष जेफर्सन यास ही गोष्ट माहीत होती; पण पेनच्या धार्मिक मतांमुळें लोकमत त्यास प्रतिकूल असल्यामुळें जेफर्सनची स्थिति फार नाजुक झाली व त्यायोगानें त्यास त्या बाबतींत पेनच्या वतीनें आग्रह धरितां येईना. सदर मागणी नामंजूर करतांना कमिटीनें त्याच्या कामगिरीबद्दल पुढील उद्गार मात्र नमूद केले.

"That Mr. Paine rendered great and eminent services to the United States during their struggle for liberty and independence cannot be doubted by any person acquainted with his labours in the cause and attached to the principals of the contest.

नंतर तिसरे दिवशीं (ता. १० जून) त्याचे मित्र त्याचें अखेरचें दर्शन घेण्याकरितां त्याच्या प्रेताभोंवतीं जमले व त्याच दिवशीं त्याचें प्रेत स्मशानांत नेण्यांत आलें. त्याचा दफनविधि मॅडम बोनेव्हिले व तिचा मुलगा बेंजामिन–हा पुढें अमेरिकन सैन्याचा जनरल झाला–यांनीं केला. त्यावेळीं मॅडम बोनेव्हिले पेनला–त्याच्या प्रेतावर माती टाकतांना उद्देशून म्हणाली, "ओ ! मिस्टर पेन, अमेरिकेच्या कृतज्ञतेची साक्ष म्हणून माझा मुलगा येथें उभा आहे व मी फ्रान्सकरितां उभी आहें." याप्रमाणें या थोर पुरुषाचा दफनविधि अगदीं साध्या रीतीनें करण्यांत आला. पेनच्या धार्मिक मतां-मुळें तो किती अप्रिय झाला होता याची कल्पना ह्या गोष्टीवरून चांगली होण्यासारखी आहे. परंतु ह्या गोष्टीचा वचपा पुढें लवकरच भरून निघाला. पेनच्या मृत्यूनंतर सर्व युरोपखंडांत व अमेरिकेंत त्याच्या धार्मिक व राजकीय मतांबद्दल बहुजनसमाजांत आदर उत्पन्न होऊं लागला. त्याच्या पश्चात् त्याचे शत्रु चिथॅम व कारव्हर यांनीं त्याची जाहीर रीतीनें मनसोक्त नालस्ती केली; परंतु त्यांनीं केलेले सर्व आरोप खोटे ठरले. पेनशीं प्रथम विरोध करणारा पण मागाहून त्याच्या मतांचा चहाता बनलेला कॉबेट (हा इंग्लंडचा रहिवासी असून लोकस्वातंत्र्याचा भक्त असल्यामुळें अमेरिकेंत येऊन राहिला होता.) यानें त्याच्या पश्चात् त्याचें एक चरित्र प्रसिद्ध केलें व त्याच्या राजकीय आणि धार्मिक मतांचें पुष्टीकरण केलें. कॉबेट हाही एक दीर्घोद्योगी व बडा ग्रंथलेखक होता. त्यानें निरनिराळ्या विषयांवर अनेक ग्रंथ लिहिले असून विचारस्वातंत्र्याकरितां त्यानें कारागृहवासही सोसलेला आहे. त्याच्या वेळीं त्याच्या लेखांस व मतांस बहुजनसमाजांत बराच मान असे. ह्या कॉबेटनें इ० स० १८१९ मध्यें रिचर्ड कार्लाईल व त्याची पत्नी ह्यांच्यामार्फत पेनच्या अस्थि इंग्लंडला नेल्या. त्याबद्दल ह्या उभयतांस अनुक्रमें तीन व दोन वर्षांची शिक्षा व १५०० व ५०० पौंड दंड झाला. परंतु यावेळीं पेनबद्दल इंग्लंडांतील मध्यमवर्गांत इतका आदर उत्पन्न झाला होता कीं, त्यांनीं ह्या शिक्षेबद्दल उपरोक्त पति-पत्नीस लेश-भरही वाईट वाटूं दिलें नाहीं. तीं जेव्हां सुटून आलीं तेव्हां लोकांनीं त्यांची उत्तम प्रकारें तरतूद केली. पुढें मिसेस कार्लाईलनें जेव्हां ह्या प्रकरणासंबंधीं पार्लमेंटकडे अर्ज केला तेव्हां त्या सभेचें व तेथील वाद-

विवादामुळें सर्व इंग्लंडचें लक्ष ह्या विषयाकडे वेधलें व पुढें लवकरच पेनच्या मतांचा तेथें विजय झाला.*

अमेरिकन लोकमतामध्येंही पेनच्या मृत्यूनंतर प्रतिक्रिया सुरू झाली व तेथेंही अखेर त्याच्या धार्मिक मतांचा विजय झाला. त्याच्या मृत्यूनंतर लवकरच न्यूयॉर्क येथें थिओफिलॅंथ्राफिक सोसायटीची स्थापना होऊन तिच्यामार्फत पेनचे ग्रंथ एकामागून एक प्रसिद्ध होऊं लागले व त्याच्याविषयीं तेथील लोकांत पुन्हा आदर उत्पन्न होऊं लागला. अमेरिकेचा एक अध्यक्ष–प्रेसिडेंट ॲंड्रू जॅक्सन–जज हर्टेल यास एकवार म्हणाला, "पेनला हातांनीं बनविलेल्या स्मारकाची जरूर नाहीं; त्यानें स्वातंत्र्यावर प्रेम करणाऱ्या सर्व लोकांच्या अंतःकरणांत आपलें स्मारक करून ठेवलें आहे."

लोकरीतीस अनुसरून पुढें पेनचें कृत्रिम (संगमरवरी पुतळा) स्मारकही करण्यांत आलें. ह्या स्मारकासंबंधाची गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे म्हणून ती येथें थोडक्यांत सांगतों. कॉबेट यानें न्यूरॉचेल येथील थडग्यांत असलेल्या पेनच्या अस्थि उकरून इंग्लंडला पाठविल्या त्या नोव्हेंबर ता. २१ रोजीं (१८१९) लिव्हरपूर येथें येऊन पोंचल्या. तेथें त्या समारंभानें पुरून त्यावर एक दगडी स्मारक उभारावें अशी कॉबेटची इच्छा होती.†

---

* मिसेस कार्लाईलच्या बहिणीलाही ह्या बाबतींत एक वर्षाची शिक्षा झाली होती. यावेळीं त्यांची शिक्षा भोगण्याकरितां अनेक स्वयंसेवक पुढें आले होते. यासंबंधानें एक इंग्रज लेखिका म्हणतेः—

"××× As they were arrested, volunteers came from all parts of the country to take their places ××× the gallent stand made by these devoted men and women purchased immunity for the "Age of reason" In England, where it has been freely sold in edition after edition ever since.

Mrs. H. B. Bonner

Editor, Paine's Life English edition,

† पेनच्या अस्थींसंबंधानें मित्राजवळ बोलतांना कॉबटन पेनबद्दल पुढील आदरयुक्त उद्गार काढले आहेत—

"I have just performed duty, gentlemen, which had been too long delayed; you have neglected too long the remains of Thomas Paine. I have done myself the honour

परंतु त्या आणून ठेवणारासच शिक्षा झाल्यामुळें कॉबेटची ही इच्छा पूर्ण झाली नाहीं. पुढें कॉबेट लवकरच वारला. तेव्हां त्यानें ती आपलीच मालमत्ता म्हणून तिचा मृत्युपत्रांत उल्लेख केल्यामुळें ती सरकारी रिसिव्हरच्या ताब्यांत गेली; परंतु त्यावेळच्या लॉर्ड चॅन्सेलरनें त्यांची गणना मालमत्तेंत करण्याचें नाकारल्यावरून एका जुन्या मजुरानें ती आपल्याजवळ ठेविली. तेथून ती १८४४ त बीटिले नामक एका दुकानदाराकडे आली. १८४९त त्याची रिकामी कॉफिन पेटी गे. चेनेल नामक एका गृहस्थाच्या ताब्यांत होती. त्यावरील चांदीच्या पत्रावर,"Thomas Paine,died June 8 1809, aged 72" हीं अक्षरें खोदलीं होतीं. इ. स. १८५४ त रेव्हरंड एनसीला यानें पेनच्या मस्तकाची कवची व उजवा हात आपलेपाशीं असल्याचें एका शोधकास सांगितलें;पण त्यानें अधिक माहिती देण्याची टाळाटाळ केली.

पेनच्या अस्थि इंग्लंडला गेल्याचें कळल्यानंतर अमेरिकेंत त्याबद्दल बरीच चळवळ झाली व पेनसंबंधीं लोकांचा उत्साह फारच वाढला. त्याच्या थडग्याचा राहिलेला अवशेष घेऊन त्यावर इ. स. १८३९ त गिल्बर्ट व्हेल व इतर फ्रीथिंकर्स (उदारमतवादी) यांनीं एक स्मारक उभारलें. पुढें इ. स. १९०० मध्यें डॉ० मॉनक्युअर कॉनवे नामक संशोधकानें (ह्यानेंच पेनसंबंधीं सर्व ऐतिहासिक कागदपत्र शोधून काढले) पेनच्या शिल्लक असलेल्या अस्थि, मज्जा व केंस हीं इंग्लंडांतून विकत आणलीं व नंतर पेनच्या स्मारकाबद्दल मोठी चळवळ होऊन उपरोक्त जुनें स्मारक १९०५ सालीं न्यूरॉचेलच्या मेयरनें जाहीर रीतीनें आपल्या ताब्यांत घेतलें. नंतर लागलीच डॉ० कॉनवेनें आणलेल्या वरील वस्तु एका कॉफिनमध्यें घालून त्यावर पहिलेंच स्मारक—पुतळा—करून उभारण्यांत आलें. मात्र तें पूर्वींच्या जागेपासूनच सुमारें ५० फूट अंतरावर

---

to disinter his bones. × × I have dug them up; they are now on their way to England × × × I shall cause them to speak the commonsence of the great man; I shall gather together the people of Liverpool and Manchester in one assembly with those of London, and those bones will effect the reformation of England in Church and state."

उंचशा जागेवर उभारलें. त्या समारंभाचे वेळीं अमेरिकन सरकारचेतर्फें कित्येक लष्करी तुकड्या व पांच तोफांचा एक तोफखाना हजर होता. नॅशनल गार्ड व वयोवृद्ध माजी वीरही त्या प्रसंगीं हजर होते. ज्या लोकांनीं जिवंतपणीं त्याचा छळ केला त्यांच्याकडून कालानें ह्याप्रमाणें त्याच्या अस्थींचा सत्कार करविला! ह्या सत्कारामुळें सदर लोकांनाही आपल्या राष्ट्राच्या एतद्विषयक पापाचें—कृतकर्माचें-पेनच्या छळाचें—क्षालन झालेंसें वाटून समाधान वाटलें.

पेनच्या निधनानंतर जशा त्याच्या अस्थि चहूंकडे परिभ्रमण करीत राहिल्या, तशींच त्याचीं मतेंही सर्व जगभर प्रसरण पावत गेलीं. त्यानें लिहिलेले लेख व प्रदर्शित केलेलीं मतें हीं सर्व मानवजातीच्या कल्याणास कारणीभूत होणारीं असल्यामुळें सर्व सुधारलेल्या जगांत आज त्यांचा पसार झालेला असून तीं पेनचें थोर व उदार अंतःकरण व्यक्त करीत आहेत. खिस्ती धर्मासंबंधीं व परमेश्वरासंबंधीं विद्वान् आणि चिकित्सक लोकांत जर कोणीं आस्तिक्यबुद्धि उत्पन्न केली असेल तर ती पेनच्या ग्रंथांनींच होय. पेनचें 'एज् ऑफ रीझन' (बौद्धिक युग) ज्यावेळीं प्रसिद्ध झालें, त्यावेळीं फ्रान्सांत जडवादाचें प्रस्थ माजून लोक नास्तिक बनत चालले होते. ज्या युरोपियन देशांत खिस्तीधर्म व बायबल प्रमाण मानलें जात असे, तेथील लोकांत खऱ्या धर्मभावनेपेक्षां धर्मवेडाची व धर्म-भोळेपणाची भावनाच जास्त प्रबल होती. व राजकीय सुधारणेच्या हेतूनें युरोपांत त्यावेळीं जी चिकित्सक प्रवृत्ति (Critical spirit) वाढत चालली होती, तिच्यापुढें वरील भावनेचा पूर्ण चक्काचूर होऊन सर्व युरोपखंड नास्तिक बनलें असतें. हा उत्पात पेनच्या 'बौद्धिक युगा'नें टाळला. ह्या ग्रंथांत, उपरोक्त चिकित्सक प्रवृत्तीच्या कसोटीस उतरणारी धार्मिक कल्पना त्या प्रवृत्तीच्या विवेचनशैलीस अनुसरूनच प्रस्थापित केलेली असल्यामुळें जडवादाच्या प्रसारास त्या ग्रंथानें चांगलाच आळा घातला. ह्यावरून पेननें ह्या ग्रंथाच्या द्वारें केवढें मोठें कार्य केलें आहे, याची कल्पना वाचकांस येईलच. मत्सर व स्वार्थपरायणता यांमुळें दुर्दैवानें ही गोष्ट तत्कालीन लोकांच्या लक्षांत आली नाहीं, आणि म्हणूनच त्यांनीं त्याबद्दल पेनचा छळ मांडला. पण पेनच्या मृत्यूनंतर

लवकरच लोकांना आपली चूक कळून आली व तेव्हांपासून त्यांच्या विचारांत क्रांति होऊन ते पेनबद्दल आदर व्यक्त करूं लागले. त्याच्या पुढील पिढींत तर ह्या आदरास पूज्यतेचें स्वरूप प्राप्त झालें आणि सध्यां जेथें जेथें म्हणून इंग्रजी व फ्रेंच भाषा बोलली जाते (बहुतेक सर्व पाश्चात्य देश ह्या व्याप्तींत येतात) तेथें तेथें पेनचें नांव आदरयुक्त रीतीनें उच्चारण्यांत येतें.

प्रकरण २० वें

उपसंहार.

गेल्या एकोणीस प्रकरणांतून थॉमस पेनचें जें चरित्र ग्रथित झालेलें आहे त्यावरून हें दिसून येईल कीं, पेन हा एक अद्वितीय युरोपियन तत्त्ववेत्ता व कार्यकर्ता होऊन गेला. लोकस्वातंत्र्य, समता, बंधुभाव, भूतदया, अखिल मानवसमाजाचें म्हणजे सार्वराष्ट्रीय ऐक्य, युद्धानिर्मूलन, सहिष्णुता, शुद्ध धार्मिकबुद्धि इत्यादि सात्त्विक व मानवसमाजाच्या उत्कर्षास आवश्यक असणाऱ्या भावनांचा त्यानें युरोपियन व अमेरिकन राष्ट्रांत प्रसार केला; आणि तेथील मानवसमाज जर आकुंचित स्वार्थबुद्धीच्या फेऱ्यांत सापडून विवेकभ्रष्ट झाला नसता तर त्यानें दाखवून दिलेलें मानवी उन्नतीचें ध्येय आज मनुष्यजातीच्या पुष्कळ आटोक्यांत आलें असतें. परंतु ज्या (विश्व-बंधुत्वाच्या) ध्येयासाठीं त्यानें इतक्या खस्ता खाल्या व कष्ट सोसले तें ध्येय आजही त्याच्या काळाइतकेंच–किंबहुना त्यापेक्षांही अधिक दूर होऊन बसलें आहे. युरोप व अमेरिका येथें सध्यां पैसा हाच देव बनून राहिल्या-मुळें त्या पैशाच्या लोभास्तव साम्राज्यवादानें तिकडील बुद्धिमान समाज बेहोष बनला आहे. त्या कारणानें नानाप्रकारचीं भीषण व सद्‌बुद्धीस अव-नत दशेस पोंचविणारीं कृत्यें तो समाज करून राहिला आहे. समता, भ्रातृभाव, लोकस्वातंत्र्य यांच्याऐवजीं एक बलाढ्य श्रीमानांचा वर्ग व दुसरा कंगाल व गुलामांचा वर्ग अशी मानवसमाजाची विषम विभागणी आज जगभर होऊन बसली आहे. हा देखावा पाहण्यास जर थॉमस पेन येऊं शकता तर तो पाहून त्याचें मन विषण्ण झाल्यावांचून खास राहिलें नसतें ! त्याच्या काळापेक्षांहि आजच्या युरोप-अमेरिकेंतील मानवसमाजानें शास्त्रीय ज्ञानांत व कलेंत फार मोठी प्रगति केली आहे यांत शंका नाहीं. परंतु ह्या ज्ञानाचा व विद्येचा उपयोग त्यांनीं केवळ आत्मप्रतिष्ठा व भोग-लालसा वाढविण्याकडे केल्यामुळें त्यांची धार्मिक व नैतिक भावना शिथिल होऊन गेली व ज्या सत्ययुगाची अपेक्षा पेन करीत होता तें त्यांच्यापासून दुरावलें आहे ! युरोप-अमेरिकेंतील सद्यःस्थितीचें चित्र विलफर्ड वेलॉक नामक एका विचारी इंग्रज ग्रंथकारानें पुढीलप्रमाणें रेखाटलें आहे:—

"In each country the pace has been set by the more aggressive spirits, with the result that a life of materialistic self-aggrandisement has become the fashion, involving perennial social and international warfare, bitter conflict between top dogs and bottom dogs, rich and poor, rival financial groups, national. & international ××× The dominant class, by reason of their enormas wealth, are able to control the situation, in as much as they are in possession of the Chief agencies of education -the press, the pulpits and the schools. It is thus comparatively easy for them to dominate the nations' political machines, governments etc. ××× Poverty and the fear of poverty are driving the masses also intc selfishness and materialism ××× And the Churches alas! are among the defenders of this materialism, being ready supporters of Governments who carry out policies of revenge, exploitation and repression, no matter at what cost in bloodshed. ××× The crude materialism of the 19th century, with its utilitarian science and its colossal armies and navies, has perverted the immagination of the modern world, ××× has converted life into a battlefield, man into a mere unit of economise force, a machine for making riches, and Gcd into a dull partisan whose Chief function is to create and protect millionaries.

(भावार्थः-प्रत्येक देशांत चढाई व बढाईखोर लोकांचें प्रस्थ माजलें

असून जडवादात्मक आत्मप्रौढी–बढाई–वाढविणें हाच त्यांचा धंदा होऊन बसला आहे; त्यामुळें सामाजिक व आंतरराष्ट्रीय कलहास ऊत येऊन वरिष्ठ (श्रीमंत) व कनिष्ठ (दरिद्री) वर्गांत तीव्र झगडा सुरू झालेला आहे. पैशाच्या बळावर वरिष्ठ वर्गानें राष्ट्राच्या सर्व नाड्या आपल्या हातीं खेंचून घेतल्या आहेत; शिक्षणसंस्था, वर्तमानपत्रें, पाठशाळा, धर्मपीठें इत्यादि राष्ट्रीय जीवनांचीं मूलस्थानें त्यांनीं पैशाच्या जोरावर आपलीशीं केलीं असल्यामुळें राष्ट्राचें राज्ययंत्र व सरकारी धोरण यांवर आपला पगडा बसविणें त्यांस सुलभ झालें आहे. XXX दारिद्र्याच्या भीतीमुळें बहुजनसमाजही स्वार्थपरायण व जडवादी बनत चालला आहे. XXX आणि दुःखाची गोष्ट ही कीं, धर्मपीठेंही या जडवादाचा पुरस्कार करून, मनुष्यहानि व रक्तपात यांविषयीं बेफिकिरीची वृत्ति बाळगून जुलूम, लूट व सूड या हेतूनें प्रेरित झालेल्या राजधोरणास उचलून धरीत आहेत ! XXX एकोणिसाव्या शतकांतील या विक्षिप्त जडवादानें व तदंतर्गत शास्त्रीय प्रगतीनें आधुनिक जगाची कल्पनाशक्ति विकृत करून टाकली आहे; मानवी जीवनास कलहाचें ग्रहण लावलें आहे; मानवाला आर्थिक शक्तीचा दास बनविलें आहे ! आणि ईश्वराला पक्षपाति बनवून लक्षाधीशांची पैदास करणें व त्यांचें रक्षण करणें या कामावर नेमलें आहे !)

फ्रान्स, अमेरिका, इंग्लंड, येथें थॉमस पेनच्या काळांत जी एक उदारमतवादित्वाची लाट उसळली होती तिला खुद्द पेनच्या हयातींतच उतरतीकळा लागली होती, असें त्याच्या चरित्रांतील अखेरच्या भागावरून दिसून येतें. त्याच्या मृत्यूनंतर शंभर वर्षांत इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, इटली व खुद्द अमेरिकन संयुक्त संस्थानांतही राजांचा व धर्मगुरूंचा जुलूम आणि एकतंत्री सत्ता यांचा लय होऊन लोकसत्तेचा कांहींसा उत्कर्ष 'प्रातिनिधिक' तत्त्वाच्या अनुरोधानें झाला हें खरें; परंतु त्यामुळें अखिल मानवसमाजाचें कल्याण व सुख संपादन होऊं शकलें नाहीं. अर्थात् पेनची विश्वबंधुत्वाची कल्पना जागच्याजागींच राहिली ! तथापि त्यामुळें त्याच्या प्रतिपादनाचें व तदनुसार त्यानें केलेल्या कृतीचें व प्रयत्नांचें महत्त्व कमी होऊं शकत नाहीं. पेननें प्रतिपादिलेलीं तत्त्वें जरी युरोपियन व अमेरिकन लोकांना सर्वस्वीं ग्रहण करतां आलीं नाहींत

तरी त्या तत्त्वांचा पुरस्कार करणाऱ्या विचारी लोकांची संख्या त्यांच्या समाजांत एकसारखी वाढतच आहे व आजकाल तर सर्व सुधारलेल्या राष्ट्रांतील विचारी लोकांचें लक्ष त्या तत्त्वांकडेच लागून राहिलेलें आहे. आणि मानवसमाजाची खरी उन्नति व कल्याण त्याच तत्त्वांच्या प्रसारावर अवलंबून असल्याबद्दल या सर्वांची एकवाक्यता होऊं पहात आहे. पाश्चात्य देशांत सध्यां जें जडवादाचें व भौतिक सुखाचें प्रस्थ माजलें आहे तें आत्मघातकी आहे अशी तिकडील विचारी लोकांची खात्री होत चालली असून जे कोणी सुखाच्या आशेनें त्यांत गुरफटले आहेत त्यांचीही खऱ्या सुखाविषयीं निराशा होऊं लागली आहे! तथापि त्यापासून एकदम पराङ्मुख होण्याची त्यांस इच्छा होत नाहीं व मानवी मनाच्या उत्क्रांतीच्या इतिहासाकडे लक्ष दिल्यास असें होणें साहजिक आहे, हें लक्षांत येईल. युरोपियन समाजाच्या उत्क्रांतीचें दिग्दर्शन उपरोक्त विलफर्ड वेलॉक यानें 'दि स्पिरिच्युअल बेसिस ऑफ डिमॉक्रसी' या ग्रंथांत फार नामी केलें आहे. तो असें म्हणतो कीं, "जगांत आज सर्वत्र एकसारखी धार्मिक ऊर्फ आध्यात्मिक भावना जागृत न होण्याचें कारण असें आहे कीं, मानवसमाजांतील निरनिराळे वंश एकाच वेळीं व एकाच पद्धतीनें सुसंस्कृत होऊं लागले नाहींत. एक मानववंश सुधारणेच्या शिखरास पोंचून वैभव भोगून पुन्हा अधोगतीस पोंचतो तों दुसरा सुधारणेच्या प्राथमिक अवस्थेस आरंभ करितो व पुन्हा पहिल्यानें चोखाळलेलाच मार्ग क्रमानें चोखाळीत जातो. याच पद्धतीनें रोमन संस्कृति नामशेष झाली तेव्हां टयूटॉनिक लोकांची संस्कृति उदयास आली. रोमन संस्कृति भरांत होती तेव्हां टयूटन लोक अर्धवट रानटी स्थितींत होते. त्यांनीं खिस्ती धर्माचा स्वीकार जरी केला होता तरी त्या धर्माचीं खरीं तत्त्वें आकलन करण्याचें सामर्थ्य त्यांच्या बुद्धीचे ठायीं अद्याप निर्माण झालें नव्हतें. सुमारें तेरा शतकेंपर्यंत ते केवळ नामधारी खिस्तीधर्मानुयायी होते. पुढें त्यांना हळुहळू त्या धर्माच्या तत्त्वज्ञानांतील खरें रहस्य कळूं लागलें तें फक्त कांहीं थोड्या लोकांस कळूं लागलें; व या विसाव्या शतकांत आतां तें बऱ्याच मोठ्या जनसमूहास कळूं लागलें आहे. या सर्वकाळांत कांहीं थोडे दूरदृष्टीचे महात्मे व सत्पुरुष निर्माण होऊन त्यांनीं आपल्या समाजांत आध्यात्मिक वातावरण उत्पन्न

करण्याचा प्रयत्न केला; परंतु समाजांतील बहुजनसमाजाची मानसिक उन्नति व सांस्कृतिक दर्जा कनिष्ठ प्रतीचा असल्यामुळें त्यांचे उच्च विचार व कल्पना त्यांना चटकन् व सहज रीतीनें ग्रहण करितां आल्या नाहींत." या उताऱ्यांत ज्या थोडया दूरदृष्टीच्या महात्म्यांचा उल्लेख केला आहे त्यांत थॉमस पेनची गणना होते. त्याचे तात्त्विक विचार युरोप व अमेरिकेंतील टयूटन लोकांच्या तत्कालीन समाजास कां ग्रहण करतां आले नाहींत याचाही खुलासा सदर उताऱ्यावरून होण्यासारखा आहे. टयूटानिक लोकसमाजाला आध्यात्मिक वृत्तीचें रहस्य कळण्यासारखी स्थिति सध्यां प्राप्त झाली आहे असें वेलॉक म्हणतो, परंतु वस्तुस्थितीकडे पाहिलें तर त्याचें तें म्हणणें आजही पुष्कळ मर्यादित करावें लागेल असें वाटतें. गेल्या महायुद्धानें युरोपियनांच्या भौतिक संस्कृतीचें वैय्यर्थ जरी टयूटन लोकांच्या नजरेस येऊन चुकलें असलें तरी त्या संस्कृतीच्या जंजालांतून त्यांची कायमची मुक्तता होण्यापूर्वीं आणखी एकदोन महायुद्धें व्हावींत असा रंग दिसत आहे; कारण रक्ताला लालचावलेला क्रूर प्राणी अखेरीस स्वतःचें रक्त पिण्याची पाळी आल्याशिवाय शांत होत नाहीं असाच सर्वसाधारण सृष्टिक्रम असल्याचें दिसून येतें. वेलॉक म्हणतो:—

"Western civilisation is doomed, for having transformed society into a den of lions, it will itself perish, as the lions, having devoured everything else will end by devouring themselves."

"इतर दुर्बल मानवसमाजाची पाश्चात्यांच्या अघोर भौतिक तृष्णेस आहुति पडल्यावर आपापसांत यादवी माजून ते परस्परांसच खाऊं लागतील," हें अगदीं खरें आहे. परंतु ही वेळ येईपर्यंत दुर्बल समजल्या गेलेल्या मानवसमाजांनीं हताश होऊन बसावयाचें कीं काय ? या प्रश्नाचें उत्तर पेननें आपल्या कृतीनें दिलेलें आहे. तो जरी विश्वबंधुत्वाचें ध्येय प्रतिपादित होता तरी भोंवतालच्या स्थितीकडे त्याचें दुर्लक्ष झालेलें नव्हतें, हें अहिंसावादी क्वेकर लोकांशीं त्यानें केलेल्या बुद्धिवादावरून व गरिबांचा वाली या नात्यानें स्वतः शस्त्र व लेखणी धारण केली यावरून कळून

येईल. चांगल्या व उच्च तत्त्वांची नुसती घोषणा केल्यानें मानवी सुधारणा होत नसून तीं तत्त्वें अंमलांत आणण्याकरितां धर्म व समाज-सुधारकानें स्वतः मानवी प्रपंचांत लक्ष घालून कष्ट व सायास केले पाहिजेत; व प्रसंगीं अनेक प्रकारच्या आपदा भोगून ध्येयच्युति न होऊं देतां केवळ बंधुप्रेमानें प्रेरित होऊन आपलें प्राप्त कर्तव्य ऊर्फ नियतकर्म बिनचूक केलें पाहिजे हें त्यानें आपल्या उदाहरणानें सिद्ध करून दिलें. आपल्या कल्पना भोंवतालच्या लोकांस नीट ग्रहण करतां येत नाहींत म्हणून पुष्कळ वेळां त्याची निराशा झाली व त्यामुळें तो खिन्नही होई; परंतु त्यानें आपलें कर्तव्य कधींही सोडलें नाहीं. फार काय, पण त्यानें आपलें कर्तव्य केलें याची जाणीवही त्याच्या कांहीं बांधवांनीं बाळगिली नाहीं; व अज्ञानामुळें कित्येक कृतघ्नही बनले; पण त्याबद्दलही फारसा विषाद न मानतां त्यानें आपलें कार्य मरेपर्यंत चालूच ठेवलें! त्याची ही कार्यनिष्ठा खरोखरच वाखाणण्यासारखी असून अनुकरणीय आहे. खालावलेल्या अथवा उदयोन्मुख राष्ट्रांतील लोकांस त्याचें चरित्र अत्यंत बोधप्रद व मार्गदर्शक होणारें आहे. त्याच्या आयुष्यांत राजकीय, सामाजिक व धार्मिक सुधारणेचे अनेक निरनिराळ्या प्रकारचे प्रसंग उत्पन्न झाले, व त्या त्या वेळीं त्यानें मानवी उन्नतीच्या दृष्टीनें योग्य असे मार्ग स्वीकारून त्या सुधारणेस इष्ट असें वळण लावलें. प्रसंगवैचित्र्य, समाजवैचित्र्य आणि ध्येयवैचित्र्य यांनीं त्याचें चरित्र भरून गेलेलें आहे व त्या सर्वांचा यथोचित परामर्ष घेऊन त्यानें आपलें बुद्धिकौशल्य उत्तम प्रकारें प्रगट केलें आहे. आणि याच कारणामुळें मुख्यतः डॉ० कॉनवेसारख्या चतुरस्र व बुद्धिप्रामाण्य-वादी विद्वानानें त्यास अवताराची उपमा दिली आहे. ती आम्हां आर्य-संस्कृतीच्या लोकांस जरी फारशी सार्थ वाटली नाहीं तरी त्यावरून तो असाधारण कोटींतील मनुष्य होता हें स्पष्ट होण्याजोगें आहे. पाश्चात्य राष्ट्रांतील मानवसमाजास उन्नतीच्या शिखराकडे पोंचविण्याचें महत्कार्य तिक-डील ज्या थोर पुरुषांनीं केलें त्यांत पेनची गणना अग्रभागीं केली जाते आणि मानवीसमाजाच्या दास्यविमोचनाचा व उन्नतीचा संकलिक इतिहास जेव्हां लिहिला जाईल, तेव्हां त्यांत पेनच्या कर्तबगारीस महत्त्वाचें स्थान मिळेल यांत तिळमात्र शंका नाहीं.

संपूर्ण